म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. 3202

अबला होई प्रबला



REFBK-0025765

चपा लिमये

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

25 JAN 1989
1 FEB 1989
15 FEB 1989
16 APR 1989
23 JUL 1989
1 NOV 1989
14 DEC 1989
3 JAN 1990
23 MAY 1990
10 JUN 1990
19 MAY 1993

(क्र. मा. पहा)
५०००–११–८६

अबला होई प्रबला

चंपा लिमये

REFBK-0025765

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार पेठ, पुणे ३०

प्रकाशक
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

© चंपा लिमये

प्रथमावृत्ती

प्रकाशनकाल
१५ सप्टेंबर १९८८

मुखपृष्ठ : सुभाष अवचट

मूल्य चाळीस रुपये

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
'शिव-पार्वती'
४६१/४ सदाशिव पेठ
पुणे ३०.

स्त्रीजीवनाला अंधारातून
प्रकाशाकडे नेणाऱ्या
सर्व थोर समाजसुधारकांना
सादर समर्पण



दोन शब्द

विविध प्रसंगी लिहिलेल्या काही लेखांचे हे संकलन आहे. यातील सर्व लेख महिला जीवनाला स्पर्शून जाणाऱ्या समस्यांविषयीचे आहेत. स्त्री-मुक्तिआंदोलनावरील लेख आंतरराष्ट्रीय महिलावर्षाच्या निमित्ताने 'स्त्री' मासिकाने मागितला होता. अविवाहित मातृत्वासारख्या नाजूक प्रश्नावरील लेख 'धर्मयुग' या हिंदी साप्ताहिकाच्या मागणीवरून लिहिला होता. त्यावर अनेक वाचकांच्या प्रतिक्रिया आल्या होत्या. देवराळाच्या अमानुष सती प्रकरणामुळे मनात विचारांचा आगडोंब उसळला. त्यातूनच 'सती व धर्म' या लेखाची निर्मिती झाली. श्री. लक्ष्मण माने यांच्या 'चंद दरवाजा'मुळे भटक्या विमुक्त जमातीतील रूढीच्या भयानक दडपणाखाली भरडल्या जाणाऱ्या स्त्री-जीवनाची व्यथा समजली तर केवळ उच्चभ्रू महिलांच्या मनोरंजनापेक्षा दुःखी स्त्रियांची आसवे पुसणाऱ्या, त्यांना धीर देऊन खंबीर बनविणाऱ्या, वेगळ्या वाटा चोखाळणाऱ्या काही महिला संघटनांच्या कार्याचे स्वरूप काय असते ते जाणून घेण्याचा प्रयत्न एका लेखातून केला आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत महिलांनी सक्रिय सहभाग घेतला. आफ्रिकेतही महिलांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. यावर काही लेखांची उभारणी केलेली आहे. स्त्रियांच्या कायदेमंडळातील कार्याचा आढावा एका लेखातून घेतला आहे. युसिसने अमेरिकेच्या स्वातंत्र्याच्या द्विशताब्दी महोत्सव प्रसंगी काढलेल्या विशेषांकासाठी 'अमेरिकेतील महिला' हा लेख मी तयार केला. युरोपखंडातून

अमेरिकेला गेलेल्या स्त्रियांच्या प्रारंभीच्या खडतर जीवनापासून आधुनिक अमेरिकन महिलांच्या जीवनाचा आलेख या लेखातून काढला आहे. याशिवाय अनेक मासिकांनं आयोजित केलेल्या परिचर्चांसाठी काही लेखांतून आपले विचार मी व्यक्त केले आहेत.

जी माता बालकाचे नऊ महिने आपल्या कुशीत भरणपोषण करते, अतीव प्रसूतिवेदना सहन करून त्याला जन्म देते, हाताचा पाळणा आणि डोळ्यांचा दिवा करून त्याचे संगोपन करते, त्याला जीवनामृत पाजून वाढवते त्या मातेचे नाव बालकाने लावण्यात औचित्य नव्हे का ? या संदर्भात श्री. मधु लिमये यांनी लोकसभेत एक विधेयक सादर केले होते. त्यावरून ' मातेचे नाव—माझे नाव ' हा लेख लिहिण्याची कल्पना सुचली.

अशा प्रकारे स्त्री-जीवनाला व्यापून टाकणाऱ्या काही समस्यांसंबंधीचे माझे विचार या लेखसंग्रहातून मी मांडले आहेत. विविध मासिकांच्या व वृत्तपत्रांच्या संपादकांनी या लेखांना यथोचित प्रसिद्धी दिली. त्यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांची मनःपूर्वक आभारी आहे श्रीविद्या प्रकाशनाचे श्री. मधुकाका कुलकर्णी यांच्या प्रयत्नांमुळे संग्रहरूपाने हे लेख प्रसिद्ध होत आहेत. त्यांच्याविषयीची कृतज्ञता शब्दातून व्यक्त करणे अवघड आहे. त्यांचे प्रोत्साहन सदैव लाभावे हीच इच्छा.

१ ऑगस्ट १९८८

चंपा लिमये

चंपा लिमये ६, रचना ३३ पेरी क्रॉस रोड बांद्रा, मुंबई ४०००५०

अनुक्रमणिका

१	बंद दरवाज्यामागील स्त्रीचा आक्रोश	१
२	महिला संघटनांच्या कार्याची नवी दिशा	७
३	अविवाहित मातृत्व : एक नाजूक विवाद्य परंतु मानी प्रश्न	२०
४	नव्या पायवाटा	२९
५	हरित क्रांतीची चाहूल	३३
६	ज्यासि आपंगिता नाही	३७
७	स्त्रीमुक्ती आंदोलनाची वाटचाल	४२
८	कायदे मंडळातील महिलांची कामगिरी	५४
९	अमेरिकेतील महिला	६६
१०	सामाजिक अधःपतन आणि आजची स्त्री	७९
११	आजची तरुणी मोहाच्या मृगजळामागे धावते आहे का ?	८५
१२	मातेचे नाव : माझे नाव	९४
१३	गांधीजींचे राजकारण आणि महिला	१०४
१४	राजकीय क्षेत्रातील भारतीय महिलांचे स्थान : कालचे आणि आजचे	११२
१५	सार्वजनिक चळवळीतील महिलांचे स्थान	११७
१६	तेजस्विनी वा–मानवतेची स्नेहल ज्योत	१२४
१७	स्त्री–स्वातंत्र्य	१३०
१८	सती आणि धर्म	१३५

बंद दरवाज्यामागील स्त्रीचा आक्रोश

तशी तर भारतीय स्त्रीजीवनाची कहाणी "अबला जीवन हाय! तुम्हारी यही कहानी। आंचलमें है दूध और आंखोंमें पानी।" या शब्दात सांगितलेली आहे. त्यातही शिकल्यासवरलेल्या, उच्चवर्गीय स्त्रियांचे जीवन काही अंशी.भिन्न असते. पण दारिद्र्याच्या खाईत होरपळणाऱ्या स्त्रियांचे जीवन रूढींमुळे किती बिकट झालेले असते! दलित स्त्रीच्या नशिबी येणारे भोग तर किती तरी भयंकर असतात– कल्पनेपलीकडले असतात. याचे काही मासले आपल्याला वाचायला मिळतात. सुप्रसिद्ध मराठी लेखक श्री. लक्ष्मण माने यांच्या 'बंद दरवाजा' या पुस्तकातून आपल्यासमोर असा एक दरवाजा उघडला जातो की त्यात डोकावून पाहिले तर भटक्या, विमुक्त जातींच्या जीवनाशी आपली थोडी ओळख होते. 'उपरा' नावाच्या आत्मकथेमुळे लक्ष्मण माने यांनी नाव मिळवलंय. 'बंद दरवाजा' ह्या पुस्तकातून त्यांनी भटक्या जातिजमातींच्या जीवनाचा वेध घेतलेला आहे. त्या त्या जातिजमातींतील कार्यकर्त्यांमार्फत त्यांनी त्यांच्या जीवनाशी समरस होण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या जीवनातील सुखदुःखे, अडीअडचणी, रूढी, समजुती यांचे दर्शन त्यांनी घडविले आहे ते विलक्षण भेदक आहे, दाहक आहे

यातल्या काही जमाती गुन्हेगार समजल्या जात. दिवसातून ३–४ वेळा

त्यांना पोलिस ठाण्यावर हजेरी द्यावी लागे. त्या दांपत्याच्या पोटी जन्माला आलेल्या अश्राप बालकांच्या कपाळावर देखील गुन्हेगारीचा शिक्का जन्मापासून मारला जातो. कधी आईला एका जिल्ह्यात प्रवेश करायची बंदी असते तर कधी बाप दुसऱ्या जिल्ह्यातून तडीपार झालेला असतो. त्या दोघांना एकमेकांना भेटायचे असले तर त्यांना तिसऱ्याच जिल्ह्यात जावे लागते.

या जातीतील स्त्रियांच्यावर काय बेतते ते पाहिले तर आपण थक्क होतो, आपल्याला धक्काच बसतो. एखाद्या स्त्रीच्या चारित्र्याविषयी जरा शंका आली तरी जातपंचायतीसमोर तिला अग्निदिव्य करावे लागते. उकळत्या तेलाच्या कढईतून तिने रुपया काढायचा. डोळे गच्च मिटून, देवाचे नाव घेऊन तिला उकळत्या तेलात हात घालावा लागतो. त्या हाताचं भाजून वांग झालं की ती स्त्री बेइमान, बदचलन ठरते. सर्वजणी काही सीतेसारख्या भाग्यवान नसतात. हात भाजल्यावर त्या स्त्रीला कलंकिनी ठरवून जातीबाहेर काढायचं. मग तिचं जिणं कठीण. ती मेली की जगली तरी कोणी तिच्याकडे जरासुद्धा लक्ष देत नाही.

गोपाळ जातीतले लोक भीक मागून आणलेली भाकरी खातात. सकाळची भाकरी संध्याकाळी खात नाहीत. ती पशुपक्ष्यांनाही खाऊ घालत नाहीत. जमिनीत खड्डा खणून पुरून टाकायची. कोल्ह्याकुत्र्याला घालायची नाही. धरित्रीला दान करायचं. असंग्रह हे त्यांचं व्रत. मागून खायचं. उरलंसुरलं धरती मातीला अर्पण करायचं. या जमातीत कुलटा ठरलेल्या स्त्रीला जातीबाहेर काढायचं म्हणजे तिला पंचइतीत बसवून तिचे केस कापून तिच्या डोक्याचा भुंडा नारळ बनवितात. त्याला तेलचुना फासतात. कपाळाचं कुंकू पुसून तिथे शेण फासतात. तिच्या आईवडलांना बोलावून त्यांच्याकडून दंड वसूल करतात. तिला पालथी पाडतात. आई हात धरते. भाऊ पाय धरतो. आणि बाप मानेवर, कमरेवर, गुडघ्यावर, घोट्यावर कुऱ्हाड मारल्याप्रमाणे अभिनय करतो. बाई रडत असते. आता ती जीवनातून पुरी उठली. सर्व नातेवाईक तिला शेवटचं बघतात. मढ्याला-प्रेताला खांदा द्यावा तसे तिला अखेरचे उचलतात. बाप तिला गाढवावर उलटी बसवून गावाच्या सीमेबाहेर नेऊन सोडतो. मग जन्मात तिचं तोंड कुणी पाहात नाही. बाई कशी धुतल्या तांदळासारखी हवी ! दिल्या घरी तिनं सुखानं नांदलं पाहिजे. चुलीतले लाकूड चुलीतच जळलं पाहिजे. नाहीतर तिची अशी

ही दुर्गती व्हायची.

वैदू जमातीत स्त्रीच्या तोंडून काही वेडेवाकडे शब्द निघून गेले तर तिच्या जिभेला डाग देतात. तिने डोळ्यांनी कुणाला खूण केली असेल (नेत्रपल्लवी) तर तिच्या डोळ्यांना डाग देतात. कानानी काही वेडवाकडं ऐकलं असलं तर तिच्या कानात उकळते तेल ओततात. तिचा परपुरुषाशी संबंध आला असेल तर तिच्या योनीवर डागतात. शिवाय उकळत्या तेलाचे अग्निदिव्य तर आहेच. त्यातून तर निरपराध माणूस देखील अपराधी ठरायचा.

जर एखाद्या स्त्रीचा आपल्या मुलाशीच लैंगिक संबंध आला असला तर किंवा तसा तिच्यावर आरोप आला असला तर तिला अतिशय कठोर शिक्षा फर्मावण्यात येते. पंच मातीचा ढीग करून त्यावर मूत्र विसर्जन करतात. ती माती कालवून तिला त्याचे पाच उंडे बनवावे लागतात. त्याच्या भाकरी थापण्याचा आदेश तिला देण्यात येतो. नंतर पेल्यात ठेवलेल्या लघ्वीने तिला हात धुवावे लागतात. मग तिला मांजरी हडळ ठरवतात आणि पंचाहत्तर हजार रुपयांचा दंड ठोकतात. तो पुढे पिढ्यान्‌पिढ्या फेडायचा. पुढच्या पिढीतील मुलींची लग्न पंचाच्या संमती-खेरीज व्हायची नाहीत.

कंजारभाट जमातीत असा रिवाज आहे की, लग्नाच्या पहिल्या रात्री नवरा-नवरीला एका स्वतंत्र खोपटात झोपायला पाठवतात. बाहेर सारं वऱ्हाड रात्रभर जागता पहारा ठेवतं. सगळ्यात वडीलधारी स्त्री लग्नानंतर नवऱ्यामुलीला एक पांढरंशुभ्र फडकं देते. रात्री पतीशी संभोग करताना त्याचा वापर करायचा म्हणून तिला सांगण्यात येते. दुसऱ्या दिवशी त्या कापडाची परीक्षा करतात. त्यावर रक्ताचे डाग आढळले तर ठीक. तिच्या अक्षत कौमार्याची, ती अनाघ्रात पुष्प असल्याची साक्ष पटते, नाहीतर तिचा उभा जन्म उन्हात जायचा. सुहाग-रात्रीनंतर दुसऱ्या दिवशी नवरदेवाला विचारतात, "का रे बाबा, तुझा माल तुला खरा मिळाला की खोटा?" मुलीच्या निष्कलंक चारित्र्याची खात्री पटली तर सुखाचा संसार, नाहीतर नवरा मुलगा म्हणतो, "तुमी जातगंगा हाय. ही वाहर्तागंगा हाय. चुकलंमाकलं मी पदरात घेतो. माझी काय तक्रार नाय." मग मुलगी नांदायला जाते सासरी. पण ती जन्मभर कलंकित ठरते. तिचे जीवन अभिशप्त होते. सर्वांना सदैव तिचा संशय येतो. तिच्या चारित्र्याचे आयुष्यभर धिंडवडे निघतात. घरातली गृहिणी वाईट चालीची असली तर

कुलदैवताचा कोप होतो अशी समजूत आहे. घरातलं कुणी माणूस किंवा जनावर आजारी पडलं, काही दुर्घटना घडली की त्याबद्दल याच स्त्रीला दोषी समजले जाते. तिचा पायगुण वाईट, ती पांढऱ्या पायाची, मग तिचा भयंकर छळ सुरू होतो. या छाळाला मरेपर्यंत शेवट नाही. कधी लहानपणी खेळताना, उड्या मारताना योनिपटल फाटलेले असते आणि त्यामुळे या निर्दोष मुलीला जन्मभर विनाकारण छळ सोसावा लागतो. विवाहापूर्वी खरोखरच कुणाशी संबंध आला असेल तर त्या व्यक्तीचे नाव सांगावे लागते. तिच्या आई-वडिलांना जावयाला दंड द्यावा लागतो. बालविवाहाची भयंकर रूढी यामुळेच त्या समाजात प्रचलित आहे.

धनगर समाजात बालविवाहाची प्रथा तर इतकी जबरदस्त आहे की मुलाच्या जन्मापूर्वीच गर्भवती स्त्रीच्या पोटाला कुंकू लावून लग्न ठरवायचं. बाई बाळंतीण होऊन तिला मुलगी झाली की तिच्या घराचा उंबरठा पुजायचा. 'उंबरापूजन' विधी झाला की मुलीच्या बापाला नारळ द्यायचा. तो बाळंतिणीनं देवाजवळ ठेवला की लग्न पक्कं झालं. मग शब्द सोडता येत नाही. पै-पाव्हणे जमतात. पाळण्याला बाशिंग बांधतात. नाहीतर मुलगी आईच्या कडेवर. मुलगा बापाच्या काखेत. उपाध्याय परवानगी विचारतो. मग अक्षता टाकतात. बकरं मारून दारू पिऊन लग्न साजरं होतं. मुलगी वयात येईपर्यंत बाप तिला सांभाळतो. सोळाव्या वर्षी उत्तरेकडील 'गौना' नामक विधीप्रमाणे 'मूळसाडा' नावाचा विधी होतो. त्यालाही लग्नासारखाच खर्च येतो. दागदागिने, कपडेलत्ते, भांडीकुंडी हे सर्व द्यावे लागते. नवरदेवाचा बाप मुलीच्या बापाला पाचदहा हजार रुपये देज देतो. कधी पोरगी १५–१६ वर्षांची तर नवरा ३५–४० वर्षांचा. कधी नवरदेव २५–३० वर्षांचा तर पोरगी ७ वर्षांची. मग तो दुसऱ्याची बायको पळवतो. लग्नाला मुलगी मिळत नाही. गरिबाला बायको मिळणं कठीण तर श्रीमंतांना ४–४ बायका मिळतात. त्यांची वाटेल तेवढी लग्नं होतात. बायका-पोरींचा व्यापार करणारे दलाल असतात. फूस लावून ते मुलींना पळवतात. त्यावरून भांडणं होतात. पहिल्या नवऱ्याला पैसे द्यावे लागतात. पैसे पंचांसमोर ठेवण्यात येतात. पंच म्हणतात, "ज्याला गवसेल त्याला गवसेल" आणि स्वतःच ते पैसे घेतात. मुलीच्या बापाला दोन्हीकडून पैसे मिळतात.

जनावरांची दलाली करणारे लोक आता आयाबहिणींची दलाली करतात.

कमिशन खाऊ लागतात. म्हणून हे लोक आपल्या बायकांना बांधून ठेवतात. चार पोरं होईपर्यंत बाईच्या जिवाला सुख म्हणून नसतंच. तिच्या पायात खुडा घालतात. खुडा म्हणजे खोडा. तिच्या पायात लाकडाचे एक फूट चाक अडकवायचं म्हणजे धड तिला चालता येत नाही तर पळता कसं येणार ? ओढाळ जनावराच्या गळ्यात लोढणं बांधतात, गाढवाला कळवा घालतात तसा तरण्याताठ्या पोरींच्या पायात खुडा घालायची रीत आहे. जवळजवळ त्यांना कैदी बनवून ठेवतात. पण हल्ली मुली असा खुडा घालून घ्यायचं साफ नाकारतात. आत्महत्या करण्याची धमकी देतात.

वैदू जमातीतदेखील अशाच प्रकारे गरोदर स्त्रीच्या पोटाला कुंकू लावून लग्न ठरवायचं. पोटाला कुंकू लावून पोटातली भाजी विकत घ्यायची. पूर्वी देज हजारो रुपये घेत. हल्ली ते ५०० रुपयांवर आलंय. मुलीच्या डोक्यात भोवरा असला तर त्या मुलीशी कुणी लग्न करीत नाही. अशा मुलीचा नवरा मरतो अशी समजूत आहे. त्यामुळे तिच्या नशिबी कायमचं दु:ख बाढून ठेवलेलं असतं. परंतु हल्ली समाजसुधारक मुद्दाम अशाच मुलीशी लग्न करून ही समजूत दूर करू पाहताहेत.

पारधी समाजात मुलीला विकण्याची प्रथा आहे. काडतुशी नावाच्या एका स्त्रीवर आलेला प्रसंग मान्यांनी वर्णन केला आहे. तिचं पहिलं लग्न तिसऱ्या वर्षी झालं. बापानं तिला पन्नास रुपयांना विकली. पहिल्या पतीपासून तिला चार वर्षांत चार मुले झाली. त्यानंतर तिच्या नवऱ्यानं तिला दुसऱ्या नवऱ्याला विकली. तिच्या दोन मुली ठेवून घेतल्या. दोन मुलगे तिच्याबरोबर लावून दिले. या नवऱ्याबरोबर तिने सात वर्षे संसार केला. या काळात तिला तीन मुले झाली. हा नवरा तिला तिसऱ्याला विकतो. तिसरा नवरा षंढ असतो. दोन वर्षांनंतर तो तिला चवथ्या नवऱ्याला विकतो. दहा वर्षांत तिला पाच मुले होतात. चौथ्या नवऱ्याला खुनाच्या आरोपावरून जन्मठेपीची शिक्षा होते. आता ती म्हणते पंचांनी आज्ञा केली तरी मी पाचवे लग्न करणार नाही. त्यापेक्षा मी माझ्या मोठ्या मुलाबरोबर संसार करीन. कित्येक वेळा या स्त्रियांचे नवरे असतात तुरुंगात किंवा कुणीतरी त्यांचा खून पाडतो. मग स्त्रीला आधार असतो नव्या पतीचा किंवा आपल्याच मुलाचा.

दारिद्र्यामुळे स्त्रीची किती विटंबना होते याचे जागते उदाहरण म्हणजे

गिरिजा. ती आहे कैकाडी समाजातली. तिचा नवरा आहे व्यसनी. बाई आणि बाटली या दोन्ही व्यसनांत पूर्ण बुडालेला. चार पोरं तिच्या पदरात बांधून तो नाहीसा झालेला असतो. इकडे गिरिजा पोरांना संभाळतेय. पाचव्यांदा गरोदर असलेली गिरिजा पार अवघडलेली आहे. तिची मोठी नाजूक अवस्था आहे. पोराबाळांना खाऊ कोण घालणार ? अशा नाजूक परिस्थितीत मुसळधार पावसात आपला टिकाव कसा लागायचा ? बाळंतपण कसे निभायचे ? प्रथम तिच्या मनात आत्महत्येचा विचार येतो. चिल्ल्यापिल्यांकडे पाहून तो विचार ती झटकून टाकते. नंतर रकमी नावाच्या शेजारणीच्या स्वाधीन आपली पोरं ती करते आणि जिवाचा धडा करून चोरी करते. मुद्दाम पोलिसांच्या गाडीसमोरच एका रुबाबदार माणसाच्या खिशात ती हात घालते. पोलिस तिला मुद्देमालासकट पकडतात. तिचा जीव भांड्यात पडतो. मॅजिस्ट्रेटसमोर ती गुन्हा कबूल करते. तिच्या अवघडलेल्या स्थितीकडे पाहून न्यायाधीश तिला शिक्षा करताना कचरतात. ते तिला फक्त एक महिना सक्त मजुरी व शंभर रुपये दंडाची शिक्षा ठोठावतात. तो न भरल्यास आणखी आठ दिवस सक्त मजुरी, पण ती त्यांच्या हातापाया पडून आणखी दोन महिने शिक्षा वाढवून द्या अशी जगावेगळी विनंती करते. त्यासाठी ढसाढसा रडते. तिची मागणी अजब असते. "पाऊसकाळ जवळ आला साहेब. पोटातल्या लेकराला आशीर्वाद द्या." शिक्षा वाढविण्यासाठी जज्जसाहेब पोलिसांना फोन करतात. कलमे बदलून ते तिला चार महिन्यांची शिक्षा करतात. गिरजाक्का कोर्टाला दुवा देत हसत हसत बाहेर पडते. आता पोर पावसात नव्हे तर जेलच्या छपराखाली जन्माला येईल हे केव्हढे समाधान !

वंजारी जमातीत प्रत्येक प्रसंग रडण्याच्या कार्यक्रमाने सुरू होतो. मग मुलगा होवो की मुलगी. पूर्वी तांडे दूर दूर जात. एकदा भेटलेला माणूस पुन्हा दहा-वीस वर्षे भेटत नसे. सासरी गेलेली मुलगी आई-वडिलांना पुन्हा भेटण्याची खात्री नसते त्यामुळे रडून, अश्रू ढाळून दुःख कमी करण्याची त्यांच्यात प्रथा आहे. मुलगी गाऊ लागली की पोटात तुटते.

एकूण या साऱ्या महिलांचे जीवन पाहिले तर त्यात स्त्रीच्या ललाटावर केव्हढा कठोर वज्रलेख विधात्याने नव्हे समाजाने कोरला आहे याची कल्पना येते. श्री. लक्ष्मण गाने यांच्या प्रयत्नामुळे या भयंकर विश्वाचे दर्शन आपल्याला होते. आजवर हे विश्व आपल्यालाअज्ञात आहे. पण हा बंद दरवाजा आपल्याकडे खुला झाला आहे.

महिला संघटनांच्या कार्याची नवी दिशा

नेहमी स्त्रीसंघटनांवर अशी टीका करण्यात येते की, त्या म्हणजे सोसायटी लेडीजचे (उच्चभ्रू महिलावर्गाचे) क्लब होत. तिथे फक्त पत्ते कुटले जातात, फॅशन्सची चर्चा करतात, कधी नवनव्या खाद्यपदार्थांची निर्मिती, पुष्परचनेचे विविध प्रकार किंवा केशभूषेच्या अभिनव तऱ्हा. साधारण असलेच कार्यक्रम या मंडळातून आखण्यात येतात. ही टीका फॅशनेबल, उच्चवर्गीय महिलांच्या आत्मकेंद्रित संघटनांवर केली तर ती योग्य ठरेल. परंतु या रुळलेल्या मळवाटा सोडून आपली सामाजिक जबाबदारी पार पाडणाऱ्या जागृत महिला आपल्या दुर्दैवी भगिनींच्या साह्यासाठी कटिबद्ध असतात. त्यांच्या जीवनातील अनेक समस्या सोडविण्यासाठी त्या सदैव तयार असतात. त्यांना मानसिक आधार आणि धैर्य देण्यासाठी किंवा इतर सर्व प्रकारची मदत करण्याची त्यांची तयारी असते. आज स्त्रियांत मोठी जागृती निर्माण झालेली आहे. आम्ही दुर्बल अबला नाही. आम्हालाही काही अधिकार आहेत. मानव म्हणून जगण्याचा आम्हाला पूर्ण हक्क आहे, ही भावना त्यांच्यात बळावत चालली आहे. "स्त्री ही पायातली वहाण नाही." असा सूर सर्वत्र ऐकू येतो.

महाराष्ट्रात, विशेषतः मुंबईत अशा अनेक संस्था आहेत. उदाहरणार्थ

'नारीकेंद्र' किंवा 'स्वाधार'. नारीकेंद्राची स्थापना झाली १९८० मध्ये, पण तिचे रजिस्ट्रेशन झाले १९८२ मध्ये. आता त्यांच्या शाखा परळ व घाटकोपर येथे सुरू झाल्या आहेत. प्रथम काही महिला आपल्या एका मैत्रिणीच्या घरी जमल्या. आपसात गप्पागोष्टी करताना त्यांनी एकमेकीच्या जीवनाची माहिती करून घेतली. परस्पर वैचारिक देवघेव केली. जेव्हा त्यांना असे आढळून आले की, त्यांच्यात कोणत्याही प्रकारच्या भिंती नाहीत, अडसर नाहीत, आपले विचार एकमेकीशी मिळतेजुळते आहेत तेव्हा त्यांनी एकत्र येऊन काम सुरू केले. सुदैवाने स्मिता पाटीलसारख्या अभिनेत्रीने त्यांना खूप मदत केली. आपल्या 'सुबह' या चित्रपटाचे पहिले उत्पन्न तिने या संस्थेला देऊ केले. अशा प्रकारे तिने आपल्या जागृतीची ओळख करून दिली. केवळ चित्रपटाची नायिका या स्वरूपात नव्हे तर प्रत्यक्षात त्यांना आपल्या मनातील सामाजिक प्रश्नांविषयी वाटत असलेल्या सहानुभूतीचा प्रत्यय त्यांनी समाजाला आणून दिला. त्या पैशातून केंद्राने आपली नवी जागा खरेदी केली. तिथे व्यवस्थित ऑफिस सुरू केले. 'सुबह' म्हणजे 'उंबरठा' या चित्रपटाची कथा तर वाचकांना सुपरिचित आहे. दुर्दैवी महिलांचे, परिस्थितीला बळी पडलेल्या स्त्रियांच्या समस्या कोणत्या, त्यांचे पुनर्वसन कसे करता येईल, त्या मार्गावरील अडचणी कोणत्या, याच प्रश्नांवर 'सुबह' चित्रपटाची मांडणी करण्यात आली आहे. शांता निसळ यांच्या 'बेघर' कादंबरीवर हा चित्रपट आधारलेला आहे.

आता नारीकेंद्रात पाच पूर्ण वेळ सेविका आहेत. पंधरा स्त्रिया सहायक म्हणून काम करतात. एक महिला दैनंदिन कामावर देखरेख करते. तेथील वाचनालयाचे कामकाज पाहते. दुसरी स्त्री हिशोबठिशोब व इतर काम बघते. केंद्र आपले वार्तापत्र मराठी व इंग्रजी भाषेत छापते. वर्षातून चार वेळा आपली पत्रिका ते प्रसिद्ध करतात. या कामाची जबाबदारी व कागदपत्रांचा भार तिसऱ्या महिलेवर आहे. स्त्रियांच्या विविध समस्यांचे एकसूत्रीकरण करण्याचे काम चौथी महिला करते, तर पाचव्या स्त्रीचे कार्य चेंबूरच्या लाल डोंगरी भागातील झोपडपट्ट्यांतून प्रौढ साक्षरता वर्ग चालविणे व वैद्यकीय सहायता प्राप्त करून देणे हे आहे. केंद्राशी दोन कायदेतज्ज्ञ महिला व दोन स्त्री डॉक्टर्स संपर्क साधून असतात. दर महिन्यातील प्रत्येक शनिवारी या वकील भगिनी येऊन महिलांना कायदेविषयक सल्ला देतात. प्रत्येक महिन्यातील दुसऱ्या शनिवारी

सर्व स्त्रिया एकत्र येऊन आपापल्या प्रश्नांची माहिती दुसऱ्यांना करून देतात. आपला प्रश्न कशा प्रकारे सुटला याचीही चर्चा करतात. त्यावरून त्यांच्या लक्षात येते की, आपली वैयक्तिक समस्याही एका मोठ्या सामाजिक समस्येचा एक पैलू आहे. कधी त्या स्त्रियांसमोर एखादे नाटक प्रस्तुत करतात व त्यावर चर्चा घडवून आणून महिलांना एक नवा दृष्टिकोण प्राप्त करून देण्यात येतो. उदा. स्त्री आणि कायदा, अंधविश्वास (श्रद्धा), द्विभार्या, स्त्रीमुक्ती, अफवा पसरविणे इत्यादींवर नाटकानंतर चर्चा होते. कधी एखादे गीत तर कधी महिला जीवनाशी संबंधित एखादा लघुपट दाखवतात. उदा. कहाणी नहाणाची, कहाणी नऊ महिन्यांची (गर्भवती स्त्रीची), कहाणी बाळाची (शिशुसंगोपनाची). त्यामुळे स्त्रियांमधील पारंपरिक गैरसमज दूर होतात आणि त्यांना शास्त्रीय दृष्टिकोण प्राप्त होतो. विचारांना चालना मिळते. केंद्रातील कामाचा जसजसा अनुभव येऊ लागतो तसतशा दु:खी स्त्रिया इतर भगिनींनाही केंद्रात जाण्याचा सल्ला देऊ लागतात किंवा स्वत: घेऊन येऊ लागतात. त्यामुळे कामाचा विस्तार होतो, प्रसार होतो. १९८५ च्या जानेवारीपासून आजवर केंद्राने सत्तर महिलांच्या प्रश्नांवर काम केले आहे.

यांपैकी काही मामले नमुना म्हणून खाली देत आहे. येथे महिलांची खरी नावे दिलेली नाहीत पण हे सर्व मामले केंद्राने सोडविण्याचा पुरेपूर प्रयत्न केला आहे. बहुतेक स्त्रियांपुढील प्रश्न असतो—पतीचे मन त्यांच्यावरून उडालेले असते. त्याने गुपचुप दुसरे लग्न केलेले असते. कधी कधी पहिली पत्नी अगदी अंधारात असते. आपल्या पतीने दुसरा घरोबा केला आहे याची तिला दादही नसते. हळूहळू पती तिच्याशी संबंध कमी करत जातो आणि एक दिवस तिला भीषण वास्तवतेची कल्पना येते. मग धावपळ सुरू होते. जेव्हा न्यायालयासमोर खटला सुरू होतो तेव्हा दुसऱ्या पत्नीची काय स्थिती होत असेल ? तिला आपला पती विवाहित पुरुष होता हे ठाऊक नसते, तर कधी घटस्फोटाचे खोटे पुरावे देऊन तिला फसविण्यात येते. त्यामुळे दोन्ही स्त्रियांची मोठी पंचाईत होते. पहिली पत्नी अपमानित होते, मानसिकदृष्ट्या ती मोडून पडते तर दुसऱ्या पत्नीचा विवाह बेकायदेशीर ठरल्यामुळे धर्मपत्नीऐवजी तिच्यावर रखेली बनण्याचे संकट येऊन कोसळते. कधी पतीचा बचाव करण्याचे दडपण आल्यामुळे कोर्टासमोर तिला आपण विवाहित पत्नी नसून रखेली आहोत असे कबूल करणे

भाग पडते. खरं म्हणजे तिचे रीतसर लग्न होऊनही तिच्यावर हा प्रसंग येऊन कोसळतो.

एका मुस्लिम महिलेवर–अमीनाबीवर–कोणता प्रसंग आला? ती आपल्या पतीची तिसरी बायको. यापूर्वी त्याने आपल्या दोन बायकांना घटस्फोट दिला होता, कारण त्यांना मूल झालेले नव्हते. अमीना खूप काम करून पैसा मिळवत असे, आपले घर सजवीत असे. चार-पाच वर्षे लोटली तरी तिला मूल झाले नाही. तेव्हा ती आपल्या पतीला म्हणाली, " चला, आपण दोघेही डॉक्टरांकडून तपासणी करून घेऊ. " यावर तिचा पती कां कूं करू लागला. परंतु तिने जोर लावून त्याचे मन वळविले. वैद्यकीय तपासणीनंतर असे आढळून आले की, तिच्या पतीत अपत्यनिर्मितीची क्षमताच नाही. त्यानंतर तिच्या पतीने ईदच्या सणासाठी तिला माहेरी पाठविले. तिथे असताना तिला असे समजले की तिचा पती आणखी एक विवाह करणार आहे. धीर न सोडता ती त्या मुलीच्या घरी गेली व तिने तिच्या नातेवाइकांना समजावून सांगितले की, या विवाहापासून मुलीला काही सुख मिळणार नाही; फार त्रास सोसावा लागेल; मुलेबाळेही होणार नाहीत. तरीही त्या लोकांनी मुलीचे लग्न केले. त्यानंतर अमीनाने नारीकेंद्रावर येऊन आपल्यावर आलेले संकट त्यांना सांगितले. नारीकेंद्राच्या कार्यकर्त्यांनी हे प्रकरण हाती घेतले. तो मनुष्य मुस्लिम असल्यामुळे तो चार लग्ने करू शकत होता. म्हणून लग्न तर बेकायदेशीर ठरत नव्हते, पण अमीनाचे सामान आणायला केंद्राने तिला मदत केली. अमीनाचा भाऊ नको नको म्हणत होता पण अमीना-जवळ हिंमत होती. ती कार्यकर्त्यांना घेऊन आपल्या घरी गेली. नव्या बायकोने अडविण्याचा प्रयत्न केला. नवरा आल्यावर त्याच्याशी बोला, नाहीतर तो मलाच मारझोड करील असे ती म्हणू लागली. अमीना म्हणाली, " मी आपल्या स्वत:च्या कष्टाने ज्या वस्तू खरेदी केल्या आहेत फक्त त्याच घेऊन जाते." पण तिने पाहिले तर तिने खरेदी केलेल्या अनेक वस्तू घरातून नाहीशा झालेल्या होत्या. पूर्वीच विकून टाकलेल्या होत्या. ज्या उरल्यासुरल्या होत्या त्या अमीना गोळा करू लागली. ते पाहून नव्या पत्नीला भयंकर धक्काच बसला. जाताना अमीना तिला म्हणाली, " हे बघ. या माणसाने तुला काही त्रास दिला तर तू माझ्याकडे ये. मी तुझी थोरली बहीण आहे. तू माझं म्हणणं ऐकलं नाहीस पण हरकत नाही. तुला जर कधीकाळी पश्चात्ताप झाला तर माझ्या घराचा दरवाजा तुला

उघडा आहे. तू संकोच न करता माझ्याकडे ये." बिचाऱ्या उद्ध्वस्त झालेल्या नव्या पत्नीच्या डोळ्यासमोर काजवे चमकू लागले. आपला भीषण भविष्यकाळ तिच्या डोळ्यांपुढे नाचू लागला. अमीनाने आपल्या सवतीबद्दल व्यक्त केलेला भगिनीप्रेमाचा नमुना अपवादात्मक असून अतिशय सुंदर आहे. दोघींच्या जीवनात समस्या निर्माण करणारा इसम एकच.

मेरीची कथा मोठी करुण आहे. मनोविकृतीने पछाडलेल्या माणसाबरोबर जीवन कंठण्याचा बिकट प्रसंग तिच्यावर येऊन कोसळला. विवाहानंतर तिने पाहिले की तिचा पती आपल्या विधवा मातेबरोबर संबंध ठेवतोय. झोपताना एका बाजूला पत्नी व दुसऱ्या बाजूला आई. आईच्या इच्छेनुसार तो तिला दुसऱ्या खोलीत नेऊन तिची इच्छा पूर्ण करीत असे. मेरीला ही गोष्ट मुळीच आवडली नाही. तेव्हा त्याने आईला गावी पोचवले. अधूनमधून तो तिला भेटायला गावी जात असे. पण जेव्हा त्याची स्वत:ची मुलगी १६ वर्षांची झाली तेव्हा तिच्यावर देखील त्याची वाईट नजर गेली. मेरीने आपल्या नवऱ्याला समजविण्याचा खूप प्रयत्न केला. मानसोपचारतज्ज्ञ डॉक्टरांनी त्याच्यापुढे हात टेकले. त्याच्यात सुधारणेची काही चिन्हेच दिसेनात. मेरीने चर्चममध्ये जाऊन फादरकडे तक्रार केली. ते म्हणाले, "तशीच प्रभूची इच्छा असेल." शेजारीदेखील कुटुंबाच्या खासगी गोष्टीत लक्ष घालायला तयार नव्हते. त्यांनी मोठे विचित्र आश्वासन दिले. मुलीवर काही वेडावाकडा प्रसंग आला म्हणजे तिला दिवस राहिले तर गर्भपात करायला आम्ही मदत करू. मेरीने विचार केला. बैल गेला अन् झोपा केला त्यात काय फायदा? तोपर्यंत माझ्या मुलीच्या जीवनाचा तर सत्यानाश होईल. तेव्हा असहाय मेरीने केंद्राकडे येऊन सल्ला मागितला. आपले वेगळे बिऱ्हाड केले. नोकरी करून आपल्या मुलीचे शिक्षण व पालनपोषण करण्याची जबाबदारी केंद्राच्या मदतीने स्वत:च्या शिरावर घेतली.

ॲन नावाच्या दुसऱ्या एका खिश्चन मुलीची अवस्था सासरी मोठी कठीण झाली. एके दिवशी तिच्या सासऱ्यांनी तिचे दागिने मागितले. मग म्हणाले, "आम्ही हुंडा मागितला होता, दागिने नाही." ॲन म्हणाली, "यातले मला काही ठाऊक नाही." सासरे म्हणाले, "हे दागिने खोटे आहेत." ॲन म्हणाली, "सोनाराकडून पारखून घ्या." सोनार म्हणाला, "हे दागिने खरे आहेत." नशीब असे की ॲनच्या वडिलांनी प्रत्येक दागिन्याचे वजन, किंमत, प्रत्येक

हिऱ्याचे वजन, किंमत सारे काही लिहून ठेवले होते ! तिने तयार केलेल्या जेवणाला कुणी हात लावत नसे. तिला कुटुंबातून बहिष्कृत करण्यात आले होते. तिला स्वयंपाक करू देत नसत. तिचा नवरा मातापित्याच्या हातातले बाहुले होता. त्याला सांगत, " हिने केलेला स्वयंपाक खाऊन तू आजारी पडशील. " ॲन एक स्त्री आहे याबद्दलही तिच्या सासऱ्याला शंका होती. ते तिला म्हणत, " तू ना धड स्त्री, ना पुरुष. तू तर हिजडा आहेस, हिजडा. " तिला मासिक पाळी आली की ते तिची टर उडवत. तिला दिवस गेले त्या वेळी प्रथम सासूला खूप आनंद झाला. मग म्हणू लागली, " माझ्या मुलींची लग्ने होऊन ४-४ वर्षे झाली. अजून त्यांना दिवस गेले नाहीत. तुझं हे सारे नाटक आहे. ढोंग आहे. " अखेर मानसिक ताण पडल्यामुळे ॲनला अंगावर जाऊ लागले. रक्तस्राव होऊ लागला. तरीदेखील तिची सासू तिच्याकडे लक्ष देईना. अखेर ती आपल्या आत्याच्या घरी गेली. आत्याने डॉक्टरकडे नेऊन तिची वैद्यकीय तपासणी केली. गर्भपाताची केस होती. त्या वेळी ॲनचा नवरा गेला होता हाँगकाँगला. तिलासुद्धा जायचं होतं पण सासू-सासऱ्यांनी तिला जाऊ दिले नाही. दुसऱ्यांदा गर्भपाताची वेळ आली तरीदेखील सासूसासरे तिच्या स्त्रीत्वावर विश्वास ठेवायला तयार नव्हते. त्यांच्या फॅमिली डॉक्टरांनी तपासणी करून सांगितले, " ही तर पूर्णतया स्त्री आहे. " ॲन म्हणत होती की सासऱ्यांनी सासूबाईंनाही खूप छळले होते. पहिल्यांदा त्यांना माझी दया येई पण पुढे सासऱ्यांच्या दडपणामुळे त्या मला वेडेवाकडे बोल लागल्या. सासऱ्यांच्या विकृत दृष्टीमुळे ॲन अगदी हैराण झाली होती. ती केंद्राकडे आल्यावर त्यांनी तिच्या नवऱ्याला बोलावून सांगितले, " तू वेगळे बिऱ्हाड कर. एकत्र कुटुंबात राहू नकोस. नाहीतर तुमचे दांपत्यजीवन नष्ट होईल. " ॲन बी. कॉम्. झालेली होती आणि स्टेनो होती.

सर्वांत भयानक कथा आहे सुशीलची. सुशीलच्या आईला व मावशीला एका सयामी स्त्रीने सांभाळले होते. ती स्त्री एक वेश्यागृह (कुंटणखाना) चालवत होती. पुढे सुशीलच्या जोराने लग्न केले. आईच्या व त्या सयामी स्त्रीच्या मृत्यूनंतर कारभार आला मावशीच्या हातात. सुशील कॉलेजमध्ये शिकत होती. ती बी. कॉम. च्या वर्गात शिकत होती. एक राजकीय पुढारी नेहमी तिच्या घरी येत असे. मावशी सुशीलला त्याच्याशी गप्पागोष्टी करायला सांगत असे. घरातले वातावरण सुशीलला मुळीच आवडत नसे. त्या नेत्याशी बोलण्यात तिला काहीच

रस नव्हता. एके दिवशी ती कॉलेजमधून घरी आली ती आपल्या खोलीत शिरल्यावर तिच्या मागोमाग तो पुढारी तिच्या खोलीत आला. बाहेरून मावशीने दरवाजा बंद करून घेतला. पन्नाशी उलटलेला तो माणूस त्या कोमल हरिणीवर तुटून पडला एखाद्या लांडग्यासारखा. तिच्या शरीराचा चक्काचूर झाला. पुढे तर हा प्रकार वारंवार होऊ लागला. अखेर सुशीलला जगणं अशक्य झालं. ती घर सोडून पळाली. बंगलोरच्या 'विमोचना' नावाच्या संस्थेत ती आसरा मागायला गेली पण तिथे राहणे तिला फार धोक्याचे होते, म्हणून तेथील मंडळींनी तिला मुंबईच्या नारीकेंद्रात पाठविले. नारीकेंद्रातील महिलांनी तिला आपल्या घरी ठेवून तिचा सांभाळ केला. त्यांच्या लक्षात आले की, सुशील गर्भवती असून तिला गुप्तरोग झालेला आहे. त्यामुळे तिचा गर्भपातही करता येत नव्हता. केंद्रातील स्त्रियांनी तिच्यावर औषधोपचार करविले. प्रसूतीनंतर पुन्हा तिने शिक्षण सुरू करायचे ठरविले आणि मुलाला अनाथाश्रमात पाठवायचे ठरविले. सुशील आपल्या पायावर उभी राहू पाहात होती.

नारीकेंद्रातील स्त्रियांनी अशा प्रकारच्या स्त्रियांना धीर दिला. तद्वत त्यांच्या मनात आपला प्रश्न हा एका मोठ्या सामाजिक प्रश्नाशी निगडित आहे ही भावना निर्माण केली. स्त्रीजातीचे दुःख समान आहे. एकच आहे. आपल्याला जातिधर्माची बंधने तोडून एकाच स्त्रीजीवनाच्या प्रश्नावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. केंद्राचा नेहमी (सदैव) प्रयत्न असतो की घरी परतताना स्त्रीला निराधर होणे भाग पडू नये. उलट तिला प्रतिष्ठा प्राप्त झाली पाहिजे. अशा प्रकारे केंद्रातील कार्यकर्त्या त्या स्त्रियांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबियांशी देखील चर्चा करतात. त्यांचीही समजूत घालतात. त्यांचा प्रयत्न विफल झाला तर त्या स्त्रियांना त्या कार्यकर्त्या सबुरीचा सल्ला देतात. त्यांना रागाने किंवा हालअपेष्टा दुःख सहन करणे अशक्य झाले तर गृहत्याग करणे भाग पडले तर त्या शरीरावरील कपड्यानिशी (नेसत्या वस्त्रानिशी) घर सोडतात. घर सोडावे लागलेच तर तुम्ही आपल्या गरजेच्या वस्तू घेऊन बाहेर पडावे असे सांगतात. येताना पोलिस स्टेशनवर जाऊन आपल्याला कोणत्या परिस्थितीत घर सोडावे लागले, कोणत्या वस्तू जाताना तुम्ही बरोबर घेतल्या याची नोंद करायला विसरू नका, नाहीतर तुमच्यावर चोरीचा आरोप देखील केला जाईल. स्त्रीने रागाच्या भरात घर सोडले तर त्यांच्या चीजवस्तू परत आणण्याच्या कामात नारीकेंद्र त्यांना साह्य करते व ज्या स्त्रिया अशा

प्रकारच्या अनुभवातून गेलेल्या असतात त्या स्वत: स्वयंसेविका म्हणून काम करतात.

ऑफिसात किंवा अन्यत्र काम करणाऱ्या स्त्रियांचे इतर प्रश्न असतात. ऑफिसमधले त्यांचे सहकारी किंवा बॉसेस त्यांना छळत असले, त्रास देत असले तर त्यांना भेटून केंद्राच्या कार्यकर्त्या त्यांना समजवतात. नाहीतर निदर्शन करण्यासाठी स्त्रिया एकत्र येतात. ऑफिसमधील इतर सर्व स्त्रियादेखील सहकार्य करतात, कारण त्या सर्वांनासुद्धा या गोष्टीची फार गरज असते. आज ना उद्या त्यांच्यावरही हा प्रसंग येणारच आहे.

नारीकेंद्राचे व इतर महिला संघटनांनी टाटा इन्स्टिट्यूट आणि गुप्त पोलिस विभाग या सर्वांनी मिळून स्त्रियांसाठी एक आरोग्य योजना सुरू केली. डॉक्टर, वकील, कारखान्यांचे मालक, पोलिस सेल इत्यादी मिळून एक केंद्र बनविले आहे. नारीकेंद्रातील स्त्रियांना वैद्यकीय सल्ला मिळतो, कायदेशीर सल्ला मिळतो. त्यांच्या पुनर्वसनासाठी त्यांना नोकरी मिळवून देण्याचा प्रयत्न देखील केंद्र करते. गृहत्याग करणाऱ्या स्त्रियांसमोर ताबडतोबीचा सर्वांत मोठा प्रश्न उभा असतो तो निवाऱ्याचा. त्यांनी आसरा कुठे घ्यावा ? तिच्या माहेरच्या मंडळींनी तिला आश्रय दिला तर ठीक, नाहीतर तिच्यावर फार मोठी संकटे कोसळतात. घराबाहेर पडताच समाज हल्ला चढवतो, तिच्याकडे संशयी नजरेने पाहतो आणि मनुष्यातल्या वेषातले (रूपातले) लांडगे तिची शिकार करायला टपलेले असतात. वेश्या-व्यवसायाचे व्यापारी त्यांच्या जाळ्यात त्यांना ओढू पाहात असतात. लहान मुले पदरात असली तर मोठीच पंचाईत. एकट्या बाईला कुणी आसरा देत नाही, मग मुलंबाळं असलेल्या स्त्रीला कोणत्या कुटुंबात आश्रय मिळणार ? म्हणून अलीकडेच केंद्राने एक कार्यशाला आयोजित केली होती. तिचा विषय होता वूमन इन डिस्ट्रेस. यात २८ महिला संस्था सहभागी झाल्या होत्या. त्यासाठी एस. एन्. डी. टी. महिला विद्यापीठाने जागा दिली होती. कार्यशाळेचा कार्यक्रम निर्मला निकेतनमध्ये झाला. त्यात गृहत्याग करून बाहेर पडलेल्या स्त्रियांना थोडे दिवस आसरा देण्याच्या प्रश्नावर चर्चा झाली. या चर्चेचे फलित असे की वाय.डब्ल्यू. सी.ए.ने आपल्या वसतिगृहातील दोन खोल्या अशा स्त्रियांसाठी राखून ठेवण्याची तयारी दाखविली. पुढे आपण जी वसतिगृहे बांधू त्यात काही खोल्या अशा मातांसाठी राखून ठेवण्याचा निर्णय वाय. डब्ल्यू. सी. ने घेतला.

केंद्राचे काम कसे चालते ? त्यांना आर्थिक साह्य कोण करते ? ज्या स्त्रिया

आर्थिक दृष्टीने संपन्न असतात किंवा मध्यमवर्गातून आलेल्या असतात, त्या कायद्याच्या सल्ल्यासाठी केंद्राला पैसे देतात. त्यांच्यावर काही बंधन नसते. त्यांच्या इच्छेनुसार, आपल्या शक्तीनुसार त्या देतात. ज्यांना शक्य नसते, ऐपत नसते त्यांच्याकडून केंद्राची काही अपेक्षा नसते. आपले प्रश्न सुटल्यावर कृतज्ञतेने भगिनी केंद्रात औदार्याने पैसे देतात. याशिवाय ऑफिन नावाची अमेरिकन संस्था, टी. डी. एच. नावाची जर्मन संस्था आणि दुसरे फेमिनिस्ट ग्रुप देखील त्यांना मदत करतात. 'इमीजिएट एड फंड' महिलांनी स्वप्रयत्नाने उभारलेला आहे. नारीकेंद्र प्रसिद्धीच्या प्रकाशापासून दूर राहू इच्छिते.

अशाच प्रकारच्या दुसऱ्या संस्थेचे नाव आहे 'स्वाधार'. ही संस्था फेब्रुवारी १९८३ पासून सुरू झाली. हुंडाविरोधी निदर्शनानंतर स्त्रीवर्गात बरीच चर्चा झाली. स्त्रियांचे संरक्षण आणि मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने मृणाल गोरेंनी ही कल्पना त्यांच्यासमोर मांडली. महिलांनी या कल्पनेला जोरदार पाठिंबा दिला. आज या संस्थेच्या दोन शाखा आहेत. एक मुंबईला लॅमिंग्टन रोडवर आणि दुसरी गोरेगावला. तिसरी एल्फिन्स्टन रोडवर सुरू करणार आहेत. लॅमिंग्टन रोडवरील शाखा रोज चालते. गोरेगावची शाखा दर सोमवारी भरते. दोन्ही ठिकाणची मॅनेजमेंट, हिशोबठिशोब एकाच जागी आहे, पण काम करणाऱ्या महिला कार्यकर्त्यांचे गट वेगवेगळे आहेत. प्रारंभी त्यांना टाटा इन्टिटयूशनकडून देणगी मिळत होती. बाकीचा पैसा इतर मंडळींनी दिला आणि सभासद वर्गणीतून पैसा उभा करण्यात येतो. या संस्थेच्या अध्यक्षा आहेत मृणाल गोरे. कार्याध्यक्ष आहेत मीनाक्षी आपटे. मीनाक्षीताईंनी आपल्या मुलाखतीतून व मृणालताईंनी आपल्या अनेक भाषणांतून ठिकठिकाणी या संस्थेविषयी माहिती दिली. आता महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून स्त्रिया आपले प्रश्न सोडविण्यासाठी स्वत: येतात किंवा पत्र पाठवून सल्ला घेतात. या संस्थेत सर्व जातिधर्मांच्या स्त्रिया येतात. त्या वेगवेगळ्या आर्थिक थरांतून येतात. मुंबई व आसपासच्या स्त्रिया प्रत्यक्ष भेटून आपली समस्या मांडतात. दूरवरच्या स्त्रियांना पत्रातून सल्ला देण्यात येतो, किंवा तेथील महिला संस्थांशी संपर्क साधून स्वाधार संस्था त्यांना अशा प्रकरणात लक्ष घालण्याची विनंती करते. या महिलांना शक्य तेव्हढी मदत करा, असा आग्रह करते.

स्वाधारचा दृष्टिकोण फार समतोल आहे. जेव्हा स्त्रिया आपली समस्या घेऊन

त्यांच्याकडे येतात तेव्हा महिला कार्यकर्त्या एका फॉर्मवर सारी माहिती नोंद करून घेतात. तिला घर का सोडावे लागले याचे संक्षिप्त विवरणदेखील त्यात असते. यानंतर स्वाधार त्या स्त्रीच्या नवऱ्याला व सासरच्या माणसांना पत्र पाठवून बोलावून घेतात. आपल्या पत्नीने वा स्नुषेने स्वाधारकडे येऊन न्याय मागितला आहे, यावर आपले काय म्हणणे आहे ते आम्हाला ऐकायचे आहे, अशा स्वरूपाचे पत्र पाठवतात. दोन पत्रे पाठविल्यानंतरदेखील ती मंडळी आली नाहीत तर महिला कार्यकर्त्या स्वत: त्यांना भेटून त्यांच्याशी बोलणी करतात. बहुतेक नव्वद टक्क्यांहून जास्त लोक येऊन आपले म्हणणे मांडतात असा त्यांचा अनुभव आहे. पत्नीचे वा सुनेचे म्हणणे काय होते ते गुप्त ठेवण्यात येते. पतीचे व सासरच्या मंडळींचे म्हणणे काय आहे ते नीट ऐकून घेतात. त्यानंतर त्या दोघांत काही गैरसमज असेल तर त्यांना एकत्र आणून तो दूर करतात. त्यांच्यात तडजोड घडवून आणण्याचा स्वाधारचा प्रयत्न असतो. कधीकधी रागाच्या भरात किंवा गैरसमजुतीने स्त्रिया जे बोलतात त्यात बऱ्याच वेळा सत्याचा अंश कमी असतो. अशा प्रकारे दोन्ही बाजू ऐकून घेऊन, त्यांची समजूत घालून दुरावलेल्या कुटुंबाला स्वाधार पुन्हा एका ठिकाणी आणते. त्यांचे पुनर्मीलन घडवून आणते. कधीकधी चार-पाच वर्षे दुरावलेल्या पतिपत्नींना एकत्र आणण्यात यशस्वी होते, पण ज्या वेळी संस्थेला असे आढळून येते की घटस्फोटाखेरीज दुसरा उपाय नाही तेव्हा केंद्र तसा सल्ला देते. स्त्रियांना न्याय मिळवून देण्याचा भरपूर प्रयत्न करते. गेल्या २-२॥ वर्षांत स्वाधारने १७१ कुटुंबांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याजवळ काही पूर्णवेळ काम करणाऱ्या समाजसेविका आहेत. कायद्याचा सल्ला श्रीमती मीना कुलकर्णी देतात.

समाजातील गरीब कुटुंबात दारूचे व्यसन हा मोठाच प्रश्न होऊन बसतो. अशा दारुड्या लोकांना हॉस्पिटलमध्ये नेऊन त्यांची दारू सोडविण्याचे प्रयत्न केले जातात. अशा कुटुंबात कुणी कमावती व्यक्ती नसली तर त्यांना रेशन पुरविण्याचे काम संस्था करते. काही व्यापारी संस्था स्वाधारने पाठविलेल्या स्त्रियांना धान्य देतात. यामागचा हेतू त्या स्त्रियांना कुटुंबाचे, मुलाबाळांचे भरणपोषण करण्यासाठी आपला देहविक्रय करावा लागू नये. क्षयरोग्यांनाही संस्था मदत करते. कधी कुणाला झोपडी बांधायला साह्य करते.

स्त्रियांना जाळण्याची वा बलात्काराची घटना घडली तर स्वाधारच्या महिला अशा कुटुंबांच्या घरासमोर निदर्शने करतात, सभा घेतात, मोर्चे काढतात, अत्याचार करणाऱ्या लोकांवर पोलिस स्टेशनवर जाऊन खटले भरतात. दुष्ट लोकांवर सामाजिक बहिष्कार घालतात. कधी मृत्युशय्येवर असलेल्या जखमी (होरपळलेल्या) स्त्रिया स्वाधारच्या कार्यकर्त्यांना भेटण्याची इच्छा व्यक्त करतात आणि त्यांच्या समक्ष व मॅजिस्ट्रेट आणि पोलिस यांच्या उपस्थितीत स्वतः अखेरचे निवेदन करतात. अशा रीतीने लोभी व क्रूर कुटुंबाविरुद्ध स्वाधार पावले उचलते. केंद्र सामाजिक जागृतीसाठी हरप्रकारे प्रयत्न करते.

कुणा स्त्रीवर बलात्कार झाल्यास पोलिस व गुप्तहेर विभागामार्फत अपराध्याचा शोध घेऊन त्याला शिक्षा करण्यात स्वाधार सक्रिय असते. श्रीमती अंजली दवे या 'सेल'च्या सेक्रेटरी आहेत. पोलिसांची कार्यपद्धती व (भूमिका) दृष्टिकोण फार सहायक असते असा स्वाधारचा अनुभव आहे. एखादी स्त्री कुठल्या रोगाने ग्रस्त असेल तर स्वाधार तिला वैद्यकीय साह्य मिळवून देते. एखाद्या स्त्रीची फसवणूक झाली असेल तर केंद्र तिला गर्भपाताचा सल्ला देते. पुरुषाने दुसरे लग्न केले असेल तर त्याला समजावून पहिल्या पत्नीशी त्याची तडजोड घडवून आणतात. मुलाबाळांसकट त्यांचे मीलन घडवून आणतात आणि दुसरीला घटस्फोट मिळवून देतात. कधीकधी स्त्रियांचा आपली सासू, वडील जाऊ किंवा सावत्र मुलगी, पुतणी यांच्या व पतीच्या संबंधाविषयी गैरसमज झालेला असतो. तिची समजूत घालून स्वाधार तो गैरसमज दूर करते. एका स्त्रीने ५–६ मुले झाल्यावर कुटुंबनियोजनासाठी शस्त्रक्रिया करवून घेतली. कुटुंबातील इतर स्त्रिया म्हणू लागल्या आता ही स्त्री उरली नाही. त्यांनी तिच्या पतीच्या कानातही विष ओतले. अशा प्रकारे स्त्रियाच स्त्रियांच्या वैरी बनतात. अशा वेळी स्वाधारने शास्त्रीय ज्ञान वैद्यकीय ज्ञान–माहिती देऊन हा संशय दूर-केला. कधी पतीवर षंढ असल्याचा खोटा आरोप केला जातो. अशा वेळीसुद्धा 'स्वाधार'ची भूमिका समजावून सांगून आपसातील गैरसमज दूर करण्याची असते. घराबाहेर पडल्यावर स्त्रियांना आसरा नसला तर स्वाधार अशा निराधार स्त्रियांना 'श्रद्धानंद महिलाश्रम' किंवा 'बापनु घर' यासारख्या संस्थेत पाठवते. त्यांच्या शिक्षणाची किंवा नोकरीची व्यवस्था करते. चेंबूरच्या महिला मंडळाने उद्योग मंदिर काढून अशा स्त्रियांच्या राहण्याची सोय केलेली आहे. तिथे काही

स्त्रियांना काम शिकायला पाठवतात.

स्वाधार संस्थेची अशी योजना आहे की, एक प्लॉट घेऊन त्यावर एक इमारत बांधायची. खालच्या मजल्यावर गृहत्याग करणाऱ्या मातांच्या बालकांसाठी क्रेशची व्यवस्था करायची. वरच्या मजल्यावर महिलांसाठी उद्योगमंदिर चालवायचे. तिथे स्त्रियांना काम करायची संधीही मिळेल किंवा काही कलाकुसर शिकण्याची व्यवस्था करता येईल. निराधार स्त्रियांच्या निवासाचीही व्यवस्था संस्था करू इच्छिते. त्यासाठी निधी गोळा करायला हवा. मदत हवी. १४ सप्टेंबरला स्वाधार एक महिला संमेलन आयोजित करणार आहे. आजवर ज्या स्त्रिया स्वाधारच्या संपर्कात आल्या त्या सर्वांना आमंत्रण असेल. महाराष्ट्रातील इतर महिला संघटनांच्या प्रतिनिधीदेखील त्यात सहभागी होतील. अशा रीतीने त्यांनाही या कामाशी संबंध ठेवता येईल. संस्थेने आजवर अनेक व्याख्यानमाला आयोजित केल्या. त्यातून स्त्रियांना विविध प्रकारची माहिती देण्यात आली. स्त्रियांसाठी केलेले कायदे, हुंड्याचा कायदा, बलात्कारविषयक कायदा. अशा प्रकारे स्वाधारचे काम फार समतोल पद्धतीने चालते आणि त्याचा खूप विस्तार होत आहे. त्यांच्या कार्याचा प्रचार व प्रसार झाल्यामुळे कानाकोपऱ्यातून स्त्रिया संस्थेत येतात. स्वाधारला जर पुरेसा पैसा मिळाला तर त्यांच्या अनेक योजना साकार होतील. महाराष्ट्रातील व अन्य प्रांतांतील महिला संघटना यामुळे प्रभावित झाल्या तर कामाचा खूपच विस्तार होईल, अशी त्यांना आशा आहे. या संस्थेचे सभासदत्व पुरुषांनाही खुले आहे.

याखेरीज सांस्कृतिक पातळीवरूनदेखील जनजागृती करण्याचे कार्य इतर स्त्रिया करतात. 'अवेही' नावाच्या संस्थेतील कार्यकर्त्यांनी स्लाईड शो तयार केला आहे. त्यात माँतेरो, अंजली, छंदिता मुखर्जी, नीला खोपकर इत्यादी कार्यकर्त्या विशेष सक्रिय आहेत. स्त्री-जीवनाशी संबंधित अशा अनेक प्रश्नांवर त्यांनी कहाणी नहाणाची (मासिक पाळी), कहाणी नऊ महिन्यांची (गर्भवती महिलेची), कहाणी बाळाच्या जन्माची (शिशुसंगोपनाची) इत्यादी स्लाईड शो बनविले आहेत. या स्लाईड शोमुळे स्त्रियांना शास्त्रीय दृष्टिकोण प्राप्त होतो. महिला जीवनावर जन्मापासून कोणते प्रसंग येतात याचे चित्रण लता म्हापसेकरांनी 'मुलगी झाली हो' या नाटिकेत प्रभावी रीतीने केलेले आहे. त्यात संगीत व नृत्याचासुद्धा अभिनव प्रयोग केलेला आहे. त्यामुळे ही नाटिका खूप मनोरंजक

झालेली आहे. नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या जीवनातील समस्या चित्रित करणारी अनेक नाटके रंगभूमीवर आलेली आहेत. मनोरंजन करीत, नाट्यगीतांच्या माध्यमातून स्त्रियांना व समाजाला नवी दृष्टी देण्याचा हा प्रयत्न आहे. स्त्रियांसाठी केलेले कायदे किंवा जे कायदे करण्याची आवश्यकता आहे त्यांची चर्चा महिला कायदेपंडितांची संस्था करते. लॉयर्स कलेक्टिव्ह नावाच्या संस्थेने या विषयावर एक पुस्तक तयार केले आहे. काही महिला संस्था नागपूर, नाशिक, शहादे इ. ठिकाणी काम करतात. आदिवासी श्रमिक महिलांतही काम चालू आहे. मथुरा प्रकरण, मंजुश्री सारडा खटला, शाहनवाझ केस अशा अनेक अत्याचारांविरुद्ध महिला संघटना केवळ निदर्शनेच करत नाहीत तर त्यांनी त्यासंबंधीच्या चित्रांचे प्रदर्शनदेखील भरविले होते. ते त्यांनी ठिकठिकाणी दाखविले होते. न्याय मिळविण्यासाठी त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजेसुद्धा ठोठावले. रिव्हयू पिटिशनदेखील त्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्याचा प्रयत्न केला. नारी अत्याचार विरोधी मंच, महिला दक्षता समिती इत्यादी संघटना या बाबतीत खूप सक्रिय आहेत. मुस्लिम महिलांच्या प्रश्नावर कित्येक सभापरिषदा झाल्या. घटस्फोटाचा कायदा किंवा घटस्फोटित स्त्रियांच्या पोटगीची व्यवस्था यासंबंधी कोणकोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत यासाठी कायदेपंडितांच्या संघटनेच्या काही सूचना असतात. स्त्रीजीवनाला स्पर्श करणाऱ्या प्रत्येक कायद्याचा कसून अभ्यास केला जातो. अशा प्रकारे अनेक महिला संघटना व कार्यकर्त्या आपला अमूल्य वेळ इतर दुर्दैवी भगिनींच्या सेवेत व्यतीत करतात. त्यांच्यातील सुप्त शक्ती उद्दीपित करण्याचे काम करतात. त्यांना प्रतिकूल परिस्थितीच्या आवर्तातही लढण्यासाठी धीर देतात.

स्त्रियांना काम शिकायला पाठवतात.

स्वाधार संस्थेची अशी योजना आहे की, एक प्लॉट घेऊन त्यावर एक इमारत बांधायची. खालच्या मजल्यावर गृहत्याग करणाऱ्या मातांच्या बालकांसाठी क्रेशची व्यवस्था करायची. वरच्या मजल्यावर महिलांसाठी उद्योगमंदिर चालवायचे. तिथे स्त्रियांना काम करायची संधीही मिळेल किंवा काही कलाकुसर शिकण्याची व्यवस्था करता येईल. निराधार स्त्रियांच्या निवासाचीही व्यवस्था संस्था करू इच्छिते. त्यासाठी निधी गोळा करायला हवा. मदत हवी. १४ सप्टेंबरला स्वाधार एक महिला संमेलन आयोजित करणार आहे. आजवर ज्या स्त्रिया स्वाधारच्या संपर्कात आल्या त्या सर्वांना आमंत्रण असेल. महाराष्ट्रातील इतर महिला संघटनांच्या प्रतिनिधीदेखील त्यात सहभागी होतील. अशा रीतीने त्यांनाही या कामाशी संबंध ठेवता येईल. संस्थेने आजवर अनेक व्याख्यानमाला आयोजित केल्या. त्यातून स्त्रियांना विविध प्रकारची माहिती देण्यात आली. स्त्रियांसाठी केलेले कायदे, हुंड्याचा कायदा, बलात्कारविषयक कायदा. अशा प्रकारे स्वाधारचे काम फार समतोल पद्धतीने चालते आणि त्याचा खूप विस्तार होत आहे. त्यांच्या कार्याचा प्रचार व प्रसार झाल्यामुळे कानाकोपऱ्यातून स्त्रिया संस्थेत येतात. स्वाधारला जर पुरेसा पैसा मिळाला तर त्यांच्या अनेक योजना साकार होतील. महाराष्ट्रातील व अन्य प्रांतांतील महिला संघटना यामुळे प्रभावित झाल्या तर कामाचा खूपच विस्तार होईल, अशी त्यांना आशा आहे. या संस्थेचे सभासदत्व पुरुषांनाही खुले आहे.

याखेरीज सांस्कृतिक पातळीवरूनदेखील जनजागृती करण्याचे कार्य इतर स्त्रिया करतात. 'अवेही' नावाच्या संस्थेतील कार्यकर्त्यांनी स्लाईड शो तयार केला आहे. त्यात मॉंतेरो, अंजली, छंदिता मुखर्जी, नीला खोपकर इत्यादी कार्यकर्त्या विशेष सक्रिय आहेत. स्त्री-जीवनाशी संबंधित अशा अनेक प्रश्नांवर त्यांनी कहाणी नहाणाची (मासिक पाळी), कहाणी नऊ महिन्यांची (गर्भवती महिलेची), कहाणी बाळाच्या जन्माची (शिशुसंगोपनाची) इत्यादी स्लाईड शो बनविले आहेत. या स्लाईड शोमुळे स्त्रियांना शास्त्रीय दृष्टिकोण प्राप्त होतो. महिला जीवनावर जन्मापासून कोणते प्रसंग येतात याचे चित्रण लता म्हापसेकरांनी 'मुलगी झाली हो' या नाटिकेत प्रभावी रीतीने केलेले आहे. त्यात संगीत व नृत्याचासुद्धा अभिनव प्रयोग केलेला आहे. त्यामुळे ही नाटिका खूप मनोरंजक

झालेली आहे. नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या जीवनातील समस्या चित्रित करणारी अनेक नाटके रंगभूमीवर आलेली आहेत. मनोरंजन करीत, नाट्यगीतांच्या माध्यमातून स्त्रियांना व समाजाला नवी दृष्टी देण्याचा हा प्रयत्न आहे. स्त्रियांसाठी केलेले कायदे किंवा जे कायदे करण्याची आवश्यकता आहे त्यांची चर्चा महिला कायदेपंडितांची संस्था करते. लॉयर्स कलेक्टिव्ह नावाच्या संस्थेने या विषयावर एक पुस्तक तयार केले आहे. काही महिला संस्था नागपूर, नाशिक, शहादे इ. ठिकाणी काम करतात. आदिवासी श्रमिक महिलांतही काम चालू आहे. मथुरा प्रकरण, मंजुश्री सारडा खटला, शाहनवाझ केस अशा अनेक अत्याचारांविरुद्ध महिला संघटना केवळ निदर्शनेच करत नाहीत तर त्यांनी त्यासंबंधीच्या चित्रांचे प्रदर्शनदेखील भरविले होते. ते त्यांनी ठिकठिकाणी दाखविले होते. न्याय मिळविण्यासाठी त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजेसुद्धा ठोठावले. रिव्हयू पिटिशनदेखील त्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्याचा प्रयत्न केला. नारी अत्याचार विरोधी मंच, महिला दक्षता समिती इत्यादी संघटना या बाबतीत खूप सक्रिय आहेत. मुस्लिम महिलांच्या प्रश्नावर कित्येक सभापरिषदा झाल्या. घटस्फोटाचा कायदा किंवा घटस्फोटित स्त्रियांच्या पोटगीची व्यवस्था यासंबंधी कोणकोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत यासाठी कायदेपंडितांच्या संघटनेच्या काही सूचना असतात. स्त्रीजीवनाला स्पर्श करणाऱ्या प्रत्येक कायद्याचा कसून अभ्यास केला जातो. अशा प्रकारे अनेक महिला संघटना व कार्यकर्त्या आपला अमूल्य वेळ इतर दुर्दैवी भगिनींच्या सेवेत व्यतीत करतात. त्यांच्यातील सुप्त शक्ती उद्दीपित करण्याचे काम करतात. त्यांना प्रतिकूल परिस्थितीच्या आवर्तातही लढण्यासाठी धीर देतात.

स्त्रियांना काम शिकायला पाठवतात.

स्वाधार संस्थेची अशी योजना आहे की, एक प्लॉट घेऊन त्यावर एक इमारत बांधायची. खालच्या मजल्यावर गृहत्याग करणाऱ्या मातांच्या बालकांसाठी क्रेशची व्यवस्था करायची. वरच्या मजल्यावर महिलांसाठी उद्योगमंदिर चालवायचे. तिथे स्त्रियांना काम करायची संधीही मिळेल किंवा काही कलाकुसर शिकण्याची व्यवस्था करता येईल. निराधार स्त्रियांच्या निवासाचीही व्यवस्था संस्था करू इच्छिते. त्यासाठी निधी गोळा करायला हवा. मदत हवी. १४ सप्टेंबरला स्वाधार एक महिला संमेलन आयोजित करणार आहे. आजवर ज्या स्त्रिया स्वाधारच्या संपर्कात आल्या त्या सर्वांना आमंत्रण असेल. महाराष्ट्रातील इतर महिला संघटनांच्या प्रतिनिधीदेखील त्यात सहभागी होतील. अशा रीतीने त्यांनाही या कामाशी संबंध ठेवता येईल. संस्थेने आजवर अनेक व्याख्यानमाला आयोजित केल्या. त्यातून स्त्रियांना विविध प्रकारची माहिती देण्यात आली. स्त्रियांसाठी केलेले कायदे, हुंड्याचा कायदा, बलात्कारविषयक कायदा. अशा प्रकारे स्वाधारचे काम फार समतोल पद्धतीने चालते आणि त्याचा खूप विस्तार होत आहे. त्यांच्या कार्याचा प्रचार व प्रसार झाल्यामुळे कानाकोपऱ्यातून स्त्रिया संस्थेत येतात. स्वाधारला जर पुरेसा पैसा मिळाला तर त्यांच्या अनेक योजना साकार होतील. महाराष्ट्रातील व अन्य प्रांतांतील महिला संघटना यामुळे प्रभावित झाल्या तर कामाचा खूपच विस्तार होईल, अशी त्यांना आशा आहे. या संस्थेचे सभासदत्व पुरुषांनाही खुले आहे.

याखेरीज सांस्कृतिक पातळीवरूनदेखील जनजागृती करण्याचे कार्य इतर स्त्रिया करतात. 'अवेही' नावाच्या संस्थेतील कार्यकर्त्यांनी स्लाईड शो तयार केला आहे. त्यात माँतेरो, अंजली, छंदिता मुखर्जी, नीला खोपकर इत्यादी कार्यकर्त्या विशेष सक्रिय आहेत. स्त्री-जीवनाशी संबंधित अशा अनेक प्रश्नांवर त्यांनी कहाणी नहाणाची (मासिक पाळी), कहाणी नऊ महिन्यांची (गर्भवती महिलेची), कहाणी बाळाच्या जन्माची (शिशुसंगोपनाची) इत्यादी स्लाईड शो बनविले आहेत. या स्लाईड शोमुळे स्त्रियांना शास्त्रीय दृष्टिकोण प्राप्त होतो. महिला जीवनावर जन्मापासून कोणते प्रसंग येतात याचे चित्रण लता म्हापसेकरांनी 'मुलगी झाली हो' या नाटिकेत प्रभावी रीतीने केलेले आहे. त्यात संगीत व नृत्याचासुद्धा अभिनव प्रयोग केलेला आहे. त्यामुळे ही नाटिका खूप मनोरंजक

झालेली आहे. नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या जीवनातील समस्या चित्रित करणारी अनेक नाटके रंगभूमीवर आलेली आहेत. मनोरंजन करीत, नाट्यगीतांच्या माध्यमातून स्त्रियांना व समाजाला नवी दृष्टी देण्याचा हा प्रयत्न आहे. स्त्रियांसाठी केलेले कायदे किंवा जे कायदे करण्याची आवश्यकता आहे त्याची चर्चा महिला कायदेपंडितांची संस्था करते. लॉयर्स कलेक्टिव्ह नावाच्या संस्थेने या विषयावर एक पुस्तक तयार केले आहे. काही महिला संस्था नागपूर, नाशिक, शहादे इ. ठिकाणी काम करतात. आदिवासी श्रमिक महिलांतही काम चालू आहे. मथुरा प्रकरण, मंजुश्री सारडा खटला, शाहनवाझ केस अशा अनेक अत्याचारांविरुद्ध महिला संघटना केवळ निदर्शनेच करत नाहीत तर त्यांनी त्यासंबंधीच्या चित्रांचे प्रदर्शनदेखील भरविले होते. ते त्यांनी ठिकठिकाणी दाखविले होते. न्याय मिळविण्यासाठी त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजेसुद्धा ठोठावले. रिव्हयू पिटिशनदेखील त्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्याचा प्रयत्न केला. नारी अत्याचार विरोधी मंच, महिला दक्षता समिती इत्यादी संघटना या बाबतीत खूप सक्रिय आहेत. मुस्लिम महिलांच्या प्रश्नावर कित्येक सभापरिषदा झाल्या. घटस्फोटाचा कायदा किंवा घटस्फोटित स्त्रियांच्या पोटगीची व्यवस्था यासंबंधी कोणकोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत यासाठी कायदेपंडितांच्या संघटनेच्या काही सूचना असतात. स्त्रीजीवनाला स्पर्श करणाऱ्या प्रत्येक कायद्याचा कसून अभ्यास केला जातो. अशा प्रकारे अनेक महिला संघटना व कार्यकर्त्या आपला अमूल्य वेळ इतर दुर्दैवी भगिनींच्या सेवेत व्यतीत करतात. त्यांच्यातील सुप्त शक्ती उद्दीपित करण्याचे काम करतात. त्यांना प्रतिकूल परिस्थितीच्या आवर्तातही लढण्यासाठी धीर देतात.

अविवाहित मातृत्व : एक नाजूक, विवाद्य परंतु मानवी प्रश्न

अविवाहित किंवा अवैध मातृत्वाला मान्यता देण्याचा प्रश्न हा फार नाजूक प्रश्न आहे. त्याचे साकल्याने उत्तर देणे सोपे नाही. त्याचे उत्तर शोधत असताना स्त्रीपुरुषसंबंधात प्राचीन काळापासून झालेल्या उत्क्रांतीवर किंवा विवाहसंस्थेच्या विकासाच्या इतिहासावर एक दृष्टिक्षेप टाकणे आवश्यक आहे. वेळोवेळी नीती-संबंधीच्या कल्पनांत खूप परिवर्तन होत गेले. एका कालखंडात समाजाच्या दृष्टीने जे उचित मानले गेले तेच काळाच्या ओघात अनुचित ठरले आणि अनुचित प्रथा योग्य समजण्यात आल्या. या इतिहासाचे अध्ययन केल्यावर एक गोष्ट निश्चितपणे प्रतीत होते की " मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे ", त्याच्यात काही पाशवी प्रेरणा आहेत आणि समाजाचा एक घटक बनून राहण्याची त्याला तीव्र इच्छा असते. सामाजिक नेत्यांचा प्रयत्न असा असतो की, या प्रवृत्तींचे समाजाच्या चौकटीतल्या मर्यादेत संयमन आणि उन्नयन करणे.

आदिमानवाला प्रजोत्पत्तीच्या कारणाचा पत्ता नव्हता. बालक आईच्या कुशीत जन्माला येते म्हणून त्यावर तिचाच अधिकार मानला जाई. जेव्हा पुरुषाला आपल्या शारीरिक सामर्थ्याची कल्पना आली तेव्हा त्याने स्त्रीवर आपला अधिकार प्रस्थापित केला. कुटुंब या कल्पनेच्या विकासामागे अनेक कारणे होती.

आक्रमकांच्या हल्ल्यापासून संरक्षण मिळावे म्हणून दुर्बल स्त्रीला सबल पुरुषाच्या अधीन होऊन राहावे लागले. माणसाच्या बाळाला आपल्या पायावर उभे राह्यला फार वर्षे लागतात. त्याला आधाराची गरज असते. निरोगी बाळाच्या विकासासाठी मातापित्याच्या प्रेमाची आवश्यकता असते. जीवनात भावनात्मक समतोल राखण्यासाठी कुटुंबसंस्थेची कल्पना योग्य आहे. परस्पर सहवासाचे सुख अनुभवल्यानंतर स्त्रीला वा पुरुषाला या जबाबदारीतून निसटून जाता येऊ नये, दोघांनीही आपल्या अपत्याविषयीची जबाबदारी नीट उचलून त्यांच्यावर उत्कृष्ट संस्कार करून त्यांना भावी जीवनासाठी समर्थ बनवावे हाच विचार कुटुंबसंस्था निर्माण करण्यामागे होता. संपत्तीचा वारसाहक्क हा औरस संततीला प्राप्त झाला. वैवाहिक संबंधातून जन्मलेल्या बालकालाच तो अधिकार मिळाला. इतरांना नाही.

प्रारंभी स्त्री-पुरुषांच्या लैंगिक संबंधांवर काही निर्बंध नव्हते. उद्दालक श्वेतकेतूने लैंगिक जीवनासंबंधी काही नियम बनविण्याचा प्रयत्न केला. पंडूने ही कथा महाभारताच्या पहिल्या पर्वातील १२२ व्या अध्यायात सांगितलेली आहे. उद्दालक श्वेतकेतूने म्हटले आहे की, "आजपासून ज्या स्त्रिया आपल्या पतीखेरीज अन्य पुरुषाशी संग करतील त्या महापातकी समजल्या जातील. तद्वत आपल्या कौमार्यावस्थेतील व्रतस्थ साध्वी पत्नीचा त्याग करून पुरुष परस्त्रीकडे गेल्यास तोही महापापी ठरेल. पुत्रप्राप्तीच्या हेतूने पतीने पत्नीला दुसऱ्या पुरुषाशी समागम करण्याची आज्ञा केली तर ती न पाळणारी स्त्री महापातकी ठरेल." उद्दालक श्वेतकेतूला स्त्रीपुरुष संबंध पराकाष्ठेचे पवित्र असावेत असे वाटत होते.

विवाहसंस्थेचे प्राचीन रूप

प्राचीन काळी विवाहसंस्थेची तीन रूपे आढळतात : (१) विवाहित स्त्रीला आपल्या वर्णात सहवास स्वातंत्र्य (समूह विवाह) त्यानंतर येते बहुपतित्व किंवा बहुपत्निकत्वाची अवस्था. (२) पती किंवा कुलपतीच्या आज्ञेनुसार अन्यत्र समागम- पंडूच्या आदेशानुसार कुंतीने व माद्रीने केलेला परपुरुषसंग. यमधर्म, वायू, इंद्र, आश्विनीकुमार यांच्याकडून करून घेतलेली पुत्रप्राप्ती. (३) पती पुत्र निर्माण करण्यास असमर्थ असेल किंवा मृत्यू पावला असेल तर दिराकडून नियोगविधीद्वारे अपत्यप्राप्ती करून घेणे. सत्यवतीने आपल्या स्नुषा अंबिका व अंबालिका यांच्यावर व्यासांकडून नियोगविधी करविला. त्यातून धृतराष्ट्र, पंडू व विदुर यांचा जन्म झाला.

अत्याचाराचे मूळ पुरुषाच्या शक्तीत

स्त्री म्हणजे क्षेत्र (शेत) व पुरुष म्हणजे क्षेत्रपती हा संकेत ऋग्वेद काळापासून प्रचलित होता. बीजारोपण करणाऱ्या पुरुषाच्या क्षेत्रात निर्माण झालेल्या प्रजेवर पूर्ण अधिकार असे. दुसऱ्याकडूनही बीजारोपण करवून घेतले तरी जन्माला आलेल्या संततीवर तो अधिकार दाखवू शके. पंडूला हा अधिकार मिळाला होता. याचा अर्थ स्त्रीचा आपल्या संततीवर काहीही अधिकार नसे. म्हणायचे ' न मातुः परदैवतम् ' पण मातृत्वाची अशी विटंबना शेकडो वर्षांपासून चालू होती. " कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ! " हे सुभाषित राहिले ग्रंथात आणि कुमारी माता, वैधव्यावस्थेत मातृत्व लाभलेली स्त्री किंवा परपुरुषाशी संबंध येऊन गर्भवती बनलेली स्त्री कलंकिता मानण्यात आली. कुंती माता असूनही कर्णाला कायमचे लांछन लागले. महाभारतातील महत्त्वाचे पात्र सूर्यपुत्र कर्ण याचे जीवन अंधकारमय होते. समाजातील वाढत्या स्वैराचारावर निर्बंध घालण्यासाठी कुमारी माता व अवैध संतती यांना समाजाने दूर लोटले. या प्रक्रियेत अनेक वेळा स्त्रीवर अन्याय करण्यात आला. तिला भ्रष्ट करणारा पुरुष मात्र निर्दोषी ठरला आणि समाजात उजळ माथ्याने फिरत राहिला. अवैध बाळे चिखलात उकिरड्यावर फेकण्यात आली. निष्पाप बालक समाजाला भिणाऱ्या, बहिष्काराला घाबरणाऱ्या मातेच्या रोषाला बळी पडले. त्याला जन्म देणाऱ्या पित्याने आपल्या जबाबदारीकडे पाठ फिरविली.

पुरुषाची अमर्याद भोगलालसा व स्त्रियांची प्रतिकाराविषयीची असमर्थता पाहून अत्रि गोत्रात जन्मलेल्या विश्ववारा नामक ऋषिकेने ऋग्वेदाच्या ५ व्या मंडलातील २८ व्या सूत्रात मोठ्या करुण स्वाने म्हटले आहे, " हे अग्निदेवा, स्त्रीपुरुषसंबंधांचे अतिशय उत्तम प्रकारे नियमन कर. " स्त्रीला प्रसूतिसमयी होणाऱ्या असीम वेदना पाहून विश्ववारा अतिशय व्यथित झाली होती. या भोगतृष्णेचे फळ महिला अनादी काळापासून भोगत आल्या आहेत. एकेकाळी मानवसमाजात मातृसत्ताक कुटुंबपद्धती होती. त्यात मातेचे स्थान फार वरचे होते. तिला बरेच स्वातंत्र्य होते. आजदेखील भारताच्या काही भागात त्याच्या खुणा आढळतात. उदा. हिमालयाच्या दक्षिणेकडील भाग, ओरिसा, केरळ; परंतु पुढे पितृसत्ताक प्रणाली सर्वत्र पसरली. स्त्रीवर सारी बंधने लादली गेली. तिच्या पायात बेड्या पडल्या. पुरुरव्यावर अटी घालणारी ऊर्वशी किंवा शंतनूवर बंधने घालणारी गंगा

ही उदाहरणे अपवादात्मक आहेत, पण अहिल्या आणि रेणुकासारख्या पतिव्रतांचे जीवन अभिशप्त झाले. पुरुषांच्या भोगलालसेच्या वेदीवर स्त्रीचे बलिदान झाले. अहिल्येवर अत्याचार करणारा पुरुष होता इंद्र आणि तिला शिक्षा फर्मावणारा पुरुष होता तिचा पती गौतम. या दोन पुरुषांच्या दरम्यान स्त्री ठरली बळीचा बकरा. तिच्या नशिबी आले शिळेचे जीवन-जीवन्मृतावस्था. सर्वांत विचित्र गोष्ट अशी की अहिल्येला पुनर्जीवन प्रदान करणाऱ्या मर्यादा पुरुषोत्तम रामाने आपल्या निष्पाप, पवित्र, गर्भवती पत्नीचा त्याग केला.

रेणुकेच्या पावित्र्याची विटंबना करणारा हैहयराज कार्तवीर्य सहस्रार्जुन आणि रेणुकेला मृत्युदंड देणारे तिचे पती जमदग्नी व पुत्र परशुराम. राजर्षी विश्वामित्राचा तपोभंग झाला मेनकेकडून आणि त्याने आपल्या नवजात अर्भकाकडे-शकुंतलेकडे पाठ फिरवली. गांधर्वविवाह करून नंतर गरोदर शकुंतलेला फसवणारा पुरुष होता राजा दुष्यंत तर मत्स्यगंधेच्या यौवनपुष्पाचा सुगंध लुटून पलायन करणारे होते पराशर ऋषी. एका संस्कृत श्लोकात म्हटले आहे :

" विश्वामित्रपराशरप्रभृतयः वातांबुपर्णाशनाः ।
तेऽपि स्त्रीमुखपंकजं सुललितं दृष्ट्वैव मोहंगताः ॥
शाल्यन्नं दधिदुग्धगोघृतयुतं भुंजन्ति ये मानवाः ।
तेषां इंद्रियनिग्रहं यदि भवेत् विंधस्तरेत् सागरे ॥

तेव्हा ही युगानुयुगे चालत असलेली परंपरा आहे की, पुरुषाच्या भोग-लालसेचा बळी ठरणार अबला स्त्री. त्याच्या वासनेच्या अग्निज्वालेत तिचे भस्म झाले. निसर्गानेही स्त्रीला कठोर वागणूक दिली. तिचे पाऊल वाकडे पडले म्हणून ती कलंकिनी ठरते आणि तिला भ्रष्ट करणारा पुरुषमात्र समाजात उजळ माथ्याने फिरतो. त्याला कलंक लागत नाही. स्त्रीला अंधारात तोंड लपवून आसवे ढाळावी लागतात. मग तिच्यापुढे दोनच पर्याय उरतात : आत्महत्या किंवा वेश्यागृह (कुंटणखाना). समाज तिला कधीच क्षमा करीत नाही. स्खलनशील पुरुष स्त्रीला पावित्र्याची मूर्ती बनवू पाहतो आणि स्वतःच आपल्या हाताने ती मूर्ती भंगून देखील टाकतो.

ज्या वेळी परित्याग अनुचित मानला जाई

मानवाच्या स्खलनशीलतेचा अंदाज प्राचीन धर्मशास्त्रकारांना होता. म्हणून

फसवल्या गेलेल्या स्त्रीविषयी त्यांच्या मनात सहानुभूती होती. ते तिला तशी वागणूक देत. बृहस्पती नावाच्या धर्मशास्त्रकाराने असे म्हटले आहे की, स्त्री अतिशय दूषित, भ्रष्ट किंवा पतित असली तरी तिचा त्याग करणे अनुचित आहे. प्रायश्चित्ताने तिचे पाप धुऊन जाते. अत्रिदेवल इत्यादी धर्मशास्त्रकारांनी बलात्कार झाल्यामुळे गर्भधारण करणाऱ्या कुमारीला वा कोणत्याही स्त्रीला प्रसूतीनंतर पुन्हा शुद्ध मानण्याचा आदेश दिला होता. वसिष्ठ धर्मसूत्रात देखील म्हटले आहे :

" बलात्कारोप्रमुक्ता वा चोरहस्तगतापि वा ।
न त्याज्या दूषिता नारी नास्यास्त्यागो विधीयते ॥
पुष्पकालमुपासीत ऋतुकालेन शुध्यति ॥

वसिष्ठ २८.३

मनु, पराशर, याज्ञवल्क्य इत्यादी शास्त्रकारांनी सुद्धा स्त्रीकडे सहानुभूतीच्या दृष्टिकोणातून पाहिले होते. वैदिक काळात स्त्री वाममार्गाला लागली तर त्याचा दोष तिच्या पालकाला दिला आहे. " न स्वैरी स्वैरिणी कुत: " असे छांदोग्य उपनिषदात म्हटले आहे (५.११.५). पुरुष वाममार्गाकडे वळला नाही तर स्त्रीतरी कशी वाममार्गाला लागेल ? अखेर टाळी तर दोन्ही हातांनीच वाजते ना ? असा प्रश्न या उपनिषत्कारांने केला आहे. मनूने व्यभिचारिणी स्त्रीच्या पापाची जबाबदारी तिच्या पतीवर टाकली आहे.

" पत्यौ भार्यापचारिणी " (८·३१७)

हिंदू कायद्याचा आधार म्हणजे पतित स्त्रीला घरात ठेवता कामा नये पण मिताक्षराने अध:पतन झालेल्या स्त्रीला घराबाहेर काढू नका असा आदेश दिला आहे. मिताक्षरा-रचयिता विज्ञानेश्वर म्हणतो, " तिला धर्मकार्यात वाटले तर स्थान देऊ नका, पण तिला घराबाहेर काढू नका. " मनूने पापी स्त्री-पुरुषांसाठी समान प्रायश्चित्त सांगितले आहे. कुमार्गाला लागणाऱ्या स्त्रीला घरात ठेवूनच सुधारण्याचा प्रयत्न करा. तिला असहाय स्थितीत रस्त्यावर सोडू नका. तिला तिच्या माहेरी पोचवा किंवा घरी ठेवून घ्या व प्रायश्चित्त करू द्या असा मनु-स्मृतीचा स्पष्ट आदेश आहे (मनु ९–८३). ज्या वेळी समाजातील सासर-माहेरच्या मंडळींनी स्मृतिकारांच्या आदेशाकडे काणाडोळा केला तेव्हा अन्य

(स्थळ प्रत)

सामाजिक संस्थांना पुढे येऊन स्त्रीला साह्य करावे लागले.

स्त्री वाममार्गाला का लागते याविषयी विचार करून स्मृतिकारांनी पुरुषांसाठी काही कर्तव्ये सांगितली आहेत. स्त्रीच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था न झाल्यास कुलशीलवती स्त्रीलादेखील वाममार्गाचे अनुसरण करणे भाग पडते, म्हणून परगावी जाण्यापूर्वी पतीने तिच्या भरणपोषणाची व्यवस्था केली पाहिजे.

स्त्रीच्या कामवासनापूर्तीसंबंधीही शास्त्रकर्त्यांनी काही नियम बनविले होते. ते कुमारिकेसाठीही होते आणि प्रोषितभर्तृकेसाठीही होते. नारदस्मृतीत परगावी गेलेल्या पतीची प्रतीक्षा आठ वर्षांपर्यंत करावी असे म्हटले आहे. संतती नसेल तर चार वर्षे वाट पाहून तिने दुसरा विवाह करावा (नारदस्मृति १३·१०४). शास्त्रवेत्त्यांनी कुमार्गी पतीलासुद्धा कोणती शिक्षा द्यावी हे निश्चित ठरवले आहे. आपल्या सद्गुणी पत्नीचा त्याग करणाऱ्या पतीला कडक दंड केला पाहिजे असे याज्ञवल्क्याने (१·७६) व नारदाने (१३·९७) मध्ये म्हटले आहे. परस्त्रीशी संबंध ठेवणाऱ्या पुरुषाला तप्त लोखंडाने डागायला हवे असा मनुस्मृतीचा स्पष्ट आदेश आहे (८·३७२). मनुस्मृतीत म्हटले आहे की कन्या ऋतुमती झाली असेल आणि तिचे आईवडील तिचे लग्न करू शकत नसतील तर तीन वर्षांनंतर तिने स्वत: विवाह करावा.

या सर्व विवेचनावरून आपण असा निष्कर्ष काढू शकतो की, वेदकाळापासून स्मृतिकाळापर्यंत वाममार्गाला लागणाऱ्या स्त्री-पुरुषांना शिक्षा देताना शास्त्रकार बराच न्यायोचित व्यवहार करीत असत. स्त्रीसाठी पावित्र्याची व नैतिकतेची एक कसोटी आणि पुरुषासाठी दुसरी अशा प्रकारचा अन्याय त्यांनी केला नाही. म्हणूनच समाजातील बेजबाबदार पुरुषाच्या वर्तनावर काहीसा अंकुश ठेवता आला. वाकडं पाऊल पडलेल्या स्त्रीलासुद्धा निराधार बनवून कायमचे पापी जीवनात लोटण्यापेक्षा घरातच राहून तिला सुधारण्याची संधी देण्यात आली. परंतु कलियुगात मात्र स्त्रीवर फार अन्याय झाला, अत्यंत अत्याचार झाला. ज्या पापाची जबाबदारी स्वत:च्या स्त्रीवर नाही अशा स्त्रीच्या शुद्धीकरणासाठीही कोणताच मार्ग मोकळा ठेवण्यात आला नाही. स्त्रीवर संपूर्ण अन्याय आणि पुरुषाची साऱ्या पापांपासून मुक्तता अशा विलक्षण अनुदार व्यवहाराला कलिवर्ज्य प्रकरणात शालिवाहन शक १००० ते ११०० ह्या काळात मान्यता मिळाली.

कौटिलीय अर्थशास्त्र आणि वात्स्यायनाच्या कामसूत्रातही स्त्रीवर्गाला सहिष्णुतेने व औदार्याने वागवावे असे म्हटले आहे. परंतु हे आदर्श काळाच्या ओघात मागे पडले. नवव्या शतकानंतर स्त्रीच्या पावित्र्याविषयी अवास्तव कल्पना रूढ झाल्या आणि हिंदू धर्माने पतित स्त्रीचा किंवा तिच्या संततीचा स्वीकार करण्यास मनाई केली. परिणामी हिंदू धर्माचे प्रचंड नुकसान झाले व मुसलमानांच्या लोकसंख्येत वाढ झाली असे कित्येक विद्वानांचे मत आहे. १९४७ मध्ये देशाच्या फाळणीच्या वेळी या प्रश्नाची पुनरावृत्ती झाली. या संदर्भात डॉ. सुशीला नायर लोकसभेत म्हणाल्या की, फाळणीनंतर इतर लोकांनी आपल्या लेकीसुनांचा त्यांच्या लेकरा-बाळांसह स्वीकार केला, उलट हिंदूंनी अत्याचाराला बळी पडलेल्या आपल्या लेकीसुनांचे स्वागत केले नाही. परिणामी अनौरस प्रजेची संख्या वाढली.

आज समाजात जो अनौरस संततीचा प्रश्न निर्माण झाला आहे त्यामागे बरीच कारणे आहेत. दारिद्र्याच्या खाईत जळत असलेल्या माणसापुढे पोटाचा सवाल आवासून उभा राहतो. 'बुभुक्षितः किं करोति पापम्? 'पोटात प्रज्वलित झालेल्या जठराग्नीत हविर्द्रव्य टाकण्याची आवश्यकता असते. वेश्यांच्या प्रश्नाचा अभ्यास केल्यावर ध्यानात येते की, गरीब मातापित्यांच्या मुली किंवा गरीब कुटुंबातील स्त्रिया सहज किंवा नाइलाजाने या मोहजालात फसतात. त्यांच्या भोवतालचे वातावरण त्याला जबाबदार असते.

प्राचीन काळीसुद्धा माणूस वाममार्गाला लागत होता. त्या वेळी समाजातील व्यवस्था काय होती? ऋग्वेदकाळात व्यभिचार किंवा बलात्कार अनार्य मानला गेला तरी त्याला पाप समजत नसत. त्यांच्या दृष्टीने असत्य हे महापाप मानले जाई. यज्ञ करताना यजमान आपल्या पत्नीला पवित्र अग्नीसमक्ष आपल्या प्रियकराविषयी सारे काही मोकळेपणाने सांगून टाकायला भाग पाडत असे. हिरण्यकेशी गृहसूत्रात श्राद्ध करताना वैवाहिक किंवा सामाजिक पापांची स्पष्टपणे, उघडपणे चर्चा करण्यात येई. "माझी आई किंवा आजी यांनी आपल्या पतीकडे दुर्लक्ष केले असेल, त्या वाममार्गाकडे वळल्या असतील तर त्यांच्या गर्भाला माझ्या वडलांनी किंवा आजोबांनी मान्यता द्यावी." पापाचा उघडपणे स्वीकार केल्यावर किंवा वरुणमंत्राचा जप केल्यावर व्यभिचाराचा कलंक पुसला जातो असे सूत्रकार मानत असत.

विसाव्या शतकात तर जीवन पूर्णपणे बदलून गेलेले आहे. अमेरिका हा

भौतिकदृष्ट्या फार पुढारलेला देश आहे. त्याचे जीवनमान फार उच्च आहे. पण समाजाच्या अध:पतनाचा पत्ता 'सोशल वर्क' नावाच्या ग्रंथावरून लागतो किंवा सुप्रसिद्ध किसे रिपोर्टवरून : १९४५-४७ पर्यंत अनौरस बालकांची संख्या होती २८०००-४७००० पर्यंत होती. १९५७ नंतर ती ६०% वाढली. १९५६ मध्ये अमेरिकेतील सर्व राज्यांत १,९३,५०० अनौरस बालके होती. त्यांपैकी ४० टक्के मुले विसापेक्षा कमी वय असलेल्या मातांच्या पोटी जन्माला आलेली होती. ही मुले फक्त गरीब कुटुंबातील नव्हती. समाजातील बुद्धिमान, सुसंस्कृत, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या वरच्या थरातील कुटुंबांत त्यांचा जन्म झाला होता. किसे रिपोर्टमध्ये म्हटले आहे की, ६०००० विवाहित स्त्रीपुरुषांच्या मुलाखतीवरून असे आढळून आले की, त्यांच्यातील ९५% व्यक्ती आपल्या पतीशी किंवा पत्नीशी एकनिष्ठ नाहीत. जेमतेम ५% लोक एकनिष्ठ होते.

भोगवादाचे हे नग्नदर्शन पाहिल्यावर अमेरिकन स्त्रियांनी एक आंदोलन सुरू केले. त्याचे उद्दिष्ट आहे पुरुषनिरपेक्ष जीवन व्यतीत करणे. पुरुषाला आकर्षून घेताना स्त्रीच अडचणीत येते. आज आपण पाहतो डेटिंग हा प्रकार पाश्चात्त्य देशांत सर्रास रूढ आहे. अनेक अविवाहित दांपत्ये एकत्र राहतात. घटस्फोटाचे प्रमाण वाढतेय म्हणून हा प्रयोग Contract marriages चा.

या सिंहावलोकनावरून आपण अशा निष्कर्षाप्रत पोचतो की, अविवाहित किंवा अवैध मातृत्वाला मान्यता देण्यास समाज प्राचीन काळापासून कचरतो आहे. पण मानव स्खलनशील असल्यामुळे अशा संततीचा जन्म तर सतत होत राहिला. समाजाने कितीही कठोर नियम तयार केले, पातिव्रत्याचे ध्येय खूप उच्च ठेवले तरी मानव त्या आदर्शाप्रत पोचू शकत नाही किंवा कधी पोचेल अशी सुतराम शक्यताही नाही. काही लोकांचे म्हणणे असे आहे की, औरस संततीच्या कल्पनेची परिणती मालमत्तामूलक पुरुषप्रधान समाजात झाली. संततीबाबत वैध-अवैध असा प्रश्न मुळी येत नाही. एक गोष्ट नक्की की नैतिकतेच्या कसोटीवर केवळ स्त्रीची पारख करता येणार नाही. कुटुंब आणि समाजव्यवस्था नीट चालायची असेल तर स्त्रीपुरुष दोघांनाही नियमात बांधणे आवश्यक आहे. उदा. इंग्लंडमध्ये अवैध बालकाला जन्म देणाऱ्या आईवडिलांवर सारखीच जबाबदारी टाकण्यात येते. एकट्याला शिक्षा करणे योग्य नव्हे. जपानप्रमाणे भारतातही गर्भपात हा कायदेशीर ठरला आहे. अर्थात मर्यादित कक्षेत. पण अविवाहित

मातांनाही मोकळीक नाही. जर ते शक्य झाले तर ज्यांच्यावर अत्याचार झाला आहे अशा स्त्रियांना अशा गर्भाच्या ओझ्यातून सुटका करून घेता येईल. गर्भपाताचा प्रत्येक मामला स्वतंत्र प्रकारचा असतो. निरपराध व्यक्तीला शिक्षा होता कामा नये, तद्वत मन:पूत, उच्छृंखल व्यवहारावर बंधन घालण्याचा मार्ग समाजाने शोधून काढला पाहिजे.

धर्मशास्त्रांचा इतिहास पाहिला तर समाजातील गृहीत तत्त्वांत वेळोवेळी परिवर्तन झालेले आहे. बदलल्या परिस्थितीनुरूप धर्मशास्त्रकारांनी नवी स्मृती तयार केली. धर्माचा मूळ स्रोत आहे मानवता. आधारशिला आहे मानवता. त्याच्या व्यापक मूल्यांच्या आधारावर समाजाची नवनिर्मिती होऊ शकते. अशी नवी दृष्टी घेऊन कधी येशू ख्रिस्त येतो, कधी गौतम बुद्ध तर कधी मार्टिन ल्यूथर. स्त्रीपुरुषांचे प्रमाण लक्षात घेऊन त्यांनी कधी बहुपतिकत्वाला मान्यता दिली तर कधी बहुपत्निकत्वाला. कधी त्यांनी नियोगविधीला स्वीकृती दिली तर कधी पुनर्विवाहाला. आता प्रस्तुत प्रश्नाचे जे भयानक स्वरूप आहे त्यावर नव्या पद्धतीने विचार करून समाजशास्त्रज्ञांना नवा मार्ग शोधून काढला पाहिजे.

जी माता बाळाला नऊ महिने आपल्या रक्तमांसावर पोसते, असह्य वेदना सहन करून त्याला जन्म देते, स्तनपान देऊन त्याचे पोषण करते, त्याचे मलमूत्र काढते, त्याला भाषा शिकवते, त्याच्यावर संस्कार करते अशा आईचे नाव बाळाने लावले तर त्यात गैर काय आहे ? मग बापाचा शोध घ्यावाच लागणार नाही. मग हे बाळ औरस की अनौरस असा प्रश्नच उपस्थित होणार नाही. यासाठी आईला महत्त्व द्यायला हवे. पूर्वी नाही का कौंतेय, राधेय, गांगेय, पार्थ ही नावे मातेला महत्त्व देणारी होती. आपल्या मातेचे वा पित्याचे नाव लावण्याची मुभा माणसाला असावी.

एकमेकांवर आत्यंतिक प्रेम करणाऱ्या दंपतीचे सहजीवन, अशा घरात सुसंस्कार प्राप्त करणारे बालक हा पृथ्वीतलावरील स्वर्गीय सुखाचा अनुभव होय, पण ज्यांना असा अनुभव मिळत नसेल त्यांना कमीत कमी सर्वसामान्य जीवन जगण्याची तरी मोकळीक असावी. त्यांच्यावर नरकवासाचे संकट येऊ नये यासाठी नव्या युगाची नवी स्मृति-नीती शोधायला हवी.

नव्या पायवाटा

बांगला देश मुक्त झाला. डाक्क्यावर बांगला देशचा ध्वज फडकला. या बातमीने सारेच भारतीय खूष झाले होते. मुक्तिवाहिनी आणि भारतीय जवानांच्या शौर्याच्या कथा प्रत्येकाच्या ओठावर खेळत होत्या. त्या दिवशी आनंदाने नाचत रोझी, साधना, उज्ज्वला, शमीम आणि रवींद्र कौर माझ्याकडे आल्या. कारण त्यांचा आणि केतन, भास्करन् आणि रुडॉल्फचा बांगला देश-निर्वासितांच्या दु:खाशी जवळून परिचय झाला होता.

माना कँपला जाऊन आल्यापासून ह्या मुली पार बदलून गेल्या आहेत. सुखवस्तू कुटुंबातील ह्या विद्यार्थिनी मध्यप्रदेशमधील निर्वासित कँपला जातील ह्याची मला खात्री नव्हती, पण त्या लगेच तयार झाल्या. कँपला जाण्यापूर्वी त्यांना बांगला देश समस्येची पार्श्वभूमी समजावून सांगण्यासाठी व कँपमधील कामाची कल्पना देण्यासाठी सभा घेतली. प्रा. कु. भरुचांनी मानातील निर्वासित छावण्यांमधील जीवनाचे मोठे प्रत्ययकारी चित्र रेखाटले. परिस्थिती किती भयानक आहे हे समजल्यावरदेखील सर्वांचा निर्धार कायम होता. हे आव्हान स्वीकारायचेच असे त्यांनी ठरवले होते. मी विचारले, "काय विचार बदलला नाही ना?"

त्या उत्साहाने म्हणाल्या, " ! छे छे ! आम्ही नक्कीच जाणार . "

परत आल्यावर मला त्या भेटल्या त्या वेळी त्यांचा कायाकल्प झाला होता. आपल्या चिमण्या घरकुलाबाहेरचे विशाल विश्व त्या पाहून आल्या होत्या. फार मोठ्या वेदनांचे दर्शन घेऊन आल्या होत्या. कथाकादंबऱ्या किंवा चित्रपट-सृष्टीतली सारी अद्‌भुतता ह्या विराट वास्तवापुढे फिकी पडली होती.

आल्याबरोबर रोझी मला म्हणाली, " ताई, खरोखरच ' ट्रुथ इज स्ट्रेंजर दॅन फिक्शन. ' मानाला जे काही आम्ही पाहिलं ते आगळंच होतं. "

साधना उद्‌गारली, " ' युद्धस्य कथा रम्या ' म्हणतात ते काही खोटं नाही. युद्धाची झळ लागलेली ही कुटुंबे पाहिली की वाटतं, कथाविश्वात कोमलता वा कारुण्य असेल पण प्रत्यक्ष वास्तव फार कठोर आहे. "

उज्ज्वलेची प्रतिक्रिया होती, " झळ काय म्हणतेस ? पार होरपळून गेलेल्या होत्या साऱ्या स्त्रिया. त्यांतल्या कितीतरी भगिनी गरोदर होत्या. कुमारी माता होऊ घातल्या होत्या. "

मी म्हटले, " अविवाहित मातृत्वाबद्दल समाजाची प्रतिक्रिया फार तीव्र असते. साऱ्या दोषांचं खापर फुटतं स्त्रीवर. पण काय ग, ह्या दुःखी जीवांनी तुमचं स्वागत कसं केलं ? "

साधना उद्‌गारली, " त्या फार गरजू होत्या त्यामुळं आम्ही त्यांना काहीतरी द्यावं ही त्यांची मागणी होती. रेशन अपुरं आहे, सर्पण कमी आहे—नाना तक्रारी. गेल्याबरोबर बुभुक्षितांसारख्या तुटून पडल्या साऱ्या आमच्यावर ! "

रोझीने आपली चीड व्यक्त केली. " अहो, सरकार एवढी मदत करत होतं पण ह्यांच्याकडे कृतज्ञतेची भावनाच नव्हती. "

" आणि कमाल म्हणजे फुकट मिळणारी औषधं वगैरे सरळ बाजारात विकून पुन्हा मागायला तयार हात पसरून. " रवींद्र वैतागाने म्हणाली.

मी म्हटले, " अग, संस्कृती, सभ्यता, कोमलता, आतिथ्य हे सारं स्वास्थ्य असल्यावर. "

उज्ज्वला कळवळून म्हणाली, " खरं सांगू का ताई, दुःखाच्या आघातानं त्यांच्या भावनाच बोथट झाल्या होत्या. मृत्यूमधलं कारुण्यदेखील लोपलं होतं. "

रोझीच्या डोळ्यांत आसवं भरून आली. ती म्हणाली, " त्या दिवशी सामूहिक स्वयंपाकघराचं रूपांतर आपले प्रा. घोरपडे, रुडॉल्फ, केतन, भास्करन् वगैरे

शाळेत करीत होते. तिथं एका वृद्धेचं प्रेत आढळलं. अठ्ठेचाळीस तास होऊन गेले होते. त्यामुळे भयंकर दुर्गंधी सुटली होती. तिचे कोणी नातेवाईक फिरकले नव्हते. आपल्याच प्रा. घोरपड्यांनी प्रेत हालवायची व्यवस्था करवली. मध्यरात्री केव्हातरी सामूहिक उत्तरक्रिया व्हायची साऱ्या प्रेतांची. ''

शमीम शांतपणे म्हणाली, '' काय करणार ?·कुटुंबातील एक माणूस गेल्याचं कळवलं की रेशनमध्ये कपात व्हायची ना ? ''

त्या पोरींना त्या विषयापासून दूर नेण्यासाठी मी म्हटले, '' उज्ज्वला, या कँपमध्ये सुशिक्षित मुली होत्या ? त्यांची प्रतिक्रिया कशी काय होती ? ''

उज्ज्वला खिन्नपणे सांगू लागली, '' फारशा तरुण मुली इथं सुखरूप पोचल्याच नव्हत्या. पाशवी अत्याचारामुळं त्यांचा बळी गेला होता. पण एक गोष्ट खरी की सुशिक्षित भगिनींना आमच्या कामाचं कौतुक वाटत होतं. त्या सहकार्य करीत होत्या. इतरांना समजावून सांगत होत्या. शाळेत शिकवत होत्या. फावल्या वेळात शिवणकाम, विणकाम करत होत्या. परंतु बहुसंख्य स्त्रिया होत्या अशिक्षित, शेतकरी समाजातल्या. त्या आमच्यावरच उसळायच्या. ''

रोझी आपला अनुभव सांगू लागली, '' सर्व्हेच्या वेळी प्रश्नावली घेऊन आम्ही त्यांच्याकडे गेलो की त्या कुचेष्टेनं म्हणायच्या, हे कसलं काम तुमचं ? शेतात जाऊन अहोरात्र कष्ट करणं म्हणजे काम, गटार-सफाई वगैरे कामं त्या आम्हाला हक्कानं करायला सांगायच्या. ''

मी ह्या मानसशास्त्राच्या विद्यार्थिनींना विचारले, '' आजवर सदैव कष्ट करणाऱ्या ह्या जीवांना कुणीतरी आपल्यासाठी कष्ट उपसतंय ह्याचं मनोमन समाधान वाटत असेल, नाही का ? ''

साधना म्हणाली, '' हो. अशा प्रकारे इतरांकडून सेवा करून घेण्याचा त्यांच्या जीवनातला हा पहिलाच प्रसंग असेल ! ''

'' पण एकूण या अशिक्षितांमध्ये झगडेच फार. त्यामुळं कपड्यांचं किंवा औषधांचं वाटप करणं अधिकाऱ्यांना कैक वेळा अशक्य होऊन जाई. समजा, एखाद्या कुटुंबात चार स्त्रिया असल्या अन् एक साडी मिळाली तर ती कुणी वापरावी यावर रण माजे ! '' उज्ज्वला त्या दृश्याने चांगलीच हादरली होती.

शमीम म्हणाली, '' जीवन-संघर्ष अगदी पराकोटीला पोचला होता. सरव्हाईव्हल ऑफ द फिटेस्ट. ''

मी उद्‌गारले, " अग दारिद्र्य आणि दैन्य यापुढं कोमल भावनांची जपणूक करणं कठीण होऊन बसतं. त्या माकडिणीची गोष्ट नाही का? जिवावर बेतल्यावर तिनं पोटचं पोर पायाखाली घालून आपले प्राण वाचवले. पण रोझी, तुमचा लहान मुलांशी संबंध आला ना? ती तुम्हांला कशी वाटली?"

रोझीचा भावमधुर चेहरा एकदम उजळला, " ताई, दिवसातला हा कार्यक्रम आम्हाला सर्वांत जास्त आवडे. आगीतून वाचलेल्या ह्या फुलांना फुलवण्याचा आनंद काही आगळाच होता."

रवींद्र म्हणाली, " दीदी, तान्ही पोरं बिचारी रिकेटस्‌नं आजारी असायची पण थोडी मोठी मुलं संध्याकाळच्या खेळात खूप रमायची. कॉलेजनं दिलेले लेझीम, फुटबॉल वगैरे खेळ त्यांना फार आवडले." बोलता बोलता तिचा चेहरा उजळला.

शमीमचे डोळे चमकले, " त्यांचे हसरे डोळे पाहून कित्ती मजा वाटायची."

रोझी म्हणाली, " खरंच, आजवर आम्ही आपल्या उबदार, सुरक्षित घरट्या-बाहेरचं जग पाह्यलंच नव्हतं. हे विशाल जगच मोठा ग्रंथ आहे. ह्या दहापंधरा दिवसांत आम्ही जे शिकलो ते आम्ही कधीच विसरू शकणार नाही."

शमीम म्हणाली, " ६५ हजार निर्वासितांचे अश्रू पुसायचे, त्यांच्या जखमी हृदयांवर फुंकर घालायची कामगिरी होती आमच्याकडे. त्या दुःखातून उमलणारा आनंदही आम्हाला पाह्यला मिळाला. त्या छावणीतच कधी एखादा विवाहसमारंभ साजरा व्हायचा. भांगात सिंदूर भरलेल्या लाजऱ्या नववधूची 'डोली' (वरात) जायची!" उज्ज्वला उत्साहाने म्हणाली.

बांगला देश मुक्त झाल्यावर त्यांच्या चेहऱ्यावरून आनंद ओसंडत होता. निर्वासित परत आपापल्या गावाकडे जात होते. मिठाई देऊन तोंड गोड करत रोझी म्हणाली, " आता अगदी पंख लावून उडत जावंसं वाटतंय. मानाला घालवलेल्या पंधरा दिवसांमुळं पूर्व बंगाल आम्हाला परका राहिला नाही. त्या 'शोनार बांगला'त आमच्या कितीतरी मैत्रिणी सापडतील. आम्ही भेटल्यावर त्यांना कित्ती आनंद होईल!"

" मग पुढचा कँप तिकडेच घेऊ या का?" मी विचारले.

हरित क्रांतीची चाहूल

डिसेंबर महिन्यातील ती रात्र. घोलवडजवळच्या आस्वली खेड्यातले कॉलेजयुवकांचं शिबिर. बाहेर थंडीचा कडाका. तंबूमध्ये श्रांत युवती विसावल्या होत्या. त्या चिमण्यांची चिवचिव थांबली होती. अंगाखालची जमीन खडबडीत होती. रोज मऊमऊ शय्येवर विसावणाऱ्या ह्या कोमल कॉलेजकन्यका आज शेतात झोपल्या होत्या. एक आगळा अनुभव घेत होत्या. वाऱ्याच्या झुळकीबरोबर संगीताची सुरावट ऐकू येत होती. कुणी गिटार वाजवत होतं. कुणी बुलबुलतरंग. कुणी विनोदी शब्दांची मधूनच उधळण करीत होतं. गॅसची बत्ती विझलेली. चंद्राचा अंधुक प्रकाश वातावरण अधिकच धूसर बनवीत होता. त्या प्रकाशात भोवतालची वनश्री परीकथेतल्यासारखी वाटत होती. कित्येक तरुण बाहेरच्या त्या थंडीत आकाशाच्या निळ्या छताखाली झोपले होते. अंधाराची दुलई पांघरून.

मुंबईच्या काही कॉलेजमधील युवक-युवती नेहमीचं आपलं सुखासीन जीवन सोडून आल्या होत्या. घोलवड स्टेशनपासून चारपाच मैलांचा रस्ता भर उन्हात चालून आल्यावर सारे दमून लालेलाल झालेले. त्यांना कँपवरचं साधं-सुधं जेवण काय रुचकर लागलं ! म्हणतात ना, ' भुकेला कोंडा अन् निजेला धोंडा '

ल्या वेळी 'अन्न हे पूर्ण ब्रह्म' ह्याची खात्री पटली.

थोड्या वेळानं उन्हात कामाला सुरुवात. आदिवासींच्या शेतात विद्यार्थी आणि प्राध्यापक काम करू लागले. कापणी होऊन गेलेली. आता काम होतं, पिकावर पडलेली कीड जमिनीच्या पोटात, झाडांच्या मुळात दबा धरून बसते. तिला म्हणतात खोडआळी. शेतात कुदळी चालवून ती खोडआळी मुळापासून उपटायचं, शेत पुढच्या पिकासाठी योग्य बनवायचं काम करीत होते हे युवक आणि युवती. रुईया, कीर्ति, नॅशनल इत्यादी कॉलेजमधील मंडळी उत्साहानं कामाला लागली होती. त्यात प्राध्यापक मंडळीही होती, अन् सर्वांना मार्गदर्शन करीत होते डॉ. गोपाळ राणे.

गेले कित्येक महिने हा प्रयोग कीर्ति कॉलेजचे विद्यार्थी करीत होते. आदिवासींच्या शेतांत नवे प्रयोग करून भरपूर पीक काढावं म्हणून धडपडणारे हे तरुण. भुकेल्या जीवांना चार घास अधिक कसे मिळवता येतील, म्हणून सारा प्रयत्न. फिलिपाईन्समधून नवं बियाणं आणून लावलेलं. शास्त्रोक्त पद्धतीनं मशागत केलेली, खतपाणी घातलेलं. त्याचं दृश्यफळ मिळालं. एरव्ही शेतातून एकरी अडीच क्विंटल पीक यायचं. विद्यार्थ्यांनी ते उत्पन्न वीसबावीस क्विंटलवर नेलं. प्रत्येक घरच्या शेतकऱ्यानं मदतीला आलं पाहिजे ही अट. मगच आम्ही तुम्हा सर्वांना मार्गदर्शन करू, सहकार्य करू ही विद्यार्थ्यांची भूमिका. नवं सहकार्याचं वातावरण ग्रामजीवनात निर्माण करायचा मानस.

शेतातून दुसरं पीक काढता यावं म्हणून शेतात विहिरी खोदण्याचंही काम ते करीत होते. दोन विहिरी खणून झाल्या होत्या. भरपूर पाणी लागलं होतं. आता तिसरी विहीर खणली जात होती. दिरंगाई होती सरकारकडून! वेळेवर पंपिंग सेट मिळत नव्हते. पाणी शेतात खेळवता येत नव्हतं. त्यामुळं शेतकरी आणि विद्यार्थी नाराज होते. चिडत होते. आजच्या ह्या खोदकामात काही मंडळी प्रथमच भाग घेत होती. अहमहमिकेनं काम चाल्ल होतं. मधून कुणाच्या पायाला कुदळ लागायची. कुणाचा हात सोलून निघायचा. कुणी पाय घसरून पडायचं. मग थकून शेताच्या कडेला बैठक मारण्याचाही कार्यक्रम चालायचा. थोडी चिडवाचिडवी, थट्टामस्करीची फोडणी. काम करून थकल्यावर तान्हेल्या जीवांना पाणी लागत होतं अमृततुल्य.

सकाळी अन् संध्याकाळी हे काम रंगात येई अन् मधल्या वेळात ओढ्यावर

नाहीतर विहिरीवर थंड पाण्यानं स्नान. बंद बाथरूममध्ये गरमागरम पाण्यानं स्नान करणाऱ्या ह्या शहरी जीवांना काही वेगळाच अनुभव येत होता. जेवण-देखील मोठं वर्तुळ करून. भोवतालच्या दरिद्री बांधवांची उपासमार पाहून जेवणाचा बेत अगदी साधा ठेवलेला. पण आग्रहानं वाढणारे मित्र आणि गुरुजन. निळ्या आकाशाची अन् हिरव्या वनश्रीची सजावट त्यामुळं जेवणाला काय न्यारीच लज्जत. घरची पंचपक्वान्नं त्यापुढं फिकी ठरावी !

दुपारी तंबूत उकडहंडी. मग झाडांच्या गर्द सावलीत मोकळ्यावर सतरंजी टाकून गप्पांना रंग भरायचा. थट्टामस्करीला ऊत यायचा. भोवतालच्या उन्हाचं चक्क चांदणं. कुठं पत्ते, कुठं भेंड्या–सारे कार्यक्रम जोरात. त्यामुळं सकाळी गुलाबी थंडीत साखरझोपेतून उठवणारी अन् तशीच दुपारी ह्या रसाळ गप्पांच्या रंगाचा भंग करणारी घंटा फारच कर्णकटू वाटायची.

रात्री बत्तीच्या उजेडात नकला, गाणी, समूह गीतं सुरू व्हायची. आदिवासी धुंद होऊन नृत्य करायचे. तारपं वाजवायचे. सुशिक्षित, शहरी, सुखवस्तू कॉलेज युवक आणि अशिक्षित, ग्रामीण, दरिद्री आदिवासी यांच्यामधील कृत्रिम भिंती ढासळायच्या. मानवाची भाषा मानवाला कळायची. त्या आदिवासी मुलांना एक वेळसुद्धा पोटभर जेवण मिळत नाही. त्यांना फक्त पेजेवर राहावं लागतं. घासभर भात मिळेल तो सणासुदीचा दिवस. हे ऐकून–प्रत्यक्ष पाहून हे तरुण हादरले. आदिवासी स्त्रियांच्या अंगावरची अपुरी वस्त्रं पाहून आपल्या अंगावरील सुंदर तलम वस्त्रांची कॉलेज-युवतींना लाज वाटू लागली. हॉटेल, पिक्चर्स आणि फॅशन्सपेक्षा काही निराळं विश्व असू शकतं ह्याची त्यांना कल्पना आली.

ग्रँट मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी आसपासच्या खेड्यात मेडिकल सर्व्हेला जायचे. ते आपले अनुभव सांगायचे. आदिवासींनी बाप जन्मात कधी डॉक्टर पाहिलेला नाही. नुसत्या प्रश्नांनीच या आदिवासी कुटुंबाची गाळण उडायची. प्रत्यक्ष उपचार तर दूरच ! स्त्रिया अंगाला हातदेखील लावू देत नसत. यांना तपासायचं कसं, घोर अज्ञानाला तोंड द्यायचं कसं ! काही विद्यार्थिनी मदतीला जायच्या. पूर्वी त्या जपानी सम्राटाच्या कपड्याचं माप दुरूनच घ्यावं लागे तसला सारा प्रकार.

सभोवार चिक्कू, आंबा इत्यादी फळांच्या बागा बहरलेल्या. पण हे वारली, आदिवासी बिचारे अर्धपोटी. काडीवर त्यांची सत्ता नाही. निसर्गाच्या ह्या लेकरांच्या नशिबी मात्र उपास, म्हणूनच गोदाराणींना त्या माणसांना जागं करावं लागलं.

हे सारं पाहून एक नवी जागृतीची लाट निर्माण करायला हवी ही जाणीव ह्या तरुणांत निर्माण झाली. आपण घाम गाळून पिकवलेलं शेत पाहून त्यांचे डोळे निवले. पावसाळ्यात हिरवंगार डुलणारं शेत पाहून त्यांची मनं तृप्त झाली. कापणीच्या वेळी धरतीमातेनं दिलेलं धन पाहून त्यांच्या ओठावर पंक्ती खेळू लागल्या, ' तुझ्या कामामधून, तुझ्या घामामधून, उद्या पिकल सोन्याचं रान. चल, उचल हत्यार, गडया होऊन हुषार, तुला नव्या जगाची आण–'

कॉलेज-युवकांच्या उसळत्या यौवनाला, उफाळणाऱ्या उत्साहाला अशी योग्य दिशा मिळाली की कायाकल्प होतो त्यांचा. हे लोण पसरलं तर तरुण पिढी राष्ट्राला निश्चितच विनाशाऐवजी विकासाकडे घेऊन जाईल–

' भाग्य लिहिलेलं माझं तुझं
घाम आलेल्या भाळावरी
स्वप्न लपलेलं माझं तुझं
तिथं वरड माळावरी–'

या प्रा. वसंत बापटांच्या पंक्ती साकार होतील. जपान किंवा इस्त्रायलसारखी आपल्या देशाची नवनिर्मिती करता येईल.

ज्यासी आपांगिता नाही

आज परिण, पुष्पा आणि शांता फारच खुषीत आहेत. वर्षभर आपण केलेल्या परिश्रमांचं चीज होतंय असं त्यांना वाटतंय. कारण श्री. वाघमारे एस्. एस्. सी. ला बसताहेत आणि श्री. कुलकर्णी अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र घेऊन बी. ए. ची तयारी करताहेत ते ह्या तिघींच्या मदतीनं. ह्या अंध विद्यार्थ्यांना जगातला प्रकाश, सृष्टिसौंदर्य सारं पारखं झालंय. पण त्यांच्यातली ज्ञानपिपासा मेलेली नाही. उलट ती अधिकच तीव्र झालेली. ती शमवावी कशी हा त्यांच्यापुढचा प्रश्न आणि एके दिवशी ही सुवर्णसंधी चालून आली.

नॅशनल सोशल सर्व्हिसच्या स्वयंसेविकांनी हे काम हौशीनं स्वीकारलं. बनाजी इंडस्ट्रियल होम फॉर द ब्लाइंड ह्या संस्थेतील दु:खी जीवांना हे भाग्यशाली डोळस मित्र आणि मैत्रिणी साथ देऊ लागले. अंधांच्या ब्रेल लिपीत काही पुस्तकं, नोटस् उपलब्ध आहेत. काही लाँग प्लेईंग रेकॉर्डस्देखील जोडीला ठेवलेल्या असतात, पण किती झालं तरी ती यांत्रिक उपकरणं. जिवंत मित्रमैत्रिणींचं सान्निध्य आणि स्नेह ह्यामुळं त्या अभ्यासक्रमात चैतन्य ओतलं गेलं. तो नुसता निर्जीव अभ्यासक्रम राहिला नाही. ह्या संस्थेतील अनेक दु:खी जीवांचे चेहरे उमलले ते ह्या मंडळींच्या प्रयत्नामुळं !

भारत-पाक संघर्षाच्या वेळी सर्वांचं औत्सुक्य शिगेला पोचलेलं. आघाडीवरील हकीगती समजावून घेण्यासाठी सारे आतुर. आकाशवाणी होती खरी पण अधिक सविस्तर हकीगत जाणून घ्यावी ही प्रत्येकाची इच्छा. हे अंध बांधव त्याला अपवाद कसे असणार? 'एके दिवशी का?' मी म्हटलं, 'बा! जरूर!' परिण माझ्याकडे आली अन् विचारू लागली, 'मी रोज त्यांना वृत्तपत्र वाचून दाखवू?' रोजचं वृत्तपत्र खरेदी करून ती त्यांना वाचून दाखवी. आपल्या वीरांच्या स्फूर्तिदायक कथा ऐकून त्यांची मनं उचंबळून येत. जवानांबद्दलच्या आदरानं त्यांची हृदयं आनंदानं ओथंबत. प्रयत्न करून संरक्षणनिधीला तेही थोडाफार हातभार लावत होते.

एके दिवशी देवनाथ सिंग माझ्याकडे आला अन् म्हणू लागला, 'मला समाजसेवा करायची आहे.' तो वरळीला राहात होता. मी त्याला ब्लाइंड होमचा पत्ता दिला. व्यवस्थापकांना फोन केला. तो तिथं मोठ्या उत्सुकतेनं गेला अन् व्यवस्थापकांना भेटला. त्यांनी त्याला ऑफिसच्या कामात, हिशोबात मदत करायला सांगितलं. तो वैतागला. 'मला कागदाशी व्यवहार नको; मला जिवंत माणसांशी बोलू द्या; त्यांच्याबरोबर हसून-खेळून त्यांचं दुःख हलकं करू द्या.' ही त्याची मागणी होती.

मीराचे वडील आंधळे. त्यांचे हाल ती लहानपणापासून पाहात होती. तिची आई लवकर गेलेली. वडिलांनीच तिचा सांभाळ केलेला. शेजारच्या कुणी बाया-बापड्या भाकरतुकडा करून देत. मीरा मोठी झाली. शाळेत स्कॉलरशिप मिळवून कॉलेजमध्ये गेली. रोज ब्लाईंड होममध्ये वडिलांना घेऊन ती मदतीला जायची. अंधांचं दुःख पाहून ती विरघळली. तिथल्या एका होतकरू, संगीतप्रेमी अंध तरुणाशी तिनं विवाह केला. दृष्टी गेल्यामुळं बेसूर झालेल्या त्याच्या जीवनात तिनं सूर भरला, रंग भरला. आंधळ्या वडिलांची ती काठी होतीच. आता त्या अंध तरुणाची ती जीवनसहचरी बनली.

अंधेरी येथे वरसोबा रोडवर–७ बंगल्यापाशी हेवन नावाची एक संस्था आहे. शारीरिक व मानसिक दृष्ट्या आणि मुलांसाठी अनेक अपंग, बौद्धिक वा मानसिकदृष्ट्या मागासलेली मुलं ह्या संस्थेत आहेत. तेथील दृश्य मोठं हृदयस्पर्शी, करुण आहे. उपनगरातील अनेक कॉलेजमधले तरुण-तरुणी तिथं जातात अन् त्या अपंग बालकांमध्ये आपला वेळ सत्कारणी लावतात.

ह्या मुलांपैकी कुणाला पोलिओ झालेला असतो. कुणाला अपघात, कुणाला अर्धांगवायू. कुणाचा हात निकामी, कुणाचा पाय. काही बहिरे तर काही मुके जीव. महत्त्वाचं इंद्रिय नसल्यामुळं जीवनाला केवढी पोकळी, केवढा रितेपणा आलेला असतो त्यांच्या. तो दूर करण्याचा ह्या तरुण मित्राचा प्रयत्न स्तुत्य नव्हे का?

रोज दोन तास त्यांना फिरायला नेण्याचं काम मोठं आनंदाचं असतं. त्यांना बाहेरची दुनिया दाखवायची, त्यांच्या सुखदुःखाशी समरस व्हायचं, त्यांचं हितगुज जाणून घ्यायचं काम कॉलेजमधील युवक-युवती मोठ्या कौशल्यानं करतात. कधी सामूहिक खेळ किंवा गीतं शिकवून त्यांच्या चित्तवृत्ती प्रफुल्लित करण्याच्या, मनावरील औदासीन्याचं पटल दूर करण्याच्या प्रयत्नामुळं ह्यातील अनेक दुःखी जीव खूप सावरलेले दिसतात.

ह्या लुळ्यापांगळ्या जीवांना फिरायला नेण्याचं एक खास तंत्र स्वातीनं अवगत करून घेतलेलं आहे. रिटा, शिरीनही तिला मदत करतात. कधी आकाशाचा नीलिमा दाखव, फुलांच्या विविध रंगांकडे लक्ष वेधून घे, केव्हा मावळतीच्या सूर्याचा लालिमा तर कधी ताऱ्यांनी फुललेल्या आकाशाचं सौंदर्य ह्यात ह्या अभागी जीवांचं मन रमविण्याची त्यांची धडपड.

विशेषतः आंधळ्या चित्राला आकाशातले बदलते रंग समजावून घेण्याची उत्सुकता केवढी. जुहूच्या किनाऱ्यावर नेलं तर समोरून सरसरत येणाऱ्या लाटांकडे तिला पाहात राहवंसं वाटे. हा सारा आनंद एका डॉक्टरांच्या काही चुकीमुळे तिनं कायमचा गमावला होता. तिच्या कविहृदयास साथ मिळाली स्वातीची. अन् आकाशातल्या बदलत्या रंगांचं सूक्ष्म चित्रण किंवा फेसाळत येणाऱ्या लाटांचं, किनाऱ्यावर येऊन आदळल्यावर मोत्यांचे तुषार उधळणाऱ्या लाटांचं हुबेहूब वर्णन करून स्वाती चित्राला दृक्प्रत्यय आणून देई.

अनाथबालिकाश्रमाच्या कोपऱ्यातल्या खोलीत मूकपणे अश्रू ढाळणारी ती चिमुकली रमा. ३+२=५ एवढी साधी वेरीज करणंदेखील तिला जमत नाही. शिकवलेलं एक अक्षर तिच्या डोक्यात ठसत नाही. रोज तिला मार खावा लागतो. कारण ती नेहमी खिडकीतून दिसणाऱ्या आकाशाकडे पाहात विचार करीत असते. आई कशी असते? बाबा म्हणजे काय? घर कुठं असतं? मग अभ्यास तिच्या लक्षात यावा कसा?

ह्या अनाथ बालकांचे अश्रू कोण पुसणार ? ना आई-बापांचा पत्ता ! जगाच्या दृष्टीनं कवडीमोल ठरलेले हे जीव. कोवळे, निष्पाप पण समाजाच्या नजरेत कलंकित ठरलेले. घरच्या प्रेमाला आंचवलेले. आई-बाप, भाऊ-बहीण—नात्याचे कसलेच कोमल बंध माहीत नसलेले. ना कुळाची परंपरा सांगता येत, ना घराण्याची प्रतिष्ठा लाभलेली ! उकिरड्यावर उमललेली ही घाणेरीची फुलं. सदैव दुसऱ्यानं फेकलेल्या तुकड्यावर कुत्र्यासारखं मिंधं जीवन नशिबी आलेल्या ह्या कोमेजलेल्या, चुरगळलेल्या फुलांचं व्यक्तिमत्त्व कसं उमलणार ? नेहमी हिडीस-फिडीस, शिव्या-शाप, शिक्षा ! प्रोत्साहनाचा गोड शब्द क्वचितच लाभायचा.

पण जगातल्या दुःखाची जाण असलेले हे तरुण मित्र तिथं जातात. अनाथ बालकांशी स्नेहबंध जोडतात. त्यांना आपल्या घरी नेतात. सणासुदीत त्यांच्यासाठी गोड खाऊ आणतात. त्यांना कच्चे वाटणारे विषय शिकवतात. त्यांचा मेळावा भरवतात. त्यांना हस्तव्यवसायाची माहिती करून देतात. गाणी, खेळ यामुळं त्यांच्या जीवनात आनंद ओततात. तो पाहा ६ वर्षांचा बबलू. किती आतुरतेनं वाट पाहतोय आपल्या मित्रमैत्रिणींची. आज दिवाळी. त्याच्यासाठी कोण फराळाचे करणार ? कोण फटाके आणणार ? कोण उटणं लावणार ? कोण त्याला ओवाळणार ? त्याचे उदास, भावपूर्ण डोळे प्रीतीला पाहिल्यावर हसू लागले. त्यानं तिला घट्ट मिठी मारली. नारळी पौर्णिमेला तिनं बांधलेली राखी त्याला आठवली. ती त्यानं जपून ठेवली होती. प्रीतीच्या कुशीत शिरून तो तिला आपण केलेली मातीची खेळणी, कागदाचे कातरकाम दाखवू लागला. त्याच्या डोळ्यांत आशादीप तेवू लागले.

शारदा, रझिया, प्रेम खरं म्हणजे वैद्यकीय व्यवसायात शिरायला हव्या होत्या. हॉस्पिटलमधील चॅरिटेबल वॉर्डकडे त्यांचे पाय नेहमी वळतात. तिथं पगारी नर्सेस नसतात. वॉर्डबॉइज आणि आयांचीही खूप धावपळ असते. लहान मुलांचा आणि स्त्रियांचा विभाग ह्या मैत्रिणींचा अतिशय आवडता. चिमण्या बालकांना गोष्टी सांगून त्यांना वेदना विसरायला त्या भाग पाडतात. कुणा आजीबाईंना काही धार्मिक पुस्तक वाचून दाखवतात. त्या आजोबांचं औषध आणून द्यायला कुणी नाही म्हणून डॉक्टरांचं प्रिस्क्रिप्शन घेऊन त्या जातात. मेडिकल स्टोअरमधून औषधं खरेदी करून, फळं घेऊन ती पाहा प्रेम निघाली. आजोबांच्या दूर गावी असलेल्या नातवाला पत्र लिहिलंय आजच. तो येईपर्यंत

त्यांना एकाकी वाटू नये म्हणून रश्मिया त्यांना पेपर वाचून दाखवते आहे.

आऊट-डोअर पेशंटस्‌चं कामदेखील खूप महत्त्वाचं. त्यांच्या व्यवस्थित रांगा लावणं, रजिस्ट्रेशन स्टाफला मदत करणं ही कामं युवक-युवतींची. कुणाला एक्सरे काढायचा असतो तो राहतो चुकून रक्तदान करणारांच्या क्यूमध्ये उभा ! कुणाला डेंटिस्टची मदत हवी असते अन् तो राहतो इ. एन्. टी. च्या रांगेत उभा. दोन तास उभं राहून त्यांचा नंबर लागतो. मग कुठं त्याला पत्ता लागतो, आपण चुकीच्या रांगेत उभे आहोत. पुन्हा दुसऱ्या रांगेत उभं राहताना जीव निघतो त्याचा. अशा निरक्षर रोग्यांना मदत करायला ही मंडळी सरसावतात. (रक्तपेढी) वगैरे संस्थांतूनही ह्या विद्यार्थि-विद्यार्थिनींचं काम चालू असतं.

नव्या पिढीमध्ये अंकुरणारी ही सामाजिक कर्तव्याची जाणीव फुलवायला हवी. त्यांच्या ह्या बहुविध कार्याची ओळख पटल्यावर आजच्या तरुण पिढीला सरसकट बेजबाबदार म्हणणं योग्य होईल का ? लेखावर दिलेल्या तुकारामाच्या उक्तीचा प्रत्यक्षात स्वीकार करणारे हे मित्र राष्ट्राचं भावी आशास्थान आहेत हे निश्चित !

स्त्री-मुक्ती-आंदोलनाची वाटचाल

युगानुयुगे स्त्रीकडे पाहण्याचा पुरुषाचा सर्वसामान्य दृष्टिकोण म्हणजे स्त्री ही हक्काची दासी. तिचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल. म्हणायचे तिला गृहदेवता पण तिचा खरा दर्जा मोलकरणीचा. तिला स्वतंत्र अस्तित्व नाही. व्यक्तित्व नाही. तिला पुरुषाने कधी सहचरी मानले नाही, अर्धांगी मानले नाही, वा सखी मानले नाही. कालिदासाचा 'गृहिणी सचिवः सखी मिथः—' हा आदर्श सर्वसामान्य पुरुषाला मान्य नाही. आपल्या अहंकाराच्या पुरुषी चष्म्यातून त्याने स्त्रीकडे पाहिले.

शतकानुशतके, युगानुयुगे आपल्या पाशवी बळावर मानवाच्या एका गटाने दुसऱ्या गटावर स्वामित्व गाजवले. आपल्याला पुरुषाने शारीरिकदृष्ट्या दुबळे, मानसिकदृष्ट्या कमकुवत आणि बौद्धिकदृष्ट्या पंगू बनवले याची जाणीव आता स्त्रियांना तीव्रतेने होऊ लागली आहे. अमेरिकेसारख्या प्रगत म्हणवणाऱ्या देशात स्त्रीवर जो भयंकर अन्याय होत होता त्यावर तीव्र प्रतिक्रिया उमटणे स्वाभाविक होते. औद्योगिक क्षेत्रात आघाडीवर असलेल्या या प्रबळ राष्ट्रात स्त्रीवर होणाऱ्या सर्वंकष अन्यायाची कल्पना पुढील काही बोलक्या आकड्यांवरून येईल. अमेरिकेत स्त्रियांच्या संख्येचे प्रमाण आहे ५१ टक्के पण त्यांना दुय्यम दर्जाचे नागरिकत्व

मिळालेले आहे.

स्त्री-पुरुषांच्या वेतनमानातील प्रचंड तफावत पाहा. एकाच दर्जाचे समान काम करूनही हा फरक आहे हे लक्षात घ्यायला हवे.

(१) गोऱ्या पुरुषाचे वार्षिक उत्पन्न ७८७० डॉलर्स.

(२) गोऱ्या स्त्रीचे वार्षिक उत्पन्न ४५८० डॉलर्स.

(३) काळ्या (निग्रो) पुरुषाचे वार्षिक उत्पन्न ५३१४ डॉलर्स.

(४) काळ्या स्त्रीचे वार्षिक उत्पन्न ३४८७ डॉलर्स.

स्त्रीचे दैनिक वेतन ३ डॉलर्स तर त्याच कामासाठी पुरुषाला ५ डॉलर्स मिळतात. पूर्ण वेळ काम करूनही स्त्रीचे उत्पन्न पुरुषांच्या उत्पन्नाच्या ५८.२ टक्के.

हा भेदभाव दूर करण्यासाठी प्रे. केनेडी, प्रे. जॉन्सन, प्रे. निक्सन यांनी अनेक कायदे केले, पण बरेच कायदे शेवटी कागदोपत्री राहतात. त्यांची अंमलबजावणी सहसा होत नाही. अमेरिकेतील स्त्रियांच्या विविध संघटनांनी यावर रान पेटवले आणि २० मे १९७० रोजी स्त्री कामगारांना १७,५१४,८११ डॉलर्सची थकबाकी मिळाली. ५१,१६० स्त्रियांना हा लाभ झाला. अर्थात यातून पळवाट म्हणून स्त्रियांना नोकरीत जागाच कमी द्यायच्या, दिल्या तरी खालच्या दर्जाच्या द्यायच्या असे धोरण अवलंबिले जाते.

विविध व्यवसायक्षेत्रांत काम करणाऱ्या स्त्रियांचे तौलनिक आकडे अभ्यासले तरी अमेरिका याबाबतीत मागासलेलीच दिसते.

अमेरिकेतील विद्यापीठांतील स्त्रियांच्या परिस्थितीचा अभ्यास केला तर आपल्याला आश्चर्याचा धक्काच बसेल. ज्ञानाच्या पवित्र प्रांगणातला हा पक्षपात महाभयंकर आहे. एका विद्यापीठात फेलोशिपचे प्रमाण ५१३ पुरुष व १२१ स्त्रिया असे होते.

हॉर्वर्डमधून दरवर्षी १५ टक्के पदवीधर स्त्रिया बाहेर पडतात, पण १९७० पर्यंत एकही प्राध्यापिका तेथे नव्हती. १९७१ मध्ये दोन स्त्रियांची नेमणूक झाली. अमेरिकेत डॉक्टरेटची पदवी घेतलेल्या पुरुषाला असिस्टंट प्रोफेसरपासून ॲसोसिएट प्रोफेसर व्हायला फक्त ३ वर्षे लागतात, पण तेवढीच शैक्षणिक पात्रता असलेल्या स्त्रीला मात्र ९ वर्षे रखडावे लागते. पुढे प्रोफेसरची जागा तिला सहसा मिळतच नाही.

विद्यापीठात अध्यापन करणारी स्त्री ही डॉक्टरेट असली तर त्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जाते. तिच्या विद्यार्थ्यांचासुद्धा त्यावर विश्वास नसतो. 'तुम्ही खरंच डॉक्टरेट मिळवली आहे काय?' असा अपमानकारक प्रश्न तिला विचारण्यात येतो. एखाद्या विषयावर प्राध्यापिका गंभीरपणे विवेचन करीत असली तर मध्येच तिला विचारतात, 'तुम्ही कामाला येता, मग तुमच्या मुलांची काळजी कोण घेतं? त्यांना कुठं ठेवता? ती केवढी आहेत?' आपल्या विद्वत्तेची छाप पाडण्यासाठी तेथे प्राध्यापिकांना जिवाचा फार आटापिटा करावा लागतो.

अर्थात विद्यापीठात विद्यार्थिनी म्हणून प्रवेश करतानाच तिने हा चटका अनुभवलेला असतो. तिच्यापेक्षा कमी टक्के गुण मिळालेल्या तरुणाला विद्यापीठात सहज प्रवेश; परंतु मुलींना मात्र कितीतरी अधिक टक्के गुण मिळाल्याखेरीज विद्यापीठात प्रवेश मिळत नाही. मुलांना सहसा प्रवेश नाकारला जात नाही. मुलींना मात्र प्रवेश मिळवणे फार अवघड. मुलींना शिक्षणात सवलती कमी, त्यांचे शिक्षणदेखील अधिक खर्चाचे ठरते. पेन स्टेट युनिव्हर्सिटीच्या आकड्यांवरून हे स्पष्ट दिसते. मेडिकल (वैद्यकीय) किंवा लॉ (कायदा) हे कोर्सेस मुलींना घेऊ नये असा प्रयत्न समाज करतो. विद्यापीठातील अधिकारी व प्राध्यापक त्यांना प्रोत्साहन देण्याऐवजी त्यांचे पाय मागे खेचतात. वर्गबंधूही त्यांची हेटाळणीच करतात. स्त्री डॉक्टर हा चेष्टेचा विषय ठरतो.

एवढ्या खडतर तपश्चर्येनंतर पदवी पदरात पडल्यावर जेव्हा स्त्री बाहेरच्या जगात प्रवेश करते तेव्हा तिला काय अनुभव येतो? ५–५ वर्षे विद्यापीठात शिक्षण घेतलेल्या स्त्रियांना अकुशल किंवा अर्धकुशल कामगार म्हणून काम करावे लागते. ४ वर्षे विद्यापीठात शिकलेल्या १७ टक्के स्त्रियांना सर्वांत कमी वेतनावर कामगार म्हणून काम करावे लागते. तिच्यापेक्षा कमी शिक्षण घेतलेल्या पुरुषापेक्षा तिला पगार कमी मिळतो.

नोकरी करणाऱ्या स्त्रियांपैकी ९४ टक्के स्त्रिया कारकून किंवा सेक्रेटरी म्हणून काम करतात. म्हणूनच हेलन मॅक्लीन म्हणते, 'अमेरिकेने जेवढी माणसे चंद्रावर पाठवली तेवढ्याही स्त्रिया वरच्या अधिकारपदावर पाठवल्या नाहीत.'

एखाद्या स्त्रीने प्रगती करण्याचा प्रयत्न केला तर तिच्याकडे काकदृष्टीने पाहिले जाते. ती सर्वांच्या तिरस्काराचा विषय बनते. तिला आक्रमक ठरविण्यात येते. नोकरीसाठी निवड करताना तिच्या बौद्धिक सामर्थ्यापेक्षा तिच्या शारीरिक सौंदर्या-

वर भर दिला जातो. तिच्याकडे तिचा बॉस उपभोगाची वस्तू म्हणून विषय-लालसेने पाहतो. बरोबरीच्या नात्याने एखाद्या प्रश्नाची चर्चा तो तिच्याशी करीत नाही. स्वतंत्रपणे काही केल्याचे श्रेय मिळत नाही. पगार कमी, ऑफिसच्या कामात मदत करण्याबरोबर अधिकाऱ्यांचे मनोविनोदनाचे साधन म्हणून तिला वापरले जाते. ह्या स्त्रियांच्या सार्वत्रिक तक्रारी आहेत. अखेर परिस्थिती असह्य होऊन २९ लाख स्त्री-सेक्रेटरींनी बंड पुकारले होते.

या साऱ्या गोष्टी स्त्रियांना चीड आणण्यासारख्या नव्हेत का? यासाठी पेन-सिल्व्हानिया येथे २७ फेब्रुवारी १९७१ रोजी स्त्रियांची एक परिषद भरली होती. विविध क्षेत्रांतून आलेल्या भगिनींनी तेथे अनुभवाची देवघेव केली. उपाय-योजनेचा विचार केला.

परंपरागत नोकरीतही उच्च स्थान प्राप्त करणे किंवा अधिकारपदे मिळवणे महिलांना फार कठीण. प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात ९० टक्के स्त्रिया शिक्षिका आहेत, पण ८० टक्के शाळांचे मुख्याध्यापक मात्र पुरुष आहेत. अमेरिकेच्या राजकीय जीवनातही स्त्रिया अत्यल्प प्रमाणात आहेत आणि होत्या.

ह्या साऱ्या परिस्थितीचे अवलोकन केल्यावर अमेरिकन स्त्रीला आपले जीवन असह्य का वाटू नये? ही कुचंबणा विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात तिला अनुभवावी लागते आहे. मग त्याविरुद्ध बंड पुकारणे स्वाभाविक नव्हे का? आजच्या स्त्रीमुक्ती-आंदोलनामागे अशी ही मोठी कारणपरंपरा आहे. प्रत्यक्ष या मुक्ती-आंदोलनाच्या स्वरूपाचा विचार करण्यापूर्वी स्त्रीचळवळीच्या ऐतिहासिक पार्श्व-भूमीचे थोडे अवलोकन आवश्यक ठरेल.

अमेरिकन स्त्रीने गेल्या शतकातील नीग्रोंची गुलामगिरी नष्ट करण्याच्या आंदोलनात सक्रिय भाग घ्यायला प्रारंभ केला तो मानवतेच्या हेतूने प्रेरित होऊन. या चळवळीत भाग घेत असताना दोन गोष्टी तिला तीव्रपणे जाणवल्या. एक म्हणजे नीग्रो गुलामांसारखे आपले जीवनही परतंत्र आहे, आपल्या पतीची आपल्या शरीरावर, संपत्तीवर, मुलाबाळांवर पूर्ण मालकी आहे. आपल्याला संपत्तीचे अधिकार नाहीत आणि जिवापलीकडे जोपासलेल्या आपल्या बाळांवरही आपली अजिबात सत्ता नाही. पतीच्या इच्छेनुसार नाचवली जाणारी आपण एक कळसूत्री बाहुली आहोत. इब्सेनच्या 'डॉल्स हाऊस' मधील नोराप्रमाणे!

चळवळीत काम करणाऱ्या स्त्रियांच्या प्रत्ययाला दुसरी गोष्ट आली ती अशी

की, आपण जाहीर सभेत बोललो तर आपली टवाळी होते. स्त्रीच्या शब्दाचा कुणी गंभीरपणे विचार करीत नाही. हे कटू अनुभव आल्यानंतर अमेरिकेतील सफ्रेज चळवळीला जोरदार चालना मिळाली. आपल्याला ही परिस्थिती सुधारण्यासाठी राजकारणात भाग घ्यायला हवा, आपल्याला मतदानाचा अधिकार असला पाहिजे ही गोष्ट स्त्रियांना तीव्रतेने जाणवली.

१८४८ मध्ये सेनेका फॉल्स येथे ल्युक्रेशिया मॉस व एलिझाबेथ कॅडी स्टँटन यांनी स्त्री-पुरुषांचा दर्जा समान आहे, स्त्रियांनादेखील मतदानाचा अधिकार असला पाहिजे अशी मागणी आपल्या निवेदनात केली. नॅशनल अमेरिकन वुमेन्स सफ्रेज ॲसोसिएशन किंवा द वुमेन्स खिश्चन टेपरन्स युनियन यासारख्या संस्था या काळात स्थापन झाल्या. मतदानाच्या अधिकारासाठी अमेरिकन स्त्रियांना फार प्रखर लढा द्यावा लागला. अतीव हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. अपमान, तिरस्कार, मारहाण या सर्वांना घरीदारी तोंड द्यावे लागले. कारावास पत्करावा लागला. अन्नसत्याग्रह करावा लागला. सभांतून कधी त्यांच्या अंगावर थंडगार पाण्याचा वर्षाव होई तर कधी त्यांच्या कॉन्फरन्स हॉलला आग लावण्यात येई. सफ्रेज चळवळीत कधी मतभेदाचे, वादळाचे प्रसंगही येत. कामगार चळवळीत स्त्री-पुरुष संघर्षामुळे फूट पडते म्हणून ती टाळण्याचा कामगार नेत्यांचा प्रयत्न होता. अखेर १९२० मध्ये घटनेत १९ वे संशोधन करून स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला.

त्यामागे अनेक महिलांचा त्याग व बलिदान उभे होते. सूझन ॲंथनी, एमेलिन पँकहर्स्ट व तिच्या कन्या, सारा आणि एंजेलिना ग्रिमके, मिस ॲलिस पॉल, ल्युसी बर्न अशी कित्येक नावे या संदर्भात घेता येतील. या स्त्रियांनी हा लढा जवळजवळ एक शतकभर चालवला होता.

स्त्री– मनामध्ये घुमसत असलेल्या संतापाची कल्पना आपल्याला मेरी वॉल्स्टन क्रॅफ्टने स्त्रियांच्या प्रश्नावर १७९२ मध्ये लिहिलेल्या 'Vindication of the Rights of Women' या ग्रंथावरून येते. स्त्रियांच्या सौंदर्याचे कौतुक हा तिला तिटकाऱ्याचा विषय वाटतो. त्यामुळे त्यांच्यातील खऱ्या गुणांची वाढ न होता त्या केवळ दिखाऊ, डौली बाहुल्या बनतात हे लेखिकेचे मत खूप बिचार करण्यासारखे आहे.

या संदर्भात सिग्मंड फ्राईडने आपल्या प्रेयसीला लिहिलेले पत्र फार बोलके

आहे. तो लिहितो–' माझ्या नाजुक पोरीला मी माझी स्पर्धक समजू ? छे ! मी तिला या स्पर्धेपासून दूर ठेवीन. तिचे शांत, सुंदर कार्यक्षेत्र म्हणजे तिचे घर–'

अशा रीतीने स्त्रीच्या कर्तृत्वात अडसर घालण्यात आला म्हणूनच— ' Towards a Female Liberation Movement 'ची लेखिका ज्युडिथ ब्राऊन म्हणते, " स्त्रीने विवाह केला की तिच्यावर जुल्म करण्याचा हक्क तिच्या पतीला प्राप्त होतो. शारीरिकदृष्ट्या ती पिचून निघते. तिचे भावनात्मक व लैंगिक जीवन साचेबंद होते आणि बौद्धिक बाबतीत तिचा कोंडमारा होतो. अशा रीतीने ती पूर्णपणे बंधनात अडकते. "

स्त्रीच्या मताधिकाराला विरोध करताना जे विचित्र मुद्दे मांडण्यात आले ते असे–सभ्य स्त्रियांना वेश्यांच्याबरोबर रांगेत उभे राहावे लागेल. त्यांच्यात मिसळावे लागेल. त्यात त्यांचा अध:पात होईल. कुटुंब-सुखाला ग्रहण लागेल. स्त्रिया शिकल्या की जारांना पत्रे पाठवतील, व्यभिचारिणी बनतील असा आपल्याकडे एक विचारप्रवाह होता तसाच हा प्रकार !

१९२० मध्ये स्त्रियांना मताधिकार मिळाला. एक मोठी लढाई त्यांनी जिंकली, पण त्यानंतर काही वर्षे स्त्री-चळवळ थंडावली. दुसऱ्या महायुद्धात पुरुषवर्ग आघाडीवर गेला असताना राष्ट्राचा शकट स्त्रियांनी समर्थपणे हाकला. सर्व क्षेत्रांत त्यांनी आपले कर्तृत्व गाजवले. युद्ध संपल्यावर त्या आपल्या शांत गृहजीवनाकडे पुन्हा वळल्या. त्यांचे जीवन मर्यादित झाले. युद्धावरून परतलेल्या कुटुंबियांच्या सहवासात त्या काही काळ रमल्या. पण मग त्यांना वैफल्याने ग्रासून टाकले. त्यांना जीवनात एक विलक्षण पोकळी जाणवू लागली. जगातील स्त्रीच्या मनातील या दु:खांना, मूक व्यथेला वाचा फोडण्याचे काम काही लेखिकांनी मोठ्या प्रमाणावर केले. त्यामध्ये ' The Second Sex 'ची लेखिका सिमॉन द बोव्हा ही प्रमुख होय. बालिकेच्या जन्मापासून तिच्या साऱ्या स्थित्यंतरात– युवती, प्रौढा, वृद्धा व कन्या, भगिनी, पत्नी, माता इत्यादी नात्यांमध्ये स्त्रीच्या मनाचा पूर्ण वेध घेण्याचे व तिच्या व्यक्तित्वाचे विश्लेषण करण्याचे कार्य या ग्रंथाने केले आहे ते केवळ अपूर्व आहे. त्याला जोडच नाही.

' Sexual Politics ' या ग्रंथात केट मिलेटने सारे साहित्य, धर्मग्रंथ, कला यांचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोण कसा विकृत आहे हे पुराव्यानिशी सादर केले, तर बेटी फ्रायडनने ग्रॅज्युएट होऊन १५ वर्षे संसारात रमलेल्या अनेक स्त्रियांच्या

मुलाखती घेऊन त्यांच्या कर्तृत्वहीन जीवनातली पोकळी व तिचे कारण स्पष्ट केले. जर्मन ग्रीअरने वेगवेगळे संस्कार स्त्रीमनावर करून तिचे कर्तृत्व कसे खच्ची केले जाते याची पूर्ण कल्पना दिली आहे. 'Modern Women–The Lost Sex' सारख्या पुस्तकाने स्त्रीचे कार्यक्षेत्र चूल व मूल निश्चित केले होते.

ज्याप्रमाणे मार्क्स व एंगल्सने शोषित आणि शोषक यांच्यामधील वर्ग-संघर्षाचे स्वरूप इतिहासाच्या सर्व कालखंडांचा आढावा घेऊन स्पष्ट केले, आर्थिक संघर्षाला एक तात्त्विक अधिष्ठान प्राप्त करून दिले त्याचप्रमाणे या साऱ्या ग्रंथांच्या वाचनाने, प्रचाराने, चर्चेने स्त्रियांची मनोभूमिका तयार झाली. त्या अंतर्मुख होऊन विचार करू लागल्या.

१९६६ मध्ये बेटी फ्रायडनने N. O. W. (नॅशनल ऑर्गनायझेशन ऑफ वुमेन) स्थापना केली. स्त्रियांवर होणाऱ्या पक्षपाताविरुद्ध या संस्थेने जोरदार लढा दिला. १३०० कॉर्पोरेशन्स (संस्था) विरुद्ध या संस्थेने खटले भरले. वॉशिंग्टनमध्ये १९६७ च्या नोव्हेंबरमध्ये झालेल्या परिषदेत स्त्रीहक्कांचा आठ कलमी जाहीरनामा प्रसिद्ध झाला. स्त्रियांना बाहेरच्या जगात काम करावे लागते एवढेच नव्हे तर आठवड्याला ८०–९० तास गृहकृत्याचा ताण त्यांना सहन करावा लागतो. पतीनेही गृहकृत्ये व बालसंगोपनाची समान जबाबदारी उचलावी अशी त्यांची मागणी होती. २६ ऑगस्ट १९७० रोजी स्त्रियांनी समान हक्कासाठी देशभर प्रचंड संप केला. 'आता स्वैपाक बंद', 'बाळंती धुवू नका', 'पाळणाघरे काढा' अशा मागण्या करणारे फलक घेऊन ठिकठिकाणी त्यांनी मोर्चे काढले. 'Women's Equality Action League' (WEAL) ही संस्था क्लीव्हलँड (ओहियो) मध्ये स्थापन झाली. वेगवेगळ्या विद्यापीठांतून व शिक्षण संस्थांतून स्त्रियांवर होणाऱ्या पक्षपाताचा अभ्यास त्यांनी केला. ३०० कॉलेजेस, विद्यापीठे, कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटी, मेडिकल स्कूल इ.विरुद्ध त्यांनी पक्षपाताच्या तक्रारी केल्या. श्रीमती मार्था ग्रिफिथ् यांनी कायदेमंडळातून त्यासाठी जोरदार लढा दिला आणि Equal Right Amendmentपास करून घेतली. Federalty Employed Women (FBW) ही संघटना सप्टेंबर १९६८ मध्ये डेझी फील्डने स्थापन केली. सरकारी व खासगी नोकऱ्यांत स्त्रियांवर होणाऱ्या पक्षपाताविरुद्ध या संस्थेने जोरदार काम केले. २० लाख स्त्री-कामगारांचा दर्जा उंचावण्याचे शिकस्त प्रयत्न यांनी केले. ७८·७ टक्के स्त्रिया अगदी खालच्या

श्रेणीत असतात. या संस्थेने तरुणींना भावी व्यवसायातील धोके दाखवून देण्यासाठी अनेक वक्त्या विद्यापीठांतून पाठविल्या. 'Human Rights for Women' (HRW) ही संस्था ३ वकील (मेरी ईस्टवर्ड, सिल्व्हिया एलिसन, कार्थर्स बर्गर व दायग्रेस ॲटकिन्सन) यांनी काढली. ही संस्था रीसर्च (संशोधन) शिक्षण व कायदेशीर साहाय्यासाठी स्थापन केली होती. स्त्रियांवर वेगवेगळ्या कार्यक्षेत्रांत होणाऱ्या अन्यायांविरुद्ध कायदेशीर इलाज त्यांनी सुरू केला. शेकडो खटले त्यांनी या संस्थेतर्फे चालवले.

यानंतर Bitch, Witch, Bread and Rases. Radical Mothers, रेड-स्टॉकिंग इत्यादी अनेक संस्था स्थापन झाल्या. न्यूयॉर्कमध्ये ५०, सॅन्फ्रॉन्सिस्को-मध्ये ३५, बोस्टनमध्ये २५ असे अनेक लहान मोठे गट आहेत. त्यामधून स्त्री-पुरुष संबंधाचे संपूर्ण पुनर्मूल्यांकन झाले. परंपरागत कल्पना व विचार यांमध्ये आमूलाग्र परिवर्तन घडून आले.

कॅलिफोर्नियाच्या व्हर्दा म्युरेलने तर भाषेचेसुद्धा परिष्करण केले. English ऐवजी ती मॅन्गलिश म्हणू लागली. बायकॉटऐवजी गर्लकॉट, हिस्टरीऐवजी हर्स्टरी, मिस् किंवा मिसेस् ऐवजी मिझ् असे नवे शब्द तिने सुचवले. स्त्रियांनी नवीन बायबलही लिहिले.

या स्त्री-मुक्ती-आंदोलनात आपल्याला मुख्यत्वे दोन प्रवाह दिसतात. स्त्रियांवरील अन्यायाविरुद्ध सनदशीर मार्गाने लढणाऱ्या संघटना नोकरी, शिक्षण इत्यादी सर्व क्षेत्रांतील पक्षपाताविरुद्ध या संस्था झगडत आहेत तर विवाह, मातृत्व, कुटुंबसंस्था या सर्वांबद्दल संपूर्णतया क्रांतिकारक भूमिका घेऊन नवीन मूल्यांसाठी जीवनपद्धतीसाठी लढणाऱ्या जहाल संघटना.

ह्या संघटनांनी स्त्रियांना Sex Symbol बनू देण्याला प्रखर विरोध केला आहे. मिस् अमेरिका ह्या स्पर्धेला त्यांनी विरोध करण्यासाठी ७ सप्टेंबर १९६८ रोजी एक प्रचंड निदर्शन केले. एका शेळीला मिस् अमेरिका हा मुकुट घालून त्यांनी मिरविले. स्त्रीच्या अंगोपांगांचे उत्तान प्रदर्शन करणाऱ्या जाहिरातींविरुद्ध निदर्शने केली. वधू वेषाच्या प्रदर्शनाविरुद्ध आवाज उठवला. २८ मार्च १९७० रोजी गर्भपाताचा कायदा करण्यासाठी निदर्शने केली तर सिरॅकस्मध्ये पाळणाघरांच्या मागणीसाठी मेयर्सच्या ऑफिसवर २६ ऑगस्ट १९७० रोजी निदर्शने करण्यासाठी आपली बाळे आणून त्यांच्या टेबलावर ठेवली. सौंदर्यप्रसाधनांची, ब्राजची

सार्वजनिक होळी केली. आम्ही पुरुषांच्या उपभोगाची वस्तू नाही. आम्ही स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेल्या कर्तृत्ववान महिला आहोत, हे जगाला त्या स्पष्टपणे बजावू इच्छित आहेत.

टायग्रेस ॲटकिन्सन विवाहाला गुलामगिरी आणि कायदेशीर बलात्कार मानते. विवाहातून पुरुषाला फुकटचा नोकर मिळतो. स्त्रीचे स्वातंत्र्य संपते. शिवाय तिला पुरुषाकडून प्रेमाची शाश्वतीही मिळत नाही, असे ती म्हणते.

कुटुंबातील साऱ्या जबाबदाऱ्या पति-पत्नींनी मिळून उचलायच्या आहेत. स्वयंपाक किंवा बालसंगोपन दोन्ही बाबतीत सहकार्य हवे. स्त्री बाहेरच्या जगात कर्तृत्व गाजवणार त्या वेळी तिच्या बाळाचे संगोपन करायला 'केअर'सारख्या संस्था काढल्या पाहिजेत. त्यासाठी स्त्रियांनी पोस्टर्स, बॅनर्स, व्याख्याने, निदर्शने, लेख असा धुवांधार प्रचार केला. गृहिणींना विनावेतन राबवण्यात येते तेव्हा त्यांना वेतन देण्याची व्यवस्था शासनाने करावी ही त्यांची मागणी. आपण पाहतो आयुष्यभर मुलाबाळांचे सारे कष्ट उपसल्यावर म्हातारपणी स्त्रीवर उपेक्षितेचे अपमानित जीवन जगण्याचा प्रसंग येतो. तिच्याजवळ हक्काचा पैसा नसतो.

पुरुषाला आकर्षित करणारी केशभूषा, वेषभूषा न करण्याचे या स्त्रियांनी ठरवले आहे. कारण पुरुषाला आकर्षित केल्याने स्त्रीच अडचणीत सापडते. म्हणून अनाकर्षक केशभूषा, जाडीभरडी वेषभूषा या स्त्रियांनी स्वीकारली आहे.

या चळवळीतून स्त्री-जीवनाचे ३ पर्याय स्पष्ट होतात : (१) परंपरागत गृहिणीचे कर्तव्य–चूल आणि मूल सांभाळणे. त्यामध्ये तिच्या कर्तृत्वाचा फुलोरा कोळपून जातो. (२) विवाह ही कर्तृत्वाच्या मार्गातली धोंड म्हणून विवाह-सुखावर पाणी सोडून एकटे राहणे. (३) विवाह करून नोकरी करणे म्हणजे दुहेरी जबाबदारी. ही तारेवरची कसरत करताना स्त्रीवर विलक्षण ताण पडतो. म्हणजे यातील प्रत्येक पर्याय सदोष आहे.

बहुसंख्य स्त्रियांना आजही आपले कुटुंब हा प्रेमाचा निवारा, मायेचा आसरा वाटतो. म्हणजे त्या संसारसुखावर पाणी सोडायला तयार नाहीत. पण सुशिक्षित कर्तृत्ववान स्त्रीला केवळ गृहकृत्यात आपल्या बुद्धीचा व शक्तीचा अपव्यय होतो असे वाटणे साहजिक आहे.

यातून मार्ग म्हणजे स्त्रीपुरुषांनी एकमेकांना शत्रू न लेखता संपूर्ण सहकार्याचे जीवन जगणे. गृहकृत्ये व बालसंगोपनात समान वाटा उचलून बाहेरच्या क्षेत्रातही

खांद्याला खांदा लावून काम करणे. स्वीडनने या दृष्टीने फार महत्त्वाची पावले टाकली आहेत. मुला-मुलींना एकाच पद्धतीचे एकत्र शिक्षण दिले आहे. स्वयंपाकघरातही दोघांना पाळीपाळीने स्वयंपाक करावा लागतो. 'मी आज उत्तम स्वयंपाक केला.' असे मुलगाही अभिमानाने सांगतो. त्यात त्याला कमीपणा वाटत नाही. असे संस्कार बालपणापासून त्यांच्या मनावर केले आहेत. शिवाय 'पाळणाघरे' फार मोठ्या प्रमाणात काढून नोकरीवर जाणाऱ्या मातांची सोय केली आहे. मातापित्यांना आपल्या बाळाकडे आळीपाळीने पाहता येईल अशा सोयीच्या वेळा नोकरीत ठरवून दिल्या आहेत. 'Forecast for Feminism' या मेरी ल्यू थॉम्सनच्या लेखात म्हटल्याप्रमाणे ईस्टायर्ली किबुत्सिमंच्या धर्तीवर कम्युनचा प्रयोगही बोस्टन, रॉक्सबरी, न्यूयॉर्क, सॅन् फ्रॉन्सिस्को इत्यादी ठिकाणी सुरू झाला आहे. ही कम्युनिटी होमची कल्पना क्रिस्टल ईस्टमनने फार पूर्वीच मांडली आहे. स्वयंपाकघर, बालसंगोपनगृह या कामासाठी त्यात रस असलेल्यांना वेतन देऊन कामावर ठेवण्यात येते.

या संपूर्ण सहकार्याच्या तत्त्वातूनच संसारसुखाची वेल फुलू शकेल. एका व्यक्तीने दुसऱ्यावर हुकमत गाजवून, तिने मन मारून कसाबसा संसाराचा गाडा रेटण्यात सुख कुठले? शिवाय, स्त्रीला चार भिंतींत कोंडले तर एवढ्या प्रचंड मनुष्यबळाचा नाश होणार. उलट चीन, इस्राइल इत्यादी देश स्त्री-पुरुषांना प्रत्येक क्षेत्रात बरोबरीने वागवताहेत. कम्युनिस्ट राज्यक्रांतीनंतर चीनमध्ये संपूर्ण परिवर्तन झाले आहे. लाकडी बुटात पाय कोंबून जीवनभर परावलंबी जीवन जगणारी चिनी महिला कधीच अंतर्धान पावली. इस्राइली महिला युद्ध आघाडीवर-सुद्धा लढते आहे.

स्त्री-पुरुषांनी विवाह न करता एकमेकांचा द्वेष करीत, एकमेकांना पाण्यात पाहात राहणे हे कितपत शक्य आहे? हा अनैसर्गिक प्रयोग कधीतरी शक्य होईल का? भिन्नलिंगी पशुपक्ष्यांत आकर्षण असते. मग मानव या सहजप्रेरणेवर मात कशी करणार? प्रमिलेच्या राज्यात 'बायकांच्या बंडा'चा प्रयोग फसला नाही का? फ्रान्समधील Sex Strike ची अशीच वासलात लागणार नाही का? या विकृतीने जीवन सुखी कसे होणार? जीवनाला पूर्णत्व कसे येणार? यावर एकमेव उपाय म्हणजे २ सुज्ञ स्त्रीपुरुषांचे संपूर्ण सहकार्य. स्त्रीने बैतागून मातृत्वाकडे पाठ फिरविल्यास जगाचा शेवट ओढवणार नाही का?

स्त्रीने मातृत्वाची जबाबदारी नाकारली तर जगावर काय प्रसंग ओढवेल याची कल्पनाच केलेली बरी !

युरोपखंडातही या चळवळीचे पडसाद जोरात उमटले आहेत. आयर्लंडच्या खासदार बर्नाडेट डेव्हलिन यांनी अविवाहित मातृत्व स्वीकारले आहे. त्यांना विवाह म्हणजे पुरुषाची गुलामगिरी नको आहे. आपल्या बाळाच्या पित्याचे नाव त्यांनी गुप्त ठेवले आहे. फ्रान्समध्ये नुक्तीच Sex Strike ची घोषणा झालेली आहे. स्वीडनमधील परिस्थितीचा आपण विचार केलाच. अमेरिका व युरोपखंडात 'पार्मेसिन्ह सोसायटी' मुळे लैंगिक प्रश्नाकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलत आहे. मुस्लिम राष्ट्रातील स्त्रीदेखील पडद्याच्या बाहेर पडत आहे. रशिया-चीन-इस्राइल येथे राष्ट्र उभारणीचे संयुक्त प्रयत्न चालू आहेत. जपानच्या स्त्री चळवळीची सूत्रे 'मदर्स युनियनकडे' आहेत. युद्धानंतर अनाथ बनलेल्यांचा सांभाळ करून त्यांनी नवा जपान उभा केला. इस्राइलमध्ये श्रीमती गोल्डा मायर यांनी राष्ट्राची अधिकारसूत्रे संभाळली होती, तर सिलोनमध्ये श्रीमती भंडारनायके राष्ट्रशकट हाकत आहेत.

आपल्या देशात स्त्रीपुरुषसंबंधाबद्दल काय म्हणता येईल? इथे स्त्रीला ग्रहदेवता मानले, 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:' असे स्त्रीबद्दल गौरवाने म्हटले, पण प्रत्यक्षात राक्षसी रूढींच्या दडपणाखाली कित्येक शतके स्त्री भरडली गेली. पण गेल्या १००–१५० वर्षांत त्यामध्ये खूपच सुधारणा झाल्या आहेत.

त्याचे श्रेय आपल्याकडील अनेक विचारवंतांना व समाजधुरिणांना आहे. सती प्रथेविरुद्ध लढा देणारे राजा राममोहन रॉय, स्त्रीच्या सर्वांगीण प्रगतीसाठी झटणारे महात्मा फुले आणि आगरकर, स्त्री-शिक्षणाच्या कार्यासाठी जीवन वाहून घेणारे महर्षी कर्वे ह्या विभूतींना आपण कधी विसरूच शकत नाही. महात्मा गांधींनी स्त्रियांना विशाल कार्यक्षेत्र प्राप्त करून दिले. तिच्यातील सुप्त तेज फुलवले. त्यामुळे आपल्याकडे स्त्रियांची प्रगती झाली.

शारदा कायदा, हुंडाविरोधी कायदा, हिंदु कोड बिलाने देऊ केलेले संपत्तीचे अधिकार, घटस्फोटाचा कायदा, गर्भपाताचा कायदा असा भारतीय स्त्रीजीवनाच्या प्रगतीचा आलेख काढता येईल. भारतीय विद्यापीठात वा सरकारी नोकऱ्यांत असा भयंकर पक्षपात कुठेच आढळत नाही. काही खासगी कंपन्यांचे अपवाद

मात्र आहेत. त्याहीविरुद्ध कामगारनेत्यांनी लढा दिला आहे.

भारतातील बहुसंख्य महिला मात्र आजही भयानक अज्ञानाच्या अंधकारात चाचपडत आहेत. त्या निरक्षर आहेत, दरिद्री आहेत. अन्नवस्त्रनिवाऱ्याच्या त्यांच्या दैनंदिन गरजाही भागलेल्या नाहीत. मग स्त्री-मुक्ती आंदोलन दूरच. आजही अनेक स्त्रिया पडदा व गोषामध्ये जन्माचा बंदिवास–अंधारकोठडीची सजा भोगत आहेत. त्यांचे जिणे गुलामाहूनही हीन प्रतीचे आहे. या साऱ्यांच्या मनात जागृतीची ज्योत पेटल्याखेरीज येथील क्रांती अपुरीच राहणार! नोकरी करणाऱ्या स्त्रियांची विलक्षण ओढाताण असते. पण दिवसेंदिवस बिकट होत असलेल्या आर्थिक परिस्थितीमुळे जास्त जास्त स्त्रिया अर्थार्जनासाठी बाहेर पडणार. आज ना उद्या आपल्याकडे कम्युनिटी होम, पाळणाघरे हे प्रयोग करावे लागणार, कारण एकत्र कुटुंबपद्धती कधीच संपली आहे. आजही मजुरी करणाऱ्या स्त्रीपुरुषांत भेदभाव केला जातो. दुष्काळी कामाच्या वेळी त्याविरुद्ध सतत आवाज उठवावा लागला होता. म्हणजे इथेही अशा चळवळीची गरज आहेच.

या चळवळीचा विचार करताना असे आढळते की या चळवळीबद्दल सहानुभूती वाटो न वाटो, स्त्रियांच्या प्रश्नांची जाहीरपणे चर्चा सुरू झाली आहे. स्त्रीपुरुष संबंधातील केवळ भावनात्मक अंगाऐवजी इतर घटकांकडेही लक्ष वेधले आहे. स्त्रियांसाठी शिक्षणाची, कार्याची नवी क्षेत्रे खुली होत आहेत. स्त्रीचा स्वाभिमान जागृत झाला आहे.

या आंदोलनामुळे स्त्रीपुरुषांच्या परंपरागत भूमिका संपतील. स्त्रियांना बाहेरच्या जगात कदाचित अधिक समाधान मिळेल. स्त्री स्वत: अधिक स्वतंत्र व स्वयंपूर्ण बनली तर पुरुषही पुरुषत्वाच्या तथाकथित दडपणापासून मुक्त होईल. त्याने आक्रमक वा महत्त्वाकांक्षीच असले पाहिजे हे काही पुरुषांच्या स्वभावाला पटणारेही नाही.

जेम्स थर्बर म्हणतात त्याप्रमाणे–'मग एकमेकांशी पूर्ण सहकार्याच्या ह्या वातावरणामुळे हा स्त्रीपुरुष संबंधातील संघर्ष संशयपूर्ण युद्धबंदीत संपणार नाही तर अधिक विश्वबंधुत्वाच्या सहअस्तित्वात त्याची परिणती होईल.'

कायदेमंडळातील माहिलांची कामगिरी

कायदेमंडळातील महिला

महात्माजींच्या अद्‌भुत प्रेरणेने भारतात जागृतीची एक नवी लाट निर्माण झाली. १९१५ मध्ये ते दक्षिण आफ्रिकेतून हिंदुस्थानात परतले आणि त्यानंतर भारतीय राजकारणाची सूत्रे त्यांनी हाती घेतली. ते जनतेच्या आशा-आकांक्षांचा केंद्रबिंदूच बनले. त्यांच्या आवाहनाला समाजातील सर्व थरांनी सारखाच प्रतिसाद दिला. गरीब-श्रीमंत, लहान-थोर, स्त्री-पुरुष सारे त्यांच्या नेतृत्वाखाली एकवटले. आणि भारताचा स्वातंत्र्यलढा लढण्यासाठी सज्ज झाले. १९१७ सालच्या चंपारण्यातील पहिल्या सत्याग्रहापासून तो १९४२ च्या 'चलेजाव' च्या चळवळीपर्यंत त्यांच्या नेतृत्वाखालील प्रत्येक लढ्यात भारतीय महिला सहभागी झाल्या. अशा रीतीने गांधीजींच्या प्रेरणेने व प्रमुख समाज-सुधारकांच्या कार्याने आपले राजकीय हक्क मिळविण्यात भारतीय महिला यशस्वी झाल्या.

भारतीय स्त्रियांना मतदानाचा अधिकार

अखिल भारतीय महिला परिषद किंवा स्त्रियांची राष्ट्रीय समिती यांसारख्या संघटनांनीही आपली कामगिरी चोख पार पाडली. इंग्लंड वा इतर पाश्चात्त्य

देशांतील स्त्रियांच्या तुलनेने भारतीय महिला मताधिकार प्राप्त करण्यात लवकर यशस्वी ठरल्या. त्यासाठी पाश्चात्त्य महिलांना फारच हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. भारतीय स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळवून देण्यासाठी श्रीमती मार्गारेट कझिन्स, ॲनी बेझंट, सरोजिनी नायडू इ. नी बरीच खटपट केली. ब्रिटिश पार्लमेंटकडे १४ भारतीय महिलांचे शिष्टमंडळ गेले. त्याचे नेतृत्व श्रीमती सरोजिनी नायडू ह्यांनी केले होते. १९२१ च्या कायद्याने भारतीय स्त्रियांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला. १९२६ पासून त्यांनी राजकारणात प्रत्यक्ष भाग घेण्यास प्रारंभ केला. १९२६ मध्ये मद्रास विधानसभेवर डॉ. मुथु लक्ष्मी रेड्डी निवडून गेल्या.

१९३५ च्या कायद्याने स्त्रियांचा मताधिकार अधिक विस्तृत बनला तथापि स्त्रीपुरुषांतील विषमता कायम होती. कारण आपल्या राजकीय हक्कांसाठी महिलांना आपल्या पतीच्या सामाजिक स्थानावर अवलंबून राहावे लागत होते. १९३७ च्या निवडणुकीत विधान सभांवर एकूण ५० स्त्रिया निवडून आल्या. त्यापैकी ४२ राखीव जागांवरून व ८ सर्वसाधारण जागांवरून निवडून आल्या. वेगवेगळ्या प्रांतांतील मंत्रिमंडळात ६ स्त्रियांचा समावेश करण्यात आला. श्रीमती अनसूयाबाई काळे मध्यप्रदेश विधानसभेच्या, नेली सेनगुप्ता (बंगाल) व श्रीमती सिपाही मलानी (मुंबई) विधानसभेच्या उपाध्यक्ष बनल्या.

स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेने एक नवेच पर्व सुरू झाले. स्त्रियांना कायद्याच्या क्षेत्रात समान अधिकार प्राप्त झाले. घटनेच्या ३२६ व्या कलमानुसार प्रौढ मतदानाचा अधिकार सर्वांना प्राप्त झाला. आपल्या घटनेने दिलेले अधिकार बजावण्याचा स्त्रियांनी खूप प्रयत्न केला. १९५२ पासून त्यांनी लोकसभा, राज्यसभा, व वेगवेगळ्या प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका लढविल्या त्या। पुढीलप्रमाणे—


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध क्र. ३२९२
२७।१२।८१

वर्ष	एकूण स्त्री उमेदवार लोकसभा	स्त्रियांना लोक सभा	मिळालेल्या कायदे मंडळ	जागा कायदे मं.
१९५२	५१	१९	२१६	८१
१९५७	७०	२७	४९०	१९७
१९६२	६८	३५	२३३	१५४
१९६७	६४	३१	२३१	९०
१९७१	८६	२२	—	—
१९७२			३५१	१५४

अशा रीतीने स्त्री-प्रतिनिधित्वाचा आलेख पहिल्या निवडणुकीत ४·४ टक्के पासून १९६२ मध्ये ६·७ टक्के हा उच्चांक गाठून पुन्हा १९७१ मध्ये ४·१ टक्क्यावर घसरला आहे.

वस्तुतः स्त्रीमतदारांचे प्रमाण एकूण मतदारांत ५० टक्के आहे, परंतु त्यांना मिळालेल्या जागा त्या मानाने फार कमी आहेत. इजिप्त, इराक, इथियोपिया इ. देशांच्या तुलनेने आपण बऱ्याच पुढे आहोत. या एकाच गोष्टीचे समाधान फार तर मानता येईल, कारण ह्या राष्ट्रात स्त्रियांना कायदेमंडळावर प्रतिनिधित्वच नाही. अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रात स्त्रीप्रतिनिधींचे प्रमाण फार कमी म्हणजे फक्त २·३ टक्के आहे. तरीदेखील रशिया, हंगेरी, युगोस्लाव्हिया, चीन इ. साम्यवादी देशांच्या मानाने आपल्याला बरीच मजल मारायची आहे.

देश	कायदेमंडळातील स्त्रियांची टक्केवारी
इजिप्त	—
इराक	—
इथियोपिया	—
इंग्लंड	४·१
अमेरिकेतील संयुक्त संस्थाने	२·३
फ्रान्स	१·६
कॅनडा	०·३
पश्चिम जर्मनी	६·१

देश	कायदेमंडळातील स्त्रियांची टक्केवारी
रशिया	३१
हंगेरी	२०.
युगोस्लाव्हिया	२०
चीन	४०.३
स्वीडन	२५
फिनलंड	२१.५
श्रीलंका	४.१४
जपान	१.४

गेल्या काही दशकांकडे दृष्टी टाकली तर आपल्याला असे आढळून येते की स्त्रियांनी मतदार या नात्याने आपली जबाबदारी पार पाडली आहे. पण प्रांतिक किंवा केंद्रीय पातळीवर अधिकारपदे विभूषित करण्याबाबत त्यांची प्रगती फार धिमी आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सामाजिक व आर्थिक समितीने असे नमूद केले आहे की, १९६० सालातसुद्धा ११४ सभासद राष्ट्रांपैकी फक्त ५५ सभासद राष्ट्रांतील महिला कायदेमंडळात निवडून गेलेल्या आहेत. ह्याचा पुरावा म्हणजे न्यूझीलंड. स्त्रियांना मतदानाचा हक्क देणारे हे पहिले राष्ट्र, पण तेथील कायदेमंडळात स्त्रियांना प्रतिनिधित्व मिळायला तब्बल ४० वर्षे लागली. ह्या उदाहरणावरून हा मुद्दा चांगलाच सिद्ध होतो.

महिला प्रतिनिधीचे वय

भारतातील विभिन्न कायदेमंडळांत निवडून आलेल्या महिलांच्या सामाजिक पार्श्वभूमीचा अभ्यास मोठा उद्‌बोधक ठरेल. यातील बहुसंख्य महिला मध्यम वयाच्या, साधारणतः ३५ ते ५५ वर्षांच्या गटातील आहेत. पहिल्या लोकसभेत त्यांची टक्केवारी ५५ व दुसऱ्या लोकसभेत ८१ टक्के होती. यांपैकी ५०टक्के स्त्रिया ४६ ते ५५ वयाच्या गटातील आहेत. याचे मुख्य कारण या वयातील स्त्रियांना निवडणुकीचे दौरे करणे व आपल्या पुरुष प्रतिस्पर्ध्याला तोंड देणे हे तरुण वयातील स्त्रियांपेक्षा अधिक सोपे जाते. शिवाय बहुसंख्य उमेदवार निवडणुकीत चारित्र्यहननाचा प्रयोग करतात. या प्रचाराचा उपसर्ग प्रौढ वयातील स्त्रियांना ऐन तारुण्यातील स्त्रियांपेक्षा कमी पोचतो. कौटुंबिक जबाबदाऱ्यांतूनही

त्या अधिक मोकळ्या झालेल्या असतात. हेही त्याचे आणखी एक कारण असावे. तारुण्यात अपत्य-जन्म व संगोपन या जबाबदाऱ्या स्त्रियांवर अधिक प्रमाणावर असतात.

सामाजिक दर्जा

वयोमर्यादेप्रमाणेच निवडून आलेल्या भगिनींचा सामाजिक दर्जा, शिक्षण, व्यवसाय इ. मध्ये बरेच साम्य आढळते. पहिल्या लोकसभेपासून आजच्या विसर्जित लोकसभेपर्यंत स्त्री-प्रतिनिधींत काही समान वैशिष्ट्ये आहेत. त्या उच्च विद्याविभूषित आहेत. त्यांनी महाविद्यालयात किंवा विद्यापीठात शिक्षण घेतलेले आहे. यावरून आपण असा निष्कर्ष काढू शकतो की, सुशिक्षित स्त्रिया अशिक्षित स्त्रियांपेक्षा आपले राजकीय हक्क बजावण्याबाबत अधिक जागरूक आहेत. पुरुष प्रतिनिधींच्या बाबतीतदेखील ही गोष्ट लागू पडेल. हिमाचल प्रदेशातील मागासलेल्या भागातील अशिक्षित स्त्रियांना लोकसभेत व कायदेमंडळात फारच कमी प्रतिनिधित्व आहे. उत्तर प्रदेशात स्त्री-शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. परंतु लोकसभेच्या जन्मापासून या राज्याने सर्वांत अधिक स्त्री-प्रतिनिधी लोकसभेवर पाठविलेले आहेत. ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे.

पहिल्या लोकसभेच्या निवडणुकांपासून व्यवसायनिहाय प्रतिनिधित्वाची वाटणी सातत्याने सारखीच झालेली दिसते. गेल्या लोकसभेपर्यंत अर्ध्याअधिक महिला-प्रतिनिधी सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्त्या होत्या. सध्याच्या (विसर्जित) लोकसभेत त्यांची संख्या ३७ टक्के आहे. त्यानंतर महत्त्वाचा गट म्हणजे शेतकी व शिक्षण क्षेत्रातील प्रतिनिधींचा. चौथ्या लोकसभेत त्यांची संख्या १३ टक्के व पाचव्या लोकसभेत १८ टक्के होती. यानंतरचा गट राजघराण्यातील महिलांचा आहे. त्यांनाही राजकारणाच्या रंगणात सक्रिय कार्य करायची इच्छा आहे. दुसऱ्या लोकसभेच्या निवडणुकांपासून त्यांची संख्या १३ टक्क्यावरून १७ टक्क्यांवर गेलेली आहे. व्यापार व उद्योगधंद्याच्या क्षेत्रातील महिलांचे प्रतिनिधित्व जवळजवळ नाहीच. वैद्यकीय व्यवसायातील महिलांचे प्रमाण दुसऱ्या व चौथ्या लोकसभेत केवळ २ टक्के होते. एकूण व्यापार-उद्योगात भाग घेणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण कमीच असते. वैद्यकीय व्यवसायातील महिला आपल्या व्यवसायावर लक्ष केंद्रित करतात. पीडित जनतेला वैद्यकीय सहाय्य करणे त्या अधिक उपयुक्त समजतात.

निवडणुका व राजकीय उलाढालीकडे त्यांचे लक्ष कमी असते.

पक्षांची पोकळ आश्वासने

बहुतेक सर्व राजकीय पक्ष स्त्रियांना खास सोयी करून देण्याचे वचन देतात. त्यांची मते मिळविण्याची त्यांच्यात चढाओढ असते. सार्वत्रिक निवडणुकांत १० ते १५ टक्के जागा आम्ही स्त्री-उमेदवारांसाठी राखून ठेवू असे ते ठासून सांगतात. पण प्रत्यक्षात कोणत्याही राजकीय पक्षाने हे लक्ष्य गाठलेले नाही. काँग्रेस पक्षाने प्रत्येक लोकसभेत सर्वांत अधिक महिला–प्रतिनिधी पाठविल्या असल्या तरी त्यांनाही हे वचन पाळता आलेले नाही. स्त्रियांच्या सामाजिक दर्जाची पाहणी करण्यासाठी निर्माण झालेल्या समितीने आपल्या अहवालात असे म्हटले आहे की, १९७१च्या निवडणुकांत स्त्री-उमेदवारांची संख्या १७ टक्के असली तरी प्रत्यक्षात त्यांपैकी ४ टक्के महिलाच निवडून आल्या. ह्याचे कारण पक्ष संघटनेवर पुरुषांचा प्रभाव असल्यामुळे स्त्री-उमेदवारांना जागा देण्याबाबत त्यांना फारशी उत्सुकता नसते.

मंत्री झालेल्या स्त्रिया

अगदी पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांपासून पाहिले तर स्त्रियांनी पुरुषाबरोबर मंत्रिपदाची जबाबदारी केंद्रीय व प्रांतिक अशा दोन्ही मंत्रिमंडळांत सांभाळली आहे. देशाच्या पंतप्रधानपदीही गेली ११ वर्षे एक महिलाच आहे. असा मान फक्त भारत व श्रीलंका या दोन देशांनाच लाभलेला आहे.

खालील तक्त्यावरून स्वातंत्र्योत्तर काळात महिलांनी केंद्रीय मंत्रिमंडळात मिळविलेल्या जागांची कल्पना येईल.

वर्ष	एकूण मंत्री	स्त्री मंत्री	स्त्री उपमंत्री	स्त्री राज्य मंत्री
१९५२	२६	१	—	—
१९५७	३८	—	२	—
१९६२	५२	—	३	२
१९६७	५१	१	३	१
१९७१	५३	१	१	२

स्त्रियांचे लोकसंख्येतील प्रमाण व स्त्री-मतदारांची एकूण संख्या विचारात घेतली तर त्या मानाने स्त्रीमंत्र्यांची संख्या फार कमी आहे. एकच समाधान की गेल्या २८ वर्षांत ह्या संख्येत हळूहळू वाढ होते आहे. १९७१ च्या निवडणुका मात्र त्याला अपवाद आहेत. जगभरसुद्धा रशिया सोडला तर अन्यत्र स्त्री-प्रतिनिधित्वाचे चित्र फारसे उत्साह देणारे नाही. महिलांनी (भारतीय) संसदेच्या अनेक समित्यांवर उदा० लोकलेखा समिती, विशेषाधिकार समिती इ. वर फार कौशल्याने काम केले आहे. काही वेळा या समित्यांचे अध्यक्षपदही त्यांनी विभूषित केले आहे.

मंत्रिपद भूषविण्याचा मान प्रथम राजकुमारी अमृत कौर यांना मिळाला. त्या केंद्रीय आरोग्यमंत्री होत्या. त्यांच्याखेरीज डॉ. सुशीला नायर, श्रीमती तारकेश्वरी सिन्हा, नंदिनी सत्पथी, डॉ.सरोजिनी महिषी, जहानारा जयपालसिंग, डॉ.फुलरेणू गुहा इ. भगिनींनी केंद्रीय मंत्रिमंडळात काम केले आहे. श्रीमती चंद्रशेखर तर पंडितजींबरोबर परराष्ट्र-खाते सांभाळत होत्या आणि संसदीय काँग्रेसपक्षाच्या चिटणीसही होत्या. केंद्रीय मंत्रिमंडळाखेरीज ३ राज्यांचे मुख्यमंत्रिपद व राज्यपालपदही महिलांनी सांभाळले आहे. श्रीमती सुचेता कृपलानी (उत्तर प्रदेश), नंदिनी सत्पथी (ओरिसा) व शशिकला काकोडकर (गोवा) यांनी प्रांताचे मुख्यमंत्रिपद सांभाळले तर श्रीमती सरोजिनी नायडू, पद्मजा नायडू व विजयालक्ष्मी पंडित यांनी अनुक्रमे उत्तर प्रदेश, बंगाल व महाराष्ट्र राज्याचे राज्यपालपद विभूषित केले.

संसदीय कामगिरी

संसदेतील स्त्रीसदस्यांनी केवळ विविध समित्यांवर काम केले असे नव्हे तर संसदेच्या चर्चांत व प्रश्नोत्तरांच्या तासातदेखील त्यांनी आपल्या पुरुष सहकाऱ्यांच्या बरोबरीने भाग घेतला. स्त्रियांच्या स्थितीबद्दल व समस्यांबद्दल त्यांनी प्रश्न विचारले. हरिजन भगिनींच्या दयनीय अवस्थेबद्दल, रेल्वेमध्ये स्त्री-उतारूंसाठी केल्या जाणाऱ्या सोयीबद्दल त्यांनी प्रश्न केले. परंतु स्त्री-सदस्यांचे लक्ष केवळ स्त्री-विश्वापुरते मर्यादित नव्हते. राष्ट्रापुढील अनेक महत्त्वाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय समस्यांवरदेखील त्यांनी प्रश्न विचारले. यावरूनच त्यांचा व्यापक दृष्टिकोण सिद्ध होतो. त्यांनी चोरटा व्यापार, लाचलुचपत, देशाच्या विविध

भागातील गंभीर अन्नसमस्या, सुशिक्षित स्त्रीपुरुषांची बेकारी, विशेषत: वैमानिक, तंत्रज्ञ, इंजिनिअर्स इ. उच्च–शिक्षित लोकांच्या समस्यांत त्यांनी लक्ष घातले. परदेशी व्यापार, शिल्पाचे प्राचीन नमुने, नोकरशाहीची जुलमी वागणूक इ. बद्दलही त्यांनी प्रश्न उपस्थित केले.

विरोधी पक्षाच्या काही सदस्यांनी आपल्या भाषणातून सरकारवर प्रखर हल्ला चढविला. त्यांनी केलेले काही आरोप पुढीलप्रमाणे होते : (१) विशेषत: निवडणुकीच्या काळात त्यांनी जातीयवादाला प्रोत्साहन दिले. (२) निवडणूक आयुक्तांना निःपक्षपातीपणे काम करू दिले जात नाही. (३) संसदेने नियुक्त केलेल्या समित्यांच्या सूचनांवर अंमल करायला मुद्दाम विलंब केला जातो. (४) प्रस्थापित हितसंबंधांची आणि समाजातील भांडवलदार वर्गाला ते काँग्रेसपक्षाला साह्य करीत असल्यामुळे सरकार त्यांना विशेष मदत करते. काँग्रेसपक्षाच्या स्त्री-खासदारांनी विरोधी पक्षावर प्रत्यारोप केले. (५) मागासलेल्या प्रदेशाकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. ग्रामीण विभागाचे हितसंबंध डावलून शहरी विभागांना उत्तेजन दिले जाते असाही आरोप विरोधी महिला सदस्यांनी केला. (६) एका सदस्येने सरकारवर उघडउघड असा आरोप केला, की सरकार लोकशाहीचे सारे संकेत झुगारून देऊन वटहुकुमांचे राज्य प्रस्थापित करीत आहे. (७) तुतिकोरिन हे महत्त्वाचे बंदर म्हणून घोषित न केल्यामुळे पार्वतीकृष्णन् सरकारच्या ढिलाईच्या धोरणावर तुटून पडल्या. त्या म्हणाल्या, "आम्हाला सरकारी कामकाजाचा चांगलाच अनुभव आहे. प्रथम सर्व गोष्टींवर विचार चालू असतो; मग अधिक विचार चालू असतो; मग तातडीचा विचार चालू असतो. अशा रीतीने अनेक महिने व वर्षे लोटतात पण प्रत्यक्षात काहीही घडत नाही."

स्त्रियांचे प्रश्न

संसदेत ज्या ज्या वेळी स्त्री व बालकांविषयीच्या प्रश्नांवर चर्चा होते, त्या त्या वेळी स्त्रीसदस्या आपल्या जागरूकतेचा पुरावा देतात. यासंबंधीची काही उदाहरणे पाहा :

१९५४ मध्ये विवाहविषयक खास विधेयकावर चर्चा चालू होती तेव्हा त्यांनी मतभेद असूनही एकत्र राहण्याची पतिपत्नीवर सक्ती करणे व संततीवर अनैतिकतेचा शिक्का मारणे या दोन गोष्टींवर टीका केली. स्त्रीविषयी अधिक

उदार मानवतावादी दृष्टिकोण स्वीकारण्याचा त्यांनी सर्वांना आग्रह केला. सर्व धर्मांना समान नागरिक कायदा लागू करावा असा आग्रह धरताना श्रीमती रेणू चक्रवर्ती म्हणाल्या, " लोकांनी समान नागरी कायदा स्वीकारावा, या दृष्टीने आपण टप्प्याटप्प्याने प्रयत्न केला पाहिजे. "

१९५५ मध्ये महिला सदस्यांनी हिंदू विवाहकायद्याला जोरदार पाठिंबा दिला. स्त्रियांना देण्यात येणाऱ्या स्वल्प पोटगीबद्दल त्यांनी असमाधान व्यक्त केले. मुलींना मालमत्तेमध्ये वाटा न देणे हे घटनेच्या विरुद्ध आहे. घटनेमधील मूलभूत हक्कांच्या तरतुदीविरुद्ध हे वर्तन आहे. श्रीमती **शिवराजवती नेहरू** यांनी स्त्रियांच्या करुण अवस्थेबद्दल बोलताना असे म्हटले की, " अन्यायावर अधिष्ठित असलेल्या समाजपद्धतीत सर्व कर्तव्य स्त्रियांकडे आणि सारे अधिकार पुरुषांकडे अशी असमान वाटणी आहे. "

स्वातंत्र्य-लढ्यातील कामगिरी

विशेषत: महिलांनी गांधीजींच्या प्रेरक नेतृत्वाखाली स्वातंत्र्य लढ्यात केलेल्या उज्ज्वल कामगिरीची आठवण संसदेतील बहुसंख्य महिला-सदस्यांनी करून दिली. स्त्रियांना कायदेविषयक मदत मोफत मिळावी असाही त्यांनी आग्रह धरला. हुंडाविरोधी विधेयकावर बोलताना महिला-सदस्या केवळ आपला निषेध नोंदवून थांबल्या नाहीत तर त्यांनी हुंडा-पद्धतीच्या भयानक परिणामांचे चित्र-देखील प्रभावीरीत्या रंगविले. हुंडापद्धती एक दखलपात्र गुन्हा ठरवावा आणि त्यासाठी कडक शिक्षा ठोठावण्यात यावी अशी सूचनादेखील त्यांनी केली.

या विधेयकाखेरीज ऑगस्ट १९५४ च्या अन्नभेसळ विधेयकावरील चर्चेतही स्त्रियांनी भाग घेतला. १९६१ मधील प्रसूतीविषयक सोयीबद्दलचे विधेयक, गर्भारपण, वैद्यकीय मदतीने संपविण्याचे विधेयक, बालकांसंबंधीचे विधेयक इ. विधेयकांवरील चर्चेतही त्या सहभागी झाल्या. सार्वजनिक आरोग्य संभाळण्याच्या दृष्टीने, सरकारने विशेषत: स्त्रिया व मुले यांच्या आरोग्यासंबंधी यथायोग्य उपाय-योजना करावी यासाठी त्यांनी खास आग्रह धरला. स्त्रियांचे शिक्षण, विवाहातील वधूवरांमध्ये १५ वर्षांपेक्षा अधिक अंतर असल्यास हरकत घ्यावी, लोकसंख्येला आळा घालण्यासाठी निर्बीजीकरणाची शस्त्रक्रिया करावी, समाजकल्याण समितीवर महिलांची अधिक प्रमाणात नेमणूक करावी इत्यादी अनेक महत्त्वाच्या सूचना होत्या.

विजयालक्ष्मींच्या सूचना

केवळ सुशिक्षित व शहरी मतदारसंघातील स्त्रियाच नव्हेत तर आदिवासी व मागासलेल्या वर्गातील भगिनीदेखील स्त्रियांच्या समस्यांवर प्रामुख्याने हरिजन स्त्रियांच्या प्रश्नांवर हिरीरीने बोलत असतात, हा मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे. सामान्यत: लोकसभेत स्त्रियांचे प्रतिनिधित्व अल्प आहे. तरीदेखील लोकसभेत जाण्याची संधी मिळालेल्या स्त्रियांनी आपले कार्य योग्य रीतीने करून दाखविले आहे आणि देशाचा कारभार स्त्रियांच्याविना चालू शकत नाही हे त्यांनी सिद्ध करून दाखविले आहे. एकदा श्रीमती विजयालक्ष्मी पंडित म्हणाल्या होत्या की, "भारतात स्त्रियांनी पुरुषांपेक्षा अधिक गुणवान असले पाहिजे. आपण दुय्यम दर्जाच्या राजकारणी नाही हे त्यांनी सप्रमाण सिद्ध केले पाहिजे. त्यांच्याजवळ कणखर व्यवहारी दृष्टी, स्वत:च्या हक्कांचे संरक्षण करण्याची शक्ती व सामर्थ्य आहे असे नव्हे. वेळ पडली तर त्यासाठी त्या लढाही देऊ शकतील. आपण पुरुषांपेक्षा वरचढ नसलो तरी त्यांच्या बरोबरीच्या आहोत, कधी पुरुषांची स्त्रिया-संबंधीची दृष्टी पूर्वग्रहदूषित असते. त्यांना अधिकारपदे मिळाली तर पुरुषांना रुचत नाहीत. पण अशा परिस्थितीतदेखील त्या आपली गुणवत्ता सिद्ध करून दाखवितात."

महिला आघाडीपुढील कामे

स्त्रियांना सामाजिक जीवनातील त्यांचे कायदेशीर स्थान द्यायचे असेल तर त्यांना राज्यकारभारात योग्य वाटा आणि कायदेमंडळात योग्य प्रतिनिधित्व मिळायला हवे. त्यासाठी तिहेरी उपाययोजना आखली पाहिजे. स्त्रियांच्या अखिल भारतीय महिला परिषद, राष्ट्रीय महिला समिती, पदवीधर स्त्रियांची संघटना इ. सारख्या संस्थांनी स्त्रियांच्या सर्व क्षेत्रातील समानतेसाठी लढले पाहिजे. स्त्रियांच्या प्रश्नांवर सरकारी धोरणाला त्या योग्य वळण लावू शकल्या नाहीत, म्हणून त्यांनी अधिक चिकाटीने व धडपडीने काम केले पाहिजे. स्त्रियांना सार्वजनिक जीवनातील त्यांचा वाटा मिळण्यासाठी लोकमत अनुकूल करून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला पाहिजे. सर्व क्षेत्रांत स्त्रिया पुरुषांच्या तोडीस-तोड आहेत, या दृष्टीने पुरुषांचेही शिक्षण करण्याची आवश्यकता आहे. महागाई विरोधी स्त्री-संघटना मुंबईत स्थापन झाली. तिचा उद्देश किमती स्थिर

करणे आणि ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी सरकाराला पावले उचलण्यास भाग पडून सामान्य माणसांपुढील समस्या सोडविणे हा आहे.

दुसरा उद्देश असा की, बहुतेक राजकीय पक्षांची महिला आघाडी असली तरी त्या आघाडीकडून कितपत कार्य होते हा विवाद्य प्रश्न आहे. त्यामुळे ही आघाडी अधिक कार्यक्षम व परिणामकारक होण्याच्या दृष्टीने पावले टाकली पाहिजेत. लोकसभेतील व विधिमंडळातील कामकाजाचे तंत्र दिवसेंदिवस अधिकाधिक गुंतागुंतीचे झाले आहे. त्या कामासाठी अभ्यासवर्ग चालविले पाहिजेत. स्त्रीपुरुष आमदार–खासदारांसाठी स्त्री–विधेयकांना विशेषत: स्त्रियांच्या प्रश्नांबद्दल अधिक माहिती द्यायला पाहिजे. राजकीय पक्षामध्ये वसत असलेली स्त्रियांसंबंधीची उदासीनता दूर करण्यासाठी दोन उपाय सुचविले जातात. एक म्हणजे स्थानिक स्वराज्यसंस्थांत, राज्यविधिमंडळात, एवढेच नव्हे तर लोकसभेतही काही जागा काही वर्षे तरी महिलांसाठी राखून ठेवाव्यात. बर्नार्ड शॉ यांनी तर प्रत्येक मतदारसंघात दोन मते असावीत, प्रत्येक मतदाराला एक स्त्रीप्रतिनिधी व एक पुरुष-प्रतिनिधी निवडण्याची संधी मिळावी अशी सूचना केली होती.

या संदर्भातील स्त्री-संघटनांचे व राजकीय पक्षांचे प्रयत्न सरकारचे सहकार्य मिळाल्याखेरीज यशस्वी होणार नाहीत. स्त्रियांच्या दर्जाबद्दलच्या सरकारी अहवालात म्हटले आहे की, स्त्रिया राजकीय आखाड्यात उतरत नाहीत याचे एक कारण निवडणुका दिवसेंदिवस अधिकाधिक खर्चाच्या होत आहेत. म्हणून निवडणुकीच्या खर्चात कपात केली पाहिजे. शिवाय स्थानिक संस्थांत, सरकारी आणि निमसरकारी समित्यांवर, लोकसभेत व मंत्रिमंडळावर स्त्रियांना प्रतिनिधित्व देण्याचे निश्चित धोरण अवलंबिले पाहिजे. महिलांनी आपली खाती उत्तम रीतीने संभाळून दाखविली आहेत. अशा कर्तबगार महिलांची आपल्या देशात वाण नाही. तेव्हा स्त्रियांना फक्त स्थानिक स्वराज्य, समाजकल्याण, आरोग्य, शिक्षण ह्यासारख्या स्त्रीखात्यांपेक्षा पुरुषांच्या सारखीच खाती मिळाली पाहिजेत, असा आग्रह धरला पाहिजे. त्यांच्या शिक्षणाप्रमाणे व आवडीप्रमाणे त्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळायला हवे. स्त्रियांच्या प्रश्नाकडे लक्ष देण्यासाठी एक खास खाते निर्माण करण्यात यावे. फ्रान्समध्ये अशी व्यवस्था आहे. त्यामुळे स्त्रियांची मुक्तता लवकर होऊ शकेल.

स्त्रियांच्या समस्या कशा सुटतील ?

अर्थात स्त्रियांची गुलामगिरीतून मुक्तता हा स्वतंत्रपणे वेगळा काढता येण्यासारखा प्रश्न नाही. सामाजिक, राजकीय, आर्थिक समता मिळविण्यासाठी करावयाच्या लढ्याचा तो एक भागच आहे आणि समाजाची अधिक न्याय्य व समतोल पायावर उभारणी केल्याशिवाय स्त्रियांच्या समस्या पूर्णपणे व समाधान-कारकपणे सुटणार नाहीत. समाजाच्या सर्व थरांत स्त्रीला स्वतंत्र व्यक्ती व स्वयंपूर्ण नागरिक म्हणून मान्यता मिळाल्याखेरीज हे शक्य नाही. वर सुचविलेल्या उपायाचा अवलंब करून स्त्रियांची प्रगती साधता येईल आणि मग सत्तेच्या राजकारणापेक्षा शांतीचे व समृद्धीचे राजकारण निर्माण करता येईल.

अमेरिकेतील महिला

अमेरिकेतील स्त्रीजीवनाचा इतिहास म्हणजे एक प्रदीर्घ संघर्षाचा इतिहास. प्रतिकूल नैसर्गिक परिस्थिती आणि मानवनिर्मित स्वार्थी कायदे याविरुद्ध दिलेल्या या लढ्यात अनेक महिलांनी आपली शक्ती, बुद्धी, चिकाटी आणि संघटना-कौशल्य पणाला लावले. आपल्या प्रभावी वक्तृत्वाने आणि लेखनाने जागृतीची ज्योत देशभर पेटवली. अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी त्यांनी खडतर परिस्थितीत सर्वदूर प्रवास केला. पैसा, प्रसिद्धी आणि सहकार्य यांची सर्वतोपरी वाण असताना मनाचा तोल ढळू न देता, आपल्या गृहिणी माता ह्या कर्तव्यात यत्किंचितही कसूर न करता कार्य केले. राष्ट्रावरील प्रत्येक संकटात कंबर बांधून काम केले. राष्ट्रशकट चालविण्याची महत्त्वाची कामगिरी बजावली. पुरुषवर्ग युद्धभूमीवर रक्त सांडत असताना त्याच्या शुश्रूषेसाठी स्त्री सावलीसारखी त्याच्या मागे उभी होती. त्याच्या अनुपस्थितीत साऱ्या उद्योगधंद्यांची चक्रेदेखील महिलावर्गाने फिरत ठेवली.

एवढे सारे कार्य करूनही अनेक वेळा महिलांना निराशेच्या घोर अंधकारात ढकलण्यात आले. त्यांनी केलेल्या कष्टांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली नाही. उलट विद्येच्या प्रांगणात असो, उद्योगधंद्यांच्या क्षेत्रात असो वा कायद्याच्या

कक्षेत असो, स्त्रीला सदैव पक्षपाताने वागविण्यात आले आणि लढाऊ महिलांनी या साऱ्या विरोधी शक्तींचा प्रतिकार मोठ्या संयमाने, दृढनिश्चयाने आणि दीर्घोद्योगाने केला. अमेरिकन महिला ही कचकड्याची नाजूक, नटवी बाहुली नाही. ती केवळ पुरुषाच्या हातातील खेळणे नाही तर एक अत्यंत संपन्न व्यक्तिमत्त्व असलेली, ज्ञानाचा ध्यास घेतलेली प्रभावी शक्ती आहे.

युरोपमधून अमेरिकेच्या भूमीवर पहिले पदार्पण करणाऱ्या स्त्रिया म्हणजे ॲन फॉरेस्ट आणि तिची मोलकरीण ॲन बुरास. त्यांनी १६०८ मध्ये व्हर्जिनियात प्रवेश केला. धार्मिक छळाला कंटाळून वा नशिबाची परीक्षा घेण्याच्या हेतूने अमेरिकेच्या भूमीकडे धाव घेणाऱ्या पुरुषवर्गाला स्त्रीसहवासाखेरीज जीवनाला स्थैर्य येणार नाही, म्हणून १६१९ मध्ये ९० महिलांना युरोपमधून बोलावण्यात आले. वसाहतीतील लोकांनी त्यांच्याशी विवाह केले.

प्रारंभी अमेरिकेतील जीवन फार कष्टमय होते. या उजाड भूमीवर प्लेग-सारख्या भयंकर रोगांशी झगडत आणि रेड इंडियन्सशी सामना देत त्यांना जगावे लागले. काही लोक सहकुटुंब आले. जलप्रवासाच्या दगदगीने अनेक स्त्रिया वाटेतच प्रसूत होऊन मृत्युमुखी पडल्या.

ब्रिटिश कायद्यामुळे या काळात स्त्रीला केवळ कर्तव्ये होती. हक्क कोणतेही नव्हते. विवाहित स्त्रियांना कोणत्याही करारावर सही करता येत नसे. स्वत: कमावलेल्या पैशावरही त्यांचा हक्क नव्हता. इतकेच काय शरीरावरचे कपडेदेखील पतीच्या मालकीचे असत. घटस्फोटाचे कायदे फार कडक होते आणि घटस्फोटा-नंतर मुलांवर आईचा हक्क नसे. पतिनिधनानंतर विधवेला फक्त ५ डॉलर्सचे सामान मिळत असे. मुलांच्या पोषणाची जबाबदारी तिच्यावरच !

स्त्रीच्या समान दर्जाच्या कल्पनेचा प्रथम उगम झाला तो न्यू इंग्लंडमध्ये— बोस्टनमध्ये. ॲन हयूजिन्सनने ऑर्थडॉक्स चर्चविरुद्ध बंड पुकारले. बायबलचे सखोल ज्ञान व उत्तम वक्तृत्व असलेल्या ह्या स्त्रीने सहिष्णू धार्मिक स्वातंत्र्याची ललकारी दिली. या गुन्ह्याबद्दल तिची न्यायालयीन चौकशी झाली ती आजारी व गर्भवती अवस्थेत. त्यानंतर तिला हद्दपारीची कठोर सजा फर्मावण्यात आली.

१७७० मध्ये अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धात माली पिचर, देबोरा गनेट इत्यादी स्त्रियांनीही भाग घेतला. रेव्हिन्यू कायदा रद्द होईपर्यंत ब्रिटिश चहावर व ब्रिटिश

मालावर स्त्रियांनी बहिष्कार पुकारला व आपली तेजस्वी वृत्ती जगाला दाखवून दिली.

युद्धकाळात व्यापाऱ्यांनी कॉफी, साखर अशा जीवनावश्यक वस्तूंची साठेबाजी करून कृत्रिम टंचाई व भाववाढ केली. त्याविरुद्ध स्त्रियांनी संघटितपणे दिलेला यशस्वी लढा पाहून पुरुषवर्ग चकित झाला! या राष्ट्रीय संकटात आपल्या कुटुंबाची काळजी घेऊन त्यांनी शेतीचे काम पाहिले. राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची धुरा सांभाळली. सैन्याला कपडे पुरवले. या कालखंडात मिसेस एस्थर रोड व बेंजामिन फ्रँकलिनची कन्या या दोघींनी कामाची सारी जबाबदारी उचलली. पुढेही अमेरिकेच्या अंतर्गत यादवी युद्धात आणि दोन्ही जागतिक महायुद्धांत स्त्रियांनी राष्ट्रकार्यात सहकार्य केले. त्यामुळे साहजिकच त्यांच्या ठिकाणी समान हक्कांची जाणीव निर्माण झाली. स्त्रियांना केवळ घरकामात डांबण्याच्या या प्रयत्नाविरुद्ध निषेधाचा पहिला आवाज उठवला तो म्हणजे श्रीमती मरेने. १७९० मध्ये कताईच्या यंत्राचा शोध लागताच स्त्रीचा दर्जा बदलला. घरगुती उद्योगधंद्याऐवजी आता तिला १३–१४ तास फॅक्टरीत काम करावे लागे. पण स्त्रियांना मजुरी मात्र मिळे पुरुषांच्या एक चतुर्थांश. १९ व्या शतकात औद्योगिक क्रांतीनंतरदेखील स्त्रीला विषम वेतन, मालक व मुकादमाकडून होणारा छळ या गोष्टींना तोंड द्यावे लागे. सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत फॅक्टरीत राबून आल्यावर नवऱ्याच्या पिठात आपले मीठ घातल्यानंतर तिला गृहकृत्याचा सारा भार उचलावा लागे. वेतनातील ही विषमता २० व्या शतकातही कायम राहिली.

स्त्रीचे दैनिक वेतन ३ डॉलर्स. तेवढ्याच कामाला पुरुषाला ५ डॉलर्स म्हणजे पूर्ण वेळ काम करूनही स्त्रियांचे उत्पन्न पुरुषाच्या ५८·२ टक्के. कामगारनेत्यांना यासाठी अविश्रांत टक्कर द्यावी लागली. कायदेशीर लढा द्यावा लागला. अनेक राष्ट्राध्यक्षांना यात हस्तक्षेप करावा लागला. २० मे १९७० रोजी स्त्रियांच्या संघटनांना यश मिळून १७,५१४,८११ डॉलर्सची थकबाकी ५१,१६० स्त्रियांना मिळाली.

१७ व्या शतकापासून स्वस्त मजुरीसाठी कापूस, तंबाखू इत्यादीच्या लागवडीसाठी व घरकामासाठी ठिकठिकाणाहून पळवून आणलेल्या गुलाम म्हणून विकलेल्या स्त्रियांचा प्रश्न होता. २०० वर्षांत २ कोटी लोकांची गुलाम म्हणून आयात करण्यात आली. १८०८ मध्ये गुलामांचा व्यापार कायद्याने बंद

झाला तरी चोरटा व्यापार चालू राहिला. अँजोलिना व सारा ग्रिमके या भगिनींनी गुलामगिरीविरुद्धच्या लढ्यात हिरीरीने भाग घेतला. नीग्रो स्त्रीला काबाडकष्ट तर करावे लागतच पण अनेक वेळा गोऱ्या मालकाच्या वासनेलाही बळी पडावे लागे. या प्रजेचे (मोलाटो) मातृत्व निश्चित असे पण पितृत्व अनिश्चित असे. त्यामुळे या स्त्रियांना कुटुंबात वेगळे स्थान असे. त्यांच्या कष्टाळूपणामुळे व प्रजोत्पादनक्षमतेमुळे त्यांचे महत्त्व असले तरी असल्या दुःसह जिण्याची त्यांना चीड येणे स्वाभाविक होते. गुलाम म्हणून जन्माला येणारी संतती जगूच नये असे उद्वेगाच्या पोटी त्यांना वाटल्यास नवल काय? गोऱ्या स्त्रियांच्या शिक्षणालाच विरोध होता मग नीग्रो स्त्रियांना शिक्षण मिळणे किती दुरापास्त असेल याची कल्पनाच करणे बरे. मिस फ्रँडलने नीग्रो मुलींना शिक्षण देण्यासाठी एक शाळा काढली. तिला ज्या संकटांना तोंड द्यावे लागले त्याचा विचार केला की खरोखरच या महिलेली धन्य म्हणावी लागते. १८३७ मध्ये गुलामगिरीविरुद्धच्या लढ्यासाठी पहिली स्त्रीसंघटना मिस चॅपमनने उभारली. सॅरा व अँजेलिना ग्रिम्के या दोघी भगिनी गुलामगिरीविरुद्ध परिणामकारक भाषणे करीत. न्यूयॉर्क ते न्यू इंग्लंडपर्यंत सर्वत्र त्यांनी प्रचार केला. अँजेलिनाने गुलाम-गिरीविरुद्ध कोर्टात खटला भरला. सह्यांची मोहीम उभारून स्त्रियांनी जागृतीचा प्रयत्न केला. पुढे स्त्रियांच्या प्रश्नांवर लढताना हा अनुभव त्यांना मोलाचा ठरला. गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी पळून आलेल्या नीग्रो लोकांना लपवणे, आसरा देणे, खाऊपिऊ घालणे, गाडीतून पोहोचवणे ही जोखमीची कामे मानवतेने प्रेरित होऊन या स्त्रियांनी पार पाडली. नीग्रोच्या गुलामगिरीचा विचार करताना त्यांना आपल्या असहाय्य जिण्याची देखील जाणीव झाली. नीग्रोंच्या दुःखात त्यांना समवेदनेचा साक्षात्कार झाला.

परंतु नीग्रो गुलामगिरीतून मुक्त झाले, तरी आपल्या दुःखांना अंत नाही याची तीव्रतेने त्यांना जाणीव झाली ती १८४० च्या गुलामगिरीविरोधी जागतिक परिषदेत. तेथे ल्युक्रेशिया मॉट आणि एलिझाबेथ कॅडी, स्टटनसारख्या पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढणाऱ्या प्रभावी नेत्यांना, स्त्री-प्रतिनिधींना सभागृहात बसू दिले नाही. बाल्कनीत बसून सभेचे कामकाज त्यांना फक्त पाहावे लागले. त्यात सहभागी होण्याची संधीदेखील त्यांना देण्यात आली नाही. ही गोष्ट त्यांच्या मनाला लागणे स्वाभाविक होते. यातूनच १८४०च्या सेनेका फॉल्सच्या

ऐतिहासिक परिषदेचे बीजारोपण झाले.

स्त्रीचा मेंदू लहान आहे त्यामुळे तिला वेगळे शिक्षण देणे आवश्यक आहे अशी समजूत प्रचलित होती. १८१२ पर्यंत स्त्रीशिक्षण फक्त श्रीमंत कुटुंबापुरते मर्यादित होते. पुढेही संगीत, भरतकाम इत्यादी विषय स्त्रियांच्या शिक्षणात अंतर्भूत केलेले असत. १८१८ मध्ये हॅना क्रोकरने स्त्रियांच्या खऱ्या हक्कांबद्दलचे विवेचन केले. मिसेस विलियर्डने शिक्षणक्षेत्रात अभिनव प्रयोग केले. सॉलिड जॉमेट्रीसारखे विषय ती कुणाच्याही मदतीशिवाय स्वत: शिकली. १९२८ ते २९ पासून मिस राईटने स्त्रियांना दुय्यम प्रतीचे शिक्षण देणे चूक आहे असे ठरविले. तिने उच्च शिक्षणाचा प्रचार केला. मिसेस जोसेफा हेल बुक व मार्गारेट फुलर या विचारवंत महिलांनी समानशिक्षणाचा हक्क आग्रहाने मांडला.

या काळात प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत वेगवेगळ्या क्षेत्रांत स्त्रिया प्रगतीच्या दिशेने वाटचाल करू लागल्या. ॲंटोनिएट ब्राऊन ही पहिली धर्मोपदेशिका तर हॅरिएट हंटने वैद्यकशास्त्राचा प्रथम अभ्यास केला. एलिझाबेथ ओक ही पहिली प्राध्यापिका. डोरोथी हिक्सने तुरुंग व वेड्यांची इस्पितळे यांची जातीने पाहणी करून त्यात सुधारणा घडवून आणल्या. या एकट्या महिलेच्या कर्तृत्वाने अनेकांचे जीवन सुसह्य झाले.

मरिया मिशेलने खगोलशास्त्राचा सखोल अभ्यास करून अमेरिकन आर्टस्-सायन्स ॲकॅडेमीवर स्थान मिळविले, तर एलिझाबेथ ब्लॅकवेलने अनंत अडचणींशी झगडत वैद्यकीय व्यवसायात पारंगतता मिळविली. कॉलेज प्रवेशापासून तिला पदोपदी अडचणी आल्या. आजही कायदा व वैद्यक व्यवसायात प्रवेश करू पाहणाऱ्या महिलांना त्रास होतो. या बाबतीत त्यांना फारसे प्रोत्साहन मिळत नाही. इतर देशांच्या मानाने या व्यवसायातील अमेरिकन स्त्रियांचे प्रमाण फार कमी आहे. डॉ. ब्लॅकवेलला शिक्षण पूर्ण केल्यावर त्या काळी प्रॅक्टिससाठी जागा मिळेना. पण परिस्थितीवर चिकाटीने मात करून तिने केवळ स्त्री-मदतनिसांच्या साह्याने ४० बेड्सचे एक हॉस्पिटल चालविले. मीरा ब्रेडवेलने वकिली व्यवसायात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला, पण तिला सुप्रिम कोर्टाने नकार दिला. अखेर १४ घटना दुरुस्तीनंतर १८७९ मध्ये बेल्व्हा लॉकवुडने अमेरिकन सुप्रिम कोर्टातील पहिली स्त्रीवकील हा मान मिळविला.

नीग्रोंची गुलामगिरीतून मुक्तता झाल्यावरच त्यातील काही स्त्रिया पुढे आल्या.

प्रामुख्याने नीग्रो स्त्रीचे जीवन कष्टमयच होते, पण हळूहळू यांच्यातही ज्ञानाचा प्रसार होत होता. १८७२ मध्ये शार्लट रे ने हॉर्वर्ड विद्यापीठाची कायद्याची पदवी घेतली. ही पहिली नीग्रो कायदेपंडिता तर कॅरोलिन स्टील ही पहिली स्त्री डॉक्टर. तिने आपले सारे जीवन जातिबांधवांच्या सेवेसाठी वेचले. सोजर्नर ट्रुथ आणि मिसेस स्टुअर्ट या नीग्रो वक्त्या गाजल्या होत्या.

ज्ञानाच्या सर्व क्षेत्रांत स्त्रिया अनिरुद्ध संचार करू पाहात होत्या. या काळात कॅथेरिन सेजविक, फॅनी फर्नर, मिसेस स्टोव इ. लेखिकांनी साहित्यिक विश्व गाजवले. मिसेस स्टँटने 'वुमेन्स बायबल' लिहून बायबलने स्त्रियांवर केलेला अन्याय प्रकाशात आणला. आजच्या 'वुमेन्स लिब' मध्ये या विचारांचा मागोवा घेण्यात आला आहे. मार्गारेट फुलरला स्त्रियांमधील नैराश्य आणि बौद्धिक उपासमार तीव्रतेने जाणवली. स्त्रीला सर्व तऱ्हेचे व्यवसाय करायला मोकळीक हवी असे मत तिने प्रतिपादन केले. १८४५ मध्ये तिची ट्रिब्यूनच्या संपादक मंडळावर नेमणूक झाली. वृत्तपत्रक्षेत्रात काम करणारी ही पहिली स्त्री. पुढे नीग्रो स्त्रियांनी स्वतंत्र संघटना उभारल्यावर 'द वुमेन्स एरा' हे वृत्तपत्र सुरू केले. इडा वेल्स व मिसेस रफिन या त्याच्या संपादिका होत्या. नीग्रो स्त्रियांच्या स्वतंत्र प्रश्नांचा त्यांनी विचार केला. पुढे नीग्रो व गोऱ्या स्त्रियांच्या संघटनांत सुसंवाद साधण्याचाही श्रीमती रफिन यांनी प्रयत्न केला.

स्त्री-चळवळीची खरी गंगोत्री म्हणजे १९ जुलै १८४८ मध्ये सेनेका फॉल्स येथे भरलेले संमेलन. त्याने स्त्री-आंदोलनाला एक नवी दिशा दिली. स्त्रीहक्काचा जाहीरनामा या संमेलनात फडकविण्यात आला. स्त्रियांसाठी मतदान या महत्त्वाच्या प्रश्नाला येथून प्रारंभ झाला. त्यानंतर अशा स्वरूपाच्या परिषदा ठिकठिकाणी भरविण्यात आल्या. ल्युक्रेशिया मॉट ही या चळवळीमागील नैतिक शक्ती होती तर ल्युसी स्टोन ही अत्यंत प्रभावशाली व्यक्ती होती. 'स्त्री-आंदोलनातील उगवता तारा' असे तिला संबोधण्यात येई. मिसेस स्टँटन ही तत्त्वज्ञ विचारवंत होती तर ॲंथनी सूझान ही कुशल संघटक होती. अर्ध शतकपर्यंत या स्त्रियांनी स्त्रीहक्काच्या चळवळीला वेग दिला आणि वेगवेगळ्या कायदेमंडळाकडे सह्या गोळा करून त्यांनी अर्ज पाठविले. त्यासाठी अखंड प्रवास, अमोघ वक्तृत्व, अविरत प्रयत्न या साऱ्यांचा वापर करावा लागला. ॲंथनी सूझानने न्यूयॉर्क कायदेमंडळाला पहिला अर्ज पाठविला, त्यात ३ सुधारणांच्या

मागण्या होत्या :

(१) आपल्या वेतनावर अधिकार. (२) घटस्फोटाच्या वेळी मुलांचे पालकत्व. (३) मतदानाचा अधिकार.

अमेरिकन यादवी-युद्धात स्त्रियांनी विशेष उल्लेखनीय कामगिरी केली. त्या केवळ आपल्याच प्रश्नात गुरफटून राहिल्या नाहीत. त्या बद्धपरिकर होऊन जखमी सैनिकांच्या शुश्रूषेला लागल्या. लुईझा मेरी अल्कॉट, मदर बिकरडाईक व क्लारा बर्टन यांनी मोठी संघटना उभारली. आजच्या रेडक्रॉससारखी ही संघटना होती. युद्धसमाप्तीपर्यंत ७,००० संस्थांची स्थापना झाली. अनेक ज्ञात-अज्ञात भगिनींनी सैनिकांचे प्राण वाचविण्याची शर्थ केली. यातून ॲना डिकिन्सासारख्या प्रभावी वक्त्या उदयाला आल्या. राष्ट्राध्यक्ष लिंकन यांच्या गुलामगिरीविरोधी धोरणाला पाठिंबा देत असताना अतिशय प्रतिकूल जमावाला त्यांना तोंड द्यावे लागे. ल्युसी स्टोनसारखी व्यक्ती अशा जमावाला काबूत आणी. गुलामगिरी-विरोधी सभांना गावकऱ्यांचे थोडेतरी सहकार्य लाभे, पण स्त्रीहक्कांच्या प्रश्नावर आपल्या समेची सारी प्राथमिक कामे–पोस्टर्स लावणे इत्यादी त्यांना स्वतःच करावी लागत. हॅट फिरवून प्रवास-खर्च गोळा करावा लागे. स्त्रियांच्या सभांवर गरम पाणी फेकले जाई. त्यांच्या सभागृहाला आगी लावण्याचा प्रयत्न होई. त्यांच्या मिरवणुकांवर हल्ले केले जात.

अमेरिकन यादवी युद्धानंतर घटना दुरुस्तीने २० लाख नीग्रो पुरुषांना मतदानाचा हक्क मिळाला, पण स्त्रियांच्या प्रश्नाकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करण्यात आले.

१८७०–७१ मध्ये व्योमिंग येथे स्त्रियांना प्रथम मतदानाचा अधिकार मिळाला. १८७० मध्ये उटा, न्यू जर्सी, मॅसॅच्युसेट्समध्येही त्यांना मतदानाचा अधिकार मिळाला. तो नंतर रद्द करण्यात आला. पण घटनेतील 'पुरुष' शब्द काढून टाकण्यासाठी 'ॲथनी ॲमेंडमेंट' १८६८ पासून १८९६ पर्यंत काँग्रेसपुढे सतत मांडली जाई. दर वेळी ती फेटाळली गेली. नंतर पुढे १९१३ पर्यंत ती मागे पडली. स्त्रियांना सफ्रेज चळवळीत रस वाटावा म्हणून व्यापक स्त्रीहिताच्या इतर प्रश्नांशी सांगड घालण्याचा प्रयत्न केला की इतर हितसंबंधांशी संघर्ष निर्माण होई. असा पेच स्त्रीचळवळीपुढे सतत निर्माण होई. विशेषतः त्यामुळे कामगार-चळवळीत फूट पडते असा आक्षेप घेण्यात येई. सफ्रेज

चळवळीला प्रखर विरोध करणारे लोक म्हणजे मद्यपान व्यवसायातील लोक. दक्षिणेकडील संस्थांनी स्त्रियांना मतदानाचा हक्क देण्यास विलंब केला. मद्यपानव्यवसायातील लोकांनी सफ्रेजविरोधी प्रचार करण्यासाठी पाण्यासारखा पैसा खर्च केला. काही वेळा अशा व्यवसायातील लोकांच्या अर्धांगिनी स्त्री-मतदानाच्या कट्टर शत्रू बनलेल्या दिसत !

स्त्रियांचे अल्पवेतन, त्यांच्याविषयीचे अन्याय्य कायदे बदलून घेतल्याखेरीज त्यांचे जीवन सुसह्य होणार नाही, त्यासाठी त्यांना मतदानाचा अधिकार देणे आवश्यक आहे याची खात्री कॅरोल राईटसारख्या उदारमतवादी पुरुषांना सुद्धा पटली. सफ्रेज चळवळ प्रारंभी घटनात्मक सनदशीर मार्गाने चालू होती. पण इंग्लंडमध्ये तिने उग्र स्वरूप धारण करताच अमेरिकेतही भाषणे, सभा यांच्या-बरोबर व्हाईट हाऊसवर पिकेटिंग करणे, गावोगावी मोर्चे काढून जागृती करणे असे उग्र स्वरूप या आंदोलनाला देण्यात आले. समाजातील विभिन्न थरांतील स्त्रिया खांद्याला खांदा लावून मोर्चात भाग घेत. प्रखर विरोध सहन करताना त्या मनाची शांती ढळू देत नसत. त्या काळात कॅरी चॅपमन कॅट ही कुशल संघटक व ॲना हॉवर्ड शो ही प्रभावी वक्ती ह्या संघटनेचे नेतृत्व करीत होत्या. मिसेस पॅकहर्लने या कामात खूप मेहनत घेतली. अखेर शेकडो सभा, लेख, सार्वमतांच्या मोहिमांचे फळ मिळून १९ व्या घटना दुरुस्तीने १९२० मध्ये स्त्रियांना मतदानाचा हक्क देण्यात आला. १८४८ पासून ही लढाई सुरू होती. १९०४ मध्ये इंटरनॅशनल वुमेन्स अलायन्स ही संस्था सुद्धा स्थापन झाली होती. तिच्यात ऑस्ट्रेलिया, डेन्मार्क, जर्मनी, ग्रेट ब्रिटन, युनायटेड स्टेट्स असे अनेक देश सामील झाले होते.

स्त्रीकामगार चळवळीचा इतिहास पाहिला तर असे आढळून येते की, वेगवेगळ्या कारखान्यांत स्त्रियांना पुरुषांच्या एक चतुर्थांश वेतन मिळे. त्यांचे आठवड्याचे काम पुरुषांच्या १ दिवसाच्या १० तासांपेक्षाही कमी मानले जाई. १८२४ मध्ये वेतनवाढ व अन्य मागण्यांसाठी स्त्रीकामगारांनी पहिला संप केला. १८४५ पर्यंत सारा बॅग्ले ही स्त्रीकामगार चळवळीची अध्यक्ष होती. औद्योगिक क्रांतीनंतर स्त्रीकामगारांची संख्या वाढत गेली. १८६३–६४ मध्ये न्यूयॉर्कला त्यांची पहिली सभा होऊन लीगल एड सोसायटीची स्थापना झाली. ॲथनी सूझानच्या ' द रेव्होल्युशन ' वृत्तपत्राचे सहाय्य त्यांना मिळत असे.

मिस ऑगस्टस् लेविसने कामगार चळवळीत खूप लक्ष घातले. १८६९ मध्ये या संघटनेची स्थापना झाली, आणि १८८१ मध्ये स्त्रीकामगारांनी आपली स्वतंत्र संघटना उभारली. ११३ वुमेन असेंब्लीची निर्मिती झाली आणि मेरी स्टर्लिंग ही पहिली स्त्री-प्रतिनिधी म्हणून निवडली गेली. ह्या कामगार स्त्रिया पोटाला चिमटा घेऊन स्त्रीसंघटनांसाठी वर्गणी देत. क्लारा लेमलिशसारख्या लढाऊ स्त्रिया एका क्षणात कामगारक्षेत्रातील वातावरण बदलू शकत होत्या. वुमेन्स ट्रेड युनियन लीगला धनिक स्त्रिया देखील मानवतेच्या भूमिकेवरून सहाय्य करीत. अमेरिकेतील स्त्रियांच्या समान वेतनाचा लढा सतत चालू राहिला. राष्ट्राध्यक्ष केनेडींनी स्त्रियांच्या प्रश्नावर १९६१ साली एक कमिशन नेमले. अमेरिकन वुमेन्स रिपोर्टने सिद्ध केले की, येथील स्त्रियांना दुय्यम दर्जाचे नागरिक मानले जाते. १९६३ मध्ये समान वेतन कायदा पास झाला. त्याचे श्रेय केनेडींना आहे. श्री. केनेडी, श्री. जॉन्सन व श्री. निक्सन यांनी स्त्रीजीवनात सुधारणा व्हावी म्हणून खूप धडपड केली. श्री. केनेडी यांनी नोकरी करणाऱ्या स्त्रियांसाठी सोय व्हावी म्हणून बालकांसाठी 'डे केअर युनिट्स' काढायला लाखो डॉलर्स सरकारी तिजोरीतून देऊ केले.

१८२० मध्ये सफ्रेज चळवळीच्या प्रयत्नांना यश आले. ही प्रदीर्घ लढाई जिंकल्यावर मात्र स्त्री-चळवळीला काहीशी ओहोटी लागलेली दिसते. मतदानाचा अधिकार मिळूनही स्त्रीजीवनात फारसे मोठे स्थित्यंतर घडले नाही. स्त्रियांनी आपले राजकीय अधिकार मोठ्या जागरुकतेने वापरलेले दिसत नाहीत. फ्राईडच्या कल्पनांचा विशेष पगडा या काळातील स्त्रियांवर दिसतो. या काळात विचारवंतांनी त्यांचे ब्रेन वॉशिंग केले. आपले कार्यक्षेत्र घर आहे असेच त्यांनी मानले. १९४०–६० च्या दरम्यान स्त्रीजागृतीचे आवाहन ओसरलेले दिसते. लवकर विवाहबद्ध होऊन संसारात रमण्याकडे बहुसंख्य स्त्रियांची प्रवृत्ती दिसते. ८८ टक्के विवाहित स्त्रियांच्या मते 'विवाह' हेच स्त्रीजीवनाचे सार्थक ठरले, तर ८७ टक्के स्त्रिया विवाह व व्यवसाय हे दोन्ही शक्य आहे असे म्हणत, पण त्यासाठी बऱ्याच अटी त्यांनी घातल्या. साधारणत: दोन्ही महायुद्धांनंतरच्या काळात सुरक्षित गृहजीवनात आणि पती व मुले यांच्या सहवासात स्त्रिया रमलेल्या दिसतात. दोन महायुद्धांतील ताटातुटीचा हा परिणाम असावा. १९३० ते ५० च्या दरम्यान उच्च स्त्रीशिक्षणाचे प्रमाण घटलेले दिसते.

वर्ष	१९३०	४३·७	(एकूण कॉलेज विद्यार्थ्यांतील
	१९४०	४०·२	विद्यार्थिनींचे प्रमाण)
	१९५०	३०·२	

१९२० मध्ये एकूण पीएच. डी. पैकी १५ टक्के स्त्रिया होत्या तर १९५० मध्ये ही संख्या १० टक्क्यांवर घसरलेली दिसते. स्त्रियांच्या मनावर संस्कार करण्याचे कार्य लेखक, शास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ करीत होते. डोरोथी थॉम्सन-सारखी या शतकातील एक श्रेष्ठ दर्जाची वृत्तपत्रकार म्हणते, ' मातेची समाजाला फार आवश्यकता आहे. ' मार्गारेट मीड किंवा सेकंड सेक्ससारखे ग्रंथ स्त्रीमधील कोमलतेला आवाहन करीत होते. स्त्रियांची चळवळ ही काही विक्षिप्त अविवाहित स्त्रियांनी चालवलेली चळवळ असे मानले जाई ! या मतप्रवाहात बहुसंख्य महिला वाहून गेल्या. परंतु आजच्या वुमेन्स लिब चळवळीची प्रेरणा आपल्याला सेनेका फॉल्सच्या परिषदेपासून शोधता येईल. स्त्रीला सदैव घरकामात का डांबता ? सारा समाज हा पुरुष-केंद्रित आहे असे विचार मिसेस गिलमनने १९ व्या शतका शेवटी व्यक्त केले. १९२० पर्यंत ती कार्य करीत होती. प्रत्येक स्त्रीला आपल्या आवडीनुसार कर्तृत्व दाखविता यावे यासाठी ' फेमिनिस्ट अॅपार्ट-मेंट 'ची कल्पना हेन्रिएटा रॉडमनने मांडली. त्यात बालसंगोपन आणि इतर गृहकृत्ये करण्याची आवड असलेल्या स्त्रियांच्या कर्तृत्वाला अवसर होता आणि बुद्धिमान स्त्रियांना बाहेरच्या क्षेत्रात काम करायला मुभा होती. किबुत्सु किंवा कम्यूनच्या धर्तीवरच हे चालवावे असा त्याचा अर्थ होता. या काळात 'अनरेस्ट ऑफ वुमेन ' आणि ' द अवेकनिंग ऑफ वुमेन ' ह्यासारखे ग्रंथ निर्माण झाले एमा गोल्डमन व क्रिस्टल ईस्टमनसारख्या नेत्यांनी समाजवाद व स्त्रीचळवळ यांचे एकत्रीकरण केले. स्त्रीसंघटकांत काही प्रागतिक विचाराच्या होत्या तर काही व्यवहारवादी होत्या.

१९२० ते ६० चा हा कालखंड स्त्रीचळवळीच्या दृष्टीने ओहोटीचा काल-खंड म्हटला पाहिजे. ही अग्निज्वाला या वेळी विझलेली दिसते पण लवकरच हा अंगार धुमसू लागला आहे. पुन्हा १९६३ मध्ये स्त्रीचळवळीचे पुनरुत्थान झालेले दिसते. बेटी फ्रायडनचा ' फेमिनाईन मिस्टिक ' किंवा सिमान द बोव्हांचा ' सेकंड सेक्स ' आणि केट मिलेटचा ' सेक्शुअल पॉलिटिक्स ' हे ग्रंथ त्याचा बोलका पुरावा आहेत. वैचारिक पाया आहेत. या चळवळीतील मागण्या पुढील

प्रकारच्या आहेत; स्त्रियांना व्यक्तित्व, शिक्षण, नैतिक मूल्ये, व्यवसायाची संधी आणि राजकीय हक्क या सर्व बाबतींत पुरुषांच्या बरोबरीने लेखण्यात आले पाहिजे. स्त्री विवाहोत्तर पुरुषाला सतत ३०–४० वर्षे एका व्यवसायाची सक्ती करीत नाही मग पुरुषाने तिच्यावर गृहकृत्याची सक्ती का करावी किंवा स्त्रीला आई-खेरीज स्वत:चे व्यक्तिमत्त्व नाही का ? असा प्रश्न आता विचारला जातो.

आज वुमेन्स लिबसाठी शेकडो संघटनांत काम करीत आहेत. National Organization of Women (NOW) किंवा Women's Equality Action League (WEAL) या त्यापैकी काही प्रमुख संघटना होत. त्या 'मिझ' सारखी अनेक जर्नल्स चालवतात. विचारांचा तुफानी प्रचार करतात.

वॉशिंग्टनमध्ये १९६७ मध्ये झालेल्या परिषदेत स्त्री-हक्काचा ८ कलमी जाहीरनामा प्रसिद्ध झाला. बाहेरच्या जगात पुरुषाच्या बरोबरीने काम करून स्त्रियांना गृहकृत्याचा ताण आठवड्याला ८०–९० तास सहन करावा लागतो. तेव्हा गृहोद्योग व बालसंगोपनाची समान जबाबदारी पतीने उचलावी अशी त्यांची मागणी होती. २६ ऑगस्ट १९७० रोजी स्त्रियांनी देशभर प्रचंड संप व निदर्शने केली आणि आपल्यावरील अन्याय जगापुढे मांडला.

विद्यापीठे व व्यवसायात सर्वत्र समान हक्कांची, पक्षपाताला कसून विरोध करण्याची त्यांची भूमिका आहे. यासाठी मार्था ग्रिफिथने कायदेमंडळातून लढा दिला. डेझी फोल्डाने सरकारी व खासगी संस्थांतील नोकऱ्यांत स्त्रियांवर होणाऱ्या पक्षपाताविरुद्ध जोरदार लढा दिला. FEW ही संघटना स्थापन केली, तर मेरी इस्टवर्ड, सिल्व्हिया एलिसन, टायग्रेस ॲटकिन्सन या स्त्री वकिलांनी शिक्षण व कायदेशीर साह्यासाठी HRW ही संस्था काढली. अनेक कंपन्यांवर त्यांनी समान वेतनासाठी खटले भरले.

या स्त्रीमुक्ती आंदोलनात दोन प्रवाह स्पष्टपणे दिसतात. स्त्रियांवरील अन्यायाविरुद्ध सनदशीर मार्गाने लढणाऱ्या संघटना नोकरी शिक्षण इत्यादी सर्व क्षेत्रांतील पक्षपाताविरुद्ध या संस्था झगडत आहेत तर काही जहाल संस्था विवाह, मातृत्व, कुटुंबसंस्था यासंबंधीच्या दृष्टिकोणात मूलगामी परिवर्तन करू पाहात आहेत. संपूर्णतया क्रांतिकारक भूमिका घेऊन नवीन मूल्यांसाठी जीवन-पद्धतीसाठी निकराचा लढा देत आहेत. भाषा देखील त्यांना बदलायची आहे.

बेला ॲन झुग (बॅटलिंग बेला) सारखी काँग्रेसवुमन म्हणते, " आता

आम्ही दुय्यम भूमिका करणार नाही." लोकसंख्येचा ५३ टक्के भाग असलेल्या स्त्रियांनी आपल्या राजकीय शक्तीचा वापर करावा असे तिचे आवाहन आहे. ४ वर्षांत पोलिटिकल कॉकसची सदस्यसंख्या ५० वरून ३ लाखांवर गेलेली आहे. याचा अर्थ समाजात योग्य स्थान मिळविण्यासाठी आपल्याला राजकीय शक्तीचा वापर केला पाहिजे याची त्यांना जाणीव झाली आहे. मेरी ॲना क्रुपसॅक न्यूयॉर्क स्टेटची लेफ्टनंट गव्हर्नर बनली आहे. मार्क फाँग कॅलिफॉर्नियाची सेक्रेटरी ऑफ स्टेट तर सूझान शार्प नॉर्थ कॅरोलिनाच्या सर्वोच्च न्यायालयाची मुख्य न्यायाधीश बनली आहे. प्रांतिक कायदेमंडळातील स्त्रियांचे सदस्यत्व ३० टक्के वाढले आहे. त्यांची संख्या ४६२ वरून ५९८ वर गेलेली आहे.

उद्योगधंद्यातही दुय्यम स्थानावर त्यांना नेहमी काम करावे लागले याची त्यांना खंत आहे. नोकरीत स्त्रियांना दुय्यम स्थान आहे. उद्योगधंद्यात एक्झिक्युटिव्हच्या ६,००० जागांपैकी फक्त ११ जागांवर स्त्रियांची नेमणूक झाली आहे. कुठे एखादी मिस मॅफी वेस्टिंगहाऊसच्या डिफेन्स व इलेक्ट्रॉनिक्स सेंटरची मॅनेजर झालेली, तिच्या हाताखाली १७५ पुरुष काम करताहेत असे अपवादात्मक दृश्य दिसते. एखादी एलिझाबेथ मे एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेची फर्स्ट डायरेक्टर, क्वचित एखादी मिसेस व्हर्जिनिया ब्राऊन इंटरस्टेट कमिशनची कमिशनर झालेली दिसते. १९७४ मध्ये एक स्त्री गव्हर्नर म्हणून नेमली जाते तर कार्ला हिल्सला हाऊसिंग व अर्बन डेव्हलपमेंटचे सेक्रेटरीपद मिळते.

कॅरोल लेझी–फॉरेन सर्व्हिसेसची डायरेक्टर जनरल.

हेलन बॅटले — मॅरिटाईम कमिशनची अध्यक्ष.

मेरी लुईझा स्मिथ — रिपब्लिकन नॅशनल कचेरीची चेअरमन.

आता प्रत्येक क्षेत्रात अशी प्रसादचिन्हे दिसू लागलेली आहेत.

कलेच्या क्षेत्रातही महिला कलावंत आपल्यातील निर्माणक्षमता प्रकट करीत आहेत. व्हर्ना गिल्सच्या मते "हा स्त्रियांच्यासाठी कलेच्या क्षेत्रांतील उत्कृष्ट काळ आहे." ट्वायान थार्पसारख्या कॅरिओग्राफर्स, ईव्हा कीलर ही संगीत-दिग्दर्शिका प्रकाशात येत आहेत. ॲन व लॅब आदी स्त्रीनाटककारांच्या कृतींना मान्यता मिळत आहे तर बोव्हसो, रे ॲलन, नोव्हेला वेल्सन या नव्या दिग्दर्शिका नाव कमवत आहेत. मिझ मासिकाने म्हटले आहे "या कलावंत स्त्रिया हॉलिवुडमधील प्रस्थापित शक्तीशी सामना देत पुढे येत आहेत." १९७३चे

ॲकॅडमी ॲवॉर्ड The Sting च्या सहनिर्मात्या ज्युलिया फिलिप्स यांना मिळाले आहे.

एकूण अमेरिकन स्त्रीजीवनाचा धावता आढावा घेतला तर त्या यशाच्या मार्गाने आगेकूच करीत आहेत. अज्ञानाच्या अंधारात चाचपडणाऱ्या अन्यायाच्या क्रूर पदाघातांनी हतबल झालेल्या या अमेरिकन महिलांनी आपल्या अखंड व संघटित परिश्रमांनी 'अबला होती प्रबला' ही उक्ती सिद्ध केलेली आहे.

सामाजिक अधःपतन आणि आजची स्त्री !

आजच्या यंत्रयुगीन संस्कृतीत मानवी जीवनाची मूल्ये फार झपाट्याने बदलत चालली आहेत. सभोवतालचे वातावरण एवढ्या जलद गतीने बदलत आहे की, जुन्या परंपरागत मूल्यांवरची श्रद्धा पार ढासळत आहे. 'मातृदेवो भव', 'पितृदेवो भव', 'आचार्यदेवो भव' ह्या निष्ठा आज घरीदारी लुप्त झाल्या आहेत.

पाश्चात्त्य जीवनपद्धतीचा, विचारसरणीचा सखोल परिणाम तरुण पिढीच्या मनावर झालेला दिसतो. आता संध्याकाळी तुळशी-वृंदावनाजवळ सांजवात तेवत नाही. 'शुभं करोति' म्हणून चिमुकले हात जोडले जात नाहीत. त्या वेळी घराघरांतून विनाका गीतमालेचे, फिल्मी संगीताचे सूर निनादत असतात. धार्मिक उत्सवांची महती फारशी उरली नाही. आता महत्त्व प्राप्त झालंय क्रिकेट टेस्ट मॅचच्या कॉमेंट्रीला, नटनट्यांच्या सत्काराला. भारतीय शास्त्रीय संगीतापेक्षा लोकप्रिय आहे पॉप् म्यूझिक. भरतनाट्यम्ऐवजी कॅबरे, ट्विस्ट यांची चलती आहे. घरच्या सुग्रास पक्वान्नापेक्षा पॉश हॉटेलमधल्या डिशेसची लज्जत अधिक. उच्च अभिरुचीच्या साहित्यापेक्षा लैंगिक जीवनावर भर देणाऱ्या सवंग साहित्याला जास्त मागणी. पोषाखातही नित्यनव्या फॅशन्स येताहेत. 'साधी राहणी आणि उच्च विचारसरणी' हे संपुष्टात आलेले दिसते. एकूण समाजाच्या अभिरुचीत आमूलाग्र

परिवर्तन झाले आहे.

शिक्षणसंस्थांत गुरुजनांबद्दलची आदराची भावना कधीच लयाला गेली आहे. ज्ञानसंपादन म्हणजे पवित्र कार्य, शिक्षणसंस्था म्हणजे ज्ञानमंदिर हा दृष्टिकोण आज उरलेला नाही. बुद्धिमान, कलाकुशल, क्रीडापटू विद्यार्थ्यांपेक्षा वर्गात गुंडगिरी करणारा मुलगा किंवा तरुण विद्यार्थिवर्गाचा नेता बनतो. आज महत्त्व आहे स्टाईलिश इंग्रजी बोलण्याला. टिपटॉप राहणे, मॅचिंगला अवास्तव महत्त्व देणे. बॉयफ्रेंड किंवा गर्लफ्रेंडबरोबर पिकनिक किंवा पिक्चरला जाणे, किमान कॉरिडॉर मध्ये उभे राहून तासन्‌तास टवाळ्या करणे हा आजच्या युवक-युवतींचा आवडता उद्योग !

अर्थात ही तरुण पिढी बऱ्याच अंशी मोठ्या मंडळींचे अनुकरण करीत असते. 'जनरेशन गॅप' म्हटली तरीदेखील एकूण वडीलधाऱ्या माणसांच्या वागणुकीत झालेल्या परिवर्तनाचा संस्कार बालपणापासून होत असतो.

आजच्या समाजाचे सर्वश्रेष्ठ मूल्य आहे संपत्ती. माणसाच्या यशस्वितेचे मोजमाप होते सत्ता आणि संपत्ती या दोन कसोट्यांवर. मग ती कोणत्याही सूक्तासूक्त मार्गाने प्राप्त केलेली असो ! समाजात आज प्रतिष्ठा आहे चोरटा व्यापार करणाऱ्या समाजकंटकांना, हातभट्टी चालवणाऱ्या गुंडांना, काळाबाजार करणाऱ्या बेइमान व्यापाऱ्यांना, पाशवी बळ व पैशाच्या जोरावर सत्ता काबीज करणाऱ्या अप्रामाणिक राजकारण्यांना, लाचलुचपत करणाऱ्या भ्रष्ट नोकरशाहीला. कारण संपत्तीच्या जोरावर सारी भौतिक सुखे त्यांच्यापुढे हात जोडून उभी असतात.

श्रमाचे मोल आज शून्यावर आलेय. प्रयत्न करून जीवनात यशस्वी होण्याऐवजी लॉटरी, रेसेस, जुगार, मटका इत्यादी मार्गांनी पैसा मिळविण्याची प्रवृत्ती वाढीला लागली आहे. किंबहुना सरकार लॉटरीसारख्या प्रकारांना उत्तेजन देतेय. 'प्रयत्नान्ती परमेश्वर' हे तत्त्व निकालात निघालेय. व्यक्तीला काय आणि देशाला काय, परिश्रमाशिवाय सुबत्ता हवी आहे.

आज समाजात लाचलुचपत हा गुन्हा ठरत नाही. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत ती बोकाळलेली आहे. त्यात कुणाला वावगे वाटत नाही. विवाह ठरविताना 'मुलाला पगार आहे तीनशे पण वरची प्राप्ती भरपूर आहे.' अशी चर्चा उघडपणे होते. भेसळ करणाऱ्या, काळाबाजार करणाऱ्या, प्राप्तीकर चुकविणाऱ्या, कुटुंबात मुलगी कशी द्यावी असा कुणाला प्रश्न पडत नाही. 'रेड' आली म्हणून त्या घराची

प्रतिष्ठा कमी होत नाही.

उलट, आज प्रामाणिकपणाने जगणारा, कायद्याच्या कक्षेत वावरणारा मनुष्य कुचेष्टेचा विषय बनतो. साधेपणा, स्वार्थत्याग, देशप्रेम ही जीवनमूल्ये धुळीला मिळाली आहेत. ह्या मूल्यांची पूजा करणारे लोक समाजात आदरणीय ठरत नाहीत तर बावळट ठरतात हा काळाचा महिमा आहे ! स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा होम करणारे स्वातंत्र्यवीर आज टाचा घासून मरताहेत !

याचे मुख्य कारण स्वातंत्र्योत्तर काळात समाजापुढे नवी ध्येये, नवे आदर्श उरले नाहीत. सत्तालोलुप नेत्यांनी समाजापुढे आदर्श ठेवले दांभिकपणाचे, पोशाखीपणाचे आणि भोगवादाचे. समाजाने ज्यांचा कित्ता गिरवावा ते नेतेच समाजाला अधोगतीच्या खोल गर्तेत लोटत आहेत.

आजच्या भोगवादी, चैनी समाजाला नकली आधुनिकीकरणाचे वेड लागलेय. सर्वत्र पाश्चात्त्य जीवनमानाची विकृत नक्कल चालू आहे. स्वतःच्या प्राप्तीकडे न पाहता भपकेबाज जीवन जगण्याचा बहुसंख्य लोकांचा प्रयत्न आहे. संपत्ती हेच प्रतिष्ठेचे लक्षण ठरल्यामुळे तिचे घृणास्पद प्रदर्शन खासगी आणि सरकारी क्षेत्रात आढळते. संपत्तीची अमाप उधळपट्टी चालू आहे. खरे आधुनिकीकरण म्हणजे उद्यमशीलता, चिकित्सक बुद्धी, शास्त्रीय दृष्टी, ह्या गोष्टींचा सर्वत्र अभाव जाणवतो.

काही वर्षांपूर्वी समाजात धार्मिक श्रद्धांमुळे पापभीरुता होती. आज तीही विलयाला गेली आहे. त्यामुळे दिशाविहीन गलबतासारखी समाजाची स्थिती झाली आहे. समाजाचा कणा असलेल्या बुद्धिजीवी मध्यमवर्गाची वृत्ती दुहेरी आहे. त्याच्या मनात धनिकांबद्दल असूया आहे. ते जीवन त्याला मोह घालते. आपले जीवनमान प्रतिदिनी वाढविण्याचा त्याचा प्रयत्न आहे. फ्रिज, एअर-कंडिशनर, कार ही आज 'स्टेटस सिम्बल्स' बनली आहेत. दुसऱ्या बाजूला समाजातील बहुसंख्य दीनदलितांबद्दल मध्यमवर्गीयांच्या मनात कमालीची तुच्छता आहे. त्यांच्या दुःखाची त्याला पर्वा नाही, सहानुभूती नाही. त्यामुळे दलितां-मध्येही अप्रामाणिकपणा वाढीला लागला आहे. ह्या भयंकर परिस्थितीचा परिणाम समाजातील सर्व थरांवर झाला आहे; सर्व क्षेत्रांवर झाला आहे.

समाजाची अशी सर्वांगीण अधोगती होण्यास कारणीभूत कोण—स्त्री की पुरुष ? ह्याला अधिक हातभार कोण लावीत आहे, स्त्री की पुरुष ? ही घसरगुंडी

थांबविणे कुणाला शक्य आहे–स्त्रीला की पुरुषाला ?

या प्रश्नांचा विचार करू लागल्यास आपल्याला असे आढळते की, आजच्या बदलत्या आर्थिक परिस्थितीचा दूरगामी परिणाम कुटुंबजीवनावर आणि पर्यायाने समाजजीवनावर झालेला आहे. विलक्षण महागाईमुळे शहरातील महिला आता नोकरीसाठी, अर्थार्जनासाठी बाहेर पडते. खेड्यातील महिलेला शेतावर राबावे लागतेच. घराकडे पुरेसे लक्ष द्यायला, बालमनावर सुयोग्य संस्कार करायला तिला फारसा वेळ नाही आणि शक्तीही उरत नाही. त्यामुळे बालमन अनेक मोहांना बळी पडते. ज्या ठिकाणी मातेच्या प्रेमळ, निःस्वार्थी, उदात्त वृत्तीचा प्रत्यय कुटुंबियांना येतो, ती मुले सभोवतालच्या दूषित वातावरणातही आपली मने पुष्कळ संयमी आणि स्वच्छ राखू शकतात. मोहाच्या क्षणावर मात करू शकतात.

पण लहानपणापासून चैनीचे, उच्छृंखल वृत्तीचे बाळकडू मिळाले तर मोठेपणी हे नागरिक भोगवादी बनणार. सदसद्विवेक बुद्धी त्यांच्याजवळ उरणे कठीण ! स्वत: भडक मेकअप् करणारी, छचोर वृत्तीची, हॉटेल-सिनेमे यांत वेळ घालवणारी, कुणाहीबरोबर भटकंती करणारी स्वच्छंदी माता मुलांना काय उपदेश करणार ? तिला अधिकार तरी काय पोचतो ? तीच गोष्ट शिक्षणसंस्थांत. नटव्या, फॅशनेबल शिक्षिका आणि प्राध्यापिका युवकांमधील वासना चाळवणार. आपल्या सौंदर्याची मोहिनी त्यांच्यावर पाडणार ? शुद्ध, सात्त्विक, पवित्र आचरणाच्या अध्यापनकुशल गुरुजनांबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात आजची आदराची भावना दिसून येते. तेव्हा शिक्षणसंस्थांत काम करणाऱ्या महिलांनी तर अधिक उच्च आदर्श निर्माण केले पाहिजेत.

महिला संस्थांच्या कार्यामधूनही समाजाची घसरगुंडी थांबविण्याचा प्रयत्न करता येईल. आज केशभूषा–वेशभूषा स्पर्धा, रमीचे अड्डे किंवा खाद्यपदार्थांचे नमुने तयार करण्याच्या कार्यक्रमापेक्षा अधिक भरीव समाजोपयोगी कार्यक्रम स्त्रियांनी हाती घ्यायला हवा. जपानमधील 'मदर्स युनियन'ने युद्धोत्तर काळात पोरक्या मुलांचे संगोपन केले. तेथील महिला-संघटना आपल्या प्रयोगशाळांत खाद्यपदार्थांची, औषधांची तपासणी करून आपला निर्णय जाहीर करतात. त्यांना दूषित ठरविलेल्या पदार्थांवर, औषधांवर सरकार बंदी घालते. समाज बहिष्कार घालतो. महिला संस्थांनी आपली इन्स्पेक्शन स्क्वाड्स तयार केली. सरकारने त्यांना अधिकार दिला तर आपापल्या विभागातील काळाबाजार त्या थांबवू

शकतील. भ्रष्टाचार करणाऱ्या कुटुंबावर सामाजिक बहिष्कार घालायचा—अशी जागृती महिलावर्गात झाली तर समाजावर वचक बसेल. जीवनमूल्यांचे पुन्हा उदात्तीकरण होईल. गांधीजींच्या चळवळीत महिलावर्गाने दारूबंदी, विदेशी कापडावर बहिष्कार इत्यादी कार्यक्रम यशस्वी केले. इतरांना देशसेवेची, त्यागाची स्फूर्ती दिली, प्रेरणा दिली.

आजही महिलांनी अशी चेतना देऊन प्रखर राष्ट्रभक्ती निर्माण करायला हवी. दुर्दैवाने आपला बहुतांश स्त्री-समाज अद्यापि तमोयुगात आहे. ग्रामीण विभागांचा दौरा केल्यावर परिस्थिती किती भयानक आहे याची कल्पना येते. पडद्यासारख्या क्रूर पद्धती आजही अस्तित्वात आहेत. घटनेने दिलेला मताधिकार स्त्रिया वापरू शकत नाहीत. याबाबत पुरुषवर्गाकडून त्यांच्यावर सक्ती होते हे दारुण सत्य अनेक महिलांशी बोलताना माझ्या प्रत्ययास आले. समाजकंटकांना शासन करावयास आवश्यक कायदे करायचे असतील, प्रस्थापित कायद्यात परिवर्तन करायचे असेल तर ह्या स्त्रीवर्गाला आपल्या कायदेमंडळातील प्रतिनिधींची निवड अधिक जागरूकपणे करायला हवी.

अनेक वेळा असे म्हटले जाते की, चैनी वृत्तीची स्त्री आपल्या पतीकडे नित्यनव्या मागण्या करते. वस्त्राभूषणे किंवा गृहसजावटीसाठी तिच्या मागण्या पुरविताना तो टेकीला येतो आणि आपल्या तुटपुंज्या उत्पन्नात भर घालण्यासाठी त्याला लाचलुचपत करावी लागते, म्हणजे पर्यायाने स्त्रीचा खर्चिक स्वभाव पुरुषाचा अधःपात घडवून आणतो.

सखोल विचार केला तर स्त्रीच्या ह्या चैनी वृत्तीचे उत्तर मिळेल, स्त्रीला पुरुषाच्या प्रेमाची निश्चिती वाटत नाही; त्याचे प्रेम बाह्यसौंदर्यावर केंद्रित झाले आहे असे आढळते; त्याच्या चंचल मनाची साक्ष पटते. या वेळी त्याचे मन आकर्षून घेण्यासाठी, त्याचे प्रेम टिकवून धरण्यासाठी तिला अविश्रांत धडपड करावी लागते. नाना तऱ्हेच्या केशभूषा, वेशभूषा, अलंकार ह्यांचा वापर करणे भाग पडते. सोसायटी लेडीजना स्टायलिश इंग्लिश बोलणे, स्लीमिंग, डायटिंग, गृहरचना, पुष्परचना इत्यादी अनंत उद्योग करून पुरुषाचे मन रमवावे लागते. ज्या दांपत्यात परस्परांबद्दलचा विश्वास नाही तेथे हा धसका फार मोठ्या प्रमाणात असतो. परस्परांवर नितांत प्रेम आणि विश्वास असेल तर कुटुंबसौख्याला सुरुंग लागणार नाही. तेथे स्वर्ग अवतरेल. श्रेष्ठ मूल्यांची जपणूक होऊ शकेल.

ज्या समाजात लंपट, चंचल मनोवृत्तीचा पुरुषवर्ग असेल तेथील स्त्रीदेखील हळूहळू मोहाच्या मार्गाने जाणार. तिच्या आवडीनिवडी, चैनी पुरविणाऱ्या पुरुषाकडे ती आकृष्ट होणार. चेंबूरच्या 'टाटा स्कूल ऑफ सोशल सायन्सेस' ह्या संस्थेने मुंबईतील वेश्याव्यवसायावर केलेल्या पाहणीतून भयानक सत्य प्रकाशात आले की सभ्य, सुशिक्षित, कुलीन समजल्या जाणाऱ्या विभागातून गुप्तपणे वेश्याव्यवसाय चालू आहे. ह्याचे कारण भोगवादी जीवनदृष्टी. 'मला उत्तर हवंय' ह्या नाट्यकृतीतून ह्या समस्येचे चित्रण आहे.

एकूण समाजाची घसरगुंडी थांबवायला, नैतिक अधःपतन थांबवायला स्त्री हातभार लावू शकेल पण मर्यादित. कारण समाज पुरुषाभिमुख आहे. समाजातील बहुतेक सत्ता पुरुषवर्गाच्या हातात आहे. कायदे त्यांच्या हिताचे आहेत. हिंदू कोड बिलान्वये स्त्रीला मिळालेल्या वारसाहक्कालाही अनेक ठिकाणी विरोध आहे. तेव्हा स्त्रीने आपल्या मर्यादित कक्षेत समाज सुधारण्याचा केलेला प्रयत्न फारसा प्रभावी ठरणार नाही.

स्त्रीला भोगदासी मानण्याऐवजी सहचारिणी मानले तर परिस्थितीत खूप फरक पडू शकेल. भौतिकवासनांपासून समाजाचे उन्नयन होईल. सद्गुणांवरची, मूल्यांवरची श्रद्धा वाढेल. कुटुंबजीवनात निरोगी वातावरण बनले तरच त्याचा परिणाम समाजजीवनावर होऊ शकेल. एकमेकांवर अपार विश्वास असलेल्या कुटुंबांतून श्रेष्ठ मूल्यांची जपणूक होईल. तेव्हा समाजात नैतिक अधःपतनापासून वाचविण्यासाठी उभयतांनी प्रयत्न करायला हवा. पुरुषांना मुख्यतः बदलले पाहिजे.

आजची तरुणी मोहाच्या मृगजळामागे धावते आहे का ?

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातले स्त्रीजीवन पूर्वीसारखे राहिलेले नाही. ते बरेच गुंतागुंतीचे झाले आहे. ह्या औद्योगिक युगात जीवनात फार झपाट्याने परिवर्तन होत आहे. स्त्रीजीवनातील सर्वांत महत्त्वाची अवस्था म्हणजे यौवन. सारे सौंदर्य आणि मोहकता उफाळून वर आलेली असते. या काळात स्त्री-देहाचा कायाकल्प झालेला असतो. स्त्रीदेहाची सारी आयुधे ह्या काळात पाजळलेली असतात. त्यांना मोहकतेची, मादकतेची धार चढलेली असते. आजची ही तरुणी आहे कशी ? बुद्धिवादी की भावनाविवश ? ध्येयवादी की ध्येयशून्य ? कर्तृत्ववान की कर्तृत्वहीन ? कलावती की शास्त्रज्ञप्रवृत्तीची ? तिच्या मार्गातले प्रश्न कोणते ? अर्थात अपवाद सर्वत्र असायचे, पण समाजाच्या सर्व थरांचे अवलोकन करून आढळणारे काही प्रातिनिधिक नमुने अभ्यासायला हवेत. गरीब, मध्यम व उच्चवर्गीय थरांतल्या काही भगिनींचे जीवन जवळून अभ्यासल्या-वर येणारे हे अनुभव मनाला बरेचसे अस्वस्थ करून सोडतात. परिस्थितीच्या भोवऱ्यात सापडून मोहाच्या मृगजळामागे धावून अनेक तरुणी अधःपाताच्या खोल गर्तेत झपाट्याने फेकल्या जात आहेत. जीवनाच्या विभिन्न आर्थिक पातळी-वरच्या ह्या भगिनी पाहा.

पतीची मिळकत अपुरी पडते म्हणून त्याच्या पिठात आपलं चिमूटभर मीठ मिसळायला निघालेली लक्ष्मीबाई लहानग्या पोरींना घरी कुणापाशी ठेवणार? म्हणून कामावर येताना ती त्यांना बरोबर घेऊन यायची. हळूहळू त्या पोरी मोठ्या होतात. तिच्या हाताशी करू लागतात. पुढं त्यांना स्वतंत्र कामे मिळतात. मुंबईला रोज नव्या नव्या स्कायस्क्रेपर बिल्डिंग्ज होताहेत, तिथं कामांना काय तोटा? गरीब कुटुंबातून आलेल्या या आशानिशा. आता मूळ ग्रामीण जीवनापासून तर त्यांचा संबंध तुटल्यासारखाच झाला आहे. उच्चभ्रू घरात कामाला राहिल्यामुळे त्यांच्या आवडीनिवडी देखील तशाच बनल्या आहेत. शिक्षणात त्यांना रस नाही. जातीत जास्त शिकलेले तरुण मिळत नाहीत म्हणून देखील त्यांनी शिक्षणाकडे फारसं लक्ष दिलेले नाही. हिंदी चित्रपट पाहून त्यातील नायिकेची सहीसही नक्कल करायला त्या शिकल्या आहेत.

बाह्य भपका हा त्यांच्या जीवनाचा स्थायिभाव बनलेला आहे. पुण्यप्रभावातील किंकिणीसारखं मेमसाबचे अनुकरण चाललंय. तशीच हेअरस्टाईल, गजरा बांधणं, लिपस्टिक, सही सही नक्कल. बाईनी दिलेले जुने रिस्टवॉच, अर्थात चाळीत मिरवायला अपूर्वाईचे. आता गॅस, हॉटप्लेट, ओव्हन, फ्रिज इ. हाताळून एक्स्पर्ट बनलेल्या. घरी स्टोव्ह शेगडीवर जेवण करणे त्यांना आवडत नाही. मेमसाहेबांकडे मिक्सरची सवय मग घरी पाट्यावरवंट्यावर कोण वाटणार? त्यांच्याकडे येणारे नीटनेटके, स्मार्ट पाहुणे पाहिल्यावर, त्यांचे साजुक इंग्रजी बोलणे ऐकल्यावर आपल्या समाजातली अस्वच्छ अशिक्षित शिवराळ भाषेत बोलणारी माणसे पाहून त्या नाके मुरडतात. आपल्या समाजापासून ह्या मुली दुरावल्यात, पोकळ अहंकाराने पछाडल्या आहेत. बरं, अशा अशिक्षित, उथळ मुलींना वरचा समाज आपल्यात सामावून घेईल का? श्रीमती मालतीबाई बेडेकरांच्या 'बळी' कादंबरीतील नायकाप्रमाणे त्यांची त्रिशंकुवत् अवस्था झालेली आहे. वये वाढत चालली आहेत. जातीतला कुणी तरुण त्यांच्या मनाला येत नाही. लक्ष्मीबाई म्हणते, "या पोरी म्हणजे माझ्या उरावरच्या जळत्या शेगड्या आहेत." रात्र रात्र ती बेचैन असते.

ह्या उमा अन् रमा. भारी चुणचुणीत, स्वच्छ. घरी खेड्यात अठराविसवे दारिद्र्य. घासभर अन्न मिळायची पंचाईत. मिळाला भात तर तो चिमुटभर मिठाबरोबर पाण्यामध्ये भिजवून कालवून खायचा. कुणाला तरी दया येऊन त्यांना कामासाठी

मुंबईला आणले. उमा ज्या घरी कामाला लागली ती सारी मंडळी दिवसभर नोकरीनिमित्त घराबाहेर. उमावर त्यांचा पुरा विश्वास. झटपट काम उरकले की उमा मोकळी. मग डोंगराएवढा दिवस कसा जायचा ? झोप तरी किती घेणार ? मग ड्रेसिंग टेबलच्या आरशासमोर उभे राहून तऱ्हेतऱ्हेच्या केशभूषा करून पाहा, दहा वेळा सुवासिक साबण लावून तोंड धू ; पावडर लाव, पद्माताईचे इस्त्रीला द्यायचे पातळ किंवा दांडीवरचे सुकलेले झुळझुळीत पातळ नेसून पाहा, खोट्या मोत्यांचे मण्यांचे सर, प्लॅस्टिकची कर्णभूषणे, रिबन्स, पावडर, लिपस्टिक, यात सारा पगार संपायचा. मग घरी काय पाठवणार ? घरून तर सारखी पत्रं यायची. मग चैन पुरवण्याचा काहीतरी उपाय शोधला पाहिजे.

हळूहळू शेजारच्या ताराच्या नादाने पिक्चरचा, हॉटेलचा पण नाद लागला. मग कुठं फुलवाल्याशी दोस्ती कर, पाववाल्याशी, अंडीवाल्याशी गप्पा छाट, मिल्कसेंटरवर लाईन मार, पिठाच्या गिरणीवाल्याशी संधान बांध, घसरायला कितीसा वेळ लागणार ? उफाळणारे तारुण्य जसजसे सतावू लागले, तसतशी घरी आलेल्या तरुण पाहुण्यांच्या खोलीत ती अकारण घुटमळू लागली. त्यांच्या बुशमध्ये आपले फोटो टेवू लागली. सारं पद्माताईच्या कानावर गेले. दादा रागावले अन् अखेर उमाची रवानगी परत खेड्यात झाली. तिथं तिचं मन कुठलं रमायला ? आता कुठला फॅनचा गार वारा ? गीझरचं गरम पाणी, चवीपरीचं जेवण ? दारिद्र्याला कंटाळून एक दिवस उमा खेड्यातून निसटली, आता तिची घसरगुंडी कोण थांबवणार ?

त्यामुळं कोवळ्या रमाच्या चारित्र्याला निष्कारण डाग लागायचा. मुंबईतून उमा गेल्यापासून तिला भारी एकटे वाटे. पण उमाला कुठं नोकरीसाठी बोलवायचा विषय काढला की रेवतीबाई मोडता घालायच्या. अखेर उमा कुणाबरोबर तरी हुबळीला पळून गेल्याचे समजले अन् मग त्यांनी उमाला न बोलावण्याचे खरे कारण सांगितले, बिचाऱ्या रमाच्या कोवळ्या मनाचा चक्काचूर.

हा श्रीमंतांनी आपल्यावर घेतलेला, गरिबांवर घेतलेला खोटा आळ आहे असे उमाने कळवल्यापासून रमा विथरली. शेजारपाजारच्या सुस्थितीतील समवयस्क मुली शाळाकॉलेजात जातात, नटतात, मुरडतात, आपण अभागी. आपल्याला मात्र दिवसभर राबावे लागते. मग ती असूयेच्या, सूडाच्या भावनेनं पेटली. चांगल्या कपड्यांचा, वस्तूंचा गुपचूप विध्वंस करू लागली. आळ लहान मुलांवर

घालायची. तिची ही मनोविकृती कोणत्या थराला जाणार ?

ही त्रिवेणी रोज पार्कमध्ये येते. संध्याकाळी त्या सुप्रसिद्ध सिनेनटाच्या मुलांना खेळायला घेऊन, बड्या घरची आया म्हणून खूप भाव खाते. त्या नटाला पाह्यला मिळावे, शूटिंग पाह्यला मिळावे, म्हणून अनेक लोक तिला मस्का मारतात. कुणी मेळ देते, कुणी कुल्फी. त्यामुळे खूप चैनी बनत चालली आहे. त्यात त्या सिनेनटाकडे येणाऱ्या मंडळींच्या होणाऱ्या कॉकटेल पार्ट्या, सारे रंगढंग, त्रिवेणी या मदिर वातावरणात पुरी गुरफटली आहे. तिचे अध:पतन कुठवर होणार कोण जाणे !

परळच्या चाळीत राहणारी वत्सला. वडील गिरणीच्या पट्टयात सापडून गेले. आई अतिश्रमाने क्षय होऊन हंतरुणाला खिळलेली. भावंडांसाठी चार घरची धुणीभांडी, सारे कष्ट उपसते वत्सला. पण तरी उपासमार संपत नाही. शेजारच्या बिऱ्हाडात केवढे वैभव. डोळे दिपवून टाकणारे. शेजारचे दादा तिला उपजीविकेचा सोपा उपाय सुचवतात. तिचा भाबडा चेहरा या व्यवसायाला योग्य. हातभट्टीच्या बाटल्या पोचवायच्या, पिशवीत घालून. वर भाजीपाला किंवा किराणा माल. येताना स्मगलिंगचा माल आणायचा. आईच्या औषधासाठी, शुश्रूषेसाठी चार पैसे तिच्या हातात यायचे अन् वत्सलेचा जीव सुपाएवढा व्हायचा. पण या सोनेरी टोळीच्या जाळयात सापडून एकेदिवशी भाबडी वत्सला आपले शील आणि प्राण दोन्ही गमावून बसते.

बंगलोरच्या खेड्यातून आलेली प्रिया, सावत्र आईच्या जाचाला कंटाळून मुंबईला आली. तिला आधार देणारे प्रेमळ कुटुंब तिला सुखाची सावली देते पण ती मंडळी परदेशात गेल्यावर प्रिया एकाकी पडते. तिचे रूप, राहणी, तिला मोलकरणीचा पेशा सुखाने करू देत नाही. शिक्षण पुरेसे नाही. नोकरी कुठं मिळणार ? आता घरच्या आगीत परत तरी कसे जायचे ? कसेबसे मुंबईत ती जीवन कंठते अन् कुणीतरी निरागस प्रियाचा बळी घेते.

अशी शेकडो उदाहरणं देता येतील. थोड्या फार फरकाने आज खेड्यातली असो वा शहरातली असो, अशिक्षित तरुणी फिल्मी दुनियेच्या चंदेरी तेजामुळे दिपली आहे. फॅशन्स, गाणी, नखरा सारे ती उचलू पाहते. दारिद्र्यामुळं शिक्षणाची संधी नाही. मग मनोविकास किंवा बुद्धीचा विकास कुठला ? कोवळ्या वयात कुटुंबियांसाठी पैसे मिळवायची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडते. मग

श्रमाचं, frustration चे दु:ख विसरण्याचा एकच मार्ग उरतो, escapism चा. गोड गुलाबी स्वप्नात रंगून जायचा. त्यातून कधी कधी किती विचित्र प्रसंग ओढवतात.

लेडीज होस्टेलमध्ये कांचन सत्यनारायणाची पूजा मनोभावे करीत होती. धूपदीप तेवत होता. उदबत्त्यांचा सुवास दरवळत होता. मैत्रिणी कुतूहलाने तिची पूजा पाहात होत्या. अन् त्या एकदम चमकल्या. चौरंगावर तर सारे देव-आनंदचे फोटो ठेवलेले होते. लहानपणापासून हळव्या वृत्तीच्या या मातृविहीन मुलीने या फिल्मी हीरोवर मनापासून प्रेम केले होते. मनाशी स्वप्न रंगवले होते. असा सुंदर चेहऱ्याचा पती मिळावा म्हणून. पण प्रत्यक्षात गाठ पडली ढेरपोट्या चंदूलालशी. त्याचा देवीचा वण असलेला काळा तेलकट चेहरा. त्यामुळे कांचनची तीव्र निराशा झाली. त्याच्याशी समरस होऊन संसार करणे तिला कठीण होऊन बसले. अखेर घटस्फोट घेऊन याच हीरोची ती पूजा बांधू लागली. अशा कांचनला आता शहाण्यात कोण जमा धरणार ? मीराने कृष्णाचा ध्यास घेतला, तसा कांचनला ध्यास लागला आहे देव आनंदचा. आकाशातील सप्तरंगी इंद्रधनुष्य पकडायला जायचा तिचा हा प्रयत्न अखेर निष्फळ ठरणार अन् घोर निराशा तिच्या पदरी येणार !

कनिष्ठ मध्यमवर्गीय तरुणीच्या जीवनाची दैना दुहेरी असते. शिक्षण घेण्याची इच्छा आहे अन् ते घेताना अनेक अडचणींचा सामना त्यांना करावा लागतो. शिक्षण घेत असताना कौटुंबिक समस्या आ वासून उभ्या राहतात. विशेषत: शाळेत शिकणाऱ्या मुलींना जागेच्या अभावामुळे अभ्यासाला शांतताच मिळत नाही. पाण्यासाठी रोज जाग्रणं करावी लागतात. कुणाचे रेशनचे दूध आणून द्यावे, घरच्या रेशनसाठी रांगेत उभे राहावे, गिरणीतून दळण आणावे, हे सारे सांभाळून अभ्यास करताना त्या वैतागतात. चौथी, पाचवी किंवा शिकस्त म्हणजे एस. एस. सी. पर्यंत पोचल्या की एखाद्या फॅक्टरीत काम पाहतात. कुटुंबाच्या तुटपुंज्या उत्पन्नात तेवढीच भर. पण फॅक्टरीत चोख कामापेक्षा रूपाला, फॅशनला महत्त्व. सुपरवायझर शेठ इ. वर लाईन मारता आली तरच प्रमोशन मिळतं. मग सभ्य कुटुंबातून आलेल्या मुलींचाही दृष्टिकोण बदलू लागतो. शीलाची जपणूक करून काय मिळणार ? साऱ्याच वागतात. मग कोण कुणाला हसणार ? हळूहळू या मुली चैनीला चटावतात. अशा चैनीला चटावलेल्या स्वैर वृत्तीच्या तरुणी

पुढे आपल्या वैवाहिक आयुष्यात कितपत सुखी होणार ?

कारकुनी पेशात असलेल्या किंवा स्टेनो म्हणून काम करणाऱ्या तरुणीची दुहेरी कुतरओढ होते. शिक्षणाची हौस पुरी करण्यासाठी किंवा प्रमोशनसाठी शिक्षण घ्यायचे. मग सकाळी कॉलेज, दुपारी ऑफिस, रात्री घरी आल्यावर आईला मदत अन् मग अभ्यास. या साऱ्या धावपळीत तारुण्याचा फुलोरा कोळपतो. अतिश्रमाने शरीर निःसत्त्व बनते. नोकरी करताना विवाह करावा तर आई वडिलांच्या संसाराची अवस्था काय होणार ही काळजी. तर इकडे बाबांचा संसार माझा कसा होणार ? हा विचार. पण मन मारून त्यांना तारुण्याचा होम करावा लागतो. अखेर वासना चाळवतात आणि एका बेसावध क्षणी मोहाचा पाश पडतो.

साऊथ कॅनरातून आलेली ही योगिनी. मॅट्रिक झाल्यावर मुंबईत नोकरीसाठी प्रयत्न करते. वशिल्याने तिला एका बँकेत नोकरी मिळते. भाषा कुठलीच येत नाही. ना धड हिंदी ना धड इंग्रजी. येते फक्त कानडी मातृभाषा....मिसळायचे कसे ? होस्टेलमधल्या मुलींशी बोलायचे कसे ? ऑफिसमध्ये रामनाथशी तिची ओळख होते. कानडी भाषेमुळे त्याच्याशी बोलताना मोकळे वाटते. मग मधल्या वेळी उडप्याच्या हॉटेलात कॉफी अन् मेदूवडा घेताना परिचय वाढतो. दर-रविवारी पिक्चर, प्रेमाच्या आणाभाका होतात. दोन वर्षं खेळ चालतो. पण ऐनवेळी घरच्या सनातनी माणसांना पटले नाही तर रामनाथ कदाचित तिच्याशी लग्न करणार नाही. मग योगिनीच्या आयुष्याची वावडी वाऱ्यावर कुठे भरकटेल ? कारण योगिनी रामनाथचं प्रकरण बँकेतल्या सर्वांना माहीत आहे. त्याचा बराच गवगवा झाला आहे. गावीदेखील साऱ्यांना हे समजलंय.

इव्हॉनचे वडील रेल्वेत क्लार्क आहेत. कुटुंबनियोजनाला बंदी. घरी १४–१५ भावंडं आहेत. साऱ्यांचं उरकताना आई टेकीला आलेली. शिवणाटिपणाचा सारा भार इव्हॉनवर. पुन्हा राहणी टिप टॉप हवी. इव्हॉनने कितीही श्रम केले, नोकरी केली तरी ह्या संसाराला ती कसे ठिगळ लावू शकणार ? मग बुभुक्षितः किं न करोति पापम् ?

शिरीनवर घरचा सारा भार. कनिष्ठ मध्यम वर्गीय पारशी समाजातली मुलगी. साऱ्या सवयी, आवडीनिवडी चैनीच्या. पण उत्पन्नाची बाजू शून्य. भाऊ कर्तृत्व-हीन. वडील अर्धांगवायूने पछाडलेले, आई अर्धवट. शिरीनसारख्या हुषार

मुलीवर सारा प्रपंच येऊन पडतो. स्टेनोचा पगार अपुरा पडतो. तेव्हा संध्याकाळी क्लबवर जाऊन तिला उत्पन्नाला जोड देण्यासाठी इतर उद्योग करावे लागतात.

एकूण कधी परिस्थिती स्त्रीला भाग पाडते, अगतिक बनवते तर कधी वातावरण तिला भुरळ घालते. कौटुंबिक वातावरणातील मांगल्य, पावित्र्य लुप्त होत चालले आहे. सांस्कृतिक मूल्यांचा आधारच ढासळलेला आहे. पुस्तकी शिक्षणाने व्यक्तिमत्त्वाला काही खरा उजाळा मिळत नाही. उलट बोचरे कंगोरे मात्र निर्माण होतात. शहरी जीवनाची ही कथा. ग्रामीण जीवनाचा चेहरा फारसा बदललेला नाही. ट्रॅझिस्टर, रेडिओमुळे फिल्मी दुनियेशी मात्र परिचय झाला आहे. जिथे पडदा पद्धती कडक तिथं बाह्य जगाशी मनमोकळा व्यवहार नाही. मग अशा स्वप्निल दुनियेत मन रमवायचे.

कनिष्ठ मध्यमवर्गीय मुलींना मन मारून तारुण्याचा होम करावा लागतो. अतिश्रमाने शरीर निःसत्त्व बनते. नोकरी करताना विवाह करावा तर वडिलांच्या संसाराची अवस्था काय होणार ? ही काळजी. अखेर वासना चाळवतात. बेसावध क्षणी मोहाचा पाश पडतो किंवा राजरोस विवाह केला तर वैवाहिक जीवनाच्या साऱ्या जबाबदाऱ्या पेलायला खांदे असमर्थ ठरतात. असमाधानी, कुरबुरीनं भरलेला संसार. ना पती सुखी ना धड मुलांकडे लक्ष. पतीच्या तुटपुंज्या उत्पन्नात भर घालण्यासाठी करावी लागणारी नोकरी अन् पुन्हा घरकामाचा चेप कायमच. दुहेरी जबाबदारीखाली, दडपणाखाली चिरडून गेलेली मध्यमवर्गीय तरुणी. शिक्षिकेच्या पेशात असो की कारकुनाच्या. ऑफिसमध्ये काम चोपून. तिथे गय नाही. घरी काम 'आ' वासून उभे. कुठे जरा कमी पडले की स्फोट. तारेवरची कसरत करताना केव्हा तोल जाईल याचा नेम नाही.

वरिष्ठ मध्यमवर्गीय तरुणीचं विश्वच न्यारे. Femina, Eve's Weekly प्रमाणे बदलणाऱ्या फॅशन्स. कधी लुंगी, कधी बेलबॉटम, कधी मिनीस्कर्ट. Elite सोसायटीला शोभेल असं बोलायला, वागायला हवं. लहानपणापासून डॅडी मम्मी बाळकडू पाजतात. कॉन्व्हेंटच्या शिक्षणामुळं 'मातृभाषा बोलता येत नाही' म्हणून सांगणारी ही पिढी. भारतीय संस्कृतीशी दुरूनही त्यांचा संबंध नाही. शाळेतल्या सेंट्सच्या फीस्टस् पाठ पण भारतीय पंचांगातील कुठलाही सण माहीत नसलेली.

खास बोबड्या उच्चारांचे स्टाईलिश इंग्लिशच बोलायला पाहिजे, टिपिकल

हेल काढून 'How cute! by Jove oh Gosh!' इ. उच्चार किनऱ्या आवाजात बोलण्याची खास प्रॅक्टिस हवी. तऱ्हेतऱ्हेच्या हेअरस्टाईल्स माहिती पाहिजेत. नेलपॉलिश अन् लिपस्टिकच्या शेडस्ची चर्चा करता यायला हवी. बांधा अगदी चवळीच्या शेंगेसारखा राह्यला हवा. एक पौंड वजन वाढले तरी डायटिंग करायला हवे.

फर्निचरची आर्टिस्टिक मांडणी, रंगसंगतीचे ज्ञान, फ्लॉवर अॅरेंजमेंट, वेस्टर्न स्टाईलचे कुकिंग, चायनीज फुड, ड्रिंक्स, स्नॅक्स सर्व्ह करायचे टेकनिक, हे सारे यावे लागते. डान्सिंग, वेस्टर्न म्युझिक, पॉप म्युझिक, पियानो वाजवणे अन् हो! कार ड्रायव्हिंग हे 'मस्ट' असते. याखेरीज रिफाईन्ड टेस्ट ठरत नाही. त्या कल्चरचे हे अविभाज्य घटक असतात. ह्या साऱ्यांतून ध्येयाचा ध्रुवतारा असतो—एखाद्या बड्या कुटुंबातील फॉरिन रिटर्न्ड तरुणाशी विवाह. खूपसा पैसा उधळून होतो तो. C. C. I. किंवा रेडिओ क्लब किंवा ताजसारख्या हॉटेलमध्ये रिसेप्शन होते. टोलेजंगी. मग स्टेट्समध्ये सेटल व्हायचं स्वप्न पाह्यचं. घेतलेली पदवी बहुधा ठेवणीतल्या दागिन्यासारखी शोभेसाठी असते. स्टेट्समध्ये गेल्यावर सारे काम हातांनी करताना जीव मेटाकुटीला येतो. घरी मोलकरीण, कुक, बेरा, शोफर इ. मंडळी सेवेसाठी सज्ज असतात. त्यामुळे भारतीय जीवनात श्रमाचे मूल्य माहीतच नसते. पण स्टेट्समध्ये हे सारे कसे परवडणार? कामाखाली जीव चेपून निघतो. मग येतो पश्चात्तापाचा क्षण. पण फार उशिरा. कैक वेळा पतीचा फॅशनच्या नावाखाली चाललेला बाहेरख्यालीपणा खपवून घेणे म्हणजे तोंड दाबून बुक्क्यांचा मार. शिवाय या समाजात सौंदर्य, फॅशन्स, पैसा, हीच नाणी चालतात. या समाजात एखाद्या कलावतीपेक्षा रूपगर्विता अधिक भाव खाऊन जाते. सखोल विद्वत्तेपेक्षा मोल असतं दिखाऊपणाला. सारं जीवन म्हणजे पोकळ डामडौल. यात शांती केव्हा गवसणार? असते ती फक्त स्पर्धा. जीवघेणी स्पर्धा.

यातूनच सारे नैराश्याचे सावट मनाचे आकाश झाकळून टाकते.

एकूण आजच्या समाजाच्या सर्व थरांतील बहुसंख्य तरुणी ह्या ना त्या कारणानं दुःखी आहेत. मोहाचे काटे तर प्रत्येकीच्या मार्गावर पेरलेले आहेत. कलेचा व्यासंग करायला फार थोड्याजणींना उसंत मिळते. शास्त्रीय संशोधनाला वाहून घेणाऱ्या भगिनी हाताच्या बोटावर मोजण्यासारख्या. ह्या जीवनसंघर्षात

कधी भावनेच्या आवेगात त्या वाहून जातात. समतोल बुद्धीचा वापर फार क्वचितच करण्याची संधी मिळते. परिस्थितीच्या भोवऱ्यात अन् लाटांत सापडलेली आजची तरुणी त्यामुळं अगतिक बनते.

मातेचे नाव माझे नाव

'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी' आणि 'न मातुः परदैवतम्' अशा सुभाषितांनी मातेचा गौरव केला जातो. महाभारतात म्हटले आहे की 'सर्व गुरूमध्ये माता हा श्रेष्ठ गुरू होय.' नऊ महिने उदरात गर्भाचे ओझे वागवून आपल्या रक्तामांसाने त्या पिंडाचे पोषण करून, मरणप्राय प्रसूतिवेदना सहन करून, प्रसंगी प्राणाचे बलिदान करून ज्या बालकाला माता जन्म देते; आपला जीवनरस पाजून त्याचे पोषण करते; डोळ्याचा दिवा आणि हाताचा पाळणा करून त्याला वाढवते; त्याच्या अनंत खस्ता खाते; भाषा शिकविण्यापासून त्याच्या व्यक्तिमत्त्वावर सर्व प्रकारचे सुसंस्कार करते अशा मातेचे नाव मुलाने लावण्यात मानवतेचा सन्मान होणार आहे की अपमान? किंबहुना हा मानवाच्या कृतज्ञतेचाच भाग ठरणार आहे; प्रतीक ठरणार आहे!

प्राचीन काळापासून पाहिले तर अनेक श्रेष्ठ पुरुषांनी आपल्या मातेच्या नावाचा गौरवाने स्वीकार केलेला दिसतो. पुरुरवा आपल्याला इलापुत्र—'ऐल' म्हणवीत असे. त्याने गंगेच्या डाव्या तीरावर स्वपराक्रमाने 'प्रतिष्ठान' नावाच्या नगराची स्थापना केली. दुसरे उदाहरण आपल्याला आढळते ते गौरिकाचे. मतिनाराची कन्या गौरी कोसलनरेश प्रसेनजिताच्या मुलाची, भुवनाश्वाची पत्नी

होती. गौरीपुत्र मांधाता गौरिक नावाने प्रसिद्ध आहे. उचथ्य ऋषीची पत्नी ममता ही मोठी विदुषी होती. तिचा विवाह पुढे बृहस्पतीशी झाला. सती जात असताना तिच्या या दिराने तिचे मन वळविले. तिला सती जाण्यापासून परावृत्त केले. उचथ्य ऋषीचा पुत्र दीर्घतमा स्वत:ला 'मामतेय' म्हणवी. शंतनुपुत्र भीष्म गंगापुत्र म्हणून 'गांगेय' नावाने ओळखला जाई. महारथी कर्ण 'राधेय' म्हणून प्रसिद्ध होता तर सव्यसाची धनुर्धर अर्जुन 'पार्थ' किंवा 'कौंतेय' या नावाने प्रख्यात होता.

तेव्हा मातृनाम प्राचीन काळापासून अनेकांनी मोठ्या प्रेमाने आणि अभिमानाने स्वीकारलेले आहे. ज्ञानकोशकार डॉ. श्री. व्यं. केतकर यांनी केवळ मातृनाम नव्हे तर मातृवंशाबद्दलही फार महत्त्वाची महिती दिलेली आहे. त्यांच्या मते प्राचीय काळी आफ्रिका, सर्केशिया, हिंदुस्थान, तार्तरी, चीन, युरोप, अमेरिका इत्यादी सर्व ठिकाणी मातृवंशपरंपरा चालू होती. उपनिषत्काळी ही पद्धत अस्तित्वात होती. (जाबाल, ज्ञानकोश विभाग २, पृ. १६६).

ही चाल हीन संस्कृतीत केवळ अस्तित्वात होती हा आक्षेप चुकीचा आहे. अमेरिकेतील उच्च संस्कृतीच्या इरोकुइस व पुएब्लो इंडियन लोकात ही पद्धत अद्यापि रूढ आहे असे डॉ. केतकरांचे मत आहे. प्राचीन काळी सर्वत्र मातृकन्या परंपरा चालू होती. बाळ मातेच्या उदरातून (कुशीतून) जन्म घेते म्हणून ते आईच्याच मालकीचे ही भूमिका होती. पण जसजशी खाजगी मालमत्तेची कल्पना रूढ झाली, पुरुषाने आपल्या शारीरिक शक्तीच्या जोरावर पुरुषप्रधान संस्कृती निर्माण केली तसे तिचे पितृशासन पद्धतीत रूपांतर झाले. पितृवंश पद्धती रूढ होऊ लागली. मातृकन्या परंपरेत खालील गोष्टींचा समावेश होत असे.

(१) आईच्या जातीवरून मुलाची जात निश्चित ठरत असे. (२) स्त्रीवंशाकडून गणना होत असे. (३) मुलाला अगर मुलीला आईकडून वारसा प्राप्त होत असे. (४) आईच्या सामाजिक दर्जावरून मुलाचा दर्जा नक्की ठरत असे. (५) कुटुंबामध्ये बापापेक्षा आईची सत्ता अधिक असे. (६) पती पत्नीगृही राहावयास जात असे.

कधी बापाची तर कधी मामाची सत्ता मुलावर चालत असे. मातृवंशपरंपरा हिंदुस्थानातील आसामच्या खासी लोकांत, मलबारमध्ये नायर व नियन लोकांत

व सित्तांग लोकांत, उत्तर अमेरिकेतील सेरी इंडियन व इरोकुइस लोकांत प्रचलित आहे. ओशियानामध्ये मेलॅनिशियन जमातीत ही पद्धत विशेष रूढ आहे. मलाया द्वीपकल्पातील काही जातींत, सुमात्रा बेटात, पूर्व आशियातील ऐनू जातीत, फिजी, सेनेगाल, लोआंगो, कांगो, गिनी इत्यादी देशांत ही पद्धत अस्तित्वात आहे.

संस्कृतीच्या प्रारंभीच्या काळात आणि कृत्रिम पुरुषाष्ठित समाजापासून दूर असलेल्या प्रदेशात मातृवंशपरंपरा सन्मान पावलेली आहे. ज्या मातेने बालकाला जन्म दिला त्या मातेकडून वंशाची गणना होई. संमिश्र स्त्रीपुरुषव्यवहार व संघलग्नाच्या काळात ही पद्धत रूढ होती. संमिश्र स्त्रीपुरुषसंबंधात संतती नेमकी कोणाकडून झाली हे कळणे कठीण. अर्थात बाप अज्ञात असल्यामुळे आईकडून वंशगणना होई. शेतकी-व्यवसायात स्त्रीला विशेष महत्त्व असे. त्यामुळे काही ठिकाणी मातृवंशपरंपरा अस्तित्वात होती असेही मत ज्ञानकोशकारांनी प्रतिपादन केलेले आहे.

मातृवंशपरंपरा संपुष्टात आल्यावर मुख्य प्रश्न निर्माण झाला तो विवाहबाह्य संबंधापासून निर्माण झालेल्या दुर्दैवी बालकांबाबत. पण त्यांचा गुन्हा काय? खरा गुन्हेगार असतो जन्मदाता. तो स्त्रीवर बलात्कार करून किंवा तिच्याशी विवाहबाह्य संबंध प्रस्थापित करून, स्त्रीच्या असहाय स्थितीचा फायदा घेऊन म्हणा वा तिला मोह घालून म्हणा, हा गर्भ तिच्यावर लादतो. ह्या अवांच्छित मातृत्वापासून सुटका करून घेण्याचा प्रयत्न असफल ठरला की, मग तिला ते लांच्छित मातृत्व जगापुढे मिरविणे अशक्य असते. समाजाच्या दृष्टीने ती ठरते पापिणी अन् तिच्या पोटी जन्माला आलेले बालक–निरपराध बालक उकिरडयावर फेकले जाते. किंवा जन्मताच त्याच्या गळयाला नख लावून त्याची गुप्तपणे वासलात लावली जाते.

अंधारात जन्माला येणाऱ्या बालकाचे नामकरण कुणी सनई-वाजंत्री लावून वा मंगलारती करून करीत नाही. त्याच्या कपाळावर कोरला जातो अमंगलतेचा शिलालेख, डागला जातो बहिष्कृततेचा शिक्का. अशा कोट्यवधी अबोध बालकांचे जीवन म्हणजे अंधारातून अंधाराकडे केलेला प्रवास. ते तमोमय जीवन उजळण्याची आशाच नाही. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त केलेल्या राष्ट्रीय कवी दिनकर यांच्या रश्मिरथी काव्यातून महाभारतातील कर्ण साऱ्या कुस्करलेल्या फुलांचे प्रतिनिधित्व करीत असताना म्हणतो,

'मैं उनका आदर्श कही व्यथा न खोल सकेगे।
पूछेगा जग किंतु पिता का नाम न बोल सकेगे।
जिनका निखिल विश्व में कोई कही न अपना होगा।
मनमें लिये उमंग जिन्हें चिरकाल कलपन होगा।

या साऱ्या अभागी जिवांची व्यथा कर्ण आपल्या मातेला – कुंतीला बोलून दाखवतो ती पुढील शब्दात–

'विधि का पहला वरदान मिला जब तुमको
गोदीमें नन्हा दान मिला जब तुमको
क्यों नहीं वीरमाता बन आगे आई
सबके समक्ष निर्भय होकर चीख़ाई?
पथसे वंचित, गोदीसे निष्कासित कर
परिवार, गोत्र, कुल सबसे निर्वासित कर
फेका तुमने मुझे भाग्यहीन को जैसे
रहने दो त्यक्त, विषण्ण भी आज वैसे–'

या मातीमोल जीवन जगणाऱ्या प्रत्येक अर्भकाला हा प्रश्न आपल्या जन्मदात्या मातेला विचारावासा वाटला असेल आणि जगाच्या दृष्टीने पापिणी ठरलेली ती माता त्यावर काय उत्तर देणार? कारण या पापाचा खरा धनी सारे ओझे तिच्या माथी मारून नाहीसा झालेला असतो. तो समाजात उजळ माथ्याने धुतल्या तांदळासारखा वावरत असतो करून-सवरून नामानिराळा! जणू पवित्रतेचा पुतळा! मग त्या मातेने काय करावे?

ह्या अपत्यांचा परित्याग केल्याशिवाय तिला समाजात जगणे मुष्किल असते. पण या पापाची छाया तिचे सारे जीवन व्यापून टाकते, झाकळून टाकते. दिवस रात्र मनात डाचणारे हे शल्य ती कुणाजवळ बोलून दाखवू शकत नाही. अन्यथा मृत्यूला कवटाळणे किंवा अधःपाताच्या गर्तेकडे धाव घेणे, उडी घेणे हे दोनच पर्याय तिच्यापुढे उरतात.

असे हे शल्य उरी बाळगून, काळजावर दगड ठेवून कुंती जीवन कंठते. अखेर भारतीय युद्धाच्या प्रसंगी आपल्या पाच मुलांच्या प्राणांची भिक्षा मागण्यासाठी मन घट्ट करून ती आपल्या परित्यक्त प्रथम पुत्राकडे जाते आणि जीवनभर

हृदयात साठवून ठेवलेल्या अपमानाचा सूड त्या क्षणी कर्ण मातेवर घेतो. मोठा विलक्षण प्रसंग !

भारतीय युद्धानंतरचा दुसरा विचित्र प्रसंग. असल्या तेजस्वी, गुणी, उदारधी वीराची माता असून ती गौप्यस्फोट करू शकत नाही. त्याचा पदोपदी होणारा अपमान, अधिक्षेप तिला उघड्या डोळ्यांनी पाहावा लागतो, सहन करावा लागतो. अखेर त्याच्या करुण मृत्यूनंतर आपल्या ह्या ज्येष्ठ पुत्राला अर्घ्य देण्याची विनंती ती युधिष्ठिराला करते–

' ततः कुन्ती महाराज सहसा शोककर्शिता ।
रुदती मन्दया वाचा पुत्रान् वचनमब्रवीत् ॥

ती काय म्हणते–

' अरे, ज्याला तुम्ही सूतपुत्र समजला तो वीरांचा वीर, सूर्यासारखा महान तेजस्वी नर-श्रेष्ठ कर्ण माझ्याच उदरातून जन्माला आलेला तुमचा सख्खा वडील भाऊ होता. तू त्यालाही एक अर्घ्य दे. ' आणि या अभागी मातेच्या विवाहोत्तर तथाकथित मंत्राने झालेल्या पुत्रांनी तिला सहानुभूतीचा एक शब्दही दिला नाही. तिची निष्ठुरपणे पूजा बांधली. साऱ्या स्त्रीजातीला धर्मराजाने अभिशाप दिला. कुंती आणि तिचा तेजस्वी पुत्र या दुर्दैवी समाजरचनेचे बळी ठरले.

एखादा अपवादभूत सुयोधन कर्णाची बाजू घेताना दिसतो. महाभारत आदिपर्वात १२७ (१०–१५) भीमाने कर्णाचा अपमान केल्यावर सुयोधन त्याला ऐकवतो, ' शूरणां च नदीनां च प्रभवा दुर्विदाः किल । ' नदीचे मूळ आणि ऋषीचे कूळ शोधू नये म्हणतात त्यातलाच हा प्रकार. जन्म कुणापासून झाला, ते महत्त्वाचे नाही. महत्त्व आहे ते अंगभूत गुणांना. पाण्यापासून निर्माण झालेला अग्नी सर्व विश्व व्यापतो, तर दधीचीच्या अस्थीपासून बनलेले अस्त्र (वज्र) दानवांचा नाश करायला कारणीभूत होते. अगस्तिऋषी कुंभापासून जन्मले तर कृपाचार्यांचा जन्म शरस्तंभातून आणि पांडवांनो तुमचा जन्म ? साराच अद्‌भुत प्रकार आहे !

समाजाने ' सूतपुत्र ' म्हणून पुनःपुन्हा केलेल्या अपमानामुळेच सूर्यपुत्र कर्णाला ठासून सांगावे लागले—

' दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम्— '

कर्णाच्या अगदी उलट एक कथा आढळते ती छांदोग्य उपनिषदात. ती आहे सत्यकाम जाबाल आणि त्याची माता जबाला ह्यांची. प्रसंग असा आहे—

एके दिवशी सत्यकाम आपल्या मातेला विचारतो, 'मी गुरुगृही जाऊन ब्रह्मचर्याश्रमाचं शिक्षण घेण्याचा प्रयत्न करीन. माते, मला माझं गोत्र सांग.'

त्याची आई कोणताही आडपडदा न ठेवता त्याला सांगते, 'बाळ, तुझं गोत्र मला ठाऊक नाही. मी अनेक ठिकाणी काम केलं. अनेकांची सेवा केली. माझ्या तारुण्यात तू मला लाभलास. मी तुला तुझं गोत्र सांगू शकत नाही. माझं नाव जबाला. तुझं नाव सत्यकाम म्हणून तू आपलं नाव सत्यकाम जाबाल असं सांग.'

गुरुगृही ह्या सत्यवचनी बालकाचे कौतुक झाले. गुरूने त्याला उदारपणे विद्याधन दिले. पण असा अनुभव आजवर किती अनौरस मुलांना आला असेल?

ह्या साऱ्या अनौरस मुलांबद्दल, या साऱ्या कुस्करलेल्या फुलांबद्दल समाजाने युगानुयुगे फार कठोर भूमिका घेतली. पित्याने आपली विषयवासना तृप्त करण्यासाठी पाशवी शक्तीच्या जोरावर बलात्कार करून वा मोहक वाणीने जिंकून स्त्रियांच्या ठिकाणी त्यांना जन्म दिला त्या अपराधी पित्याची जबाबदारी काय? वेगवेगळ्या धर्मांनी याबाबत काय भूमिका घेतली आहे?

हिंदुधर्मशास्त्रानुसार ह्या बालकांना आपल्या पित्याच्या मालमत्तेत वारसाहक्क साफ नाकारलेला आहे. त्यांचे पोषण एकवीस वर्षांच्या वयापर्यंत पित्याने केले तरी खूप झाले. मालमत्तेवर मात्र त्यांचा यत्किंचितही हक्क नाही. मृत्युपत्रात मुद्दाम नमूद करून त्यांच्या नावे संपत्ती वेगळी ठेवली असेल तर गोष्ट निराळी. मात्र शूद्र पुरुषाला शूद्र स्त्रीपासून झालेल्या अनौरस संततीला पित्याच्या मालमत्तेतील एकषष्ठांश वाटा मिळत असे. ज्या वेळी हिंदू कोड बिलाची रचना झाली त्या वेळी अनौरस संततीबाबत अधिक सहानुभूतीचे धोरण स्वीकारावे असा विचार करून त्यांचा वारसाहक्क मान्य करण्याची योजना झाली. परंतु त्या वेळचे कायदेमंत्री श्री. हरिभाऊ पाटसकर यांनी प्रस्तुत केलेल्या या बिलावर प्रचंड वादळ उठलेले दिसते. राज्यसभेतील चर्चेचा एकूण सूर पाहता त्यात सहानुभूतीचा वाटा ह्या अर्भकांच्या नशिबी फारच थोडा आलेला दिसतो. या चर्चेच्या संदर्भात सोव्हिएट कायदा, चिनी राज्यघटना, ब्रिटनमधील लेजिटिमसी ॲक्ट (१९२६) इत्यादी अनेक कायद्यांचा ऊहापोह झालेला दिसतो. इस्लाम

धर्मातील शियासुनी कायद्याचा उल्लेखही आढळतो.

शिया कायद्याने अनौरस बालकांना मातापित्यांच्या मालमत्तेची, संपत्तीची दोन्ही दारे बंद केली आहेत. परंतु सुनी कायदा म्हणतो—अनौरस बालकाला पित्याच्या बाजूने वारसा हक्क नाही. पण बापाने ही आपली संतती आहे असे मान्य केल्यास त्याला तो हक्क मिळतो. त्यासाठी तीन अटी आहेत : (१) बाप-लेकांच्या वयातील योग्य अंतर. (२) दुसऱ्या एखाद्या व्यक्तीकडे मुलाचे पितृत्व असून चालणार नाही. (३) पुत्राने ह्या संबंधाला मान्यता द्यायला हवी.

सोव्हिएट कायद्याने प्रारंभी औरस-अनौरस संततीस वारशाचे समान अधिकार दिले. परंतु पुढे मात्र ते काढून घेतले.

Civil Law vol. I by Gsovski Page 635. Edict of the Federal Presidium of July 8, 1944. Sec. 19—20. नुसार हे अधिकार काढून घेण्यात आले. ह्या तारखेपूर्वी जन्माला आलेल्या बालकाच्या माता-पित्यांनी नंतर विवाह केला तरी त्या अनौरस मुलाला औरस मुलाचे सर्व अधिकार देण्यात आले. एकूण रशियाचा या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोण प्रारंभी अधिक उदार-मतवादी होता. हळूहळू क्रांतीचा जोश ओसरला. माणसे खासगी मालमत्ता प्राप्त करू लागली त्याबरोबर पुरुषप्रधान, संपत्तीवर अधिष्ठित असे समाजजीवन जगण्याकडे समाज झुकू लागला. प्रारंभीच्या प्रगतिशील धोरणाला मुरड घालण्यात आली.

चीनच्या राज्यघटनेतील १५ व्या कलमानुसार अनौरस संततीला औरस संततीइतकेच अधिकार देण्यात आले आहेत. कुणालाही औरस-अनौरस हा भेदभाव त्यांच्यात करता येणार नाही. चीनने या बालकांवरील 'अनौरस'पणाचा कलंक धुवून काढला आहे.

ब्रिटनने १९२६ च्या इंग्लिश लेजिटिमसी ॲक्टच्या नवव्या खंडात निष्पाप, अनौरस बालकांना सहानुभूतीने वागविण्याचा, त्यांच्यावरील अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. दुसऱ्याच्या गुन्ह्याबद्दल त्यांना जबाबदार धरू नये, त्यांनी स्वत: न केलेल्या गुन्ह्याची शिक्षा देऊ नये अशी व्यवस्था या कायद्याने केली. 'चाईल्ड लॉ' ह्या पुस्तकात अनौरस व अनाथ बालकासंबंधी ब्रिटनने वेळोवेळी केलेल्या कायद्याचे विवेचन आहे. त्यावरून ह्या प्रश्नाबाबत ब्रिटनचा दृष्टिकोण उदार आणि मानवतावादी आहे हे सिद्ध होते. 'बॅस्टार्ड' म्हणजे बिनबापाचा

हा शब्द कोशातून काढून टाकण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे.

ब्रिटनमध्ये कुमारी मातेला किंवा विवाहबाह्य संबंधातून जन्माला आलेल्या मुलाला जास्तीत जास्त मदत केली जाते. बाळंतपणाची रजा, आर्थिक मदत इत्यादी सर्व फायदे त्यांना मिळतात. शक्यतो बाळाचा बाप शोधून काढून अनुरूप वधुवरांचा विवाह करण्यात येतो. १५ वर्षे आईवडिलांना ह्या बालकाचे पोषण करण्यासाठी अनाथाश्रमाला पैसे द्यावे लागतात. मधूनमधून भेट घेऊन ते बालकाशी संबंध ठेवू शकतात. अनौरस बालकाचा पिता हात झटकून मोकळा होऊ शकत नाही. याबाबतीत शासन आणि समाज दोघेही आपआपली जबाबदारी पार पाडतात. कुटुंबातही अशा मुलीला पतितेसारखे वागवले जात नाही. सुधारण्याची संधी दिली जाते. प्राचीन काळी आपल्याकडे यज्ञ करताना 'यजमान' आपल्या कुटुंबातील सर्वांच्या पापाबद्दल अग्नीजवळ क्षमा-याचना करीत असे. मग ते पाप आईचे किंवा आजीचे असो. पतितेला समाज-जीवनातून न उठवता सहानुभूतीने वागविण्याचा आदेश दोन्ही कुलांना (सासर-माहेर) धर्मगुरू, स्मृतिकार देत असत. अशी उदारमतवादी क्षमाशील दृष्टी आपल्या पूर्वजांनी स्वीकारली होती.

नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क इत्यादी स्कँडिनेव्हियन देशांनी या प्रश्नाबाबत उदार धोरण स्वीकारलेले आहे. औरस-अनौरस हा भेद काढून टाकला आहे. डेन्मार्क-मध्ये अविवाहित माता व अनौरस बालक यांना खास संरक्षण देण्यात येते. अविवाहित मातेची काळजी घेण्याचे काम शासन करते. प्रत्येक मातेला गरोदर-पणी आणि बाळंतपणात काही भत्ता देतात. अविवाहित मातेला तो जास्त देतात. जन्मणारे बालक हे सर्वथैव तिच्या मालकीचे. त्याने मातेचे नाव लावावे. समाज कुणाही बालकाकडे घृणास्पद दृष्टीने पाहात नाही. प्रत्येक बालक राष्ट्राच्या मालकीचे मानले जाते.

हिंदू कोड बिलाची चर्चा जेव्हा १९५५ मध्ये राज्यसभेत झाली तेव्हा अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी या चर्चेत भाग घेतला. त्यांपैकी काही मते फार महत्त्वाची होती.

चर्चेच्या प्रसंगी श्रीमती रुक्मिणीदेवी अरुंडेल म्हणाल्या—'अनौरस शब्दच त्या मुलाच्या मनात एक प्रकारचा गंड निर्माण करतो. देवदासीसुद्धा एकाच पुरुषाशी जन्मभर एकनिष्ठ असतात. मग ते अपत्य कलंकित कसे? त्या संततीचे

पितृत्व तर सर्वश्रुत असते.

'मातृवंश, मातृनाम लावल्यास हा साराच ताप टळेल. कुणी औरस-अनौरस हा फरक करणार नाही. पितृत्व सिद्ध करण्याचा प्रश्नच येणार नाही. प्रत्येक बाळ आपल्या आईचे असते म्हणजे मातृत्व स्वयंसिद्धच असते.'

खासदार श्री. एन् टी. प्रसादराव म्हणाले,

'निष्पाप बालकांना का शिक्षा? २१ वर्षे पोषणाची जबाबदारी पित्याची मग मातापित्यांच्या मालमत्तेत त्याला सारखा हक्क दिला तर काय हरकत आहे?'

कम्युनिस्ट खासदार श्री. भूपेश गुप्तांनी असे मत व्यक्त केले की, औरस मुलाला अधिकार मग अनौरस मुलाला का नाही? एका मुलाला दुसऱ्यापासून वेगळे का काढता? त्यांच्यावरील अनौरसपणाचा कलंक धुऊन काढा. मुलांना राष्ट्राची संपत्ती माना. असेच मत श्री. रामेश्वर राजभोज यांनी व्यक्त केले.

श्री. कन्हैयालाल वैद्यांनी असे प्रतिपादन केले की, केवळ निर्वाहनिधी देऊन भागणार नाही. त्या बालकाला हिस्सा मिळाला पाहिजे. आपल्या विवाहित पत्नी-खेरीज इतर स्त्रियांशी संबंध ठेवणाऱ्या पुरुषांना सजा झाली पाहिजे. कमीत कमी सहा महिने त्यांना तुरुंगाची कोठडी दाखवा. खरे गुन्हेगार तेच आहेत.

श्रीमती लीलावती मुन्शी यांनी असे आवाहन केले की, या बालकांवरील कलंक धुऊन काढा. त्यांना शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारने शिरावर घ्यावी. बालके अनौरस नव्हेत. आईवडिलांचे संबंध बेकायदेशीर आहेत. डॉ. सीता परमानंदांच्या मते औरस मुलांनी आपल्या व्यभिचारी पित्याचा धिक्कार करावा; या निष्पाप बालकांचा नव्हे.

एकूण नव्या हिंदू कायद्यानुसार अनौरस संपत्तीचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न काही विचारवंतांनी केला. पण समाजातील परंपराप्रिय तत्त्वांनी त्याला कसून विरोध केला आणि कायद्यातील ही पुरोगामी पावले टाकणारी तरतूद हाणून पाडली. विरोधकांचा युक्तिवाद असा की ह्यामुळे अनीती बोकाळेल. विवाहित पत्नी व मुले यांचे नुकसान होईल. एकपत्नीत्वाला बाध येईल. परंतु उद्या ही स्त्री व हे अनौरस मूल आपल्या संपत्तीतील वाटा मागेल या भीतीने या पुरुषाला अन्य स्त्रियांशी संबंध ठेवताना विचार करावा लागला असता. जपून, विचारपूर्वक पावले उचलायला लागली असती. स्वैराचारावर बंधन पडले असते.

अशा रीतीने समाजाच्या नीतिमत्तेवर धर्ममार्तंडांनी कितीही नियंत्रण ठेवले तरी

जगभर अशा बालकांचा जन्म प्रतिदिनी होतच आहे. मध्यंतरी बुखारेस्ट येथे झालेल्या परिषदेत जगातील लाखो अनौरस बालकांच्या प्रतिनिधींनी आर्त स्वाने अशी मागणी केली की, आमच्यावरील हा कलंक पुसून आम्हाला माणूस म्हणून जगू द्या. जगातील लाखो बालकांचे, तडफडत्या जिवांचे मानवतेला हे आवाहन होते.

ह्या प्रश्नाकडे संसदीय पातळीवरून पाहण्याचा, ही समस्या सोडविण्याचा प्रयत्नही होत आहे. भारतीय लोकसभेच्या अंदाजपत्रकी अधिवेशनात श्री. मधु लिमये यांनी एक विधेयक मांडले. त्याचे नाव मातृवंशविधेयक. या विधेयकानुसार भारतातील कुठलाही नागरिक कागदोपत्री आपल्या पित्याचे वा मातेचे नाव लावू शकतो. पित्याचेच नाव लावले पाहिजे असा नियम चालणार नाही. कुणालाही दासीपुत्र, रांडलेक, अनौरस म्हणणे हा कायद्याने गुन्हा मानावा. ह्या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्याला एक महिना सश्रम कारावास आणि ५०० रुपये दंड किंवा दंड न दिल्यास आणखी एक महिना सश्रम कारावासाची शिक्षा द्यावी अशी तरतूद आहे.

श्री. मधु लिमये हे विधेयक संसदेपुढे मांडताना म्हणाले, की आज जगात सात प्रकारच्या क्रांतीचे सप्तरंगी इंद्रधनुष्य निर्माण झालेले आहे. ह्या सर्व क्रांत्या परस्परांशी संबद्ध आहेत–

(१) आर्थिक समता–गरिबी-श्रीमंती यांमधील भेद दूर करणारी क्रांती.

(२) सामाजिक समता–जन्मावर आधारलेल्या जाती नष्ट करणारी क्रांती.

(३) काळ्या-गोऱ्यांतील भेद दूर करणारी वंशवादविरोधी क्रांती.

(४) राष्ट्राराष्ट्रांतील समतेची–वसाहतवादविरोधी क्रांती.

(५) भांडवलशाही व सरंजामशाहीविरोधी क्रांती.

(६) एक तृतीयांश विकसित औद्योगिक विश्व आणि दोन तृतीयांश अविकसित विश्वामधील दूर करणारी क्रांती.

(७) स्त्रीपुरुष समता क्रांती.

ही अखेरची क्रांती या विधेयकाची आधारशीला आहे. ह्या विधेयकावर संसदेत साधकबाधक चर्चा होऊन आता हे विधेयक जनमताचा अंदाज घेण्यासाठी परिचालित करण्यात आलेले आहे. विशेषत: स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या संदर्भात हे विधेयक ऐतिहासिक कामगिरी बजावणारे ठरेल. मातेचा महिमा खऱ्या अर्थाने प्रस्थापित करणारे हे विधेयक आहे.



गांधीजींचे राजकारण आणि महिला

" पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने ।
रक्षन्ति स्थविरे पुत्राः न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ।।

मनुस्मृति

" अबला जीवन हाय तुम्हारी यही कहानी
आंचल में है दूध और आंखोंमें पानी "

श्री. मैथिलीशरण गुप्त

युगानुयुगे स्त्री-जीवनाची, विशेषतः भारतीय स्त्री-जीवनाची, हीच दुःखद कथा आहे. गार्गी-मैत्रेयीचा उज्ज्वल कालखंड संपला. त्यानंतर स्त्रीचे जीवन घराच्या चार भिंतींत कोंडले गेले. घराच्या उंबरठ्याबाहेर पाऊल टाकणे तिला अशक्य झाले. पडद्यामागे, अज्ञानाच्या घोर अंधकारात महिलांचे जीवन लपलेले होते. ह्या तमोमय जीवनात नवा प्रकाश आणणारा सूर्य पूर्वक्षितिजावर चमकला. त्याचेच नाव–महात्मा गांधी.

स्फूर्तीचा नवा झरा

गांधीजींना स्त्रीमधील सुप्त शक्तीचा साक्षात्कार झाला. तिचे मोठेपण त्यांनी जगापुढे मांडले. किंबहुना त्यांच्या राजकारणामुळे केवळ भारतीय स्त्रियांनाच नवजीवन लाभले असे नाही, तर जगातील इतर देशांतील स्त्रियांनाही आपल्या जीवनाचा नवा अर्थ शोधण्याची संधी मिळाली. उच्च घराण्यातील महिलांपासून गरीब कुटुंबातील स्त्रियांपर्यंत साऱ्या महिलांना स्फूर्तीचा नवा झरा त्यांच्या रूपाने सापडला. त्यांच्यात राजप्रासादात राहणाऱ्या राजकन्या होत्या, कोट्यधीश कुटुंबात वाढलेल्या सुविद्य, सुसंस्कृत महिला होत्या आणि त्याचबरोबर दरिद्री झोपडीत जन्मलेल्या अशिक्षित स्त्रियाही होत्या. गांधीजींच्या मार्गाने जाण्यासाठी त्यांच्या महान जीवनकार्यात सहभागी होण्यासाठी प्रत्येक प्रांतातून, धर्मातून हजारो महिला पुढे आल्या. आपल्या संकुचित जीवनाच्या मर्यादा ओलांडून देशाच्या स्वातंत्र्यासाठी, दीन-दलितांचे अश्रू पुसण्यासाठी त्या कटिबद्ध झाल्या. समाजाविषयीची आपली जबाबदारी त्यांनी पार पाडली. जातिभेदाच्या भिंती त्यांनी तोडून टाकल्या.

मातेकडून प्रेरणा

गांधीजींना प्रेरणा मिळाली ती आपल्या मातेकडून—पुतळीबाईकडून. त्यांच्या जीवनाला आकार देऊन त्यावर सुसंस्कार करण्याचे काम केले ते त्यांच्या मातेने. धार्मिक शिक्षण देऊन बालपणापासून त्यांनी गांधीजींच्या मनावर सखोल संस्कार केले.

दुसऱ्या महिलेने त्यांना अखेरपर्यंत साथ दिली. त्या होत्या बा. त्यांच्या अर्धांगिनी. गांधीजींची जीवनमूल्ये व सिद्धान्त समजावून घेऊन त्यांना मूर्त रूप देण्याचा यांनी सफल प्रयत्न केला. भारतीय महिलेचा कायाकल्प पाह्यचा असेल तर त्यासाठी अशिक्षित कस्तुरबांचे सारे जीवन डोळ्यांखालून घातले पाहिजे. वस्त्रालंकारांचा मोह, केवळ कुटुंबियांबद्दलचे प्रेम, जातिप्रथेचा प्रभाव-या साऱ्या संकुचित स्वार्थांना दूर लोटून कस्तुरबा गांधीजींच्या आश्रमाची स्फूर्तिदेवता बनली. "वसुधैव कुटुंबकम्" ही दृष्टी त्यांनी स्वीकारली. अस्पृश्यतेच्या कल्पनेचा परित्याग केला. "लक्ष्मी" नावाच्या ७ वर्षांच्या हरिजन मुलीला त्यांनी दत्तक घेतले. भंगी वस्तीत काम करीत असताना दारिद्र्याशी त्यांची खरी ओळख

झाली. दक्षिण आफ्रिकेतील चळवळीत भाग घेण्याचा निर्णय यांनी स्वत:च घेतला. गांधीजी लोकांशी सत्याग्रहाबाबत चर्चा करीत. पण बांना सत्याग्रहात भाग घे असे त्यांनी कधीच सांगितले नाही. त्याबद्दल त्यांना दु:ख झाले. "हे मला का सांगत नाहीत ? मला का विश्वासात घेत नाहीत ?" अशी खंत कस्तुरबांना वाटत होती. बापू म्हणाले, "तू आपल्या मनाने निर्णय घे. मी तुझ्यावर कोणत्याच गोष्टीची सक्ती करणार नाही." त्या दिवसापासून बा प्रत्येक आंदोलनात भाग घेऊ लागल्या. अखेर कारावासातच त्यांना मृत्यू आला. पतीचा विशाल दृष्टिकोण स्वीकारून आपले जीवन राष्ट्रकार्यासाठी त्यांनी संपूर्णतया समर्पित केले. सहधर्मचारिणीची भूमिका त्यांनी उत्कटपणाने वठविली.

महिला आंदोलनाचा पाया

सत्याग्रह आंदोलनाने भारतीय जनतेत जागृतीची ज्योत पेटवून गांधीजींनी आपल्या अधिकारांसाठी संघर्ष करण्याच्या हेतूने संघटना उभारली. ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या चुकीच्या धोरणाशी टक्कर द्यायला त्यांनी जनतेला प्रेरणा दिली. नंतर सहकारी शेती व सामुदायिक जीवनाचा प्रयोगही त्यांनी केला. त्या कार्यक्रमात भारतीय जनतेबरोबर अनेक परदेशी लोक पण सामील झाले. ह्या नव्या प्रयोगामुळे विश्वविख्यात लेखिका श्रीमती ऑलिव श्रीनर त्यांच्याकडे आकृष्ट झाली. साधेपणाचा आदर्श तिने आपल्यापुढे ठेवला होता. आपल्या पतीसमवेत गांधीजींच्या कार्यात तिने खूप सहकार्य केले. तिला हृदयाचा विकार होता तरीदेखील भारतीय जनतेच्या हक्कांसाठी ती लढत राहिली. ह्याचे फळ तिला भोगावे लागले. तिचे घर बाँबने उडविण्यात आले. गांधीजींच्या कार्यावर तिचा अतूट विश्वास होता. 'द स्टोरी ऑफ ॲन आफ्रिकन फार्म' या ग्रंथात तिने गांधीजींच्या दक्षिण आफ्रिकेतील कार्याची संपूर्ण माहिती दिली आहे. दीन-दलितांच्या दु:खाला तिनं वाचा फोडली आहे. तेथे तिनेच महिला आंदोलनाचा पाया घातला.

सौंदर्याचे वेगळे निकष

गांधीजींची दुसरी सहकारी स्त्री म्हणजे श्रीमती मिली ग्रॅहॅम पोलक. ही एक स्कॉच महिला. तिचे पती गांधीजींचे मित्र व सहकारी होते. ती कस्तुरबांना गृहकृत्यातही मदत करी. आपल्या वेषभूषेवर पैसा खर्च करणे तिला अजिबात

आवडत नसे. गांधीजींना तिच्या निर्भयतेचे व साधेपणाचे कौतुक वाटे. दक्षिण आफ्रिकेतील कॉलनीत आपल्या नेतृत्वाची चुणूक तिने दाखविली. वेस्ट दांपत्याचे सहकार्यही गांधीजींना भरपूर मिळाले. त्या सर्वांचे मिळून एक कुटुंबच बनले होते. श्री. वेस्ट 'इंडियन ओपिनियन'चे संपादक होते. त्यांची धर्मपत्नी पादत्राणांच्या एका कारखान्यात काम करी. तिच्या हृदयाच्या पावित्र्याचा गांधीजी फार गौरव करीत. त्यामुळे ती त्यांना सुंदर वाटे. गांधीजींचे सौंदर्याचे निकषच वेगळे होते.

दक्षिण आफ्रिकेतील गांधीजींची सर्वांत मोठी सहायक म्हणजे श्रीमती सोनिया श्लेसिन. ही एक रशियन ज्यू स्त्री. गांधीजींच्या कार्यात तिला फार रस होता. ऑफिसचे काम ती संभाळत असे. प्रत्येक कामात ती कुशल होती. अनेक कामांत ती पूर्णपणे बुडलेली असे. आपल्या पगारवाढीला तिने कसून विरोध केला. ती गांधीजींना म्हणाली, "आपले कार्य आणि आपले आदर्श यावर माझी निष्ठा आहे म्हणून मी काम करते. मला फक्त एकतृतीयांश पगार द्या." सभांचे आयोजन करणे, वर्गणी गोळा करणे, चळवळीचे बातमीपत्र हिंदुस्थानात व इतर देशांतील वृत्तपत्रांना पाठविणे ही सारी कामे तीच करी. त्यामुळे लोकांना चळवळीबद्दल खरी माहिती मिळे. जोहान्सबर्गच्या धोकादायक रस्त्यावरून ही निर्भय स्त्री रात्रीच्या अंधारातही एकटी फिरे. घरोघरी जाऊन आंदोलनाचा संदेश पोचवी. श्री. वेस्ट यांना अटक झाल्यावर 'इंडियन ओपिनियन'चे संपादन तिनेच केले. ती विलक्षण कर्तृत्ववान होती. सैनिकाप्रमाणे शूर, जैन श्रमणकां-सारखी त्यागी अशी ही थोर महिला. तिचे कार्य पाहून श्री. गोपाळ कृष्ण गोखले गांधीजींना म्हणाले, "अशी त्यागी, पवित्र व निर्भय स्त्री क्वचितच आढळते. माझ्या दृष्टीने तुमच्या सर्व सहकाऱ्यांत ही श्रेष्ठ आहे."

भारतीय महिलेचा गौरव

गांधीजी आफ्रिका सोडून भारतात परत येत असताना काही दिवस इंग्लंड-मध्ये राहिले होते. त्या वेळी त्यांची श्रीमती सरोजिनी नायडूंशी भेट झाली. उच्च कुळातील या बुद्धिमान व प्रतिभाशाली महिलेवर गांधीजींचा पहिल्याच भेटीत खूप प्रभाव पडला. तेव्हापासून त्यांचा स्नेह घनिष्ठ झाला. भारतीय महिला जीवनाची ती प्रतिनिधी होती. तिने खूप उच्च शिक्षण घेतले होते. इंग्रज लोक

तिचा फार गौरव करीत. तिची पुस्तके प्रकाशित करण्याचे श्रेय तिच्या दोन इंग्रज मित्रांना आहे. हिंदुस्थानात परतल्यावर गांधीजींनी साबरमतीला आश्रम काढला आणि गरीब शेतकऱ्यांच्या मदतीसाठी खादीचा कार्यक्रम सुरू केला. ह्या कार्यक्रमात सरोजिनीला गोडी होती. आपल्या धनिक मित्र-मैत्रिणींना आश्रमात आणून तिने गांधीजींना खूप मदत केली. जालियनवाला बाग हत्याकांडानंतर इंग्रजांबद्दलचा तिचा दृष्टिकोण बदलला. ती उग्रवादी बनली. भारताच्या या कोकिळेने सर्व देशभर आपल्या मधुर व प्रभावशाली वक्तृत्वाने गांधीजींचा संदेश पोचवला आणि नंतर इंग्लंडमध्ये जाऊन तेथील जनतेला डायरच्या क्रूर कृत्यांची माहिती तिने दिली. अखिल भारतीय काँग्रेसच्या चाळिसाव्या संमेलनात गांधीजींनी भारतीय महिलेचा गौरव केला. त्यांनी सरोजिनी नायडूंची अध्यक्ष-पदावर योजना केली. घोर अंधकारात बुडालेल्या भारतीय स्त्री-जीवनाला एक नवा मार्ग दाखविला. धारासना वा अन्य सत्याग्रहांत सरोजिनीनं जे महान कार्य केले त्यामागे महात्माजींची प्रेरणा होती. गांधीजींच्या हरिजनांतील कार्यासाठी सरोजिनीने अनेक कार्यकर्ते गोळा केले. ती त्यांना खरोखरच 'देवाचा पुत्र' मानत होती. येशूने पर्वतावर जे प्रवचन दिले त्यानुसार हा खरोखरच 'देवाचा पुत्र' आहे असा सरोजिनी नायडूंचा विश्वास होता.

ज्या दिवशी सरोजिनींनी धारासना येथे सत्याग्रह केला त्याच दिवशी श्रीमती कमलादेवी चट्टोपाध्याय मुंबईमधील सत्याग्रहाचे नेतृत्व करणार होत्या. परंतु आदल्याच रात्री पोलिसांनी त्यांना अटक केली. तेव्हा त्यांचा लहानगा मुलगा त्यांना म्हणाला, "आई, तू काळजी करू नकोस. उद्याचा सत्याग्रह नक्की होईल, आणि त्याचे नेतृत्व मी करीन." त्यानंतर कमलादेवी स्वातंत्र्य चळवळीत आणि राजकारणात खूप सक्रिय होत्या.

पंडित नेहरूंच्या कुटुंबाला, विशेषतः त्यांच्या भगिनींना गांधीजींच्या कार्या-पासून स्फूर्ती मिळाली. श्रीमती विजयालक्ष्मी पंडितांनी गांधीजींचा संदेश जगभर पसरवून खूप कीर्ती मिळविली. त्यांच्या संघटनाकौशल्याचे खूप कौतुक झाले. अमेरिकेतील श्रोत्यांना आपल्या प्रवाही वाणीने, ओघवत्या वक्तृत्वाने भारतातील सत्य परिस्थितीचे निवेदन करून त्यांचे हृदयपरिवर्तन विजयालक्ष्मींनी केले. पंडितजींची माता, पत्नी व कन्या सर्वांनी स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतला.

श्रीमंत कुटुंबातून आलेल्या कपूरथळ्याच्या खिश्चन राजकन्या राजकुमारी

अमृत कौर मोठ्या सुशिक्षित व क्रीडापटू होत्या. त्यांनी गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा स्वीकार करून त्यांना पत्रव्यवहार व इतर कामांत कौशल्यानं मदत केली. गांधीजींच्या कुटुंबात त्यांना पाहून लोकांना खूपच आश्चर्य वाटे.

मीरेचे कृष्ण : मीरेचे गांधी

श्रीमती मॅडेलिन स्लेडसारख्या इंग्लंडमधील श्रीमंत कुटुंबातील एका युवतीच्या तडफडणाऱ्या हृदयाला रोमारोलांनी लिहिलेल्या गांधीजींच्या चरित्राने नवा आधार दिला. सर्वस्वाचा त्याग करून ही महिला भारतात आली. आपला देश, कुटुंब, संपत्तीने मिळणाऱ्या सुखसोयी सारे सोडून कष्टमय जीवन व्यतीत करण्यासाठी ती कायमची हिंदुस्थानात आली. गांधीजींनी तिची कठोर अग्निपरीक्षा घेतली तिची निष्ठा कसाला लावून त्यांनी तिला 'मीराबेन' हे नाव देऊन आपल्या निकटवर्तीयांमध्ये सामील करून घेतले. मीरेला कृष्णाबद्दल जशी ओढ होती, श्रद्धा होती तशीच मॅडेलिन स्लेडला गांधीजींबद्दल वाटत होती.

दृष्टिकोण बदलला

आयरिश आंदोलनात भाग घेणाऱ्या श्रीमती ॲनी बेझन्टमुळे गांधीजींचा स्त्रीविषयक दृष्टिकोण बदलला. श्री. चार्ल्स ब्रॉडला यांच्या अंत्ययात्रेच्या वेळी आयर्लन्डमधील आंदोलनात भाग घेणाऱ्या या बुद्धिमान व निर्भय स्त्रीशी गांधीजींचा परिचय झाला. त्या वेळच्या भारतीय तरुणांना असे वाटे की, ही कोणी स्वर्गीय देवताच भूतलावर अवतरली आहे. गंगेच्या पवित्र किनाऱ्यावर, "हे भारता, जागा हो" या व्याख्यानमालेत भारतीय जनतेच्या श्रद्धेचा व परंपरागत धर्माचा आवाज तिने गुंजित केला. प्रथम ॲनी बेझंट गांधीजींना कायदा मोडणारा भयंकर माणूस समजत होती. पण पुढे आपल्या वृत्तपत्रातून तिने-देखील ब्रिटिशांच्या धोरणावर कडाडून हल्ला केला. म्हणून सरकारनं तिला कारावासात डांबले. तिची 'होमरूल चळवळ' दडपण्याचा खूप प्रयत्न केला. जेलमधून सुटल्यावर जनतेनं तिचे उत्साहपूर्ण स्वागत केले. पुढे मात्र जालियनवाला बाग प्रकरणातील तिची भूमिका लोकांना मुळीच आवडली नाही.

गांधीजींनी लहान बालकांच्या मनावर जी मोहिनी घातली तिचे उदाहरण म्हणजे डॉ. सुशिला नायर. श्री. प्यारेलाल यांची ही धाकटी बहीण. आश्रमीय जीवनावर

ती मोहित झाली. तिने खादी परिधान करण्याचा निश्चय केला. गांधीजींच्या विशेषत: कस्तुरबांच्या प्रेमळ छायेखाली ती वाढली. अनेक वेळा आपले शिक्षण अपुरे टाकून तिने बा आणि बापूंची खूप सेवा केली. कस्तुरबांच्या जीवनात सरोजिनी नायडू व सुशिला नायर ह्यांना महत्त्वाचे स्थान होते. यांच्या अखेरच्या कारावासात, आगाखान पॅलेसमध्ये त्यांची सेवाशुश्रूषा सुशिला नायरनेच केली. नंतर नौखालीत प्राणांची बाजी लावून तिने गांधीजींबरोबर जातीय दंगे, धार्मिक वैमनस्य शांत करण्याचे प्रयत्न केले.

नवा आदर्श

सर्वसामान्य कुटुंबातील गंगाबेन मुजुमदार यासारख्या निरक्षर, भोळ्याभाबड्या स्त्रीमधून गांधीजींनी स्त्रीजीवनाचा नवा आदर्श निर्माण केला. खादीच्या कामासाठी गंगाबेनने चरखा शोधून काढला आणि झोपडीत जाऊन गरीब कुटुंबांना पूरक उत्पन्न मिळविण्यासाठी सूत कातण्याचे शिक्षण दिले. गांधीजींच्या मार्गावर प्रवास करताना या भगिनीने नवयुगाची निर्मिती केली.

अबला, की रणचंडी ?

कोट्यधीश कुटुंबातून आलेल्या अनसूया व मृदुला साराभाई यांसारख्या महिलांच्या मनात गरीब व दु:खी लोकांबद्दलच्या सहानुभूतीचा दीप गांधीजींच्या तत्त्वज्ञानामुळेच प्रज्वलित झाला. कामगारांना कमी काम व वाजवी वेतन मिळावे म्हणून प्रयत्न करणारी अनसूयाबेन गांधीजींची शिष्या होती. भांडवलदारांच्या कुटुंबातील स्त्रियांनी जसे सारे काही गांधीजींच्या चरणापाशी समर्पित केले, त्याप्रमाणे गरीब शेतकऱ्यांनी देशासाठी आपले सर्वस्व प्रदान केले, स्वार्थाचा त्याग करून भारतीय स्त्रिया स्वातंत्र्यसंग्रामात रणचंडी बनल्या.

अगणित महिलांना आपले जीवन उज्ज्वल करण्याचे भाग्य गांधीजींच्या चळवळीमुळे मिळाले. सर्व चळवळींत त्या लाखोंच्या संख्येने सामील झाल्या. लाठ्या, गोळ्या झेलण्यासाठी उत्सुक झाल्या. त्यात ७० वर्षांच्या मातंगिनी हाजरा या वृद्धेपासून गोपूरच्या कनकलता किंवा बहरामपूरच्या रत्नमालेसारख्या चौदा वर्षांच्या किशोरी होत्या. तळहातावर शिर घेऊन त्यांनी स्वातंत्र्यवेदीवर हसत हसत बलिदान केले. जंगल सत्याग्रह, मिठाचा सत्याग्रह, सविनय कायदेभंग ह्या

सर्व काळात स्त्रियांचे कार्य फार आश्चर्यकारक होते. दारूची दुकाने आणि परदेशी कापडाची दुकाने यांसमोर धरणे धरून त्यांनी जनतेच्या मनात जागृतीची ज्योत पेटवली. प्रभातसमयी स्फूर्तिदायक गीत गात उषःकालच्या किरणांबरोबर स्वातंत्र्याचा संदेश त्यांनी घरोघरी पोचवला. आपल्या स्वयंपाकघरात गुप्तपणे सायक्लोस्टाईल मशीनवर पत्रके तयार करून रातोरात अंधाराचा आसरा घेऊन भिंतीवर, रस्त्यांवर सर्व ठिकाणी त्या ती चिकटवीत. सारे तुरुंग या भारतीय स्त्री-सत्याग्रहींनी भरून गेले. भारतीय चंडिकेचे हे उग्र रूप पाहून परदेशातील अनेक लोकांना प्रश्न पडला 'यांना अबला कसे म्हणायचे?' समाजसेवेच्या क्षेत्रात त्या पुढे होत्या. अस्पृश्यांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न अनेक महिलांनी केला. वस्त्राभूषणांचा त्याग करून त्या साधेपणाने जीवन व्यतीत करू लागल्या. धर्म, जातिभेदाचा संकुचितपणा त्या विसरल्या.

अद्‌भुत सामर्थ्याचा माणूस

अशा तऱ्हेने भारतीय स्त्रीजीवनाचे उन्नयन करण्यात महात्माजींना फार मोठे श्रेय आहे. स्त्रियांच्या व्यक्तित्वाला जखडून टाकणाऱ्या युगायुगाच्या बेड्या तुटल्या. महात्माजी दक्षिण आफ्रिकेतून परतल्यावर एका विशाल जाहीर सभेत श्री. गोपाळ कृष्ण गोखले म्हणाले, "सामान्य माणसातून महान व्यक्ती निर्माण करण्याचे, शहीद निर्माण करण्याचे, अद्‌भुत आत्मिक सामर्थ्य गांधीजींमध्ये आहे."

खरोखर गांधीजींच्या पूर्वी क्वचितच कुणा नेत्यात अशा प्रकारची शक्ती असेल. पुनश्च गांधीजींच्या जीवन-आदर्शांवर प्रकाश टाकून महिलांना आपल्या उच्च ध्येयाची आठवण करून देता येईल.

[illegible]
आणि वि.
१९१७
महिलांचे एक
उद्देशाने ब्रिटि
प्राप्त झाला,

राजकीय क्षेत्रातील भारतीय महिलांचे स्थान : कालचे आणि आजचे

स्वातंत्र्यसंग्रामात भारतीय स्त्रियांनी फार महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली होती. झाशीच्या राणी लक्ष्मीबाईपासून नेताजींच्या आझाद हिंद सेनेतील डॉ. लक्ष्मी स्वामिनाथन यांच्यापर्यंत अगणित महिलांनी स्वातंत्र्यवेदीवर बलिदान केले. विशेषत: महात्माजींच्या प्रेरणेने १९२० नंतर भारतीय वीरांगनांनी फार धैर्याने क्रांतियुद्धात उडी घेतली. धारासना येथील मिठाच्या सत्याग्रहातील २५ हजार लोकांचे नेतृत्व श्रीमती सरोजिनी नायडू यांनी केले.

स्वभावत: कोमल अशा महिलांना या भीषण संग्रामापासून दूर ठेवण्याचा खूप प्रयत्न झाला पण सर्व प्रकारच्या यातना सहन करायला त्या सिद्ध होत्या. रौलट कायद्यासारख्या पाशवी कायद्याविरुद्ध त्यांनी हस्ताक्षर मोहीम काढली. कापडाच्या दुकानावर आणि दारूच्या दुकानावर त्यांनी निरोधने केली. भल्या पहाटे- पासून मिरवणुका काढून सूर्याच्या पहिल्या किरणाबरोबर स्वातंत्र्याचा दिव्य [illegible]. त्यांनी घरोघरी पोचवला. गुप्तपणे बुलेटिन्स छापणे नि ती वाटणे ही का[illegible]गनी केली. स्वयंपाकघरात सायक्लोस्टायलिंग मशीन ठेवून ही सारी कामे त्या [illegible]चौदा

लाठीमार, गोळीबार, कारावास या सर्वांना हजारो स्त्रियांनी तोंड [illegible]हसत ७० वर्षांच्या वृद्ध मातंगिनी हाजरापासून १४ वर्षांच्या कनकलता किंवा [illegible]ग ह्या

यांसारख्या कोमल किशोरीही होत्या. म्हणून 'या अबला नव्हेत प्रबला आहेत' अशा प्रकारचा सन्मान त्यांना सहजगत्या प्राप्त झाला. तुरुंगात राहून चळवळीत भाग घेऊन त्यांच्या मनाचे क्षितिज विशाल बनले. त्यांच्या आचारविचारात स्वातंत्र्यसंग्रामामुळे आमूलाग्र परिवर्तन घडून आले.

परदेशी 'भारतीय' महिला

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा पाया स्त्रियांनी तसा दक्षिण आफ्रिकेतही घातला. गांधीजींच्या नेतृत्वाखाली तेथे त्यांनी आपल्या कामाला प्रारंभ केला. परदेशातून येऊन या देशाला आपली मातृभूमी मानणाऱ्या आणि भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या भगिनी म्हणजे श्रीमती ॲनी बेझंट, श्रीमती मार्गारेट नोबल्स [भगिनी निवेदिता] व श्रीमती मार्गारेट कझिन्स ह्या होत. श्रीमती ॲनी बेझंट यांनी होमरूल चळवळीत विशेष कामगिरी केली. त्यांनी 'न्यू इंडिया' नावाचे दैनिक व 'कॉमनविल' नावाचे साप्ताहिक संपादित केले. भारताच्या स्वातंत्र्यासाठी कारावासही सहन केला. त्यांनी व श्रीमती मार्गारेट कझिन्स यांनी भारतीय महिलांना मताधिकार मिळवून देण्यासाठी अविश्रांत परिश्रम केले.

मार्गारेट नोबल यांनी भारतीय जनतेचे शोषण कशा प्रकारे आणि किती प्रमाणात केले जाते याचे सत्य परदेशात जाऊन लोकांपुढे ठेवले, तर परदेशात वास्तव्य करून भारतीय स्वातंत्र्यासाठी जीवनाचे आणि मालमत्तेचे समर्पण करणाऱ्या भगिनी म्हणजे श्रीमती भिकाईजी कामा. परदेशात राहून त्यांनी अनेक गुप्त पत्रिका छापून प्रचार केला. देशोदेशी असलेल्या भारतीय क्रांतिकारकांच्या संघटनेला विपुल साह्य केले. १९०६ साली स्टुटगार्ट येथील संमेलनात युनियन जॅकऐवजी पहिल्याप्रथम भारताचा स्वतंत्र राष्ट्रध्वज फडकविणारी महिला म्हणजे भिकाईजी कामाच होय. देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी आपल्या जीविताचा आणि वित्ताचा अक्षरशः होमच केला.

१९१७ मध्ये श्रीमती सरोजिनी नायडूंच्या नेतृत्वाखाली १४ भारतीय महिलांचे एक शिष्टमंडळ भारतीय स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळवून देण्याच्या उद्देशाने ब्रिटिश पार्लमेंटसमोर गेले. १९२१ च्या कायद्याने हा अधिकार स्त्रियांना प्राप्त झाला, पण फारच मर्यादित प्रमाणात. ज्या स्त्रियांचे पती सुशिक्षित व

संपत्तीचे मालक असतील अशाच स्त्रियांना हा अधिकार मिळाला होता. स्वातंत्र्यानंतर हा अधिकार व्यापक करण्यात आला. घटनेच्या ३२६ व्या कलमानुसार प्रौढ मतदानाचा अधिकार स्त्रियांनाही प्राप्त झाला. भारतीय महिलांनी स्वातंत्र्य चळवळीत जी अमोल कामगिरी केली त्यामुळे त्यांना मताधिकार सहजगत्या प्राप्त झाला. श्रीमती नलमुल्थू राममूर्ती, ताराबेन प्रेमचंद, लक्ष्मी मेनन, राजकुमारी अमृत कौर इ. महिलांनी प्रौढ मताधिकाराची मागणी केली होती आणि स्वतंत्र मुस्लिम मतदारसंघांना विरोध केला होता.

मंत्रिपदे, उपाध्यक्षपदे सांभाळणाऱ्या महिला

१९२६ मध्ये प्रथमच मद्रास विधानसभेत प्रवेश करण्याचा मान महिलांना मिळाला. डॉ. मुथुलक्ष्मी रेड्डी मद्रास विधानसभेवर निवडून गेल्या. श्रीमती नेली सेनगुप्ता यांनी बंगाल विधानसभेचे उपाध्यक्षपद विभूषित केले. १९३६ च्या निवडणुकांनंतर श्रीमती अनसूयाबाई काळे यांना मध्यप्रदेश विधानसभेचे उपाध्यक्षपद देण्यात आले, तर श्रीमती सिपाहीमलानी यांना सिंध विधानसभेचे उपाध्यक्षपद प्राप्त झाले. श्रीमती रुक्मिणी लक्ष्मीपती मद्रास मंत्रिमंडळाच्या सभासद बनल्या. श्रीमती ज्योती वेंकटाचलम चक्रवर्ती राजगोपालाचारी मंत्रिमंडळातील एक मंत्री होत्या. श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांना उत्तर प्रदेश मंत्रिमंडळात स्थान मिळाले तर श्रीमती राधाबाई सुब्बरायन यांची गोलमेज परिषदेच्या सभासद म्हणून निवड झाली.

१९४२ मध्ये 'भारत छोडो' आंदोलनात स्त्रियांनी विशेष कामगिरी केली. क्रांतिदेवता श्रीमती अरुणा असफ अल्ली यांनी इतर नेत्यांच्या बरोबरीने मान मिळविला. त्या भूमिगत होत्या व अखेरपर्यंत त्या इंग्रजांच्या हाती लागल्या नाहीत. त्यांची प्रकृती फार खालावली होती म्हणून गांधीजींनी त्यांना पोलिसांच्या स्वाधीन व्हायला सांगितले, आणि ५ हजाराचे बक्षीस हरिजन कार्यास देण्यास सांगितले. परंतु त्यांनी तो सल्ला मानला नाही. डॉ. उषा मेहता या डॉ. लोहियांच्या नेतृत्वाखाली भूमिगत आकाशवाणी केंद्र मोठ्या कौशल्याने चालवत होत्या.

सशस्त्र क्रांतिमार्गावरही अनेक महिलांनी कार्य केले. विशेषत: बंगाल व पंजाबमधील महिलांचा त्या मार्गावर विशेष विश्वास होता. ह्या संदर्भात बीना दास, कल्पना दत्त, प्रतिलता बड्डेदार ह्या नारीरत्नांचा उल्लेख करता येईल. त्यांचाही

त्याग महान होता. स्वातंत्र्य-संग्रामानंतर १९४६ मध्ये घटना समितीची स्थापना झाली. तीवर श्रीमती सरोजिनी नायडू, दुर्गाबाई देशमुख, रेणुका रे, हंसा मेहता इ. ची निवड झाली. भारतीय घटनेच्या निर्मितीत या विदुषींचा विशेष वाटा होता.

फाळणीच्या अग्निकुंडातही कार्य चालूच

भारत १९४७ साली स्वतंत्र झाला पण तो फाळणीच्या आगीत जळत होता. सर्वत्र रक्ताच्या नद्या वाहात होत्या. नौखालीत जे हिंसेचे अग्निकुंड धगधगत होते ते विझवून अपहृत महिलांच्या मुक्ततेचे कार्य करण्यासाठी गांधीजींबरोबर श्रीमती सुचेता कृपलानी आणि डॉ. सुशीला नायर यांसारख्या भगिनी कटिबद्ध झाल्या. उत्तरेकडे श्रीमती मृदुलाबेन साराभाई यांनी मोठ्या धैर्याने अपहृत महिलांच्या पुनर्वसनाचे कार्य केले. श्रीमती रामेश्वरी नेहरू, कमलादेवी चट्टोपाध्याय, किट्टी शिवराव, अचम्मा मथाई इ. महिलांनी आपल्या दुर्दैवी भगिनींना नवजीवन प्रदान करण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली.

अशा रीतीने स्वातंत्र्यपूर्व काळात ज्यांनी आपल्या कर्तृत्वाची परिसीमा दाखविली त्यांचे स्वातंत्र्योत्तर काळात राजकारणात काय स्थान होते ? स्वातंत्र्य-प्राप्तीसाठी त्यांनी महान बलिदान केले. आता राजकीय रंगभूमीवर त्यांची भूमिका कोणती हा प्रश्न निर्माण होतो.

१९५० मध्ये घटनेच्या ३२६ व्या कलमानुसार प्रौढ मताधिकार सर्वांना प्राप्त झाला. ३२५ व्या कलमाने जाती, धर्म इ. वर आधारलेले स्वतंत्र मतदारसंघ रद्द करण्यात आले. त्यानंतर प्रांतिक व केंद्रीय मंत्रिमंडळांत महिलांनी फार मोठ्या जबाबदारीच्या जागा संभाळल्या. परदेशातील महिलांच्या मानाने भारतीय स्त्रियांना ही संधी फार लवकर मिळाली असे विधान आपल्याला निःसंकोचपणे करता येईल. श्रीमती सुचेता कृपलानी यांनी उत्तर प्रदेशसारख्या प्रचंड प्रांताचे मुख्य-मंत्रिपद मोठ्या कौशल्याने संभाळले. कालपरवापर्यंत ओरिसाचे मुख्यमंत्रिपद श्रीमती नंदिनी सत्पथींकडे होते, तर पित्याच्या निधनानंतर गोव्याचे मुख्यमंत्रि-पद शशिकला काकोडकर यांना मिळाले आहे.

साऱ्या देशाची सूत्रे महिलेच्या हाती

केंद्रीय मंत्रिमंडळात प्रथम स्थान मिळाले ते श्रीमती राजकुमारी अमृत कौर यांना. त्यांनी आरोग्यमंत्री म्हणून काम केले. त्यानंतर काही वर्षे डॉ. सुशिला नायर ह्या आरोग्यमंत्री म्हणून काम पाहात होत्या. डॉ. सरोजिनी महिषी, नंदिनी सत्पथी, तारकेश्वरी सिन्हा, सुशिला रोहतगी, श्रीमती चंद्रशेखर, डॉ. फुलरेणू गुहा, जहानारा जयपालसिंग इ. महिलांनी भिन्नभिन्न मंत्रालयाचे काम संभाळले. श्रीमती लक्ष्मी मेनन ह्यांनी संसदीय पक्षाच्या चिटणीस म्हणून काम केले आणि पंडित नेहरूंच्या मार्गदर्शनाखाली परराष्ट्रखात्याचा कारभार संभाळला. राज्यसभेचे उपाध्यक्षपद श्रीमती व्हायलेट आल्वा यांच्याकडे होते आणि १९६६ नंतर तर श्रीमती इंदिरा गांधी देशाच्या पंतप्रधान झाल्या व साऱ्या देशाची सूत्रे त्यांच्या हाती एकवटली.

श्रीमती सरोजिनी नायडू उत्तर प्रदेशच्या व त्यांच्या कन्या पद्मजा नायडू बंगालच्या १० वर्षे राज्यपाल बनल्या. श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांनी महाराष्ट्र राज्याचे राज्यपालपद ५ वर्षे सांभाळले. ब्रिटनमध्ये हायकमिशनर म्हणून काम केले, तर मॉस्को व वॉशिंग्टन येथे राजदूताची कामगिरी पार पाडली. संयुक्त राष्ट्रसंघाच्या अध्यक्षपदी विराजमान होण्याचा मान मिळविणाऱ्या त्या एकमेव महिला होत.

सार्वजनिक चळवळींतील महिलांचे स्थान

स्त्रियांच्या खास पक्षाखेरीज भिन्न भिन्न राजकीय पक्षांतील महिलांचे स्थान खालील प्रकारे आहे. अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे अध्यक्षपद ४ महिलांनी विभूषित केले. १९१७ मध्ये ॲनी बेझंट, १९२५ मध्ये श्रीमती सरोजिनी नायडू, १९३० मध्ये श्रीमती नेली सेनगुप्ता व १९५९ मध्ये श्रीमती इंदिरा गांधी यांना अध्यक्षपदी निवडण्यात आले. श्रीमती चंद्रशेखर या अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या चिटणीस होत्या. स्वतंत्र पार्टी व भारतीय जनसंघात अनुक्रमे राजमाता जयपूर–गायत्रीदेवी व राजमाता ग्वाल्हेर–विजयाराजे शिंदे यांचे स्थान फार उच्च होते. समाजवादी पक्षात श्रीमती मृणाल गोरे यांचे स्थान फार मोठे आहे. श्रीमती प्रमिला दंडवते तर अखिल भारतीय समाजवादी पक्षाच्या सहचिटणीसच होत्या. उजव्या कम्युनिस्ट पक्षातील सभासदांपैकी ५% सभासद महिला आहेत. ह्या पक्षाच्या नॅशनल कौन्सिलच्या ११० सदस्यांपैकी ४ महिला सभासद आहेत. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात १% महिला सभासद आहेत. संघटना काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या २८ सभासदांपैकी २ महिला सभासद आहेत. महाराणी पतियाळा या पक्षाच्या चिटणीस आहेत. भारतीय जनसंघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीवर ५ महिला सभासद आहेत. समाजवादी पक्षाने स्त्रियांच्या मागण्यांचे

एक पत्रकच प्रकाशित केले आहे. त्यात मोफत शिक्षण, अर्धवेळ व्यवसाय, धंदेशिक्षण, समान नागरिक अधिकार, हुंडाबंदी, स्त्रियांना संघटनेत अथवा निवडणुकीत विशेष संधी अशा मागण्या समाविष्ट केलेल्या आहेत.

स्त्री-मतदार उदासीन ?

१९५० मध्ये स्त्रियांना मताधिकार प्राप्त झाला खरा पण त्या अधिकाराच्या उपयोगाबाबत त्यांनी कितपत जागरुकता दाखविली ? गेल्या काही निवडणुकांची आकडेवारी पाहून आपल्याला काही निष्कर्ष काढता येतील.

स्त्री-पुरुषांच्या मतदानाचा एक तक्ता

साल	एकूण पुरुष मतदारांपैकी टक्के मतदान	एकूण महिला मतदारांपैकी टक्के मतदान
१९५७	५५.८%	३८.८%
१९६२	६२.२%	४६.६%
१९६७	६६.७%	५५.५%
१९७१	६१.०%	४९.२%

लोकसभा, राज्यसभा, प्रांतिक विधिमंडळे, केंद्रीय मंत्रिमंडळ व प्रांतिक मंत्रिमंडळांतील स्त्रियांची संख्या.

निवडणुकीचे वर्ष	केंद्रीय मंत्रिमंडळ	प्रांतिक मंत्रिमंडळे	लोकसभा सदस्य
१९५२	३	५	२३
१९५७	३	१२	२७
१९६२	५	२१	३४
१९६७	५	१०	३१
१९७१	३	१८	२२
	राज्यसभा	विधिमंडळ	एकूण संख्या
१९५२	१४	९८	१३४
१९५७	८	१९६	२४६
१९६२	१२	१७३	२४५
१९६७	२०	१३४	२००
१९७१	९	१६४	२१६

१९७१मधील लोकसभा निवडणुकीतील पुरुष व स्त्री मतदारांची राज्यवार टक्केवारी.

राज्य	एकूण पुरुष-मतदारांतील मतदानाची टक्केवारी	एकूण स्त्री-मतदारांतील मतदानाची टक्केवारी
आंध्रप्रदेश	६४.४	५४.७
आसाम	५८.४	४१.६
बिहार	६०.०	३७.०
गुजरात	६०.६	५०.२
हरियाणा	६७.८	६०.५
हिमाचल प्रदेश	४८.४	३३.४
जम्मू-काश्मीर	६७.६	४६.६
केरळ	६५.८	६३.३
मध्य प्रदेश	५८.२	३७.६
महाराष्ट्र	६३.५	५६.१
म्हैसूर	६१.७	५२.७
नागालँड	५६.८	५०.४
ओरिसा	५१.८	३३.७
पंजाब	६३.४	५५.९
राजस्थान	६०.१	४७.५
तामिळनाडू	७४.५	६९.२
उत्तर प्रदेश	५२.२	३८.८
प. बंगाल	६४.८	५८.७
अंदमान निकोबार	६९.७	७२.३
चंदीगढ	६२.८	६३.१
दिल्ली	६६.८	६३.३
दादरानगरहवेली	७१.५	६८.१
गोवा-दमण-दीव	५७.०	५४.९
मणिपूर	५३.४	४३.६
पाँडिचरी	७१.९	६८.३
त्रिपुरा	६५.०	५५.९

गेल्या ९ वर्षांतील मतदानात खालीलप्रमाणे कपात झालेली आहे.

पुरुष-मतदार	१५.४%
स्त्री-मतदार	११.८%

गेल्या सार्वत्रिक निवडणुकांवरून आपण एक निष्कर्ष काढू शकतो. १९७१ च्या निवडणुकीत महिलांनी १७% जागांवर निवडणूक लढविली, पण त्यांना फक्त ४% जागा मिळाल्या. महिला उमेदवारांची सर्वांत जास्त संख्या उत्तर प्रदेश, बिहार व मध्य प्रदेश यांमध्ये होती. वस्तुतः तेथे स्त्री-मतदारांचे प्रमाण कमी आहे. पंजाबमध्ये महिला उमेदवारांची संख्या कमी आहे. पण मतदानाचे प्रमाण मात्र पुरुषांपेक्षा जास्त आहे. ओरिसा, बिहार, मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश येथे महिलांमध्ये मतदानाचे प्रमाण कमी आहे, कारण शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक जीवनातील त्यांचे मागासलेपण. साक्षरतेचे प्रमाण जेथे जास्त आहे तेथे मतदानाचे प्रामाणही जास्त आहे. पण हे प्रमाण आर्थिकदृष्ट्या उच्च स्तरावर अवलंबून नाही.

राजकीय पक्षच पक्षपाती

केरळ आणि महाराष्ट्रातील स्त्री-उमेदवारांची संख्या हळूहळू वाढत गेली, परंतु पश्चिम बंगालमध्ये मात्र १९७१ च्या निवडणुकीत महिला उमेदवारांची संख्या अचानक वाढली. कर्नाटक राज्यात एकही महिला उमेदवार निवडणुकीच्या रंगणात उतरली नाही. मणिपूर, आंध्र, तामिळनाडू, म्हैसूर, ओरिसा येथील महिलांनी स्त्री-उमेदवारांना संधी न दिल्याबद्दल राजकीय पक्षांवर टीका केलेली आहे. त्यांचे म्हणणे महिलांमध्ये उत्साहाची कमतरता नव्हती. परंतु राजकीय पक्षांचे औदासीन्यच त्याला कारणीभूत होते.

प्रत्येक निवडणुकीतील स्त्रियांची प्रतिक्रिया पाहून असे वाटते की, घटनेने दिलेल्या राजकीय अधिकारांचा त्या वापर करीत आहेत. साक्षरतेचा प्रसार झाल्यावर त्या राजकारणात जास्त रस घेऊ लागतील असे म्हणता येईल. नव्या उमेदवार महिला राजकारणात येत आहेत आणि जुन्या राजकारणातून निवृत्त होत आहेत, याचे प्रमुख कारण त्यांचा भ्रमनिरास होय. मुस्लिम व आदिवासी भगिनी उमेदवार आणि मतदार या दोन्ही स्वरूपांत फार कमी प्रमाणात आहेत. त्रिपुरा, मेघालय, बस्तर इ. भागांत शिक्षणाचे प्रमाण कमी असूनदेखील तेथील

महिलावर्ग निवडणुकीत खूप रस घेतो.

मागासलेल्या वर्गातील स्त्रिया राजकारणात जास्त रस घेतात. मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, त्रिपुरा, इ. मधील मुस्लिम आणि आदिवासी महिलांना निवडणुकांची खूप आवड आहे. गुप्त व स्वतंत्र मतदानाबाबत त्यांच्यात चांगलीच जागरुकता दिसून येते. त्यांची अशी तक्रार आहे की, बहुतेक राजकीय पक्षांनी त्यांना योग्य मार्गदर्शन केलेले नाही. शहरी–ग्रामीण असा भेदभाव नाही. परंतु शहरातील मध्यमवर्गीय महिला मतदानात विशेष भाग घेत नाहीत. उमेदवार महिला आर्थिक दृष्ट्या संपन्न कुटुंबातील, काही राजकुटुंबातील आहेत. सुशिक्षित आणि राजकीय कुटुंबात वाढलेल्या स्त्रिया अधिक जागरूक असतात. काही नव्या दमाच्या स्त्रिया राजकीय क्षेत्रात प्रवेश करीत आहेत.

स्त्रियांतील अनौत्सुक्य

सर्वसाधारणपणे राजकारणात भाग घ्यायला स्त्रिया फारशा उत्सुक नसतात. याचे कारण निवडणुका फार खर्चाच्या होत आहेत. हिंसेचे तांडवनृत्य वाढत आहे. चारित्र्यहननाचा धोका पत्करायलाही त्या तयार नाहीत.

प्रत्येक राज्यातील जागृतीचे प्रमाण बदलते आहे. तेथील वातावरणावर, राजकीय पक्षांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोणावर तसेच शिक्षणाच्या प्रभावावर ते अवलंबून आहे. शिक्षणाने राजकीय जागृती येऊ शकेल, परंतु राजकारणात प्रत्यक्ष भाग घेणे त्यावर अवलंबून नाही. नोकरी किंवा व्यवसायात असलेल्या स्त्रियांमध्ये जागृती असूनही प्रत्यक्ष भाग घ्यायला त्यांची तयारी नाही. यद्यपि बहुतांश उमेदवार धनिकवर्गातले असले तरी धनिकवर्गात निवडणुकीबाबत एकूण औदासीन्यच आढळून येते. पुरुषवर्गाचे मतदानावर दडपण कमी आहे, परंतु खेडोपाडी वडिलधाऱ्या माणसांचा प्रभाव असतोच.

महिलांचे लक्ष मुख्यतः स्वतःच्या जीवनाशी निगडित दैनंदिन प्रश्नांवर केंद्रित झालेले असते. उदा. महागाई, टंचाई, भेसळ, बेकारी, गरिबी इ. ज्वलंत प्रश्नांवर चळवळ करायला त्या तयार असतात. म्हणूनच श्रीमती मृणाल गोरे महागाईविरुद्ध एवढे प्रचंड आंदोलन उभे करू शकल्या. राजकीय, आर्थिक आणि सामाजिक प्रश्नांचे एकत्रीकरण केल्यानंतरच स्त्रिया राजकारणात अधिक सक्रिय होतील.

आज भारतीय स्त्रिया कामगार, किसान, आदिवासी, ट्रेड युनियन्स इ. संघटनांत कामे करतात. त्यातील काही महत्त्वपूर्ण महिलांचे कार्यक्षेत्र पुढील-प्रमाणे आहे—

कामगार संघटनांत श्रीमती मणिबेन कारा, श्रीमती पार्वती कृष्णन, श्रीमती इला भट, श्रीमती मणिबेन पटेल इ.नावे प्रसिद्ध आहेत. श्रीमती गोदाराणी परुळेकरांनी डहाणू-उंबरगाव इ. भागातील आदिवासींमध्ये जागृतीचे कार्य केले ते अतुलनीय आहे. श्रीमती इंदुमती केळकर यांनी ग्रामीण भागात जागृतीसाठी अपार परिश्रम केले. सौंदरम रामचंद्रन यांनी दक्षिणेच्या ग्रामीण भागात तर श्रीमती सरला भदोरिया यांनी उत्तरेकडील ग्रामीण भागात महत्त्वाचे कार्य केले.

कामगार–किसान संघटनांखेरीज आणखी काही क्षेत्रांतील स्त्रियांचे उल्लेखनीय कार्य म्हणजे श्रीमती कमलादेवी चट्टोपाध्याय यांनी कुटिरोद्योगांची सुस्थापना केली. श्रीमती धनवंती रामराव आणि शकुंतला परांजपे यांनी कुटुंब नियोजनाच्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय ख्याती मिळविली आहे. श्रीमती लीला मुळगावकर मुंबईच्या भूतपूर्व शेरीफ यांनी रक्तदानाच्या क्षेत्रात मानवतेच्या सेवाभावनेने प्रेरित होऊन कार्य कार्य केले. मुंबईच्या सध्याच्या शेरीफ डॉ.अंजना मगर यांनी अनाथ बालकांसाठी बालनगरीच्या उभारणीत बरेच लक्ष घातले आहे. श्रीमती अरुणा असफ अली यांना दिल्लीचे नगराध्यक्षपद व तारा चेरियन यांना मद्रासचे नगराध्यक्षपद लाभले होते. आर्थिक नियोजनाच्या क्षेत्रातील आपल्या कामगिरीने श्रीमती दुर्गाबाई देशमुख यांनी आपले नाव अधिकच उज्ज्वल केले आहे. ही यादी बरीच लांबवता येईल.

महिला हिताचे कायदे

गेल्या काही वर्षांत महिलांच्या कल्याणासाठी अनेक कायदे करण्यात आले होते. महिलांच्या वारसा हक्कात सुधारणा करण्यासाठी मिताक्षरा व दायभाग पद्धतीतील दोष काढून टाकण्यासाठी वेळोवेळी अनेक कायदे करण्यात आले होते. बाल-विवाह प्रतिबंधक कायदा झाला. विवाहाची वयोमर्यादा वाढविण्याचा कायदा झाला. स्पेशल मॅरेज ॲक्टने आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहांना मान्यता देण्यात आली तर जाचक विवाहबंधनांतून सुटका करण्यासाठी घटस्फोटाचा कायदा झाला आणि गर्भपाताला कायदेशीर मान्यताही मिळाली. हुंड्यालाही

कायद्याने प्रतिबंध केला आहे.

अशा प्रकारे भारतीय महिलाजीवनात प्रकाश आणण्याचा कायद्याने प्रयत्न झाला असला, राजकीय क्षेत्रात काही महिलांनी उच्च पदे मिळविली असली तरी वस्तुस्थिती अशी आहे की, बहुसंख्य महिलांचे जीवन आजही रूढीच्या शृंखलांनी जखडलेले आहे. तरीदेखील ज्या ज्या वेळी देशाची हाक येते त्या त्या वेळी सारे प्रापंचिक मोहपाश तोडून घरांचा उंबरठा ओलांडून त्या मैदानात उतरतात. उदा. गोव्याच्या आंदोलनाच्या वेळी सुधाताई जोशी, सिंधू देशपांडे, मित्रा काकोडकर, सहोदरादेवी इ. भगिनींनी तेजस्वी कामगिरी करून दाखविली. भारतीय स्त्री वात्सल्याने कुटुंबाचे संगोपन करते पण वेळ येताच ही शांतादुर्गा बनते असे तिचे वैशिष्ट्य आहे.

तेजस्विनी बा–मानवतेची स्नेहल ज्योत

बिहारमधील ही गोष्ट. एक मिलिटरीचा ट्रक भरधाव वेगाने पाटण्याहून डाल्टनगंजच्या दिशेने निघाला होता. एका छोट्याशा खेड्याजवळ तो थांबला. त्यातून संगीनधारी जवान बाहेर पडले. आणि...आणि...गावकऱ्यांचा डोळ्यावर विश्वास बसेना. त्या ट्रकमधून काही म्हाताऱ्या तर काही तरुण स्त्रिया खाली उतरल्या. हे दृश्य पाहून गावकऱ्यांची तर बोबडीच वळली. बातमी वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली. मिलिटरीचे जवान काही बायकांना पळवून नेत आहेत. सारा गाव आणि आजूबाजूच्या शेतात काम करणारी मंडळी हातातले काम जिथल्या तिथे टाकून त्या दिशेनं धावत सुटली. जवानांच्या हातातील बंदुका पाहून त्यांच्याशी बोलण्याची कुणाची छातीच होईना. जेमतेम एका वृद्धानं धीर करून एका वृद्ध महिलेला विचारले, 'तुमच्यावर फार मोठं संकट गुदरलेलं दिसतंय! बोला, आम्ही तुम्हाला काय मदत करू?' एक वृद्ध स्त्री चकित होऊन म्हणाली, 'कसलं संकट?' 'हे मिलिटरीचे लोक तुम्हाला पळवून नेताहेत. सांगा, कसं सोडवू आम्ही तुम्हाला या संकटातून?' तेव्हा त्या आश्चर्यचकित झाल्या व हसून म्हणाल्या, 'छे! छे! हे लोक आम्हाला पळवून थोडेच नेताहेत! उलट आम्हाला मदत करताहेत. आम्ही दुष्काळी भागात काम

करायला आलो आहोत मुंबईहून. आतल्या भागात जायला वाहन मिळणं कठीण. धान्यवाटप करायला वेळेवर पोचायला हवं. लोक उपाशी आहेत. त्यामुळे या धान्याच्या ट्रकमधूनच आम्ही निघालो आहोत.' हे ऐकून गावकऱ्यांनी सुटकेचा नि:श्वास टाकला आणि ते निश्चिंत मनाने परतले.

नेहमी लोकांचे दु:ख दूर करायला कंबर कसून तयार असलेल्या या बा म्हणजेच श्रीमती मणिबेन नानावटी. बिहारच्या भयंकर दुष्काळात आपल्या सहकारी भगिनींसमवेत चालल्या होत्या.

ओरिसातील प्रसंग

दुसरा एक प्रसंग ओरिसातला. तिथे प्रचंड चक्री वादळ आलेले. बावीस फूट उंचीच्या लाटा उसळलेल्या. गावकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले. पूर्वी बा रविशंकर महाराजांबरोबर कामाला गेल्या होत्या. सर्वोदय मंडळातल्या रमादेवी चौधरींच्या संस्थेत राहून त्यांनी ३५०० झोपड्या बांधून घेतल्या. आपल्या अंगच्या उपजत कौशल्यामुळे बा स्वत:च बनल्या स्थापत्यविशारद ! मुंबई उपनगर रिलीफ फंडातर्फे खूप मदत केली त्यांनी. दरवर्षी कामाला त्या तिथे जातात. १९८२ मध्ये त्या तिथे गेल्या असताना गावकरी त्यांना म्हणाले, 'महानदीवर मोठं धरण झालं खरं पण आम्हाला त्याचा काही उपयोग नाही. आमच्या गावापर्यंत छोट्याशा कालव्यानं पाणी पोचवायला हवं. तेव्हा आमची शेती पिकेल.' बा म्हणाल्या, 'किती लांबीचा कालवा लागेल !' गावकरी म्हणाले, 'राजनगर ब्लॉकमध्ये २२ किलोमीटर लांबीचा.' 'मग त्याला खर्च किती येईल.' बांनी विचारले. एका किलोमीटर लांबीला दहा हजार रुपये. एकूण बांधकाला खर्च बराच येणार होता. सरकारकडून पाच लाखांपैकी फक्त दोन लाख रुपये आले होते. उरलेला पैसा कसा उभारायचा ? गावकरी बांकडे आशेने पाहात होते. ते डोळ्यांत पाणी आणून त्यांची करुणा भाकत होते. बा म्हणाल्या, 'आपण प्रयत्न करू या. जसजसा पैसा मिळेल तसतसा कालवा बांधूया.'

बा मुंबईला आल्या. आपल्या इष्टमित्रांना भेटल्या. बांना दिलेला पैसा कधी वाया जायचा नाही. एक पैसा अनाठायी खर्च व्हायचा नाही हा लोकांचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास. कारण बा कुठेही कामाला गेल्या तरी प्रवासखर्च स्वत:च्या पदरचा खर्च करणार. खाण्याचा भार कुणावर टाकणार नाहीत. पैन्‌पैचा हिशोब

चोख. हळूहळू धनिक मंडळी पैसा देऊ लागली. एका मित्राने आदल्या दिवशी संध्याकाळी १० हजार रुपये द्यायचे कबूल केले अन् दुसऱ्या दिवशी सकाळी त्याने आणून दिले ५० हजार रुपये. रात्री त्याला जणू परमेश्वरानेच प्रेरणा दिली. हळूहळू कालव्याचे काम पूर्ण होत होते. कटकपासून ७७ किलोमीटर अंतरावर हा कालवा होता.

आनंदाचा सोहळा

एका वर्षानंतर बा या भागाला भेट देणार होत्या. महानदी पार करून बा आल्या. पाहतात तो गावाचा कायाकल्प झालेला. त्या दरिद्री भागाचे रंगरूप पार बदलून गेले होते. एका वर्षात तिथली शेतीवाडी पिकली होती. घरेदारे सावरली होती. पोराबाळांच्या चेहऱ्यावर आनंद विलसत होता. गावात उत्सवाचे वातावरण पसरलेले होते. आज कोणत्या देवीचा उत्सव? पताकांनी गाव शृंगारलेले होते. मंगलवाद्यांचा गजर चालू होता.

हा होता बांच्या स्वागताचा उत्सव. ज्या वृद्धेने शेकडो मैलांवरून येऊन त्यांना साद्य केले होते, त्यांच्या जीवनात आनंदीआनंद निर्माण केला होता, त्यांच्याबद्दलच्या कृतज्ञतेचा हा सोहळा होता. उलट बा श्रेय देत होत्या इतरांना—धनिक दात्यांच्या दानशूरपणाला, सरकारी नोकरांच्या कर्तव्यतत्परतेला व गावकऱ्यांच्या सहकार्याला.

अशा या स्नेहमयी बा. आजच्या अंधश्रद्धेच्या, नैराश्याच्या युगातही त्यांचे जीवन पाहिले की वाटते ८० व्या वर्षी ही वृद्ध महिला किती तडफेने, उत्साहाने काम करते आहे! भारताच्या कुठल्याही प्रांतात दुष्काळ पडो, महापूर येवो, भूकंप होवो या साऱ्या नैसर्गिक आपत्तींच्या वेळी बा आणि त्यांचे सहकारी गाजावाजा न करता, शांतपणे शिस्तबद्ध रीतीने काम करत असतात. सारे काही योजना आखून चालते. बांना गलथानपणा खपणार नाही. उधळमाधळ चालणार नाही. लोकांनी जनतेच्या सेवेसाठी दिलेला पैसा त्याच कामासाठी वापरायला हवा.

बांचा जन्म २८ फेब्रुवारी १९०५ रोजी गुजरातमधील डेरोल गावी झाला. अहमदाबादजवळच्या विजापूरसमीप असलेले हे छोटेसे गाव. बांचे वडील होते मोत्यांचे व्यापारी. त्या काळी त्यांचा फ्रान्सबरोबर व्यापार चाले. अतिशय सधन,

उदार असे हे संयुक्त कुटुंब. बा जेमतेम ३-४ वर्षांच्या आसताना मातृसुखाला आचवल्या. त्यानंतर जनरीतीप्रमाणे वडिलांनी दुसरा विवाह केला, पण १९१८च्या मानमोडीच्या (एन्फ्लुएंझाच्या) साथीत कुटुंबातील ९ माणसे एकापाठोपाठ मृत्यू पावली. बांचे पितृछत्र नाहीसे झाले. नवी आईही गेली आणि छोट्याशा सावत्र बहिणीची–कांताची त्यांनाच आई व्हावे लागले. कुटुंबात आता काकाच कर्तेधर्ते होते. त्या काळी मुलींना शिक्षण कुठले? फक्त गुजराथी तिसऱ्या इयत्तेपर्यंत बांचे शिक्षण झाले. नंतर शिक्षणाला पूर्णविराम. वयाच्या अठराव्या वर्षी या रूपवती तरुणीचा विवाह चंदुलाल बाळाभाई नानावटी यांच्याशी झाला. ते विधूर होते. त्यांना एक मुलगी होती. पहिल्या पत्नीच्या मृत्यूनंतर सात वर्षांनी ते पुन्हा विवाहबद्ध झाले. त्यांचाही कोळशाचा मोठा व्यापार होता.

कायदेभंगाची चळवळ

बडोद्याचे हे मोठे सधन प्रतिष्ठित कुटुंब. त्या काळात त्यांचा सिलोनबरोबर व्यापार होता. बा आणि त्यांचे पती व्यापारानिमित्त सिलोनला गेले असताना गांधीजींची कायदेभंगाची चळवळ सुरू झाली. तेव्हा ते मुंबईला परत आले. कलकत्त्याच्या परमानंद कापडिया नावाच्या मित्रामुळे त्यांचा काँग्रेसशी घनिष्ठ संबंध आला. चंदुलालजींना म्हणत भाई. भाई प्रत्येक अधिवेशनात भाग घेऊ लागले. गांधीजींपासून साऱ्या नेत्यांचा मुक्काम त्यांच्या घरी असे. अनेक कार्यकर्ते, सत्याग्रही हे आपलेच घर मानत. वेळी बांना १००-२०० माणसांसाठी स्वयंपाक करावा लागे. हाताखाली एखादा नोकर असे.

गांधीजींनी पार्ले येथे एक केंद्र स्थापन केले होते. दिलखुषभाई दिवाण यांच्या मार्गदर्शनाखाली तेथे पिंजणे, सूत कातणे, हातमाग चालवणे ही सारी कामे होत. गांधीजींचा निकट सहवास, भोवतालचे स्फूर्तिदायक वातावरण, भाईंचा आदर्शवाद या साऱ्यांचा परिणाम ह्यांच्या संवेदनाक्षम मनावर झाल्याशिवाय कसा राहणार? बादेखील सत्याग्रहात सामील झाल्या. बांना एका वर्षाची शिक्षा झाली त्यांना ठाण्याच्या तुरुंगात ठेवण्यात आले. बा होत्या 'ब' वर्गाच्या कैदी. त्यांना चांगले जेवण मिळे, पण एकट्याने असं चांगलं खाणं बांना रुचत नसे. त्या म्हणत, अपराध म्हटला तर आमचा सारखाच, मग शिक्षाही सारखीच हवी. असा भेदभाव कशाला? त्या आपले जेवण इतरांबरोबर वाटून खात. 'क'

वर्गाचे कदन्न त्यांच्याबरोबर खात.

खादीचा प्रचार

गांधीजींच्या प्रत्येक कार्यक्रमात बा मनापासून भाग घेत. दारूच्या गुत्त्यावर निरोधन करणे, परदेशी कापडावर बहिष्कार घालणे, त्यासाठी मिरवणुका, प्रभातफेऱ्या काढणे या सर्व उद्योगात बांचा पुढाकार असे. १९३४ मध्ये त्यांनी पार्ल्यात एक खादी मंदिर सुरू केले. महिलांनी चालविलेले हे पहिले खादी केंद्र. 'जे कातें ते पेहरे' हा गांधीजींचा संदेश बांनी आपल्या जीवनात सहीसही उतरवला. आजही बा स्वतः कातलेल्या सुताची पांढरी शुभ्र वस्त्रे परिधान करतात. दिवसाकाठी रोज त्या ३-४ तास सूतकताई करतातच. त्यांनी खादी उत्पादनाचे कार्य गावोगावी सुरू केले. नवसारीजवळ कराडी गावी अजून हे कार्य चालते. आजही बा मुंबईतील खादी ग्रामोद्योग केंद्राचे काम पाहतात. वयाच्या ८०व्या वर्षीदेखील रोज दुपारी त्या विलेपार्ल्याहून लोकलच्या दुसऱ्या वर्गाने चर्चगेटला जातात. तेथून पायी खादीभांडार गाठतात व तिथला कारभार पाहतात. वर्षाला दोन कोटींची उलाढाल चालते. बा न चुकता दोनतीन तास खादी भांडारात जाऊन कामे करतात.

आश्रमशाळा

बांनी आदिवासी भागात आश्रमशाळांचे जाळे विणले आहे. सुरत जिल्ह्यात बार्डोलीजवळ मढी कन्याशाळा आहे. बेडछी, डुंगरा इत्यादी अनेक ठिकाणी या आश्रमशाळा आहेत. त्यातून या आदिवासी मंडळींना शिक्षण देणे, संस्कार देणे, अन्न-वस्त्र-निवाऱ्याची सोय करणे हे सारे कार्य करण्यात येते. आता सरकार आश्रमशाळांतील अन्नाची सोय करते. पण पैसे कमी पडले तर चंदनवाडी ट्रस्टमधून पैसे वापरण्यात येतात. बलसाड जिल्ह्यातील धरमपूर तालुक्यात बाबरखडक येथेही एक आश्रमशाळा बा चालवतात.

अविरत उद्योग

अशा प्रकारे बा अविरत उद्योगात मग्न असतात. बसल्याबसल्या हाताने सतत त्यांचे शिवणकाम चालू असते. कापडाचे तुकडे जोडून त्या सुबक गोधड्या बनवतात. लहान मुलांसाठी कपडे तयार करतात आणि आदिवासी भागात

जाताना ते बरोबर घेऊन जातात. दुष्काळी भागात नेऊन हे कपडे वाटतात. त्या मुलांच्या तोंडावरचा ओसंडून वाहणारा आनंद ही त्यांच्या श्रमांची पावती. वयाचा त्यांच्या कर्तृत्वावर काही परिणाम झालेला नाही. कारण त्यांचे जीवन अगदी साधे, संयमित, व्रतस्थ आहे. दीन-दु:खितांचे अश्रू पुसण्याचे त्यांचे व्रत अखंड चालू आहे.

१९३९ मध्ये चंदुलालभाई आजारी असल्याने उपचार करण्यासाठी त्यांना स्वित्झर्लंडला नेले. बाही त्यांच्यासमवेत गेल्या होत्या. मातृविहीन इंदिरा गांधी त्या काळात बांजवळ राहात. बा त्यांची प्रेमाने काळजी घेत. छोटी इंदिराही त्यांना फार मानत असे. पुढे इंदिरा गांधी भारताच्या पंतप्रधान झाल्या. पण या ओळखीचा बांनी कधीच फायदा घेतला नाही वा दुरुपयोग केला नाही. दुसऱ्या महायुद्धामुळे भाई व बा यांना १९४०च्या जून महिन्यात हिंदुस्थानात परत यावे लागले. त्यानंतर अवघ्या सहा महिन्यांत भाई हे जग सोडून गेले. या अंधश्रद्धेच्या, स्वार्थांधतेच्या, सत्तापिपासेच्या युगात बांसारखी तपस्विनी आपल्या सात्त्विक मंगल अशा व्यक्तिमत्त्वामुळे इतरांना प्रेरणादायी ठरेल, स्फूर्तिदायक ठरेल. बा म्हणजे भारतातली दुसरी मदर टेरेसाच !


मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
3252
दि. क्र. २५०६५
२७/१२/८८
ग्रंथ : शाखा (स्थळ प्रत)

स्त्री-स्वातंत्र्य !

४० वर्षांपूर्वी १५ ऑगस्टला प्रत्येक जागृत भारतीय नागरिक हर्षाने उमलून गेला होता. कित्येक वर्षांनी स्वप्नांची पूर्ती होत होती. तपस्या फळाला येत होती. स्वातंत्र्यलढ्यातील भारतीय महिलेचा वाटा फार मोठा होता. अबला वाटणाऱ्या ह्या स्त्रीने जे चमत्कार करून दाखविले त्यामुळे ब्रिटिश राज्यकर्ते-देखील चकित झाले. प्रभातफेऱ्या काढून, राष्ट्रभक्तीची गीते गाऊन, परदेशी कापडाच्या दुकानावर पिकेटिंग करून, परदेशी कापडाच्या होळ्या करून स्त्रियांनी जनमानसात जागृतीची ज्योत पेटवली होती. स्वयंपाकघरासारख्या निरुपद्रवी ठिकाणी सायक्लोस्टाईल मशीन्स ठेवून गुप्त हस्तपत्रके छापण्याचे आणि नंतर वाटण्याचे काम त्या करीत. हजारो लाखो ज्ञात-अज्ञात महिलांच्या बलिदानानं स्वातंत्र्य सूर्याला लालिमा आणून दिला.

पण गेल्या ४० वर्षांत त्यांना काय मिळाले ? भारतीय स्त्रीजीवनात स्वातंत्र्या-नंतर कोणतं परिवर्तन घडून आलं ? कोणती स्वप्नं त्यांच्या डोळ्यांपुढं होती ? त्यांची परिपूर्ती कितपत झाली ? मला आठवतंय, स्वातंत्र्य आलं म्हणजे समृद्धता येणार, सुखशांतीचे वातावरण निर्माण होणार हे समीकरण सर्वांनी मांडलं होतं.

ज्या ज्या गोष्टींची चणचण भासत होती ते सारं इंग्रजांनी लुटलं ही

भारतीयांची समजूत. ते गेले की मग आबादीआबाद. प्रगतीच्या मार्गातला अडसर दूर होणार. स्वातंत्र्याच्या किमयेची प्रत्येकजण उत्सुकतेनं प्रतीक्षा करीत होता. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जीवनावश्यक वस्तूंची जी विलक्षण चणचण भासत होती आणि महागाईने जो उच्चांक गाठला होता तो नाहीसा होणार हे स्वप्न सर्वसामान्य गृहिणी पाहात होती. पण ते ठरलं मृगजळ.

स्वातंत्र्य आलं त्यामुळं स्त्रीजीवन कितपत उजळून निघालं ? खेडोपाडीच्या महिलांच्या जीवनात काय परिवर्तन झाले ? पडदापद्धतीत फरक ? छे ! आज खेड्यात लग्नानंतर ४० वर्षांत घराचा उंबरठा ओलांडू न शकणाऱ्या, जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा भोगणाऱ्या 'महिला' भेटतात. रोगराईबद्दलचे घोर अज्ञान, अंधश्रद्धा आणि रूढी ठाण मांडून बसल्या आहेत. देवीसारख्या भयानक संसर्ग-जन्य रोगानं पछाडलेल्या रोग्याच्या बिछान्यावर बसण्याचा आग्रह करणाऱ्या, तिथंच चहा-सरबताचा आग्रह करणाऱ्या भगिनी आढळतात. त्यांच्या आतिथ्याचा स्वीकार केला नाही तर त्यांच्या गरिबीचा किंवा जातीचा अपमान केल्यासारखं त्यांना वाटतं. 'काला अक्षर भैसबराबर' अशी परिस्थिती बहुतेक खेड्यांत आहे:!

खेड्यांतल्या भगिनींनी आपले शरीरधर्म केव्हा आणि कुठे उरकायचे हा त्यांच्यापुढे प्रश्न असतो. दौऱ्यावर असताना खरी कसली अडचण जाणवत असेल तर बंद न्हाणीघर आणि शौचकूप यांची. तो प्रसंग कसाबसा निभावून न्यावा लागतो. कधीमधी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत शरीरधर्म रोखून धरावे लागतात. त्यात स्त्रीची मासिक अडचण असली तर मरणच. मोठमोठी धरणं झाली. पोलादाचे कारखाने झाले. अणुशक्तीची केंद्रं उघडली. पण स्वातंत्र्यानंतर खेड्यातल्या स्त्रीची साधी गरज अद्याप भागली नाही. गेल्या ४० वर्षांत या परिस्थितीत एक रेसभरही बदल नाही.

तीच गोष्ट पाणवठ्याची. किती दूरवरून पाणी आणावं लागतं स्त्रियांना, याची कल्पना खेड्यात गेल्याखेरीज येणार नाही. उन्हाळ्यात पाणी आटल्यावर तर पुरते हाल. नवप्रसूत मातांचे, गरोदर स्त्रियांचे किती हाल होत असतील ? मोठमोठ्या प्रकल्पांपेक्षा या जीवनावश्यक गरजा भागल्या तर ? पंपिंग सेटस् बसवले तर ? ट्यूबवेल्स केल्या तर ? ग्रामपंचायती, जिल्हापंचयती आपसातील लाथाळ्या थांबवतील अन् ह्या निकडीच्या प्रश्नांकडे लक्ष देतील तर ?

गांधीजी हरिजन वस्तीत, भंगी वस्तीत राहात. त्यांच्या पेपरचं नावच होतं

'हरिजन', पण स्वातंत्र्योत्तर काळात हरिजन आदिवासी स्त्रियांची काय दुर्दशा आहे! वर्णनापलीकडे! जंगलात लाकूडफाटा आणायला जावं तर फॉरेस्ट ऑफिसर्सचा बडगा. तरुणीच्या शीलाचा तर हमखास बळी. विड्यांसाठी पानं तोडावी, शहरात आणण्यासाठी सारी खटपट करावी तर तिकीट नसल्यामुळे रेल्वे पोलिस पकडणार. तिकीट विकत घ्यायला पैसे कुठले? नाहीतर मैलोन् मैल पायपीट करावी लागते. या साऱ्या यातायातीनंतर दिवसाकाठी पदरात काय पडणार? २॥–३ आणे (२० पैसे) कसं भागावं? अत्याचारांना सदैव सामना करावा लागतो. पाणवठ्यावर बंदी. कधी नग्न मिरवणूक. दारिद्र्य पाचवीला पुजलेलं. कुठलं स्वातंत्र्य? ह्या निबिड अंधकारात त्याचा किरणही पोचलेला नाही. उलट बाहेरून येणाऱ्या ग्रामसेविकांचादेखील गावगुंड बळी घेतात.

शहरात मारे स्त्रियांच्या सभा-संघटना असतात, परिषदा होतात, शिष्टमंडळे परदेशी जातात, ठराव पास होतात, पण बराचसा भाग म्हणजे उच्चस्तरीय भगिनींच्या मनोविनोदनाचाच आणि अहंकारपूर्तीचाच भाग. खऱ्या समाजसेवेची कळकळ त्यामागे नाही. बहुसंख्य महिला संस्थांना दीन-दलितांचे अश्रू दिसतच नाहीत. उदा० पोटापाण्याच्या उद्योगासाठी शहरात येणाऱ्या, शिक्षण घेण्याच्या उद्देशानं किंवा नोकरी व्यवसायासाठी भगिनींनी राह्यचं कुठं हा त्यांच्यापुढचा प्रश्न. नातेवाइकांकडे मिंधं जीवन जगत. त्यांच्यासाठी होस्टेल्स नकोत का? समाजात एकेकट्या स्त्रीनं राहणं सुरक्षित नाही. त्यांच्यासाठी शासनानं, स्त्री-संस्थांनी लक्ष घालायला नको का?

दुसऱ्या महायुद्धाच्या काळापासून भडकलेला महागाईचा भस्मासुर नष्ट होण्याचा काही मार्ग दिसत नाही. प्रत्येक गरीब कुटुंबाची होते आहे त्यात होळी. वाढत्या महागाईला तोंड देण्यासाठी बाहेर पडलेली नोकरी करणारी स्त्री कोणाजवळ पोर टाकणार? नात्याचं वडिलधारं माणूस असलं तर बरं, नाहीतर पुरते हाल. मोलकरीण मिळत नाही. कामाच्या ठिकाणी शिशुगृह नाही, दुपारच्या जेवणाची सोय नाही. परिणामी ह्या स्त्रीचं मन द्विधा, तिच्या एफिशियन्सीवर परिणाम. कामाचं नुकसान. विवाहित स्त्रिया नोकरीवर नकोत असं काही कंपन्या म्हणतात. त्याच्या मागचं कारण हेच. पण तिच्या अडचणी दूर करण्याची काही सोय नाही. घटनेनं प्रत्येकाला काम करण्याचा अधिकार दिलाय, पण तो असा हिरावून घेतला जातो.

घटनेनं भारतीय स्त्रीला मतदानाचा हक्क मिळाला आहे. त्यासाठी तिला सफ्रेजेट चळवळीसारखी तीव्र चळवळ करावी लागली नाही. पण मतदानाचा हा अधिकार ती कितपत वापरू शकते ? " ते म्हणतील तसं करू. " हे स्त्रीचे उद्‌गार तर " बायांना काय कळतं हो ! त्यांचं कसलं मत न् बीत ? " ही उपेक्षेचीच भावना पुरुषांमध्ये वास करते.

हिंदू कोड बिलानं पित्याच्या मिळकतीत स्त्रीला वाटा दिला. पण ती तो कुठं उपभोगू शकते ? माहेरचा आधार तुटायला नको, भावाशी भांडण नको ही तिची भूमिका. सख्खा भाऊ नसला तर चंद्राला ओवाळणारी भावडी बहीण.

घटस्फोटाचा अधिकारदेखील कायद्यानं तिला मिळाला आहे. आता लाजिरवाण्या सौभाग्याचा गळफास नको. पण घटस्फोटाचा कायदा इतका कठीण आहे की, कोर्टकचेऱ्यांत सारा यौवनाचा फुलोरा कोळपून जायचा. पुन्हा नवं घरकुल वसवायला मानसिक आणि शारीरिक शक्तीच उरायला नको. अशी आहे ह्या कायद्याची कात्री. कॅथलिक भगिनींना घटस्फोटाची परवानगी नाहीच तर मुस्लिम भगिनींच्या शिरावर ' तलाक 'ची तरवार सारखी टांगलेली. बहुपत्नीकत्वाचा धोका सदैव उभा.

गर्भपाताचा कायदा हा स्त्रीला दिलासा आहे. (पण गर्भपाताच्या कायद्याचा फायदा खिश्चन आणि इस्लाम भगिनी घेऊ शकत नाहीत.) कुटुंबनियोजना-खेरीज स्त्रीचं जीवन व्यर्थ आहे. या भयानक महागाईच्या खाईत वर्षाचा पाळणा हा वर नसून शाप ठरतो. निरोगी प्रजा आहे कुठं ? हवा दूषित, पाणी दूषित, औषधं बनावट. असं सारं जीवन ग्रस्त झालंय.

हुंडाप्रतिबंधक कायदा झाला. पण प्रत्यक्षात हुंड्याचं प्रमाण वाढतंय. लग्न-समारंभावरचा खर्च वाढतोय. साखरपुड्याचंच आता मिनी मॅरेज झालंय. स्वातंत्र्य चळवळीच्या वेळी वाटलं आता साधी राहणी अन् उच्च विचारसरणी येणार. विषमतेचा वृक्ष मुळापासून उपटला जाणार. पण झालं उलटंच. या विष-वृक्षाचा विस्तार वटवृक्षासारखा पसरतोय. सामाजिक आर्थिक सर्व क्षेत्रांतील विषमता शिगेला पोचली आहे. मनात येतं, " काय याचसाठी केला होता अट्टाहास. " त्या काळी हरिजन वस्तीत जाऊन सेवा करणाऱ्या, लाठ्या खाणाऱ्या, स्वातंत्र्य-चळवळीत कारावास भोगणाऱ्या, स्वातंत्र्यलढ्यात पित्याच्या, पतीच्या वा पुत्राच्या जीवनाचा होम झालेला पाहणाऱ्या स्त्रिया आज अवाक

होऊन पाहताहेत. पद्मश्री कुणाला ? समाजसेविका कोण ? आमदारक्या, खासदारक्या कुणाला ? मंत्रिपदे कुणाला ? प्रत्यक्ष लढणारे कुठे गेले ? अन् लोणी खायला कोण आले ?

भारताची आर्थिक प्रगती होऊन स्वातंत्र्योत्तर काळात भारताला आंतरराष्ट्रीय क्षेत्रात मानाचं स्थान मिळणार हे स्वप्न. आज दुसऱ्या महायुद्धात भस्मसात झालेल्या जपानची प्रगती विलक्षण आश्चर्यकारक आहे. आमचं पोलाद, कोळसा इ. चे उत्पादन चीन, जपान, रशिया, अमेरिका सर्वांच्या खाली. घरोघर बेकारी, हताश तरुण आत्महत्येला प्रवृत्त होतात. ब्रेन ड्रेन होतोय. गिरण्या बंद होताहेत, कारखान्यात टाळेबंदी. कुटुंबियांनी काय करावे ?

भारतातील अंतर्गत वातावरण अधिकाधिक दूषित होतंय. प्रांताप्रांतातले सौहार्द लोपलंय. लाल-बाल-पाल ही त्रयी भारताला स्फूर्तिदायक वाटत होती. भगतसिंगाची फाशी, जतींद्रनाथांचा कारावासात प्रदीर्घ उपोषणानंतर मृत्यू, स्नेहलतेची आत्माहुती ह्या घटना अखिल भारताला हालवून सोडत. बंगभंगाच्या चळवळीचे सूत्राधार होते लोकमान्य, महात्माजी, नेताजी, पंडितजी. ह्या नेत्यांना प्रांतिक रंग नव्हता. ते साऱ्या भारताचे नेते होते. आज सीमातंटे, नदीच्या पाण्याचे तंटे, कारखाने काढण्यावरून तंटे सर्वत्र माजले आहेत. प्रांतिक विद्वेषाचे विष पसरवणारे पक्ष वाढताहेत. जातिजातींतील वैमनस्य पराकोटीला पोचलंय. धार्मिक विद्वेष उफाळून येतो न् भिवंडी, अहमदाबादसारखे प्रकार घडतात. कुठली सुवर्णभूमी ? प्रतिदिनी ती रक्तलांछित होत आहे. राष्ट्रभाषेवरचं प्रेम कुठं लोपलंय ? घरोघर 'डॅडी ममी'च्या संस्कृतीचं लोण पोचलंय. त्यागाचं नव्हे; स्वार्थाचं राजकारण माजलंय. जातिधर्माच्या भिंती कोसळलेला एकसंध, समृद्ध, प्रगतीच्या दिशेनं जलद वाटचाल करणारा भारत, प्रत्येकजण उत्साहानं, उमेदीनं, चैतन्यानं नवराष्ट्र निर्मितीसाठी कटिबद्ध झालेला आहे हे होतं स्वातंत्र्यपूर्व काळातलं स्वप्न. आता ते वाऱ्यावर उधळलं गेलंय. त्या सोनेरी स्वप्नाचा झाला आहे चक्काचूर.

सती आणि धर्म

४ सप्टेंबर १९८७ रोजी राजस्थानमधील देवराला गावी झालेल्या रूपकुंवरच्या सती-प्रकरणामुळे साऱ्या देशाला एक जबरदस्त धक्का बसला. एक प्रचंड वादळ उठले. आपण एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे आहोत की प्राचीन तमोयुगात वावरतोय असा प्रश्न पडला. सती प्रथा कायद्याने नष्ट करण्याचे प्रशंसनीय कार्य लॉर्ड बेंटिंक यांनी १८२९ मध्ये केले. १८ जून १८२३ रोजी ब्रिटिश खासदार पिम् यांनी हे विधेयक ब्रिटिश पार्लमेंटमध्ये मांडले. त्यापूर्वी बेडफर्डशायर येथील नागरिकांनी व काही ब्रिटिश मिशनऱ्यांनी मानवतेच्या भावनेने प्रेरित होऊन सतीच्या अमानुष रूढीविरुद्ध एक अर्ज केला. त्या अर्जाला बंगालचे राजा राममोहन रॉय व मुंबईचे जगन्नाथ शंकरशेठ या दोन प्रतिष्ठित नागरिकांनी पाठिंबा दिला होता. ब्रिटनच्या पार्लमेंटमध्ये पिम्च्या विधेयकावर खूप गरमागरम चर्चा झाली. चर्चेच्या ओघात चितेच्या आगीपासून स्वत:ला वाचविण्यासाठी दूर दूर पळून जाऊ पाहणाऱ्या १४-१५ वर्षांच्या मुलीला पुन:पुन्हा आगीत कशा प्रकारे ढोसून लोटले जात होते अशा प्रकारची हृदयद्रावक उदाहरणे ऐकून सर्वांची मने व्यथित झाली. लॉर्ड बेंटिंकने भारतात गव्हर्नर जनरल म्हणून पाऊल टाकले ते ही क्रूर रूढी मी नष्ट करीनच करीन

अशी प्रतिज्ञा करूनच. " मानवता व न्याय या दोन्ही दृष्टींनी हा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. त्यामुळे जे परिणाम मला भोगावे लागतील ते भोगण्यास मी सिद्ध आहे. " अशी भूमिका लॉर्ड बेंटिंकने घेतली. विद्वान पंडितांबरोबर चर्चा करून अखेर त्याने हा कायदा केला. त्यामुळे कित्येक दुर्दैवी स्त्रियांचे प्राण वाचले. नाहीतर दर वर्षी ८००-९०० स्त्रिया सतीच्या नावाखाली नाहक जाळल्या जात असत.

या क्रूर प्रथेचे मूळ या भावनेत आहे की मानवाला मृत्यूनंतर परलोकात-देखील सर्व उपभोग्य वस्तूंची गरज असते, म्हणून त्याची पत्नी, नोकरचाकर, हत्तीघोडे या सर्वांचा त्यात समावेश करण्यात येई. प्राचीन इजिप्तमध्ये राजा-समवेत या सर्वांना पुरून टाकत किंवा ग्रीक आणि सीथियन्स राजांच्या मृत्यु-समयी या सर्वांना जिवंत जाळून टाकत. सतीप्रथा हा त्याचाच अवशेष आहे. आता यापैकी फक्त पत्नी तेव्हढी शिल्लक राहिली. तिला पतीच्या चितेवर जिवंत जाळले जाऊ लागले. कारण ती त्याची अर्धांगी ना? या मागचे तर्कशास्त्र असे की—

" मृतोऽपि बांधवः शक्तो नानुगन्तुं प्रियं जनम्।
जायावर्जं हि सर्वस्य याम्यः पंथा विरुध्यते ॥ "

वस्तुतः पाहता हिंदू धर्मग्रंथात असा काही आदेश नाही की, विधवेने मृत पतीच्या चितेवर जळून भस्म झाले पाहिजे. ऋग्वेद-यजुर्वेदात सतीचा उल्लेख-देखील नाही. अथर्ववेदातील एका उल्लेखावरून मात्र सतीप्रथेचा काय अवशेष राहिला होता याची आपल्याला कल्पना येते.

" इयं नारी पतिलोक वृणुत्वा निपद्यते उपत्वा मर्त्यप्रेतम्।
धर्मं पुराणमनुपालयन्ती तस्य प्रजा द्रविणंच ह धत्र ॥ "

किंवा तैत्तिरीय आरण्यक अथवा गृह्यसूत्रातही जो उल्लेख आहे तो असा की पतीच्या चितेजवळून विधवेला तिचा दीर, पतीचा शिष्य किंवा वृद्ध सेवक परत आणत असे व त्यानंतर तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी सर्वजण प्रार्थना करीत असत.

" तामुत्थापयेद्देवर पतिस्थानीयोऽन्तेवासी जरद्दासो
वा उदीर्ष्व नारि अभिजीवलोकम् इति । " गृह्यसूत्रम्

विधवा आपल्या मृत पतीच्या हातातून धनुष्य, सोने किंवा रत्ने घेऊन चितेवरून परत येत असे आणि नंतर आपल्या दिराबरोबर विवाह करीत असे. या प्रथेचे उदाहरण आहे विदुषी ममतेचे. तिचे पती उचत्थ ऋषी. त्यांना एक जन्मांध पुत्र होता. त्याचे नाव दीर्घतमा. उचत्थ ऋषींच्या निधनानंतर ममता सती जाणार होती परंतु तिच्या दिराने, बृहस्पतीने तिला चितेवरून परत आणून तिच्याशी विवाह केला. या दांपत्याला झालेला पुत्र म्हणजे भरद्वाज. ममतेचे दोन्ही पुत्र मोठे विद्वान होते. याचाच अर्थ असा की त्या काळी विधवेवर सती जाण्याची सक्ती न करता तिला पुनर्विवाह करण्याची अनुमती होती. परंतु पुढे धर्ममार्तंडांनी विधवांवर अशी काही भयंकर बंधने घातली की, त्यांचे जीवन घोर अंधारात बुडून गेले. त्यांना जगणे अशक्य होऊन बसले. धर्मपंडितांनी निर्दयतेची परिसीमा गाठली. एखाद्या मुलीचा विवाह ठरला, नुसता वाङ्निश्चय झाला आणि तिचा नियोजित पती निधन पावला तरी तिला लग्न करण्याची परवानगी नसे. तिने सारे आयुष्य विधवेप्रमाणे जगावे अशी अपेक्षा असे. विधवेचे जीवन म्हणजे अभिशप्त जीवन. तिचे दर्शन अशुभ मानत. तिला अलंकारविहीन, एकवस्त्रा, एकभुक्ता राहावे लागे. तिचे सक्तीने केशवपन करण्यात येई म्हणजे तिचे नैसर्गिक सौंदर्य हिरावून घेऊन तिला कुरूप बनविण्यात येई. मग ती एखादी अबोध बालिका का असेना. त्या काळी बालविवाहाच्या प्रथेमुळे अनेक मुलींवर लहान वयातच वैधव्याची कुऱ्हाड कोसळे. त्यांना संपत्तीचा अधिकार नव्हता, शिक्षणाचा गंध नव्हता, की पुनर्विवाहाची परवानगी नव्हती. उलट पुरुष विधुर झाले, त्यांचे वय ७०-८० वर्षांचे असले (अवघे पाऊणशे वयमान) तरी त्यांना अनेक वेळा विवाह करण्याची परवानगी होती, मुभा होती, कारण सर्व धर्मग्रंथांचे लेखक होते पुरुष. स्त्रियांच्या भावना समजावून घेण्याची त्यांना गरजच भासली नाही, पण पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, आगरकर, जोतिबा फुले यांसारखे पुरुषमात्र अपवाद ठरले. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागरांच्या प्रयत्नांनीच १८५६ साली विधवांच्या पुनर्विवाहाचा कायदा पास झाला. कायदा पास झाला खरा पण प्रत्यक्ष पुनर्विवाह करण्याचे धैर्य किती लोकांत होते ? भारतरत्न महर्षी कर्वे यांच्यासारखे सच्चे समाजसुधारक कितीसे असणार ? त्यांनी मात्र विकेशा

विधवेशी विवाह करून समाजाच्या रोषाला हिंमतीने तोंड दिले. एरव्ही एवढे धाडस कोण करणार ?

सतीप्रथेला अनेक धर्मपंडितांनी, विद्वानांनी विरोध केला आहे. मेधातिथीने मनुस्मृतीवर भाष्य करताना म्हटले आहे की, अंगीरस स्मृतीमध्ये या प्रथेचा उल्लेख आहे पण तिचा अधिकृत म्हणून स्वीकार करता येत नाही, कारण ती वेदसंहितेच्या विरुद्ध आहे. वेदांत सर्व प्रकारची आत्महत्या वर्ज्य करण्यास सांगितले आहे.

" पुंवत्स्त्रीणामपि प्रतिषिद्ध आत्मत्यागः ।.... किं च तस्मादुह न परायुषः प्रेयादिति प्रत्यक्ष श्रुतिविरोधोऽयम् अतोऽस्यव पतिमनुमरणे स्त्रियाः प्रतिषेधः । " मेधातिथी.

विराटाने अतिशय कडक शब्दांत या प्रथेवर टीका केली. त्याच्या मते पती जिवंत असेपर्यंत पत्नीने त्याचे अनुसरण करावे. मृत पतीचे नव्हे. तिने पतीबरोबर सहगमन केले तर तिला आत्महत्येचे पाप लागेल.

" अनुवर्तेत जीवन्तं न तु यायान्मृतं पतिम् ।
जीवद् भर्तृहितं कुर्यान्मरणादात्मघातिनी ॥ "

सातव्या शतकातील सुप्रसिद्ध कवी बाणभट्टाने या कुप्रथेवर अक्षरशः झोड उठविली. त्याच्या मते आपल्या प्रियतमाच्या मृत्यूनंतर मरणे अगदी निष्फळ आहे. त्या क्षणी भावनावेगाच्या भरात अशी चूक होऊ शकते. मनुष्य असा अविचार घाईघाईने करतो. ही अक्षम्य चूक आहे. तिच्यामुळे मृत व्यक्तीला काहीही लाभ होत नाही. त्याची स्वर्गात पोचण्याची सोय होत नाही की पत्नी सती गेल्यामुळे त्याच्या नशिबाच्या नरक यातना वाचत नाहीत. मृत्यूनंतर मीलनाची काही शक्यताच नाही. मृत व्यक्ती आपापल्या कृतकर्मानुसार नेमलेल्या जागी जाऊन पोचते. त्याच्याबरोबर चितारोहण करणारी स्त्रीमात्र आत्महत्येच्या पापाची धनी होते व अशा पापासाठी निश्चित केलेल्या नरकात जाऊन पडते. उलट जिवंत राहून ती स्त्री आपल्या व मृत पतीच्या परलोकातील सुखप्राप्तीसाठी तर्पण करू शकते. त्याच्या समवेत मरण पत्करून दोघांना काहीही लाभ होत नाही.

" यदेतदनुमरणं नाम तदतिनिष्फलम्....जीवंस्तुजलाञ्जलिदानादिना बहू-

पकरोत्युपरतस्यात्मनश्च मृतस्तु नोभयस्यापि।"

कादंबरी, पूर्वार्ध, पृ. ३०८

देशाच्या काही भागात, विशेषत: काश्मीरसारख्या प्रदेशात त्या काळी सती-प्रथेचा जो गौरव होत होता तो पाहून कादंबरीकार बाणभट्टाचे हृदय तडफडू लागले. म्हणून त्याने सतीप्रथेला जोरदार विरोध केला. तंत्रलेखकदेखील या मोहिमेत सामील झाले. त्यांनी म्हटले आहे की स्त्री ही सर्वोच्च देवतेची मूर्ती आहे आणि तिला पतीच्या शवाबरोबर चितेवर जाळणारे लोक कायमचे नरकात जातील. हे विचार त्यांनी महानिर्वाणतंत्रात मांडले आहेत.

"भर्त्रासह कुलेशानि न दहेत्कुलकामिनीम्।
तवस्वरूपा रमणी जगत्याच्छन्नविग्रहा॥
मोहाद् भर्तुश्चितारोहाद् भवेन्निरयगामिनी॥"

महानिर्वाणतंत्र, १०, ७९-८०

बाराव्या शतकातील देवभट्ट नावाच्या दक्षिण भारतातील प्रसिद्ध लेखकाने असे लिहिले आहे की, सतीप्रथा हा अगदी हीन प्रतीचा धर्म आहे. आणि कुणीही:या प्रथेचा अवलंब करू नये.

"तद्धर्मान्तरमपि ब्रह्मचर्यधर्माज्जघन्यं निकृष्टफलत्वात्।"

अशा प्रकारे वेदांत, ब्राह्मणात, आरण्यकात, गृह्यसूत्रात वा मनुस्मृतीत या प्रथेचा कुणीही गौरव केलेला नाही. उलट तिला कसून विरोधच केलेला आहे. नवव्या शतकापासून लढवय्या जमातीत या प्रथेला पुनश्च प्रारंभ झाला. आपल्या स्त्रियांची आपल्यामागे विटंबना होऊ नये, राणीला दासी बनावे लागू नये; तिचा अपमान होऊ नये या उद्देशाने कदाचित पुन्हा ही प्रथा सुरू झाली असावी. प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पनेने प्रेरित होऊन पुढे प्रत्येक जातीत या प्रथे-संबंधी स्पर्धा सुरू झाली. समाजात या प्रथेला प्रतिष्ठा प्राप्त झाल्यावर धर्मपंडितांनी तिचा उदोउदो सुरू केला. अंगीरस स्मृतीत म्हटले आहे की,

"साध्वीनामि नारीणामग्नि प्रपनाहते।
नान्यो धर्मोऽसि विज्ञेयो मृते भर्तरि कुत्रचित्॥" १·८७

हरित असे म्हणतो की पत्नीने स्वत:ला मृत पतीच्या चितेवर जाळून घेतले तर ती त्याला महाभयंकर पापांपासून वाचवते व त्यानंतर साडेतीन कोटी वर्षे त्याच्या समवेत सुखाने स्वर्गात वास करते.

" तिस्रः कोट्यर्धकोटीच यानि रोमाणि मानुषे।
तावत्कालं वसेत्स्वर्गे भर्तारं यानुगच्छति ॥ "

वृद्धहरित म्हणतात--

" ब्रह्मघ्नं वा सुरापानं वा कृतघ्नं वापि मानवम्।
यमादाय मृता नारी सा भर्तारं पुनाति हि ॥

म्हणजे पती कितीही दुष्ट असो, पापी असो, पत्नीने त्याच्याबरोबर सहगमन केल्यावर त्याचा उद्धार होतो.

पराशरस्मृतीतील एका प्रक्षिप्त श्लोकात असे म्हटले आहे की गारुडी ज्याप्रमाणे नागाला बिळातून ओढून काढतो त्याप्रमाणे विधवा सती गेल्यावर आपल्या पतीला नरकातून बाहेर काढून त्याच्याबरोबर स्वर्गात वास करते.

" व्यालग्राही यथा व्यालं बिलादुद्धरते बलात्।
एवमुद्धृत्य भर्तारं तेनैवसह मोदते ॥ "

IV, ३१-३२

हा श्लोक प्रक्षिप्त वाटण्याचे कारण यापूर्वीच्या दोन श्लोकांत पराशराने विधवांना पुनर्विवाहाची अनुमती दिलेली आहे.

स्त्रीने व्यभिचारी जीवन व्यतीत केले असले आणि पतीच्या मृत्यूनंतर काश्मीरच्या जयमती नावाच्या राणीप्रमाणे ती सती गेली तरी देखील तिला व तिच्या पतीला नक्कीच स्वर्गात स्थान मिळेल, मग ही सती स्वेच्छेने नव्हे तर जबरदस्तीने गेली असली तरी हरकत नाही.

" अवमत्य तु या पूर्वं पतिं दुष्टेन चेतसा।
वर्तन्ते याश्च सततं भर्तृणां प्रतिकूलतः ॥
भर्त्तानुमरणं काले याः कुर्वन्तिं तथाविधाः।
कामात्क्रोधात् भयान्मोहात्सर्वाः पूता भवन्तिह ॥ "

याचा अर्थ असा की पती पापी असला तरी तिनेच सती जायला पाहिजे, स्वत: स्वैरिणी असली तरी ती पतिचितेवर जळून पवित्र होणार. स्वर्गनरकाच्या या कल्पनांनी जिवंत स्त्रियांना धडधडत्या चितेत लोटून देण्यात आले. जे धर्म-मार्तंड असे म्हणत होते की विधवेला पतीच्या चितेवर भस्मीभूत होण्याखेरीज दुसरा मार्ग नाही, त्यांनी आपले एक बोट तरी अग्नीच्या भडकत्या ज्वालेवर धरून होणाऱ्या वेदना कधी अनुभवल्या होत्या का? आपल्या लेखणीच्या एका फट-काऱ्यासरशी त्यांनी जिवंत स्त्रियांना सरळ अग्निकुंडात ढकलून दिले. वा रे! यांची कामगिरी! कुणी स्वर्गनरक कधी प्रत्यक्ष पाहून परत आला होता का? भोळ्याभाबड्या स्त्रियांची दिशाभूल करून त्यांना असह्य यातना भोगायला लावणारा हा कुठला धर्म? सारे धर्ममार्तंड पुरुष होते म्हणून त्यांनी स्त्रियांनाच सती जाण्याचा आदेश दिला. आपल्या मृत पत्नीच्या चितेवर पतीनेदेखील सती जावे अशी आज्ञा त्यांनी का दिली नाही?

जे लोक म्हणतात की स्त्रिया स्वेच्छेने सती जात त्यांनी या प्रश्नांची उत्तरे द्यावीत की मग सतीची चिता खोल खड्ड्यात का रचण्यात येई? तिला पळून जाता येऊ नये म्हणून? तिला एका खांबाला का बांधून ठेवण्यात येई किंवा तिचे पाय का जखडून ठेवण्यात येत? जळत्या ज्वालांतून तिला निसटता येऊ नये म्हणून? आणि पळून जाण्याचा प्रयत्न केला तर लांब लांब बांबूंनी त्या अभागी जीवाला परत चितेत का ढकलण्यात येई? तिच्या करुण किंकाळ्या ऐकून कुणाच्या हृदयाला पाझर फुटू नये म्हणूनच ना ढोल नगारे जोरजोरात बडविण्यात येत? सतीच्या चितेभोवती नंग्या तलवारीचा पाहारा का असे? तिने पळण्याचा प्रयत्न केल्यास तिचा शिरच्छेद करण्यासाठी की तिचा प्राण वाचवायला कुणी पुढे आल्यास त्याला शिक्षा करण्यासाठी? सती जाणाऱ्या स्त्रीला मादक द्रव्ये पाजून जवळजवळ बेशुद्ध का करण्यात येई? काही ठिकाणी सतीच्या चितेवर लाकडी मंदिर बांधण्यात येई ते का? म्हणजे आग लवकर भडकून तिच्या डोक्यावर जळत्या लाकडांचा भार ढासळून त्याखाली तिने दबून जावे म्हणून? तिला उठताच येऊ नये? आणि ती स्त्री कर्मधर्मसंयोगाने या सतीच्या अग्निदिव्यातून निसटण्यात यशस्वी झालीच तर तिला कुटुंबातून व जाती-तून बहिष्कृत का करण्यात येई? पतीच्या दृष्टीने तिला मृत का समजण्यात येई? स्मशानाभोवती जमलेल्या साऱ्या जातीच्या लोकांना या गोष्टीचा अगोदरच

सुगावा लागला की ह्या स्त्रीवर सती जाण्याची सक्ती होत आहे तर ते त्या स्त्रीला आपल्याबरोबर घेऊन जात ते का ?

इंग्रज अधिकाऱ्यांनी अशा अभागी स्त्रियांचे प्राण वाचवले होते याचा पुरावा मनूचीने दिला आहे. २३ जुलै १८४२ रोजी मोगलाईतील जालनापूर गावची घटना काय सांगते ? तीन दिवस दाहसंस्कार रोखून ती महिला सती गेल्यास साऱ्या गावाला फाशी देण्यात येईल, जबाबदारी साऱ्या गावाची राहील अशी धमकी देणारा इंग्रज अधिकारी त्या स्त्रीचे प्राण वाचवू शकला ना ? अशाच एका इंग्रज अधिकाऱ्याने पेटत्या वस्त्रानिशी नदीत उडी टाकून जीव वाचवू पाहणाऱ्या स्त्रीला आपल्या घोड्यावर उचलून घेऊन तिचे प्राण वाचविले. आजन्म तिचे संरक्षण केले. सांभाळ केला. या घटनेवर सुप्रसिद्ध लेखक माडगूळकर यांनी ' सती ' नावाचे नाटक लिहिले आहे.

हुमायून आणि अकबर या मोगल सम्राटांनी सतीप्रथा बंद करण्यासाठी ठिकठिकाणी अधिकारी नेमले. दाहसंस्कारासाठी सरकारी परवाना घेण्याची सक्ती केली. याचा अर्थ असा की मोगल शासक असोत वा इंग्रज अधिकारी त्यांनी हिंदू महिलांना या भयंकर क्रूर रूढीपासून वाचविण्याचा मनापासून प्रयत्न केला आणि आमच्या रूढिप्रिय, संकुचित विचारांच्या काही पंडितांनी स्त्रियांच्या जीवनाचा अत्यंत निर्दयपणे अंत केला. आत्मसन्मानाच्या नावाखाली समाजातील काही जमातींनी कधी नवजात बालिकेला जिवंतपणी खड्ड्यात पुरून टाकले तर कधी खड्ड्यातील दुधात बुडवून ठार मारले. कधी मातेचे पहिलेच स्तनपान विषारी देऊन असंख्य बालिकांचा जीव घेतला. कुपोषणाने कित्येक मुली मृत्युमुखी पडतात तर हुंड्याच्या नावाखाली अनेक निष्पाप तरुणींचे नित्य बलिदान होते. हे कमीच होते म्हणून आता सतीप्रथेचे पुनरुज्जीवन करून स्त्रियांच्या हत्येसाठी नवे हत्यार पाजळले जाते आहे ? पण इतके सारे करायची गरजच काय ? गर्भजलाची परीक्षा हे मोठे अमोघ शस्त्र शास्त्रज्ञांनी हाती दिलंय् ना ? त्याचा वापर केला की झाले. मातेच्या गर्भाशयातच बालिका गर्भाचा गर्भपात करून ध्यावा म्हणजे पुढच्या साऱ्या कटकटीतून सुटका. भारतीय संस्कृतीचा केव्हढा हा गौरव. एका बाजूला म्हणायचे की " यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता ". तिचा गृहलक्ष्मी, गृहदेवता इत्यादी बिरुदे लावून सन्मान. बुद्धीची देवता सरस्वती, संपत्तीची लक्ष्मी, शक्तीची दुर्गामाता म्हणून देवतांच्या

मूर्तीची पूजा करावी आणि दुसऱ्या बाजूला हाडामासाच्या जिवंत स्त्रियांचे बलिदान करावे. खरोखरच आमची संस्कृती किती महान. अखिल विश्वात तिचा गौरव केला पाहिजे. जगातील मानवाला शास्त्रज्ञ वायुयानातून चंद्रावर व इतर ग्रहगोलावर पाठवताहेत आणि आमचे रूढिप्रिय, अंधश्रद्धावादी सनातनी धर्ममार्तंड व समाज अग्निशिखेद्वारे महिलांना स्वर्गलोकी पाठविण्यास सज्ज आहेत! धन्य हा समाज, हा धर्म व ही संस्कृती!

इंग्रज शासक व मुसलमान शासक स्त्रियांचे प्राण वाचवू शकले तर स्वतंत्र भारतातील शासकांना व नागरिकांना रूपकुंवरचे प्राण वाचवायला काय हरकत होती? भविष्यकाळी पुन्हा एखादी रूपकुंवर सती जाणार नाही यासाठी काय व्यवस्था होणार? महिला संघटना यात पुढाकार घेणार? की आपल्या लेकी-सुनांना सती मंदिरात नेऊन त्यांनाही त्याच मार्गाचे अनुसरण करायला प्रतिज्ञा घ्यायला लावणार? नवयुवकांची सेना हे विष समाजात पसरू नये म्हणून जबाबदारीचा कोणता वाटा उचलणार? हे सारे प्रश्न आज देशापुढे आ वासून उभे आहेत.

•

REFBK-0025765

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
वर्ग ३९२
नोंदणी क्र. २५७६५
२५/१२/८९

श्रीविद्या
प्रकाशन